५.२८४

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
काव्य

संग्रहालय क्रमांक
१८८

लेखक मयूरकविकृत

सन
३८८

पुस्तकाचें नांव भारत - भाग २

सनयांची[1] चिंता बुध न करिति जैसी तसीच अनयांचा ५॥
पाहुनि उत्पातातें बहु तज्ज्ञ[2] सकंप-काय[3] होतात " ॥
हें ऐकुनि भूप ह्मणे "होणार चुकेल काय हो तात "॥३॥
भगवान् मुनिवर गेला पुत्राला सूचवूनि भाव्यर्था[4] ॥
कीं न तयाची व्हावी चिंता-शोकें-करूनि भा[5] व्यर्था॥ ७॥
जाऊनि कुरु-क्षेत्रीं दुर्योधननृपति-निकट राहूनी ॥
संजय नृपाकडे ये भीष्म-निपतनांत[6] युद्ध पाहूनी ॥ ८ ॥
धृतराष्ट्रासि ह्मणे " जी संजय मी वंदितों तुह्मां परिसा ॥
अद्भुत झालें, वधिला त्वत्तात शिखंडिनें, गजें हरिसा"॥९॥
नृपति ह्मणे "अनृत कसें झालें? स्वाधीन मृत्यु होता तें॥
फिरलें अदृष्ट? अथवा त्यजिलें कोदंड काय हो तातें? ॥१०॥
शिवलीं शिखंडि-शस्त्रें कैसीं? गुरु देव विप्र मत्तातीं[7] ॥
नित्य प्रसन्न, कीं हो स्पर्शावीं स्पष्ट विभ्रमत्ता तीं॥ ११ ॥
रामासहि न मिळालें हें यश, भुवनांत जो असामान्य॥
हा पांचाळ शिखंडी आहे द्रुपदासि सुत असा मान्य॥१२॥
बा तूं महानिरंकुश[8] लिहिलें ऐसें कसें अगा धात्या ॥
हा गोष्पदीं बुडावा लंघुनि रामार्णवा[9] अगाधा त्या ॥१३॥
हा भृगुपति-वर-विद्या- सर्वस्व-निधान-धनप[10] हा तात ॥

१ सह नय-न्यायनिष्ठांची. २ उत्पातज्ञ. ३ कंपयुक्त देह ज्यांचा ते. ४ भविष्याला. ५ तेज. ६ भीष्माचें पतन होईपर्यंत. ७ अति उन्मत्ताला. ८ ज्याला कोणाचाही प्रतिबंध नाहीं तो. ९ परशुरामरूप समुद्रास. १० रामाच्या श्रेष्ठ अशा विद्यारूप सर्व धनाचा जो कोश तेणेंकरून धनवत्तर अशा हे भीष्मा.

॥ श्री ॥



# श्रीमयूरकविकृत भारत.

भाग २.

## उद्योगपर्व–भीष्मपर्व–द्रोणपर्व.

बाबाजी अनंत तेंडुलकर,
यांनीं आपल्या
"श्रीहरिवरदा" छापखान्यांत छापिलें.
मुंबई.

१८९१.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. २८८
ठाणे

॥ श्री ॥

# भारत.

[ उद्योगपर्वांतील आर्या. ]

## अध्याय पहिला.

### सारांश.

उप

: नगरामध्यें पाण्डव असतां सभेमध्यें श्रीकृष्ण बोलला
वांनीं प्रतिज्ञेप्रमाणें वनवास व अज्ञातवास संपविला.
धनानें यांचा राज्यार्धभाग यांस द्यावा, असें बोलणें क-
तां कोणीतरी सुज्ञ ब्राह्मण हस्तिनापुरास पाठवावा तो
अनुमतें पसंत ठरला. मग द्रुपदानें आपला पुरोहित साम
ोतां, कौरवांकडे पाठविला. मग श्रीकृष्ण द्वारकेस

नें राज्यभाग न दिल्यास युद्धाची तयारी असावी,
ड्वांनीं बहुत राजांस आपल्या साह्यास बोलाविलें. दु-
ो युद्धाची तयारी केली. अर्जुन व दुर्योधन श्रीकृष्णास

बोलाविण्याकारितां द्वारकेस गेले. तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाला कीं नारायण नांवाचे दहाकोटि यादव माझ्या सारखेच पराक्रमी आहेत. व मी युद्धांत शस्त्र न धरणारा केवळ गोष्टी सांगणारा आहें. तर मी व यादव या दोहोंतून ज्यास जें आवडेल तें त्यानें मागावें. तेव्हां अर्जुन ह्मणाला. देवा, मला तूंच पाहिजेस. दुर्योधनानें यादव सैन्य मागितलें. तें श्रीकृष्णानें मान्य केल्यावर दोघे स्वस्थानास निघून गेले.

सरसिजनाभ[1] सभेंत द्रुपद-विराटादि-निजजनांसहित ॥
बैसुनि मनीं विचारी घ्याया साधूनि निजजनास हित ॥१॥
प्रभु सभ्यांस ह्मणे "हो जें झालें तें तुह्मां सकळ कळलें ॥
सर्वां साधूंचें मन परिसुनि धर्म-श्रमासि कळकळलें ॥ २ ॥
वसतां द्वादश वर्षें क्षणहि गडबडो दिली न धी[2] रानीं ॥
केला स्वजनांत परम दुष्कर अज्ञातवास धीरांनीं[3] ॥ ३ ॥
आतां सुयोधनानें यांचा यांला विभाग ओपावा ॥
लोपावा न न्याय स्वल्पहि राजर्षि[4] हा न कोपावा ॥ ४ ॥
सुज्ञ ब्राह्मण कोण्ही तिकडे प्रेषावयासि[5] योजावा ॥
जो संमत सर्वांला सत्वर कौरव-पुरासि तो जावा" ॥ ५ ॥

---

१ सरसिज ( कमल ) नाभीचे ठायीं ज्याच्या, तो श्रीकृष्ण
२ बुद्धि. ३ ज्यांच्या चित्तास कधीं विकार होत नाहीं अशा पाण्डवांनीं. ४ धर्मराज. ५ पाठविण्यास.

ाम ह्मणे "दुर्योधन संमत आह्मांसि पार्थसा मानें ॥
ते कुशल असावे साधावा बलित्हृतार्थ सामानें ॥ ६ ॥
अक्षज्ञ नसोनि भरीं भरला, स्वगुणेंचि अर्थ हारविला ॥
पडतां गांठि गर्तश्री होय शशी दोष काय हा रविला" ७॥
"शिव शिव हर हर" ऐसें बोलुनि सात्यकि ह्मणे "अगा रामा
धर्मासि दोष लाविल तरि सोडिल विष्णुच्या अगारा मां॥८
मानर्धनासि बळेंचि द्यूत-क्रीडार्थ बाहिलें कुटिलें ॥
लुटिलें सर्वस्व अहो बलदेव, खळांसि पाहिजे कुटिलें ॥ ९ ॥
याचें न धर्म-युद्धें हरिलें, द्यूतें करूनि पद कपटें ॥
शुचिचें अशुचि न मिरवू झांकील कसा हरूनि पदक पटें १०
पदर पसरितील शकुनि दुर्योधन कर्ण हे तिघे राया ॥
नाहिं तरि त्यां माझ्या सिद्धचि आहेत हेति घेराया ॥११.
उपदेशितील अस्मत् शस्त्रें त्यां द्यावयासि पद नमुनी ॥
हें न घडतां न तुमचें यावरि अवलोकितील वदन मुनी॥ १२
पांचाल मत्स्य यादव पांडव हे वीर काय सामान्य ॥
होईल ? श्रीहंसी हे हंस त्यजुनि वायसा मान्य ॥ १३ ॥
मारूनि सुयोधनातें राज्यपदीं बसवितों पहा यास ॥
...ंचि तेज अद्भुत रामा आह्मां नको महायास" ॥१४॥

---

१ बलिष्ठानें हरण केलेली संपत्ति. २ द्यूतामध्यें कुशल. ३ तेजोहीन. ४ गृहाला. ५ लक्ष्मी. ६ मान हेंच धन (प्रियवस्तु) ज्याचें; तो धर्म. ७ बोलाविलें. ८ शस्त्रें. ९ या धर्माचें.

द्रुपद ह्मणे "सत्य वदसि योग्य खल प्राप्त-दर्प हा निधना॥
पावेल कसा चतुर्राहि नकरूनि निधिस्थ-सर्पहानि घना॥१५॥
पळहि न वळेल सामें दुर्योधन दुष्ट मत्त अंधकसा ॥
पुत्र-स्नेहें भुलला नयनिष्ठुर हित वदेल अंध कसा ॥ १६॥
जरि धीर वीर भीष्म द्रोण प्रख्यात पात्र तन्नमना ॥
तरि दीनचि ते,त्यांच्या, त्याचें बहु लाजवील अन्न,मना॥१७
कर्ण शकुनि तों त्याचे मूर्त-कुसंकल्प काय सांगावे ॥
ज्यांहीं नय-हंसांतें निंदावें अनय-वायसां गावें ॥ १८ ॥
न शके शक्र घनांहीं शमवूं, शमवील त्या नर गर्दूनीं ॥
सांगेल कोण दुसरा भीष्महि सांगेल ज्या न रगडूनीं ॥१९
येइल वहूपचारें वंध्योरसिजासि काय ओलावा ॥
डोलावा हर-मूर्धा कुरु-पतिपूर्वींच भूप बोलावा ॥ २०॥
सांगूनि सांगणें तें प्रेषावा आमुचा पुरोहित हो ॥
न्यायाला न चुकावें अंधाचें पुत्र-शत उरो, हित हो"॥२१॥
श्रीश "ह्मणे तूं गुरुसा हे आह्मी शिष्यसेचि, रायांस ॥
स्वपदीं स्थापावें त्वां, यीं देवें भोगिला चिरायास ॥२२॥

---

१ ज्यास गर्व झाला, तो दुर्योधन. २ द्रव्याच्या ठेव्यावरील सर्पाचा नाश. ३ अन्धकासुरासारखा. ४ नीतीला अनुसरून असल्यामुळें कठोर भासणारें. ५ धृतराष्ट्र. ६ दुर्योधनाच्या नमनाला. ७ मूर्तिमान दुष्टविचार. ८ लहान पात्रविशेषानें. ९ अनेक उपायांनीं. १० वांझेच्या स्तनाला. ११ शंकराचें मस्तक. १२ दुर्योधनाच्या आधींच. १३ राजे. १४ श्रीकृष्ण. १५ धर्मराजाला. १६ या धर्मराजानें. १७ फार दिवस श्रम.

धृतराष्ट्र मानितो तुज, तूं द्रोणाचा सखा, कृपाचाहीं ॥
विश्वास तुझ्या ठायीं याचाही आणि त्या नृपाचाही॥२३ ॥
झाला विवाह, जातों, सर्वांमागूनि भज हिं पाचारा ॥
साचा राया मॅझ्या चित्तखगा साधु-संग हा चारा" ॥२४॥
सत्कारिला विराटें प्रभु गेला निज पुरा सपरिवार ॥
बहुधा घेऊनि उद्धव- संमत मग मारणार अरिवार ॥ २५ ॥
पांडवदूतचि पाहाति, नृप न मुहूर्तास, यावयाला हो ॥
जो तो ह्मणे "भल्याच्या साह्यें सार्थक्य या वयाला हो"॥२६
प्रेषी द्रुपद गुरुसि जो संमत जीवा तसाच कार्याही ॥
कीं नरकीं न बुडावा जोडुनि सद्घातपातका व्यांही ॥२७॥
शल्याद्याप्त बहाया प्रेषुनि दूत स्वयेंचि वासवि त्या ॥
पाचाराया जाय प्रणत-जनाऽब्जांचिया शिवा सवित्या॥२८
तें परिसतां मन ह्मणे त्याहि अनार्यासि आर्यसा धात्रें ॥
प्रियविजयापूर्वींच प्रभुला गांठूनि कार्य साधावें ॥ २९ ॥

---

१ युद्धाकरितां साह्यास बोलावा. २ चित्तरूपी पक्ष्यास. ३ शत्रुसमूह. ४ पाण्डवदूत मुहूर्त पाहाति इ०; ह्म० राजांना युद्धांत साह्याला यावें असें आमंत्रण करण्यास पाठवावयाचे दूत, निघण्यास मुहूर्त पाहत होते. पण राजांनीं निघण्यास मुहूर्त पाहिला नाहीं. ५ बृहस्पतीला. ६ शुक्राचार्याला. ७ धृतराष्ट्र. ८ अर्जुन. ९ शरणागत जन हींच कमलें, त्यांच्या. १० कल्याणकारक अशा. ११ सूर्याला-श्रीकृष्णाला. १२ दुष्ट दुर्योधनाला. १३ अर्जुनासारखा. १४ श्रीकृष्णाला प्रिय, अशा अर्जुनापूर्वींच.

जाय प्रथम कुरुप तो निजला होता प्रभु स्व-पर्यंकीं ॥
ज्यासि स्मरुनि निजावें स्वस्थ स्थापूनि शीर्ष अंर्यंकीं॥ ३०
प्रभुच्या शिराकडे तो स्वमहत्त्वास्तव बसे अंकवि मानी ॥
होईल काय हंस ब्रह्म्याच्याहि बसला बक विमानीं॥३१॥
मागुनि गेला अर्जुन बसला पायांकडेचि पाहत कीं ॥
यां विनतीं श्रीगुरुची बहु, त्या लेशाहि नसे कृपा हतकीं३२
कैसा असेल अन्य प्रभुच्या दृष्टीसमोर सामान्य ॥
उठतांचि तीस अर्जुन झाला दृष्टीस मोरसा मान्य ॥ ३३ ॥
पार्थ ह्मणे "प्रार्थाया आलों प्रभुजी तुला सहायास" ॥
कौरव ह्मणे "बहाया प्रथमचि जो पातला पहा यास॥३४॥
तुजशीं, याचें माझें सम सख्य जसें, तसेंच सम नातें ॥
संत ह्मणति पूर्वागत- साह्य-शिवपदीं सदा वस मनातें"॥३५॥
देव ह्मणे "सत्यचि हें तरि पार्थ प्रथम पाहिला आहे ॥
सर्वांहि संत न्यायें भेद, न आगमन, दर्शनीं पाहे ॥ ३६ ॥
पूर्वागत तूं जैसा तैसा मज पूर्वदृष्ट हा मान्य ॥
दोघांचेंहि करावें म्यां साह्य ,प्रिय तुह्मी, न सामान्य॥३७॥
तुजहुनि कनिष्ठ अर्जुन बाळकसा, हें मनीं पहा नातें ॥

१ शत्रूच्या मांडीवर. २ मूर्ख. ३ या विनंती श्रीगुरुची बहु कृपा इ०. ह्म० मला श्रीकृष्णाच्या पायांजवळ बसावयास सांपडलें यास्तव माझ्यावर श्रीगुरूची फार कृपा होय, असा अर्जुनाचा भाव. ४ दुष्ट दुर्योधनावर. ५ पूर्वी आलेल्याचें साह्य करणें हाच शिव, त्याचें करणी. ६ संत न्यायें, दर्शनीं भेद पाहे, आगमन न पाहे, हा अन्वय.

रीति दहांची हे कीं पहिलें समजाविती लहानातें ॥ ३८ ॥
आहेत एक अर्बुद नारायणनाम गोप मजसम जे ॥
सर्वहि अनंत-बल ते, समजे न परां, परंतु मज समजे ॥ ३९ ॥
ते कीं न्यस्तायुध मी त्यांत तुह्मां मान्य काय दोघांस" ॥
ऐसें प्रभूत्तम पुसे त्या दैवा-दैव-संपदोघांस ॥ ४० ॥
पार्थ ह्मणे "गोविंदा न्यस्तायुध तूंचि पाहिजेस मज" ॥
मागे सैन्य सुयोधन वरहि वरायासि पाहिजे समज ॥ ४१ ॥
पग साह्यार्थ विनवितां राम ह्मणे" ऐक भारता राया ॥
सिद्धचि मी स्वजनातें उतरुनियां आधिभार ताराया॥४२॥
वदलों विराटनगरीं त्वद्विषयक किमपि जें विहित सुचलें ॥
पारि परिस, त्याहरिस त्या- समयीं न सभेंत तें वचन रुचलें४३
पाचकर कृष्ण-त्याग स्व-प्राण-त्यागही न दुष्करसा ॥
कृष्णाविणें क्षिति मला नलिनी मधुपासि जेविं शुष्करसा४४
यास्तव सहाय संप्रति हा बल न तुझा, न पांडुतनयाचा ॥
निश्चल निश्चय जाणा आजि तुह्मी सर्व आप्त-जन याचा॥४५
जा आहेसि क्षत्रिय, भांड, न अभिमान सांड, गा साच ॥
स्वर्ग असे, काळमुखीं व्हायाचा काय सांडगासाच" ॥४६॥
ऐसें वदोनि रामें आलिंगुनि तो खलेंद्र बोळविला ॥
रविनें विधुसा प्रभुनें स्वगृहागत मलिनही न पोळविला ४७॥

---

१ टाकिलें शस्त्र ज्यानें, तो. २ दैवसंपत्ति व अदैवसंपत्ति यांचे प्रवाह ज्यांवर, ते अर्जुन व दुर्योधन. ३ हे दुर्योधना. ४ देह.

अक्षौहिणी[1] कटक कृत- वर्मा दे[2] त्यासि, कीं न[3] येनाच ॥
कुलजा नकार जैसा मेल्याही पंगुला नये नाच ॥ ४८ ॥
बहु मेळवूनि बल्लवं[4] अज्ञ पळत जाय कृष्ण सोडून ॥
अधन शिशु जसा टाकुनि चिंतामणि बहु कपर्द[5] जोडून ४९
चित्तांत ह्मणे कैसा केला अरि-मीन-ह्रद[6] अगाध रिता ॥
भ्रांत श्रुत[7] स्मरेना कीं हा प्रभु जाहला अगा[8] धरिता॥५०॥
कृष्ण ह्मणे "पार्था त्वां अर्बुद बल हातिचें दिलें अरिला ॥
जो ह्मणतो भांडेना शस्त्र धरीना असा कसा वरिला"॥ ५१
पार्थ ह्मणे" तूं मुनिनीं चित्तीं षडरिक्षयार्थ धरिलास ॥
हरिला समस्तहि श्रित- ताप तुवां ह्मणुनि भ्यांहि वारलास॥५२
न धरावें शस्त्र असी प्रभुची आहे जरि प्रतिज्ञा ते ॥
राहो, त्वत्स्मरणेंचि ध्वंसिति कामाद्यरिप्रति ज्ञाते ॥ ५३ ॥
सुगम त्वदाश्रितांला देवेंद्रालाहि अर्थ असुगम जे ॥
त्वत्प्रोक्षितात्वरांतक- सेनांचे[9] लोपतात असु गम[10]जे ॥ ५४ ॥
तूं या धनंजयाचा सारथि करुणाम्बुदा समीरण हो ॥
वाढेल तेज माझें प्रचुर[11], मग करीन दास मी रण हो॥५५॥

---

१ पायदळ. १०९३५०, घोडेस्वार. ६५६१०, रथ २१८७०, हत्ती २१८७०, मिळून एकंदर जें सैन्य, तीं. २ या क्रियापदाचा कर्ता कृतवर्मा. ३ कृतवर्म्याच्या तोंडातून न ( नकार ) येईना. ४ गोप. ५ कवड्या. ६ शत्रुरूप मत्स्यांचा डोह. ७ ऐकिलेलें. ८ पर्वताला-गोवर्धनाला. ९ त्वां पाहिलेल्या दैत्यसेनांचे. १० चेष्टा. ११ पुष्कळ.

व्हावा सारथि समरीं शौरिमनोरथ मनीं असे चिरं हा ॥
मत्प्रग्रहप्रतोद स्वीकारुनि मद्रथीं असेचि रहा"॥ ५६॥
स्वजनामरद्रुम प्रभु हांसोनि "ह्मणे• अवश्य तुजला जो ॥
अर्थ अपेक्षित तो हो मातलिसारथि महेंद्र तुज लाजो"॥५७॥
असि साधु साधुपतिसीं गांठि पडे, ती जसी अया परिसा ॥
यापरि साचा हाचि प्रेमळ ,याच्याचि याजया परिसा ५८
भुजबलयुक्तिबळें जो मधुकैठभकांतरा अजा तारी ॥
त्या प्रभुला घेउनि ये तो अर्जुन ज्या स्थळीं अजातारी५९

# अध्याय २ रा.

## सारांश.

मद्रदेशचा राजा शल्य सैन्यासह धर्माकडे येत असतां, मार्गांत दुर्योधनानें त्याचा उत्तम प्रकारें बेत राखिला. तेणें करून शल्य

१ श्रीकृष्ण. २ पुष्कळ दिवस. ३ माझ्या घोड्यांच्या दोऱ्या व चाबूक. ४ स्वजनांचा कल्पवृक्ष. ५ इच्छिलेला. ६ मातलि सारथि ज्याचा, तो. ७ बाहुबल व युक्तीचें बल येणें करून. ८ मधुकैटभ दैत्याला भ्यालेला. ९ ब्रह्मदेवाला.

प्रसन्न झाला. तेव्हां दुर्योधनानें त्यास आपल्या साह्यास बोलाविलें. तें शल्यानें कबूल केलें. मग शल्य धर्माला भेटावयास गेला. व झालेलें वर्तमान त्यास सांगितलें. तेव्हां धर्म ह्मणाला. कीं, हे शल्य राजा, तुला दुर्योधन कर्णाचें सारथ्य करण्यास सांगेल. तेव्हां तूं कर्णाचा तेजोभंग करावा. तें मान्य करून शल्य ह्मणाला, धर्मा, तूं स्वस्थ रहा, कांहीं खेद करूंनको. तुझें राज्य तुला लौकर प्राप्त होईल. पूर्वीं इन्द्रास ब्रह्महत्त्येचें पातक घडलें. तेणें करून तो पदभ्रष्ट झाला. त्याच्या पदावर देवांनीं नहुषराजाला बसविलें. तेणें करून नहुष उन्मत्त झाला. त्यानें देवांना फार त्रास दिला. शचीला वश करण्यास त्यानें खटपट केली. तेव्हां सर्व देवांच्या मसलतीनें शचीनें नहुषास सांगितलें कीं, तुह्मी अपूर्व यानावर बसून अमरावतींत फिरलां तर मी तुह्मांला वरीन. नहुषानें तें मान्य केलें. व अगस्तिप्रमुख ऋषि पालखीला लावून त्या पालखींत आपण बसला. ऋषींनीं त्वरेनें चालावें ह्मणून त्यांस लत्ताप्रहार केले. तेव्हां अगस्तीनें नहुषाला तूं सर्प हो असा शाप देऊन भूमीवर पाडिलें. इन्द्रानें अश्वमेध केला, तेणें करून तो ब्रह्महत्त्येपासून मुक्त झाला. व आपलें पूर्वपद पावला. धर्मा, हा दुष्ट दुर्योधन नहुषाप्रमाणें भूमीवर पतन पावेल. मग इंद्राप्रमाणें तूं आपलें पद पावशील, असें धर्मास सांगून त्याचें समाधान शल्यानें केलें. मग शल्य दुर्योधनाकडे निघून गेला.

धर्माकडे बहु कटक घेउनि मद्रेश[1] यावया लागे ॥
तत्पूजार्थ सुयोधन अष्टौप्रहर स्वयें सदा जागे ॥ १ ॥
कुरुवरकृतसाहित्यें[2] त्या शल्याचे विवास जे वाटे ॥
ते स्वोद्यानींच[3]; असें त्याला त्याच्या भटांसही वाटे॥ २ ॥
जेथें उतरे तेथें सर्व अचिंतित पदार्थ सिद्ध करी ॥
शल्यासि सुरनगाधिक कुरुपति हे उक्ति कवि ह्मणेल खरी
या साहित्यें शल्य- क्षितिपति होउनि बहु प्रसन्नमना ॥
स्वप्रेष्यांसि ह्मणे "रे पाचारा पार्थ-सचिव मन्नमना ४ ॥
तपला बहु प्रसादा माझ्या तो धर्मदास भाजन हो ॥
कसभेहूनि शतगुणें झाल्या मज शर्मदा सभा जनहो ॥५॥
ा तों सभा सभाग्या जनहो यातेंचि बहु न वाखाणा ॥
ाहों कूपशतांतुनि एका ऐसा बरें नवा खाणा ॥ ६ ॥
सें जल ऐसें स्थळ ऐसें आलें कधीं न अन्न मना ॥
ो सुप्रसन्न झालों आणा तो निपुण पुरुष मन्नमना" ॥७॥
टे त्यासि सुयोधन जाणुनियां समय कामलाभाचा ॥
वत्तीं शल्य ह्मणे "बहु याहुनि भासेल कां मला भाचा॥८॥
ंगुनि त्यासि ह्मणे " इष्टार्थ प्राणसमहि मागावा ॥
रधिल्या वश नव्हे तरि थोराचाहि न महिमा गावा॥९॥
रुप ह्मणे माझ्या तूं सेनांचा नाथ मद्रपा हो गा ॥

१ शल्य. २ दूर्योधनानें केलेल्या साहित्यानें. ३ आपल्या बागांत योद्ध्यांना. ५ कल्पवृक्षापेक्षां. ६ स्वसेवकाना, ७धर्माचा प्रधान, सुखदायक. ९ शंभर विहिरींतून. १० इष्टप्राप्तीचा.

प्रसन्न झाला. तेव्हां दुर्योधनानें त्यास आपल्या साह्यास बोलाविलें. तें शल्यानें कबूल केलें. मग शल्य धर्माला भेटावयास गेला. व झालेलें वर्तमान त्यास सांगितलें. तेव्हां धर्म ह्मणाला. कीं, हे शल्य राजा, तुला दुर्योधन कर्णाचें सारथ्य करण्यास सांगेल. तेव्हां तूं कर्णाचा तेजोभंग करावा. तें मान्य करून शल्य ह्मणाला, धर्मा, तूं स्वस्थ रहा, कांहीं खेद करूंनको. तुझें राज्य तुला लौकर प्राप्त होईल. पूर्वीं इन्द्रास ब्रह्महत्त्येचें पातक घडलें. तेणें करून तो पदभ्रष्ट झाला. त्याच्या पदावर देवांनीं नहुषराजाला बसविलें. तेणें करून नहुष उन्मत्त झाला. त्यानें देवांना फार त्रास दिला. शचीला वश करण्यास त्यानें खटपट केली. तेव्हां सर्व देवांच्या मसलतीनें शचीनें नहुषास सांगितलें कीं, तुह्मी अपूर्व यानावर बसून अमरावतींत फिरलां तर मी तुह्मांला वरीन. नहुषानें तें मान्य केलें. व अगस्तिप्रमुख ऋषि पालखीला लावून त्या पालखींत आपण बसला. ऋषींनीं त्वरेनें चालावें ह्मणून त्यांस लत्ताप्रहार केले. तेव्हां अगस्तीनें नहुषाला तूं सर्प हो असा शाप देऊन भूमीवर पाडिलें. इन्द्रानें अश्वमेध केला, तेणें करून तो ब्रह्महत्त्येपासून मुक्त झाला. व आपलें पूर्वपद पावला. धर्मा, हा दुष्ट दुर्योधन नहुषाप्रमाणें भूमीवर पतन पावेल. मग इंद्राप्रमाणें तूं आपलें पद पावशील, असें धर्मास सांगून त्याचें समाधान शल्यानें केलें. मग शल्य दुर्योधनाकडे निघून गेला.

धर्माकडे बहु कटक घेउनि मद्रेश यावया लागे ॥
तत्पूजार्थ सुयोधन अष्टौप्रहर स्वयें सदा जागे ॥ १ ॥
कुरुवरकृतसाहित्यें त्या शल्याचे विवास जे वाटे ॥
ते स्वोद्यानींच; असें त्याला त्याच्या भटांसही वाटे॥ २ ॥
जेथें उतरे तेथें सर्व अचिंतित पदार्थ सिद्ध करी ॥
शल्यासि सुरनगाधिक कुरुपति हे उक्ति कवि ह्मणेल खरी
या साहित्यें शल्य- क्षितिपति होउनि बहु प्रसन्नमना ॥
स्वप्रेष्यांसि ह्मणे "रे पाचारा पार्थ-सचिव मन्नमना ४ ॥
जपला बहु प्रसादा माझ्या तो धर्मदास भाजन हो ॥
स्वसभेहूनि शतगुणें झाल्या मज शर्मदा सभा जनहो ॥५॥
या तों सभा सभाग्या जनहो यातेंचि बहु न वाखाणा ॥
पाहों कूपशतांतुनि एका ऐसा बरें नवा खाणा ॥ ६ ॥
ऐसें जल ऐसें स्थळ ऐसें आलें कधीं न अन्न मना ॥
मी सुप्रसन्न झालों आणा तो निपुण पुरुष मन्नमना" ॥७॥
भेटे त्यासि सुयोधन जाणुनियां समय कामलाभाचा ॥
चित्तीं शल्य ह्मणे "बहु याहुनि भासेल कां मला भाचा॥८॥
[illegible]गुनि त्यासि ह्मणे " इष्टार्थ प्राणसमहिं मागावा ॥
आर[illegible]धिल्या वश न व्हे तरि थोराचाहि न महिमा गावा॥९॥
कुरुप ह्मणे माझ्या तूं सेनांचा नाथ मद्रपा हो गा ॥

---

१ शल्य. २ दूर्योधनानें केलेल्या साहित्यानें. ३ आपल्या बागांत ४ योद्ध्यांना. ५ कल्पवृक्षापेक्षां. ६ स्वसेवकाना. ७धर्माचा प्रधान. ८ सुखदायक. ९ शंभर विहिंरींतून. १० इष्टप्राप्तीचा.

अर्थी जय-लाभाचा हा भाचा हेंचि भद्र पाहे गा"॥ १०॥
शल्य ह्मणे "आराधुनि मागितलें काय? आणिकहि मागा॥
चिंतामणि देणारा मगावें काय माणिक हिमागा"? ॥११॥
भूप ह्मणे "हेंचि पुरे माझी इष्टार्थ-सिद्धि याच वरें॥
विजयश्री येणेंचि न मजवरि ढाळील काय गा चवरें"१२॥
"पांडव पाहुनि येतों" "या जा जरि संभ्रमा गुता ना कीं॥
आहेचि धर्म-संभ्रम व्हायाचा माप्त मागुता नाकीं" ॥ १३॥
उक्ति प्रत्युक्ति अशा झाल्या, गेले निघूनि ते राजे ॥
बाहेर शल्य देखे होते हृदयांत अब्द तेरा जे ॥ १४ ॥
आलिंगितां प्रमोदें पाडु-सुतांनीं नमान मद्रप हा ॥
धर्मासि ह्मणे "साधो निज-साधुत्वेंचि साधु-भद्र पहा ॥१५॥
तूं राम-सम समर्थ प्रभु पुण्य-श्लोक लोक-मत राया ॥
अज्ञातवास दुस्तर बा त्वदितर यासि योग्य न तराया"१६
पूजा करितां शल्य स्तुति करितां धर्मही बसे उगला॥
पूज्यत्वें स्तुत्यत्वें, ते न, परि ग्रंथ मात्र हा फुगला॥ १७ ॥
शल्य ह्मणे "बा म्यां तो ऐसा दुर्योधना दिला वर हो ॥
तुज आशीर्वाद असा कीं धर्मा धार्मिका,इला-वर हो॥ १८॥
प्रथम 'तथास्तु'मग ह्मणे "वरदान तुह्मांसि उचित मामानें ॥

१ कल्याण. २ हिमवान्पर्वताला. ३ फिरवील. ४ आदरसत्काराला. ५ धर्माचा आदर. ६ आनन्दानें. ७शल्य. ८ उत्तम कल्याण- ९ लोकमान्य. १० तुझ्याशिवाय. ११ उगीच. १२ पृथ्वीपति.

.. । गजासि गंगा तशि हे आशीहि शुचितमा मातें॥१९॥
तुंअकरवीं कर्णाचें सारथिपण धार्तराष्ट्र करवील ॥
पसरील पदर तेव्हां सारथ्यगुणप्रतोद धरवील ॥ २० ॥
तेजो-वध कर्णाचा अर्जुन वांचावया करावा हें ॥
दे दान,'करीन' असें ह्मण,आण न बा दयाकरा वाहें"॥२१
मद्रप ह्मणे "करीन स्वस्थ रहा' दुःख-सिंधु आटेल ॥
वाटेल स्वप्न तसें त्वत्कीर्ति त्रिभुवनांत दाटेल ॥ २२ ॥
बलवत्तर विधि देतो थोराला थोरल्याचि तापातें ॥
इंद्रप्रमुखसुरांसहि जें भावि न लंघवेचि बापा तें॥ २३ ॥
पांवे सभार्य शक्रहि पूर्वी बहु दुःख,ऐक बापा तें॥
कीं होय विश्वरूप ब्राह्मण मारूनि पात्र तापातें ॥ २४ ॥
सा॰रि वृत्र-वध करी आर्धी देऊनि त्यासि विश्वास ॥
ब्राह्मण-वधाऽनृतानें लाजे, दावी न वदन विश्वास ॥ २५॥
शक्र जळांत, मखादिक सव्यवहारहि अराजकांत बुडे ॥
उत्सव पळे वळावी ताप मुनि-त्रिदशचित्ररूप हुडे ॥ २६ ॥
देवांनीं सन्मुनिंनीं देऊनि वर नहुष अमरपति केला ॥
स्पर्शावया शचीला पाहे, दव जेविं कल्पलतिकेला ॥२७॥

---

१ अतिपवित्र. २सारथ्यसम्बन्धीं दोऱ्या व चाबूक. ३ उत्साहभंग. ४ दयेची खाणच, अशा. ५ सर्वव्यापी, त्वष्ट्याचा पुत्र त्रिशिरा, ब्राह्मण. ६ ब्रह्महत्या व असत्य भाषण, येणेंकरून. ७ राजा नाहीं अशा स्थितींत.

सुरं-मुनि-सन्मंत्रांहीं काहीं नाहींच नहुखें वळला हो ॥ ॥
भाग्यमदांत मनोभू- ग्रग्रह शिरतांचि बहु खवळलाहो॥२८॥
गुरुला शची ह्मणे "हो नहुषीं काहींच धर्म नय नहीं ॥ ॥
कैसें तुह्मीं पहावें ऐसें हें पापकर्म नयनाहीं ॥ २९ ॥
न परस्पर्श स्वप्नीं तुमच्या या धर्मकन्यकेला हो ॥ ॥
प्राण-त्याग सतींनीं केला कीं अन्यकांत केला हो"॥३०॥
तीस गुरु ह्मणे "वत्से धैर्य असोंदे उगी नकोचि रडों"॥ ॥
माझ्या माथां दे हा तूं या चिंता-भरें नको चिरडों" ॥३१॥
सभय सुरर्षिहि ह्मणती "शचि हा अत्युग्र नहुष. नभला गे।
हूं ह्मण बाई, याच्या धाकें कांपावयासि नभ लागे॥ ३२ ॥
अजि आचार्य तुह्मी तरि सांगा जरि काय नहुष पाहेल॥
राहेल तेज न किमपि याचा दृक्पात कोण साहेल" ॥३३॥
जीव ह्मणे "हो कांहीं, त्यागावें केविं शरण आलीला ॥ ॥
मी काय सत्क्रियाचि व्यसनीं या न त्यजील आलीला"॥३४॥
नहुषासि स्वमुखेंचि प्रार्थाया युक्ति सत्वरा शिकवी॥ ॥
धाडी सतीस, अवना आशी देऊनि, सत्वरांशि कवी॥३५॥
तो पाहुनि तीस ह्मणे "ये मज भज सुमुखि पावलों सुरता॥ ॥
झालों इंद्र जगाचा मग मजसीं इच्छिसी न कां सुरता" ३६ ।

---

१ देव आणि ऋषि ह्यांच्या उत्तम उपदेशांनीं. २ नहुष. ३ मका नोभू-उग्र-ग्रह ह्म० मदनरूप उग्र पिशाच. ४ हे बृहस्पते. ५ दृष्टिपतन. ६ बृहस्पति. ७ सखीला. ८ गांभीर्याचा राशि. ९ देवत्व ...ति

प्रार्थुनि शची ह्मणे "द्या कांहीं अवकाश या नत-जनातें[1]॥
नाहींच हरि[2], असा हो[3] निश्चय. मग मी करीन भजनातें" ३७
नहुष ह्मणे "जा वेड्ये जोडुनियां पापविसर[4] या पतितें ॥
वांचावें कोविं? विसर तूं धर्मन्याय-विसरत्या पातितें[5] ॥ ३८ ॥
जा शचि, नाशाचि झाला प्राप्त महाघें-करूनि पहिल्याला ॥
असलाहि काय पापी? कैसा आलिंगवेल अहि[6] ल्याला ॥ ३९ ॥
असलाहि काय पापी? सत्वर हो पूर्णकाम हो दारा॥
राज्यश्री ज्या भजली तूं न भजसि तूर्ण कां महोदारा[7]"४०॥
आली पुन्हा गुरुकडे मग तो देवांसमेत विष्णूतें॥
प्रार्थी, ह्मणे "प्रभो हो अघ जाउनि राज्यलाभ जिष्णूतें[8]॥४१॥
हयमेध जिष्णुकरवीं करवा विजया सुखा[9] मग न वाणी ॥
निर्जर-कर्ण-चकोर-[10] ज्योत्स्ना असि जाहली गगनवाणी॥४२
दूर उडविला होता जो केवळ तूलसाचि[11] अघवातें[12] ॥
तो हुडकिला सुरांनीं करिता झाला सुकर्म मघवा[13] तें॥४३॥
झाला शुचि, परि भ्याला त्या नहुषाच्या असह्य वरतेजा॥
पाहों न शके भगवान् भानुहि डोळे करूनि वरते ज्या॥४४॥

---

१ नम्र झालेल्या जनाला. २ इन्द्र. ३ होवो. ४ पापसमूह. ५ पातक्यानें. ६ सर्प. जो अहि ल्याला, तो कैसा आलिंगवेल;असा अन्वय. ७ फारउदार. ८ इन्द्राला. ९ उणेपणा. १० देवांचे कर्ण हेच चकोर, त्यांस चन्द्रप्रकाशासारखी. ११ कापसासारखा १२ पापरूप वायूनें. १३ इन्द्र.

पुनरपि हरि शतयोजन- विस्तृतकासारपद्मनालांत ॥
बिसतंतुमाजि राहे जो मान्य समस्त-लोक-पालांत ॥ ४५ ॥
नेली शची उपश्रुति- देवीनें त्याहि नलिन-नालांत ॥
त्यांसि ह्मणे सुरपति या "ऐशा कां संकटांत आलांत"॥४६
प्रार्थुनि शची ह्मणे "व्हा प्रकट, धरा वज्र-तेज-उत्साहा ॥
अज्ञातवास न भला ' प्रभुजी प्रसवेल फार कुत्सा हा ॥ ४७ ॥
सागावया शचीला न तुह्मी हरि योग्य, तोहि न रमेला ॥
भोगुनि तुमच्या श्रीतें टपतो स्त्रीतेंहि नहुष नर मेला ॥ ४८ ॥
तुमच्या पदच्युतिस्तव मजहुनि बहु नित्य अभ्रमु रडे हो ॥
नाथ वळा जी चातक- रुत आइकतांचि अभ्र मुरडे हो" ॥
शक्र ह्मणे " नहुपाचें दुःसह वर-तेज साहवेना तें ॥
हेंही न सोसवे जें आपत्पूरांत वाहवे नातें ॥ ५० ॥
मी किति तद्दृष्टि-पुढें निज-तेज न रक्षिजेल मत्तातें॥
श्रीमद करिल पदच्युत अल्पें काळें तया प्रमत्तातें ॥ ५१ ॥
जरि खळपरपुरुषाचें असदुक्त तुझ्या मनासि बहु खातें ॥
तरि जाचि भेट मतिमति सति अतिरतिदाससीचें नहुखातें ५२

---

१ शम्भर योजनें विस्तीर्ण, अशा सरोवरातील एका कमलाच्या देंटामध्यें. २ कमलतन्तूमध्यें. ३ उपश्रुतिनामक देवतेनें. ४ कमलाच्या देंटामध्यें. ५ चातकाचा शब्द. ६ विपत्तीच्या प्रवाहांत. ७ वाहून जातें. ८ माझ्या पित्यानें ब्रह्मदेवानें. ९ अतिशयेंकरून रतीच्या दासीसारखीच ह्म० अत्यन्त कामपीडित, अशीच.

ह्मण " मजकडे महर्षि स्कंधीं देऊनियां स्व-शिबिका या ॥
हें मत्प्रिय, बहु काय? च्छेदी प्राक्षिप्रियार्थ शिबि काया" ५३
जाय शची; शुक्र ह्मणे "पावो श्रीभगवती उमा नवसा"॥
राहे उगाचि विधिवरिं भर घालुनि संकटीं सुमानवसा॥५४॥
देवी नहुषासि ह्मणे " कथिन प्रियवचन, जरि न फिरवाल॥
बैसुनि अपूर्व-यानीं जरि या अमरावतींत मिरवाल ॥ ५५ ॥
जरि २अद्भुत प्रताप प्रकटूनि कराल मन परम हर्षी॥
होइन वशगा, जोडा शिबिकेसि समाधि-धनपर महर्षी" ५६
बहुखल नहुख लवकरी स्त्री हरिची आपणासि वशगा हो॥
ह्मणुनि चढे ऋषियानीं गंधर्वांला ह्मणे 'स्वयश गा हो' ५७
मुनि ह्मणति "देवराया ऐसें हें अयश हीन कां गावें ॥
गोप्रोक्षणमंत्र तुह्मां प्रमाण कीं अप्रमाण सांगावें"॥ ५८ ॥
नहुष ह्मणे "गोमारण- मंत्र सकल अप्रमाण, गो विप्र ॥
एकचि, अवध्य कुळ हें, पुसतां रे काय, हूं चला क्षिप्र" ५९
करितां विवाद, कोपें नहुष वदे 'सर्प सर्प, हे वाणी॥
चरणें अगस्त्यमुनिला कामात्मा दुष्ट तो शिरीं हाणी॥६०॥
अवमानिले असे मुनि, मंत्रहि, पोषूनि गर्व, ते ज्यानें॥
चैतन्यें वायु तसा तो संत्यजिलाचि सर्व तेजानें ॥ ६१ ॥

१ शंकर ससाण्याचें रूप घेऊन शिबिराजाचें सत्व पाहण्याकरितां आला असतां, त्यास राजानें आपल्या शरीराचें मांस कापून दिलें. २ अनुकूल. ३ समाधि( चित्ताची एकाग्रता ) हेंच ज्यांचें उत्तम धन, ते. ४ यज्ञामध्यें गोवधाचा मन्त्र. ५ चला, चला.

घटज[1] ह्मणे "रे, मंदा दुर्गतिद[2] तुला त्वदीय दर्पचि हो ।।
हाणुनि विप्र-शिरीं पद जरि ह्मणसी 'सर्प सर्प, सर्पचि हो' ६२
गर्वेंचि नहुष पडला, अनुतापें हरि पुन्हा पदीं चढला ।।
हें समजे श्रद्धेनें[3] सद्गुरुपासीं सुबुद्धि जो पढला ।। ६३ ।।
ऐसें दुःसह संकट शक्रासहि लागलेंचि भोगावें।।
साधुजयद[4] हें ह्मणउनि ऐकावें भारता विभो गावें ।। ६४ ।।
शक्र तसा प्रभु तूंहि स्वपदातें पावसील बा पार्था ।।
नहुष तसा दुर्योधन, कीं याची रीति तापपापार्था[5]'।।६५ ।।
करुनि समाधान असें गेला रक्षावया स्ववचनातें ।।
सत्य गुरुनिष्ठ मद्रप दुसरें न गणीच जेविं कच नातें ।। ६६ ।।

# अध्याय ३ रा.

## सारांश.

द्रुपदपुरोहित धृतराष्ट्रास भेटला आणि ह्मणाला. पाण्डव तुह्मांशीं साम करूं इच्छितात, तर तुह्मीं त्यांचा राज्यभाग त्यांस देऊन साम करावें. भीष्मानें तें वचन मान्य केलें. कर्ण ह्मणा-

१ अगस्ति ऋषि. २ अधःपातदायक. ३ गुरुवेदान्तवाक्यावर विश्वास. ४ उत्तम जय देणारें. ५ दुःख व पाप यांचा लाभ जीपासून, ती.

र्णा, पाण्डवांनीं प्रतिज्ञेप्रमाणें वनवास व अज्ञातवास पुरा करावा, ह्मणजे त्यांचा राज्यभाग त्यांस मिळेल. धृतराष्ट्रानें कर्णाचें निवारण करून भीष्मानुमतानें संजयास पाण्डवांशीं साम करण्यास पाठविलें. ' संजय धर्माला भेटला. कुशलप्रश्नानन्तर धर्म त्यास ह्मणाला, श्रीकृष्ण सांगेल तसा मी वागेन. श्रीकृष्ण बोलला, संजया, राज्यभाग दिल्यास साम होईल; नाहींतर आह्मी युद्धास सिद्ध आहों, असें धृतराष्ट्रास जाऊन सांग. संजय धृतराष्ट्रास भेटला. व उद्यां सर्व वृत्तान्त सांगेन, असें राजाला सांगून स्वस्थानीं गेला. धृतराष्ट्र पुत्रमोहानें चिंताग्रस्त झाला. तेव्हां विदुरानें त्यास नीति सांगितली. व सनत्सुजातानें अध्यात्मशास्त्र सांगितलें. तेणेंकरून धृतराष्ट्र समाधान पावला.'

अक्षौहिणी मिळाल्या धृतराष्ट्राच्या सुताकडे अकरा ॥
परि धर्म-नयविहीना काय? सुहेती जशा जना अकरा ॥ १ ॥
सात अजातरिपुकडे, झाल्या या त्या मिळोनि अठरा हो॥
धर्म ह्मणे "यश राहो, खळ दुर्योधन ह्मणे, स्वहठ राहो॥ २॥
धृतराष्ट्र-प्रमुखांतें भेटोनि द्रुपदगुरु ह्मणे "पारिसा ॥
सुहृदुक्ता हितकामें "धनकामें जड ह्मणों नये परिसा॥ ३ ॥
धृतराष्ट्र पांडु दोघे एकाचे पुत्र पितृधन-विभागी ॥
हें वचन अनादारितां होइल सुरगुरुसभेसह विभागी ॥ ४ ॥

१ धर्म व नीति येणेंकरून हीन. २ उत्तम शस्त्रें. ३ हस्तरहिताला. ४ धर्माकडे. ५ आपला दुराग्रह. ६ सुहृदाच्या भाषणाला. ७ बृहस्पतीच्या सभेसहित. ८ तेजोहीन. ९ वाणी.

देइल नयें समस्तहि, अनयें प्रभु राज्यभाग चवथा न ॥
स्वापत्यासचि दे कीं व्याघ्रीचें भलतयासि चव थान ॥१४ ॥
सांगा या मूर्खाला कीं रक्षा प्राण-पालका समया ॥
या प्रभुकडे विभाग प्रार्थाया साधु-बालका-सम या ॥ १५ ॥
त्यजितिल धर्म-समय जरि युद्धचि केवल हठेंचि वरितील ॥
तरि ती लयासि जाइल कीर्ति चमू अश्रु-मोक्ष करितील" ॥
भीष्म ह्मणे " राधेया उत्तर-गोग्रह तुला न आठव दे ॥
स्मर जें विजय तुज, तुझी पाहुनि असकृत् रणतां पाठ, वदे१७
गांडाव त्वद्धनुनें जिंकावें, रजत तरि न कां कथिलें ॥
खाल रणीं रज मद्सह न करुनियां या महर्षिचें कथिलें" १८
कर्णासि निवारुनियां जोडुनि देवव्रतासि हातातें ॥
अंध ह्मणे " जें सन्मत अस्मद्धित सत्य वदसि ताता तें १९
द्रुपद-गुरो वा तूं जा तुजमागुनि संजयासि पाठवितों ॥
मी पांडु-पांडवांतें घटिकेंत सहस्र वेळ आठवितों" ॥२०॥
तो पांचालपुरोहित जातां पळभरि उगेचि राहून ॥
पाहून विचार मनीं वृद्ध ह्मणे संजयासि बाहून ॥ २१ ॥
गावल्गणे न झाले पुरुष कुरुकुळांत सत्य पांडवसे ॥
यांचें विष्णुयशासम सुयश व्यापूनि सर्वपांड वसे ॥ २२॥
भजले भजतीलहि बहु गुरुसेवेतें सुधा समजतात ॥
मानिति मनांतुनि प्रभु पांडव परमाऽबुधासें मज तात॥२३॥

---

१ रुपें. २ धूळ. ३ सांगितलेलें. ४ भीष्माला. ५ हे संजया. ६ ब्रह्मांण्ड. ७ अतिमूर्खाला.

हातींहि चित्रगुप्तें यांविषयीं घेतली नसेल वही ॥
कैसें काय लिहावें, कीं पुण्य अगण्य, अघ नसे लवही ॥२४॥
द्वेष अशा साधूंचा रुचला या कुरु-कुळांत मत्तनया ॥
कीं क्षुद्रा या कर्णा, लंघिति हे दुष्ट भाग्यमत्त नयी ॥२५॥
हा भाग पांडवांचा मंदात्मा पाहतो हरायास ॥
ऐकुनि नमजे निष्फळ जो पार्थ-पराभवीं हराऽऽयास ॥२६॥
कृष्णसख्यासीं युद्धीं होईल दहांत हा कसा मान्य ॥
नृहरिपुढेंचि त्रसती हरि, मग देईल हाक सामान्य ! ॥२७॥
उलतिल युधिष्ठिराच्या उष्ण-कटाक्षें कडे हिमाद्रीचे ॥
न असे भीम जनार्दन भज भयद, न पुत्र तेहि माद्रीचे ॥२८॥
यास्तव युधिष्ठिराला भेट, बुधा कुशल पूस, जाच कसा ॥
साधुविरोधें मजला परलोकीं सोसवेल जाच कसा ॥ २९॥
सुज्ञा, मद्वचनें तूं कुशल सकल-वृष्णि-पालका पूस ॥
ज्याच्या प्रताप-लक्षर्ण- वह्निपुढें होय काल कापूस ॥ ३० ॥
धृतराष्ट्र सामकामुक आपणचि युधिष्ठिरासि वळवावें ॥
हें सव्यसाचिसचिवा सदया श्रीकृष्णजीस कळवावें ॥३१॥
वळवील धर्म-मन तो नह्मणेलचि साधु तुच्छ सामास ॥
नीतींत तसें खळमन जेविं नळींत श्वें-पुच्छ सा मास" ॥३२॥
संजय युधिष्ठिरातें भेटाने निधितें जसा निवे दीन ॥

१ शंकराला झालेला श्रम. २ नरहरि-अवतारी आदि पुरुष, त्या पुढें. ३ भय पावतात. ४ फुटतील. ५ श्रीकृष्णाला. ६ पराक्रमरूप अग्नीपुढें. ७ साम इच्छिणारा. ८ अर्जुनाचा साह्यकारी श्रीकृष्ण, ह्यास. ९ कुत्र्याचें शेंपूट.

कुशल पुसोनि ह्मणे " जी आज्ञेनें तात-मत निवेदीन "॥ ३३
धर्म ह्मणे "तातविदुर- भीष्मद्रोणादिकुशल आहेत?॥
रे संजया, असावे सर्व सुखी या मनांत हा हेत ॥ ३४ ॥
कर्ण बरा आहे कीं, कुशल असावें सदा वदान्यातें॥
जो याचकांसि ह्मणतो जें वस्तु प्रिय, सुखें वदा, न्या तें ॥
ताताङ्कित सुयोधन आहे कीं? विप्र-वृत्ति चालवितो ? ॥
बहुधा युयुत्सु दुसरा तात,सदा साश्रु भक्त कालवितो॥ ३६
ताताऽभिप्राय कसा, वद,सांनिध्यें तुला सकळ कळतें ॥
काय पुसावें? पितृमन चिंतुनि दीनां मुलांस कळकळतें", ३७
सूत ह्मणे " प्रभुजी ते आहेत बरेच. तीरगत तरुसे॥
तत्कुशल काय पुससी? वा ज्यांवरि धर्म-नीति सतत रुसे ॥
ताताऽभिप्राय मला पुसतां जरि, तरि समस्त परिसा हो ॥
परि साह्रो मन, तुमचा महिमा गुरुसाच मान्य, हरिसा हो॥
त्वत्तात-मनीं आहे स्वापत्य-शिवार्थ साम-कामुकता ॥
ह्मणतो, सुखा दशमुख,'न धरिता पर-विषय-काम'कां मुकता
परि तुमचा भाग तुह्मां देउनियां शीघ्र संधि करवीना ॥
इच्छी कुलहित नागें वि- भाग न अर्पूनि संधिकरवींना ४१
आतां शीघ्र करावें स्व-पर-हित तुह्मींच 'साम साधूनीं ॥
धरिला न कधींच परा- स्वर्थघ्न स्वार्थ-काम साधूनीं ॥४२॥

---

१ दात्याला. २ अश्रुयुक्त. ३ भात. ४ नद्यादिकांच्या तीरावरील. ५ दुसऱ्याच्या वस्तूची इच्छा करणारा. ६ सर्प. ७ विं-इन, पक्षिश्रेष्ठ गरुड यास. ८ पर-असु-अर्थ-घ्न. दुसऱ्याचे प्राण व द्रव्य यांचा नाश करणारा.

स्पर्शे[1] जड ... ... ... ... अपराधांच्या रची अर्य शतातें॥
बुध हो यु                     काय जी अयश तातें ? ॥४३ ॥
जरि आग्रह कराल   ज्ञातासा धरुनि राज्यकाम रण ॥
धामें[3], रणन्मणिनूपुर-[4]   यौवतहिं, गमेल मसणं[5] आमरणं[6] ॥४४
राज्यश्री[7]-मदिरेच्या   निर्वृति[8] कवणासि हो दिली पानें? ॥
त्यजिली कां भरतानें?   त्यजिली तैसीच कां दिलीपानें? ४५॥
श्री अनुभाविली, आतां   नित्य-सुख-यशार्थ शांतिस वराहो
परिणामशोककरहा   स्व-गुरु[9]-प्रमुखाऽप्तशांतिसव राहो"॥
धर्म ह्मणे "रे संजय,   मी सिद्ध, नसिद्ध जनक, सामातें ॥
जाणोनि सर्व दाटुनि   दूषिसि तूं साधु-जन कसा मातें?॥४७॥
निंद्य[10] स्वधर्म-विच्युत   मी तरि युद्धासि सिद्ध उत्साहें ॥
धर्म-न्यायाऽनुसरण   पावाया योग्य काय कुत्सा हें ॥ ४८ ॥
सदनुमतें[11] क्षिति अर्पूनि   सत्पुत्रकरी निवे दिलीप, तिला ॥
शोचूं नयेचि सुज्ञें,   जैसी कन्या निवेदिली पतिला॥ ४९ ॥
जरि हे न सोडवावी   द्यूतजिता द्रौपदी तसी मांहि  म्या ॥
तरिं भरत-कुळ-गुरुंच्या लागेना बोल काय गा महिम्या!५०॥
होइन निंद्य दहांत, न   सोडवितां श्रीस संजया परिस ॥

---

१ परिस. २ लोखंड. ३ गृह. ४ शब्दायमान, रत्नखचित नूपुरें ज्याचीं असा तरुण स्त्रियांचा समूह ज्यांत, तें. ५ श्मशान. ६ मरेपर्यंत. ७ राज्यलक्ष्मी हेंच मद्य, त्याच्या. ८ सुख. ९ आपले गुरु आदिकरून जे आप्त, त्यांचा नाश हाच यज्ञ. १० स्वधर्मभ्रष्ट. ११ सज्जनांच्या अनुमतानें.

कुलजा[1] यशाचि, न विधिसहि बहुमत हरिनाभिकंज[2] यापरिस
हरि कुरु-कुल-हित इच्छी तोकाचें नित्य माय जेंवि हित ॥
करिन तसेंचि, प्रभु हा सर्वज्ञ कथील काय जें विहित" ५२ ॥
श्रीकृष्ण ह्मणे, "सूता[3] तवांत गृहस्थ-धर्म सन्मत रे ॥
या आश्रमांत सर्व स्व-पराचें सफल करुनि जन्म तरे ॥ ५३ ॥
कर्म कसें टाकावें, जी अमृत मुखांत मायसी ओती ॥
ती सद्विद्या कर्म- त्याग नकरितांचि फळवती होती ॥ ५४ ॥
रवि-शशि-लोकपति[4]-धरा प्रमुख सकळ कर्म-सिद्ध हें समज ॥
कर्म-जल तृप्ति-दायक वाटे नैष्कर्म्य[5] जेंवि पळस मज ॥ ५५ ॥
दूषील कोण वर्णाऽऽश्रम-निरता भरत-सत्तमा राया ॥
योग्यचि हा साधु सकळ रक्षाया, सर्व मत्त माराया ॥ ५६ ॥
दस्यु-दमन[6] हा मुख्य क्षत्रिय-धर्म प्रमाण थोरांस ॥
यास्तव मारावें या प्रभुनें दुर्योधनादि चोरांस ॥ ५७ ॥
दस्यु-दमनार्थ शक्रें चाप-कवच-शस्त्र निर्मिलें आहे ॥
आहेत घना चातक तैसे धर्मा करूनियां आहे[7] ॥ ५८ ॥
हे अधिक काय दुर्बल ते रात्रौ घालिती दरवडा जे ॥
लुटिलें धन दुःख नसे परि हृदयीं बहु कुवाद-रव[8] डांजे ॥ ५९ ॥
स्तेन[9] भले, न स्त्रीचा नग्न करिति हरुनि सावलें[10] काय
नव्हतों सभेंत आह्मी ह्मणुनि लुटायासि फावलें काय ६० ॥

---

१ कुलीनाला. २ विष्णूच्या नाभीवरील कमल. ३ संजया. ४ स्वर्गादि लोकांचे स्वामी. ५ कर्मरहितता. ६ चोरांचें मर्दन. ७ कटुभाषणाचा शब्द. ८ जाचतो. ९ चोर. १० वस्त्रें.

जा सांग, त्वद्वदनें ऐकावें हेंचि वाक्य अंधानें ॥
आहेत सिद्ध पांडव सेवाया बाण प्राण-संधानें ॥ ६१ ॥
देतां विभाग करितिल पांडव धृतराष्ट्र-दास्य दास तसे ॥
नाहीं तरि खल मर्दुनि हास्य, मज असें भविष्य भासतसे'
संजय निघे, तयाला धर्म ह्मणे, " आयका यश तगावें ॥
द्या पांच ग्राम, नदे दासाला राय काय शत गावें? ॥६३॥
ताताला भीष्माला सांगावीं पाय धरुनि मन्नमनें ॥
जोडुनि हस्त ह्मणावें साम करावेंचि सुप्रसन्नमनें ॥ ६४ ॥
आचार्य द्रोण कृप प्रार्थूनि प्रथम कथुनि मन्नमना ॥
ह्मण, साम भलतसें मज वहुमत, दुकळांत जेविं अन्न मना६५
सांग कनिष्ठ-पित्यातें बंधु-विरोधासि चित्त भी माजें ॥
करवा साम भलतसें देइल हरि इष्ट वित्त भीमा जें ॥६६॥
कर्णासि वद, सख्याला आवर, विजयासि आवरील हरी ॥
समयीं प्रवृत्ति आवरि थोर, जसा सिंधु आवरी लहरी॥६७॥
सांग नृपासहि हें. कीं, साम शुचि, तयांत नाव रायाचें ॥
सुगति वरायाचेंचि न कर्म उचित यातना वरायाचें ॥६८॥
गांधारीस ह्मणावें पंचोत्तरशत असोत तनय, शतें ॥
तृप्ति नसोचि तुज, करीं जेणें गातील साधु-जन यश तें ६९
माझ्या सुयोधनादि भ्रात्यांच्या बायकांसि कळवावें ॥
कीं स्वहितार्थ तुह्मी तरि एकांतीं कांत-चित्त वळवावें॥७०॥

---

१ राजा. २ पाहिजे तसें. ३ विदुराला. ४ मित्र दुर्योधन यास. ५ मनाचा कल.

क्लीव-द्वारप[1]-दासी- जन-वामन[2]-कुब्ज[3]-दास-दायांतें ॥
पुशिलें अनामय[4] असें सांग, पुसावेंचि बा सदा यांतें ॥ ७१ ॥
कुरुकन्यांसि ह्मणावें तातें पुशिलें तुह्मांसि, ज्या तातें ॥
श्री देउनि नदिली ही स्वःकन्यां-श्रीद-पारिजाताते[5] ॥७२ ॥
ऐसें अजातरिपु-मुख- शशि-मंडल,अमृत तेविं, वाचिक[6] वी ॥
तें बहु असोचि, विस्तर- वद्ग्रंथ प्राकृतीं न वाचि कवी ७३
गेला तेव्हां वाटे ओढुनि दुर्दैव संजया नेतें ॥
धरिलें होतें जें कवि- सुकवच[7] हरिपाद[8]-कंज यानें तें॥७४ ॥
धृतराष्ट्रासि ह्मणे " मी संजय, आलों तया सुताकडुन ॥
वैर[9]-ज्वरीहि ह्मणती " यत्कीर्ति-सुधांब्धि[10]च्या उता कडु न ॥
श्रमलों बहु, मज आज्ञा द्यावी श्रित[11]-सुरतरो निजायास ॥
सांगेन सभेंत उद्यां प्रभुवाक्[12]-तरि भय तरोनि जायास॥७६॥
जातां सूत, अनिद्रा स्त्री भेटे नूतनाचि रायास ॥
कीं संतोषा बाळा ये चिंता पूतना चिरायास ॥ ७७ ॥
स्मरतांचि विदुर भेटे सद्वैरा[13]ख्या प्रजागरा[14]माजी ॥

---

१ द्वारपाळ. २ खुजे. ३ कुबडे. ४ कुशल-आरोग्य. ५ देवकन्यांना, धन देणाऱ्या कल्पवृक्षाला. ६ निरोप. ७ ज्ञात्यांस उत्तम कवच्या सारखें. ८ कृष्णचरणकमळ. ९ वैररूपी ज्वरानें ग्रस्त. १० ज्याच्या कीर्तिरूपअमृत समुद्राच्या. ११ आश्रितांच्या कल्पवृक्षा. १२ श्रीकृष्णाचें वाक्य हीच नौका. १३ सद्वैर ( सज्जनांशीं वैर ) हीच आख्या(नाम )ज्याची, त्या. १४ जागरणांत.

सेवुनि वांचेल कसी म्हणत्या गुरुस प्रजा गरा माझी[1] ॥७८॥
विदुर म्हणे " हा आलों, आहें पायांसमीप[2] राजाजी ॥
एथेंचि म्यां बसावें तीच तया योग्यता परा ज्या जी ॥७९॥
कोणा कार्या करितां रात्रौ स्मरला तुम्हांस हा जन हो ॥
स्वस्थ अहां कीं? आज्ञा काय? प्रणत प्रसादभाजन हो" ८०
धृतराष्ट्र म्हणे " वत्सा, तुजहुनि इतरास काय सांगावें ॥
आलें असे कपाळा कीं, निंदुनि हंस, वायसां गावें ॥ ८१ ॥
तिकडुनि येउनि सूतें केलें पाण्यापरीस पातळ तें ॥
सांगावें काय सख्या, जें त्हदया गरलसेंचि[3] आतळतें[4] ॥८२॥
वदला सांगेन उद्यां धर्माचा धर्मधाम[5] संदेश[6] ॥
चिंतेंत वुडाला हा सुज्ञा त्वद्बंधु सर्व मंदेश[7] ॥ ८३ ॥
निद्रा येईल कसी? मच्चिंता होय काय सामान्या; ॥
शूर्पनखीसी हे बा तुज हा अतिभार कायसा मान्या॥ ८४ ॥
बहु धर्मार्थकुशल तूं वद या जें श्रेय असदवस्थागा[8] ॥
निववू मज बोल तुझा, जैसा पीयूषरस दवस्थागां[9] "॥८५ ॥
विदुर म्हणे " हो प्रभुजी बळवंतासीं प्रसंग ज्या पडतो

१ माझी प्रजा [ पुत्र ] गरा सेवुनि कशी वांचेल? असें म्हणत्या गुरुस ( धृतराष्ट्रास ) सद्दैराख्य प्रजाक्षरामाजी, स्मरतांचि, विदुर भेटे, असा अन्वय. २ नम्र झालेला. ३ विषासारखें. ४ स्पर्श करितें. ५ धर्माचें केवळ स्थान, असा. ६ निरोप. ७ मूर्खशिरोमणि. ८ धर्मयुक्त अर्थानें सुखदायक. ९ वाईट अवस्थेस गेलेला. १० वणव्यांतील वृक्षास.

स्पष्ट प्रजागर तया हीनबलां[1] हीनसाधनां[2] घडतो ॥ ८६ ॥
कीं जो हृतधन[3] कामी तस्कर[4] रात्रौ न नीज ये त्याला ॥
देवा ऐसा कांहीं दोष नसे कीं तुम्हांकडे आला ॥ ८७ ॥
अथवा परवित्ताचा अभिलाष नसेल कीं मना रुचला ॥
हा बहु पापद तापद यापरि कटु[5]कीं न कटु न वा कुचला[6]"॥
भूप म्हणे "प्राशूं दे धर्माऽमृतकवल[7] बोल, कानाहीं ॥
त्वत्सम सत्समयज्ञ[8] सु- धर्मा-पतिजवळ[9] बोलका नाहीं"८८॥
विदुर म्हणे "जो आस्तिक गुरुवेदोक्तीं जयास विश्वास ॥
मीपण ज्यासि न शिवलें तो पंडित, मान्य होय विश्वास९०
दुर्लभ वस्तु न वांछी न करी जो नष्टवस्तु[10]चा शोक ॥
आपत्तींत न मोहे, त्या पंडित म्हणति जाणते लोक ॥ ९१ ॥
विद्या नसोनि उद्धत, धन नसतां जो उदारपण वाहे ॥
अर्थासि नीच कर्मे जो संपादावयासि जन पाहे ॥ ९२ ॥
नसतां लाभ यशाचा दाटूनि करी परार्थ जो यत्न ॥
मित्रार्थी कपट करी तो साक्षात् मूढजनाशिरोरत्न ॥ ९३॥
मित्रत्व दे अमित्रा जो मित्रद्वेष दुष्ट कर्म करी ॥
तो मूर्ख, असें म्हणती पुरुष-परीक्षा कळे जयांसि बरी॥९४
इत्यादि बहु वदे, तें मोडुनि आली कथाचि आर्यांत ॥

---

१ कमी बल ज्याचें, त्यास. २ कमी सामुग्री ज्याची, त्यास. ३ ज्याचें धन हिरावून नेलें तो. ४ चोर. ५ कुटकी. ६ काजरा. ७ धर्मरूप अमृताचे ग्रास. ८ उत्तम समय जाणणारा. ९ इंद्रा जवळ. १० सांडलेल्या वस्तूचा.

निजपरिवार त्यागुनि जसि भगवन्मूर्ति गोप-भार्यांत ॥९५॥
धर्माऽर्थ-काम-मोक्ष- प्राप्तीचे सिद्ध मंत्र ते बोल ॥
मोल न करवे त्यांचें धनदासाहि, सिंधुहूनि जे खोल ॥ ९६ ॥
सत्य प्रिय हित सर्व- श्रुति-शास्त्ररहस्य विदुर कवि बोले ॥
तो लेलिह[1] जाणो त्या प्रभु-वेणु-रवाऽमृतें निवे डोले ॥ ९७ ॥
भूप ह्मणे " बा सुज्ञा दे सर्व तमासि भीति, परि सवित्या॥
भी न गुहातम[2], तेंवि न तुज पुत्र-प्रेम नीति-परिसवित्या ९८॥
पांडव साधु यशस्कर, अयशस्करसुत असाधु, हें गमतें ॥
रमतें मन उपदेशीं पुत्रस्नेहासवें पुन्हा भ्रमतें ॥ ९९ ॥
पुरुष-प्रयत्न दुर्बळ, दैव बहु प्रबळ, मज असें कळतें ॥
असता बलवंत पुरुष[3]- कार, तरि कधींच चित्त हें वळतें१००
कथिलें नसेल तें वद सांगावें फार-काय हो कवितें ॥
सेवावें सेव्य, जह्नी पुत्र-प्रेमाऽम्ल[4]-पित्त ओकवितें[5] ॥१०१॥
विदुर ह्मणे " राजेंद्रा उरलें अध्यात्म तें सुजातानें ॥
सांगावे, परिसावें; याकारितां श्रीसनत्सुजातानें[6] ॥ १०२ ॥
केली असे प्रतिज्ञा, "मृत्यु[7] ह्मणति, परि नसे; असी कांहीं ॥
तद्वदनें परिसावें . तें तत्व तुह्मीं विचाररसिकांहीं" ॥ १०३॥
भूप ह्मणे " तच्छ्रवणीं माझें अत्यंत मानस त्वरतें[8] ॥

---

१ सर्प. २ गुहेंतील अंधकार. ३ प्रयत्न. ४ पुत्रप्रेमा हेंच अमूलपित्त. ५ कुलीन अशा, त्वां. ६ सनत्सुजात ऋषीनें. ७ मृत्यु नाहीं, अशी ज्यानें प्रतिज्ञा केली आहे, त्या सनत्सुजाताच्या मुखानें. ८ त्वरायुक्त होतें.

सांगावें सर्वज्ञा मज तें आतां तुवांचि तत्वरतें" ॥ १०४ ॥
विदुर ह्मणे " आर्या, तें सांगावें ब्राह्मणें, न अन्यानें, ॥
ठावें, परि न वदावें स्वमुखें म्यां शूद्रयोनिजन्यानें" १०५॥
भूप ह्मणे " या देहें त्या मुनिचा संग मज कसा घडतो ॥
केवळ नीच मनुज हा अमृत[2]-फळांचा समुच्चतर[1] घड तो"॥
चित्तीं विदुर ह्मणे "बा तुज कथिलें तत्व जें तुझ्या तातें[3]॥
या दासासि कथावें त्वां करुनि कृपा सनत्सुजाता, तें"॥७॥
येउनि सनत्सुजातें कथिलें अध्यात्म[4]-शास्त्र अंधातें ॥
जें तत्काळ च्छेदी सुदृढतरा[5]ऽनादि-मोह-बंधातें ॥ १०८ ॥

# अध्याय ४ था.

## सारांश.

दुसरे दिवशीं धृतराष्ट्र सभेंत बसला असतां, संजयानें त्यास धर्माचा व कृष्णाचा निरोप सांगीतला. तें एकून भीष्म ह्मणाला. पुर्वीं नरनरनारायण ह्मणून ऋषि होते.ते ब्रह्मदेवासही पूज्य होते. त्यांच्याच वरानें इंद्रानें पराक्रम केले. त्याच ऋषींचे अवतार हे

१ अतिउंच-श्रेष्ठ. २ हे सनत्सुजात. ३ ब्रह्मदेवानें. ४ ब्रह्मविद्या. ५ आदिरहित जी अविद्या तिचा अतिदृढ असा बंध.

अर्जुन आणि श्रीकृष्ण होत. यांशीं विरोध करणारास कधीं यश यावयाचें नाहीं. कर्ण ह्मणाला, शत्रूशीं साम कधीं होणार नाहीं. मी पांडवांस मारून दुर्योधनाचें कार्य साधीन. भीष्म ह्मणाला राजा, ज्याचा अनेक वेळां अर्जुनानें पराभव केला, अशा कर्णाच्या वचनावर तूं विश्वास ठेवूं नको. द्रोणानेंही तेंच सांगीतलें. पण धृतराष्ट्रानें तें ऐकिलें नाहीं. धृतराष्ट्र ह्मणाला, संजया, धर्म कोणाच्या बळावर आह्मांशीं युद्ध करणार ? संजय ह्मणाला, भीमार्जुनशिखंडी श्रीकृष्ण यांच्या बळावर. त्यांच्या साह्यानें धर्म त्रिभुवनही जिंकील. तें ऐकून धृतराष्ट्र चिंताक्रान्त होउन ह्मणाला, कौरव, पाण्डवांकडून नाश पावतील; असें विदुरानें भविष्य केलें होतें तें खरें होणार, असें वाटतें. संजय ह्मणाला, पूर्वींच तूं दुर्योधनाची उपेक्षा केली, त्याचें हें फळ. आतां त्याचा शोक करून काय उपयोग ? तेव्हां दुर्योधन ह्मणाला, पाण्डव व आह्मी एकाच कुळांत जन्मलों, व एकाच पृथ्वीवर राहतों, मग पाण्डवांना आह्मीं कां भ्यावें ? त्यांचाच जय होणार हें कशावरून ? आह्मांकडे कर्णादि महावीर आहेत; हे इंद्राचाही पराभव करितील; मग पाण्डवांची कथा काय ? पांच गांव तर काय ! पण, अतिसूक्ष्म सुईच्या अग्राएवढा देखील भूमीचा भाग पाण्डवांस युद्धावांचून मिळणार नाहीं. तेव्हां धृतराष्ट्र ह्मणाला. दुर्योधना, असा दुराग्रह धरून आपला नाश करून घेऊं नको. माझें वचन तूं ऐकत नाहीस; पण भीम गदेनें तुझा प्राण घेईल, तेव्हां तुला माझ्या वचनाची आठवण होईल.

आले सभेंत सर्व प्रातःकाळींच, त्यांत संदेश ॥
सांगे संजय, परिसति भीष्मादि सुधीश[1], तोहि मंदेश[2] ॥१॥
संजय ह्मणे " अजी धृत- राष्ट्र महाराज सानुजें धर्में ॥
द्रोणादिकांसह तुह्मां, वंदुनि तुमचीं विचारिलीं शर्में[3] ॥२॥
वदला जिष्णु असें कीं "माझ्या तातासमक्ष, मंदेशा ॥
दुर्योधना, सभेंत स्पष्ट समग्राहि सांग संदेशा ॥ ३ ॥
सावध होउनि सत्वर आह्मां अस्मद्विभाग ओपावा ॥
कोपावा न वृकोदर[4]- आहि न तुझा आयु[5]-वायु लोपावा ॥
साचें, याची, काळा- हूनि उणी एक तिळहि न गदा, हें ॥
न मरावे बहु बंधु त्वन्नाशें, जेंवि नाग[6] नगदाहें[7] ॥ ५ ॥
लोभदुरभिमानातें, रक्षाया प्राण यश कटक, टाकीं ॥
यमसम यम समरीं हे पाहुनि ह्मणसील तूं कटकटा[8] कीं ॥६॥
जागवितो हित-हस्तें सुप्ता तुजलाहि हा निरोपानें ॥
धर्म-क्षोभें होइल, तसि न हराच्याहि, हानि रोपानें[9] ॥ ७ ॥
हा श्रीकृष्ण प्रभु जरि काय क्रोधें-करूनि पाहेल ॥
राहेल कोण कटकीं भट, कीं काळासही न साहेल ॥ ८ ॥
सोसेल रुद्र-चक्षु, प्रस्फुट[10] जरि वरिल शोणतेला[11] तें ॥
दीप्तालय विझवाया दाटुनि घालील कोण तेलातें ॥ ९ ॥
गांडीव ज्यांत तो सुर- पतिसहि नेदील विजयलाभ रण ॥

१ ज्ञात्यांमध्यें श्रेष्ठ. २ मूर्खशिरोमणि धृतराष्ट्र. ३ कुशलें. ४ भीमरूपसर्प. ५ आयुष्यरूप वायु. ६ हत्ती. ७ पर्वतदहनानें. ८ हायहाय. ९ बाणानें. १० स्पष्ट. ११ आरक्तपणाला.

कुरु-राज्य तुज न साजे, प्रभुचें चोरास जेंवि आभरण १०
स्पष्ट बुडविंतिल शिकवुनि कुमति शकुनि कर्ण हे तुह्मां,तारा
कां शोकांत बुडवितां बालिश हो जन्महेतु ह्मातारा ॥११॥
धृष्टद्युम्न शिखंडी सात्यकि अभिमन्यु हे न सामान्य ॥
वृद्ध द्रोण पितामह शतहि खळ तुह्मी दहां नसा मान्य१२॥
द्यूत न अजातरिपुसीं, भीमासीं जीवनघ्न[1] संगर हा॥
रंग रहाया धरुनि द्रोण-विदुर-भीष्म-बुद्धि-संग रहा ॥१३॥
दे भाग, अभय देइल धर्म महाराज हा अवनतातें॥
न गणुनि दोषशतातें, करिल, करावें जसें अवन तातें॥१४
युद्धचि करीन ह्मणसी, परि पश्चात्ताप बहुत बाधेल॥
धर्म-न्याय-विरोधें कोणाचेंही न इष्ट साधेल ॥ १५ ॥
जन्हि तूं सानुज साप्त प्राप्तमहोत्कर्ष आजि सामरसा[2] ॥
पामर-साम्य वराया इच्छिसि कलह,त्यजूनि सामरसा''॥१६
ऐसें धर्मानुमतें कृष्णानुमतें उदंड वदला हो ॥
तें बहु काय वदावें शीघ्र अजातारि राज्यपद लाहो ॥१७॥
भीष्म ह्मणे " कुरुराया, ऐक करुनि सावधान कान मन॥
दोघेचि देवें[3] न करिति पूर्वी श्रीसत्यनायकां नमन ॥ १८॥
तेंव्हां पुसे बृहस्पति विधिला, कीं''सर्वसिद्धि-सदनमुनी॥
शक्राद्यखिलसुराहि कृत- कृत्यचि होती त्वदीय-पद नमुनी
विश्वगुरो, कां गेले, न नमुनि दोघेचि देव हे, तूतें ॥

१ जीवनाशक. २ अमरसहितसा. ३ नरनारायण ऋषि. ४ ब्रह्मदेवाला.

कुतुकीं सभा बुडतसे याच्या स्वमुखेंचि सांग हेतूतें''।२०॥
वदला विधि कीं''ते श्री- नर-नारायण तपो-नदींन मुनी ॥
होती विज्वर सद्यः प्रेमें ज्यां भवमहानदी नमुनी ॥ २१ ॥
मत्तेज त्यांपुढें किति कीं ते प्रभु मुख्य विश्वपाळक हो ॥
महिमा अनंत त्यांचा, त्यांसम ते त्रिभुवनांत, बाळकहो२२
जाय सुरेश्वर, होते ज्या स्थानीं तपत ते प्रभू तरणी॥
मागे वर, कीं द्यावें साह्यें मजला यश प्रभूत रणीं॥२३ ॥
शरणागत-शक्रा यश देती होउनि सहाय बहुदा ते ॥
बहुदार्त्वें गतमद मग ह्मणतिल कां न हाय बहु दाते२४
जे प्रभु नर नारायण, ते अर्जुन वासुदेव अवतरले॥
वदला असेंचि नारद ज्याच्या बोलें असंख्य भव तरले ॥
यांसीं विरोध करिती जे जे ते वेंचिती असु खलेश ॥
जे यांसि हात जोडिति त्यांसि स्वप्नीं नसे असुखलेश ॥
दुर्जात कितव खल जे ज्यांच्या लाविति यशास डाग मती
आह्मांहुनि कर्ण शकुनि दुःशासन हित तुला जडा गमती॥
गांडीवसुदर्शनधर नरनारायण समर्थ अमरांत ॥
बसतिल एकरथीं रथि सारथिभावेंकरूनि समरांत ॥२८॥
मेरुहि खचेल राया श्री-धर्माच्या उलोन कोपानें ॥

---

१ तपाचे सागर. २ज्वररहित. ३ संसाररूप महारोग ज्यांस, ते. ४ हे देवहो, ऋषिहो. ५ हा बहुधा शब्दचा अपभ्रंश असावा. ६ त्यांच्या औदार्यानें. ७ दुष्टशिरोमणि.

हो सावधान या श्री- मद मद्याच्या भुलों नको पानें॥२९॥
तुज काय? शत्रुसहि मी न स्वप्नांतहि कथीन अहितातें ॥
मणिहार घालिजे तो 'शिशु कंठीं कीं महोग्र अहि तातें'' ३०
कर्ण म्हणे “ हो पंडित करितां [1]सद्धर्मनिरतकुत्सा हें ॥
अनुचित, मी पाण्डववध करुनि करिन मित्रकार्य उत्साहें॥
हा क्षत्रधर्मनिष्ठ स्तुत्य तिळहि अघ नसोनि यास कसा !!
निंदिसि न दोष लाविति सुजन न लावून सोनियास कसा
अजि [2]पूर्वविरुद्धांसीं करिती कोणीहि तरि शम नयज्ञ ॥
राज्यस्वर्गफलार्थी सिद्धिस नेतीच अरिशमनयज्ञ''॥ ३३ ॥
भीष्म म्हणे “ धृतराष्ट्रा देईल दहांत दैन्य हें मत रे ॥
खळमळसंसर्गास्तव न रणकसीं गुरुहि सैन्यहेम तरे ॥३४॥
दावील सूतसुत हा हित ऐसें लेखिल्या विनाशपथा ॥
विधिच्या[3]हि पतंग खळहि न वळति फळ देखिल्याविना,[4]शपथा
हा पावला असे निज गुरुपासुनि भंगजनक[5]शापातें ॥
पापा[6]तें वाग्दंडें ताडिति गुरु, भूपजन कशापातें ॥ ३६ ॥
अवलंबिला तव सुतें भीमाब्धि तरावयासि हा प्लवँ[7] गा ॥
मारुतिं भंग घेडेल प्रचुरचकर्ण[8]चर्वणोद्धता प्लवगा[9] ॥ ३७ ॥
एकैकें पाण्डुसुतें केलें जें कर्म, यासि दुष्कर तें॥

---

१ सत्यधर्मनिष्ठाची निंदा. २ पहिल्यानेंच जे विरुद्ध, त्यांशीं ३ ब्रह्मदेवाच्या. याशब्दाचा 'शपथा, याकडे अन्वय शपथशब्द पुलिंगी आहे. ४ परशुरामापासून. ५ नाशासकारणभूत अशा शापाला. ६ पाप्याला. ७नौका. ८ पुष्कळ चणे खाऊन मत्तझालेल्या. ९ वानराला.

वाचाळनीचसख्यें न फळ, जसें वंध्यदारशुष्करतें ॥ ३८ ॥
सिंहें मृगसा, पार्थें गोग्रहणां गांठिल्या स्व भावातें ॥
त्यजुनि पळाला कैसा स्मरत नसे या मळस्वभावातें ॥३९ ॥
कोठें गेला तें हा पार्थें हरितां सुकीर्तिसह वास ॥
बुडतीच अकुळजांच्या सत्कुळजांचीहि कीर्ति सहवासें॥४०॥
रे धृतराष्ट्र, जनितसुत- शत-मिष-विष-विषम-खरतराधे या॥
गंधर्वबद्धदुर्यो- धनमोचनवृत्त पूस राधेया ॥ ४१ ॥
पाण्डव दया न करिते तरि ते अरि तेज सर्वही हरिते ॥
होतों मुनिपीतजलधि- कुक्षि तसे विगतसार कां न रिते॥
आतां बहु गर्जतसे मत्तवृषभसा सभेंत वित्रप हा ॥
याच्याचि बळें पांडव- परिभव करणार पुत्र चिंत्र पहा"
द्रोण ह्मणे " हेंचि करा भरतर्षभ ससार वदला हो ॥
पद लाहो धर्म उचित,शुचितम शम,यशचि घ्या न वदलाहो
शूर रणक्रूर सकळ काळतसे, तदपि ते दयाळु बरे ॥
पांडव सुयोधना सुख देतील अपार, खेद या लुबरे॥४५॥
असति बहु धनुर्धर परि पार्थ सदा नव्यसाचि समरा या ॥

१ वस्त्रें. २ कुलहीनाच्या. ३ सुतशतरूपविषाच्या सेवनानें विषम व खरतर असा आधि (चिंता) झाला ज्याला, तो. ४ कर्णाला. ५ अगस्तीनें पिऊन टाकिलेल्या समुद्राच्या एका भागासारखे ६ बलहीन. ७ निर्लज्ज. ८ आश्चर्य. ९ एकादें कार्य करण्यास असमर्थ असून तें करण्यास पुढेंपुढें होणारे. १० नवीनसा.

हटकाया भट काया साजिल कवण सव्यसाचिसम राया"॥४६
अंधापासुनि पावे भीष्म-द्रोणोक्तही अनादर तें ॥
जेंवि अनादरिजे हरि- "हरकीर्तन सुबंधिरें आनंद-रतें॥४०॥
सभ्य ह्मणति हा, हाही धरितो, जसि धरिति कामना सदरी
हा! जनरीति असी, मग कविच्या येइल न कां मनास दरी
वृद्ध ह्मणे " रे संजय अकरा, अक्षौहिणी, चमू-श्रवण ॥
करुनि अजातरिपु कसें वदला, नृप बोलिले कसे कवण ॥
आह्मांकडे मिळालें बहुबल, हें परिसतां अनीचेष्टा ॥
धर्मा, कैसें गमलें, केली तेणें कसी जनीं चेष्टा ॥ ५० ॥
तला जरि मोहमद- राज्यश्रीसीं, बळेंचि मंद रतो॥
कोण्ही असें ह्मणे कीं नशमाया शत्रुसिंधुमंदर तो ॥ ५१ ॥
आज्ञार्थ युधिष्ठिरमुख कवण पहाती धरून समरेहा ॥
सम रे हा त्या यांच्या ओपुनि आधींस मानस मरे हा"॥५२
संजय ह्मणे "नृपाळा सद्दात्याचें धनेच्छु संसारी ॥
देखति जसें मुख तसें धर्माचें भीष्म जिष्णु कंसारी ॥५३ ॥
आज्ञेचीच पाहती वाट, स्तविती नृपाळ भाटतसे ॥
क्षिप्र जयार्थ निघावा प्रभु बालांसहि असेंचि वाटतसे" ५४
भूप ह्मणे "कलह नव्हे कार्य, तरि तयासि कार्य कां गमला

१ बहिऱ्यानें. २ अरसिकानें. ३ सज्जनशत्रु. ४ अनीच-साधु, त्यांनाइष्ट अशाधर्माला. ५ वर्तन. ६ तो शत्रुसिंधुमंदर (धर्म) शमाया, कोण्ही असें(पूर्वार्ध) नह्मणे कीं! हा अन्वय. ७ युद्धाची इच्छा धरून आज्ञा मागण्याकरितां धर्माच्या मुखाकडे कोण पहात होते ?

आह्मांसीं कोणांच्या सामर्थ्यें भांडणार सांग मला"॥५५॥
ऐसें सभेंत पुसतां तो काळ-ग्रस्त-बुद्धि[१] जाणोनी ॥
पडला मूर्च्छित संजय चित्तीं भावी अनर्थ आणोनी॥५६ ॥
विदुर ह्मणे " राजेंद्रा त्वच्चित्ताला असत्य न गमो हा ॥
संजय पडला कीं जी झाला वश जरि महाजनग[२] मोहा"॥
भूप ह्मणे " बहुधा हा भ्याला भीमादि-योध-तेजानें ॥
भ्यावाचि तो, निरखिले सहसा सक्रोध योध ते ज्यानें"५८
सूत उठोनि ह्मणे " हो करणार प्रभु तुह्मांसवें कलहा ॥
धृष्टद्युम्नबळानें द्रोण-वधोत्पन्न[३] कीं महाबळ हा ॥ ५९ ॥
जो बक-हिडिंब-मागध- कीचक-किर्मीर-शमन भीम रणा ॥
चिंती, बहु न विलासा, ज्याचें स्वप्नींहि न मन भी मरणा
जो गंधमादननगीं क्रीडे प्रभु, जेविं एकला भवनीं ॥
क्रोधवशां[४] वधुनि वदे मज मोठा हाचि एक लाभ वनीं६१
त्याच्या बळें तुह्मांसीं धर्म प्रभु भांडणार बा राजा ॥
जपला विराटनगरीं बहु बहुत वनींहि अब्द बारा ज्या॥६२॥
ज्या श्रीगांडीवधनु- र्वल्लीतें सत्यपांडवानी ती ॥
देवी[६] देती युद्धो- त्साह, दुजी सत्य पांडवा नीती॥ ६३ ॥
जो भांडला शिवासीं प्राप्रहरि-हर-प्रसाद होरां[७] ज्या ॥

---

१ कालानें साधिली बुद्धिज्याची, तो. २ महाजनांत गमन करणारा (मोह) ३ द्रोणवधा कारितां उत्पन्न झालेला. ४ क्रोधाला वश झालेले कुबेरसेवक. ५ ब्रह्मांड. ६ गांडीवधनुर्वल्ली देवी ७ मुहूर्त.

त्याच्या बळें तुह्मांसीं धर्म प्रभु भांडणार हो राजा ॥६४॥
यक्षें पुरुषत्व दिलें ज्याला, जो धैर्यसन्नगं[1] शिखंडी ॥
करणार तद्बळें रण, कीं तो गांगेयपन्नगशिखंडी[2] ॥ ६५ ॥
जो वासुदेव भगवान् सर्वाश्रितकामकल्पनग[3] राया ॥
त्याच्या बळें सुरपुरा[4] वेइल, मग कां न अल्प नगरा या६५
करिल न्याय ब्राह्मण[5] सत्पुरुषाशीर्बळेंचि कलहातें ॥
होतिल अजातरिपुच्या भग्न रणांत क्षणांत खल हातें ६७
प्रज्ञाचक्षु म्हणे " हे सर्वहि एकीकडे महाबाहू ॥
एकीकडे वृकोदर मत्पुत्रांतें रणीं न हा बाहूं[6] ॥ ६८ ॥
भीमापासुनि भीतों, मी हरिपासूनि जेविं काळवि[7] ॥
घेइल हा न वधाचा विटँ, घेइल एकवेळ काळ विट ॥६९॥
अस्त्रीं गुरुसम; कोपीं हरसम, वेगींहि वातसम, जो गा ॥
देवा मंद सुयोधन भीमविरोधें स्वघात समजो गा ॥ ७० ॥
नीज न ये रात्रिंदिवस भीमाचें लागलेंचि मतिला भें ॥
आजूनि वांचलों कीं उरले द्यूतांत, याचि अतिलाभें॥७१
म्हणतो मरूं नका रे' भीमकरें मारवूं नका राजे॥
पारि नवळती कसे तर- तिल गुरुच्या लंघिती नकारा जे७२
देवासुरांहि दुःसह भीम, असो सगद[8] कीं असो अगद[9] ॥

१ धैर्याचा उत्तम पर्वत. २ भीष्मरूप सर्पाचामोर. ३ आश्रितांच्या सर्व इच्छा पुरविणारा कल्पवृक्ष. ४ अमरावतीला. ५ नीति, ब्राह्मण व सत्पुरुष, यांच्या आशीर्वादांच्या बळानें. ६ बोलावूं. ७ कंटाळा. ८ गदाधर. ९ गदाहीन.

अग-दर्पाला[1] वज्री[2] अरि दर्पालाहि होय हा अगद[3] ॥ ७३॥
राजर्षिवर युधिष्ठिर त्याचा ब्रह्मास्त्रसाचि निःश्वास[4] ॥
याची काय कथा? तो भस्म करील[5] क्षणांत विश्वास ॥७४
भीष्म द्रोण-कृपाहीं परमाप्तांहीं सदा सहायांहीं ॥
भुज-बुद्धि-बळें दिधला व्यसनांत पडों न दास हा यांहीं ॥
आतां यांहीं आर्य- व्रत कैसें जीवितार्थ सोडावें ॥
मोडावें कैसें मन अपयश कैसें नवेंचि जोडावें ॥ ७६॥
कर्ण मदय प्रमादी गुरु-भीष्महि वृद्ध, पार्थ तरणा रे ॥
आहेत काय कोठें- तरि बाहुबळें समुद्र-तरणारे ॥ ७७ ॥
भीमार्जुनाच्युत[7] रणीं मथितिल अदितितनयां[8] सकटकांतें ॥
आलें येइलही जें नृप-बळ वधितिल न यांसकट कां तें ॥
तें सत्य होत आलें विदुरें जें भावि घातलें कानीं ॥
केला पहा कसा हा येउनि पोटासि घात लेंकांनी ॥ ७९ ॥
जो मज ताप कुपुत्रें गिरिसाहि पविच्या[9] न दाविला पातें[10] ॥
न तरेन वृद्ध मी सुत- शोक-घनज-विष-नदा[11] विलापातें ८०
संजय ह्मणे "पहावा स्वतनुज-परिणाम जो भला तातें ॥

---

१ पर्वतांच्या गर्वाला. २ इंद्र. ३ औषध. ब्रह्मनिष्ठ राजांमध्यें श्रेष्ठ. ४ श्वास. ५ जगाला. ६ वेसावध. ७ भीम, अर्जुन व श्रीकृष्ण. ८ देवांना. ९ वज्राच्या. १० प्रहारानें. १० पुत्र शोकरूप मेघापासून उत्पन्न झालेल्या विषाच्या (उदकाच्या) नदाला.

नाचों दिला सुत गृहीं धरुनि द्यूताभिधा अलातातें॥८१॥
तेव्हां स्मित ये वदनीं न मनीं ये कीं करील हा हानी॥८२॥
झालें दीप्त अलातें जें गेह विझेल काय हाहानीं ॥ ८२ ॥
आजुनि तरि टांका कीं प्रभुहो, कारालयांत हा कोंडा ॥
प्रेमकरें एखादे ते कण साराल यांत हा कोंडा ॥ ८३ ॥
होय न तें शंख-शस्तें जें शिवं एकेंचि दक्षिणावर्तें ॥
लोकद्वयीं सुखें, श्री पात्रीं देवूनि दक्षिणा, वर्ते ॥ ८४ ॥
लटिक्याचि अनीशत्वा धरिसी न भाधेल या सभा सोंगा॥
हितकर परि परसे तुज जरि आह्मीं आप्त दास भासों गा''८५
तेव्हां सुयोधन ह्मणे "अजि तात, मद्वुक्तिलाहि परिसा हो॥
तुमच्या सभेसि यद्यपि मन्मत बहुताचि असह्य परि साहो८६
पांडवभय न धरावें, झाले पांडव कुळांत ते ज्या तें ॥
आह्मांसहि प्रसवलें जाणे जग आमुच्याहि तेजातें ॥ ८७ ॥
धर्मासि भेटले जैं कृष्णादि श्याल सर्व हे रानीं ॥
वदले राज्यहरण म- द्वध तें कथिलें समस्त हेरांनीं ॥ ८८॥
तेव्हां अभय दिलें मज भीष्मद्रोणादि सर्व गुरुगुरुनीं ॥
देवीहरिंश्रितांचें वनहरि हरितील काय गुरुगुरुनीं ॥८९ ॥
स्वाधीनमृत्यु भीष्म, द्रोणहि उग्रप्रताप, हा राविला ॥
जिंकिल, याच्या तेजें. कोणाचा न प्रताप हाराविला ॥ ९०
वाखाणिलें मज बंळें, भीम मजपुढें धरील न गदेतें॥

१ द्यूत या नांवाच्या २ कोलिताला. ३ बंदिगृहांत. ४ अडकावून टांका. ५ कल्याण. ६ पराधीनतेला. ७ शत्रुसारख. ८ मेहुणे. ९ पार्वतीच्या सिंहाच्या आश्रिताचें १० इच्छामरणी. ११ बलरामानें.

गुरुचा प्रताप बहु दे याहुनि अत्यल्प कल्पनगं दे तें ॥९१॥
भ्याले पांडव आम्हां कीं प्रार्थुनि पांच मागती गावें ॥
यश आमुचें कवीला वाटे गावूनि मागती गावें ॥ ९२ ॥
ज्याचा तात अयोनिज, मायहि, हा वीर काय सामान्य ॥
अश्वत्थामा, सर्वां धन्वधरां रामरायसा मान्य ॥ ९३ ॥
सहजकवचकुंडलधर रविसा तेजोनिधान कर्ण, वहा ॥
चिंता यास, यशोस्त्रा- ऽमृतरत्नार्चित नृकाय अर्णव हा९४॥
कांपत असेल शक्राहि परिसुनि माझ्या सुयोर्धनागातें ॥
बाहेल कोण योद्धा समरीं राया सुयोधना मातें ॥ ९५ ॥
केशव सात्यकि दोघे, पाण्डुतनय पांच, सात हे तिकडे ॥
त्यांताहि हरिप्रतिज्ञा असि कीं पाहूंनयेचि हेतिकडे ॥ ९६ ॥
भगदत्त शल्य भीष्म द्रोण कृप द्रौणि कर्ण हे तिपट ॥
वीर मजकडे, यांचे रविसहि आच्छादितील हेतिपट ॥९७॥
भ्यालां कां हो तात? स्वस्थ रहा, पांडवांसि पिळितील ॥
खिळितील वायुसहि हे चारि दिवस ते मिशांसि पिळितील॥
भीमातें मारिन मी वधितिल कर्णादि 'फाल्गुनासि पणें ॥
रिपुरक्ताचें खेळों पाहुनियां समरफाल्गुनासि पणें" ॥९९ ॥

१ कल्पवृक्ष. २ पुनः ३ वर्णावें. ४ शुक्रशोणितांच्या मिश्रणानें नझालेला. ५ धनुर्धरांला. ६ यश आणि अस्त्रें, हींच अनुक्रमें अमृत व रत्नें यांनीं अर्चित (अलंकृत) ७ मनुष्यदेहधारी. ८ उत्तमवीरांच्या नांवांला. ९ श्रीकृष्णाची प्रतिज्ञा. १० शस्त्राकडे. ११ शस्त्ररूपवस्त्र.

धृतराष्ट्र म्हणे " सूता युद्धकथा कोण काय वदतात ॥
वद, परिसो सुत, परिसो गुरु, परिसो कीर्तिनीतिपदें तातें"॥
संजय म्हणे " शिखंडी म्हणतो भीष्मासि ठेविना सत्य"॥
धृष्टद्युम्न म्हणे " मी द्रोणा रोगासि जेविं नासत्य"॥१॥
निज भाग कल्पिलासे मद्रेश युधिष्ठिरें अहीनकुळें ॥
शतहि सुत तुझे भीमें स्वविभागत्वें जसे अही नकुळें १०२
अर्जुन वदला येतिल दुर्जय वैरीभनक्रें सम राजे ॥
कर्णजयद्रथमुख सुख- कर माझा भाग, शक्त समरा जे"१०३
अभिमन्यु बोलिला कीं मोडा घालूं नयेचि इतरानीं ॥
द्यावा मज दुर्योधन- दुःशासनपुत्र भाग पितरांनीं"॥१०४॥
नकुळ असें वदला कीं " भाग उलूकादि आपले खावे ॥
मद्बाणांनीं, नाहीं तरि त्यांसम हेहि पाप लेखावे ॥१०५॥
नकुळानुजप्रतिज्ञा ऐसी हीं परिशिली मुखानें हो ॥
कीं, शकुनि आपुल्याचि व्यसुं, पापी परि, शिलीमुखानें हो
आवश्यक-क्रिया जी शीघ्र तुह्मीं घ्याच उरकुनी तीतें ॥
कोणाचें आचरतां लोकांत उरेल उर कुनीतीतें ॥ १०७ ॥
अंध ह्मणे " दे त्यांचें त्यांला, केल्या जरि प्रतिज्ञा, ते ॥
सज्जन करितिल करुणा, रक्षिति नम्रा अरिप्रति ज्ञाते॥१०८॥

१ कीर्ति व नीति ह्यांचें स्थान. २ भीष्म. ३ उत्तमकुलीनानें. ४ दुर्जय वैरी इभ नक्रसम. ह्म० अजिंक्य जे शत्रु, हेच हत्ती, त्यांचे नक्र. ४ दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मण व दुःशासनाचा पुत्र दौःशासनी ५ माझे बाणही. ६ सहदेवाची प्रतिज्ञा. ७ गतप्राण. ८ बाणानें.

ज्यांच्या बळें उडसि ते, तिकडेचि मनेंहि, तुजकडें देहें ॥
साम करावें त्यांसीं, बा मज वृद्धासि एवडें दे हें"॥१०९॥
ते हेहि एकजाती ते हेहि क्षोणिवरि रहातात ॥
मग त्यांचाचि विजय कां? काय ह्मणावें तुह्मां अहा तात॥
न बळें तुझ्या, न गुरुच्या, न गुरुसुताच्या, न याहि आजाच्या
स्वबळें कर्णबळें मी हरणार असूंसि धर्मराजाच्या ॥१११॥
करितिल समरीं माझ्या ते, मी त्यांच्या करीन, मथना कीं॥
भोगीन भाग्य एथें कीं हाचि धरूनि भव्यपथ[1] नाकीं १२॥
अतिसूक्ष्में सूच्यग्रें जितुका भू भाग होतसे विद्धं ॥
युद्धाविना न देइन जरि ते तितुकाहि घ्यावया सिद्ध"११३
प्रज्ञाचक्षु ह्मणे " रे देईल न एकवेळ विष मरण ॥
अशनिहि[3] दहनहि, परि जो; भीमासीं तो अतीव विषम रण
न करीं दुराग्रह अरे वत्सा हो सावधान रे शमं[4] रे ॥
त्यजितां जळ मीन तसा, धर्मनय त्यागितां नरेश[5] मरे १६
स्वबळेल भीम हरिसा मन्मतिला तों असें गमे रुरुसे ॥
व्हाल तुह्मी, कीं विधिवरि त्याचें ऐकोनि सत्व मेरु रुसे ॥
नग जगतीवरि न तसे तुटतील धृतायुधा सुतारा जे ॥
भीमा भी माझें मन दुःसाध्य न या पृथासुता राजे ॥ १७ ॥
ज्यां अहितं पितृपितामह, सांगावें काय त्या मग दहांनीं

---

१ कल्याणमार्ग. २ व्याघ्र. ३वज्र. ४शांत हो. ५राजा. ६ मृगासारखे. ७ ब्रह्मदेवावर. ८ भीमाचे. ९ वृक्ष. १० धरलें आयुध ज्यानें, त्या. ११ ज्या दुर्योधनाला. १२ शत्रु. १३ पिता-धृतराष्ट्र व आजा भीष्म.

स्मरसिल मद्रच जेव्हां प्राणाची करिल तो सगंद हानी॥ १८
संजय, कंजयशोहर- नयन कसें काय बोलिला वद रे ॥
आइक हो सुखपद रे मदरेचितसद्यशोनिधे सदरे ॥ १९ ॥

# अध्याय ५ वा.

## सारांश.

संजय ह्मणतो, राजा धृतराष्ट्रा, श्रीकृष्णाचा तुला असा निरोप आहे कीं, सर्व सारासार करून परलोकास जाण्याची तयारी कर; तें ऐकून दुर्योधन हांसून ह्मणाला, अशी बडबड ऐकून भिणारा हा दुर्योधन नव्हे. अशानें, भूमीचा तिळाएवढाही तुकडा पांडवांस मिळणार नाहीं. माझ्या पराक्रमाचें मी स्वमुखानें वर्णन करीत नाहीं. तो तुह्मांस विचार केला असतां, सहज समजेल. कर्ण ह्मणाला, भीष्म मला गुरुशापदग्ध असें ह्मणतो. पण मजवर गुरुप्रसाद आहे ह्मणून मी अद्याप जीवंत आहें. मी अर्जुनास मारीन. श्रीकृष्ण भगवान परम समर्थ आहे हें. मला माहित आहे. पण भीष्माला माझा उपहास करण्याचीच हौस फार. ह्या भीष्म जीवन्त आहे तों पर्यंत मी शस्त्र धरणार नाहीं. भीष्म ह्म-

१ गदाधर भीम. २ कमलाचें यश हरणारे नेत्र ज्याचे, तो श्रीकृष्ण. ३ गर्वानें रिक्त केला यशाचा समुद्र ज्यानें, अशा. ४ सज्जनशत्रो.

णाला, दुर्योधना कर्णासारख्या प्रतिज्ञा करणाऱ्या वीराच्या साह्यानें तूं पाण्डवांचा पराभव कसा करशील ! दुर्योधन ह्मणाला मी केवळ दुःशासन, कर्ण ह्यांच्या व माझ्या स्वतांच्या बळावर भरंवसा ठेवून हें युद्ध आरंभिलें आहे. विदुर ह्मणाला, कलहानें कुळाचा नाश होतो. याकारितां भूमि नदेण्याची प्रतिज्ञा बरी नाहीं. धृतराष्ट्र, विदुरवचनाची प्रशंसा करून ह्मणाला, अर्जुन बोलला कीं, धर्मविभाग न दिल्यास मी एकटाच तुमचा सर्वांचा नाश करीन. यावर दुर्योधन कांहीं बोलला नाहीं. व सर्व राजे स्वस्थानीं गेले. मग एकांतीं धृतराष्ट्र संजयास ह्मणाला, संजया, इकडे व तिकडे बल किती आहे. व युद्धांत जयपराजय कोणाचा होईल ! गांधारी, भीष्म, विदुर व्यास यां समक्ष संजय ह्मणाला, राजा, प्रतियुगीं अवतार घेऊन दुष्टांचा संहार करणारे कृष्णार्जुन जिकडे आहेत तिकडेचेंच बल अधिक व तिकडेच जय होईल, हें काय सांगावें ? तें ऐकून धृतराष्ट्र व गान्धारी यानीं दुर्योधनास, श्रीकृष्णाला शरण जाण्यास सांगितलें. पण तें व्यर्थ. व्यास सत्संगतीनें वागण्याविषयीं धृतराष्ट्रास उपदेश करून निघून गेला.

संजय ह्मणे पुसाया गेलों लोकैकनायका यदुजा ॥
तेव्हां वदला प्रभु तें कथितों सांगों रहस्य काय दुजा ॥ १ ॥
एकीं शयनीं होते नर नारायण पिऊनि हाला हो ॥

---

१ श्रीकृष्णाला. २ मद्य.

तद्दर्शनामृताचा आज्ञेनें घे भिऊनि हा लाहो ॥ २ ॥
जेथें अभिमन्यु नकुळ सहदेव अशासही न शिरवेच ॥
तेथें शिरतां कवणा न ह्मणेल स्वापराध शिर वेचें ॥ ३ ॥
ध्याउनि ज्यासि निवाले सज्जन अमृतें जसे,न हाले तें ॥
कृष्णाख्य तेज निजळें होतें राया पिऊनि हालेतें ॥ ४ ॥
कृष्णा भामा देवी साक्षात् देवीच ज्या जना दिसती ॥
होत्या कृष्णापाशीं हरिहरनिकटीं जशा अनादिसती ५ ॥
जेणेंकिरातऋषि- प्रभुसीं केला प्रसिद्ध वाढ कली ॥
तो मजकडे स्वपादें कांचनमय पादपीठ बा ढकली ॥ ६ ॥
शरणागताधिगिरिंचें बा केलें ज्या कृपाकरें पीठ ॥
प्रभुयुग वंदुनि महिवरि बसलों स्पर्शुनि नृपा करें पीठ ७ ॥
वदलों वाचिकं सांगा आलासे दास हा निरोपाला ॥
कुरुसंततितुलसीच्या स्पर्शो द्यावी न हानि रोपाला ॥ ८ ॥
मद्वचनातें परिसुनि पाहूनि द्रौपदी वदन रगडी ॥
वदवाया स्वांकस्थ श्रीभामाजानिचें पद नर- गडी ॥ ९ ॥
पार्थ ह्मणे '' यदुराया वाचिक या संजयासि सांगावें ॥
पिकपतिपुढें वसंतीं पृथुकानें त्यजुनि मान कां गावें ॥ १० ॥

---

१ खर्चंकर. २ ध्यान करून, ३ भयंकर. ४ सिंहासनावर बसल्यावर पाय ठेवण्याचें आसन. ५ शरण आलेल्या जनांचे आधि हेच गिरि, त्यांचें, ६ पिष्ठ. ७ निरोप. ८ आपल्या मांडीवरील. ९ माभा जाया ज्याची, तोश्रीकृष्ण. १० कोकिळापुढें. ११ बालकानें

श्रीकृष्ण उठोनि ह्मणे "संजय, दुर्योधनासि सांग असें ॥
वारासार करुनि यम- सदना जायास साप्त सिद्ध असें११॥
गोविंदा धांव, असें व्यसनीं मारुनिं सभेंत हाकेला ॥
या कृष्णेनें तेंव्हां, पासुनि केवळ ऋणीच हा केला॥ १२ ॥
फेडायास्तव करितों तेरा वर्षेंहि जप तप रिणा मी ॥
वांहों न शकें, असतें हें द्याया दुःख जपत परिणामीं १३॥
जे त्वत्सहाय, आह्मी भीमार्जुनशौरि हे तिघे त्यांतें ॥
मारूं रणांत, सोडूं तृणघेत्यांतें, न हेति घेत्यांतें" ॥ १४ ॥
भूप[४] ह्मणे "पुत्राचा अभिमान पिता धरील हा नियम ॥
धर्मप्रियार्थ वत्सा त्वत्कटकांची करील हानि यम ॥ १५ ॥
मारुतेंहि कसपटेंसीं कटकें कुतुकें करूनि उडवील ॥
विजयध्वजस्थ मारुति सर्वांसहि सागरांत बुडवील ॥१६ ॥
शक्र त्रिदशांकरवीं त्वद्वीरशिरोंबुजांसि खुडवील ॥
चिंतुनियां ऐरावत वैरा, बत वादि-वीर तुडवील ॥ १७॥
संरक्षितील नानो- पायें त्यां वैद्यराज नासत्य ॥
ज्यांच्या बळें उडसि तूं दैवबळ नसेचि त्या जनां सत्य" १८
हांसुनि ह्मणे सुयोधन "धरितिल सुर काय जी नवी प्रकृति
ऐसें न ह्मणति नारद मार्कंडेयादिं जीनें विप्र कृती ॥ १९ ॥
जरि कामकोपलोभ- द्वेषांतें सुर मनुष्यसे धरिते ॥
तरि कां न काननाप्रति- जातां प्रियपुत्रसाह्य ते करिते २० ॥

१ आप्तांसह, २ वायु. ३ ह्मातारे, ४ धृतराष्ट्र. ५ हे सुयोधना

माझ्यांठायीं केवळ मनुजबळ न, दैवबळहि बहु वसतें॥
नानोत्पात शमवितों मीहि, असें मच्चरित्र बहुवसं तें ॥२१॥
गडबड वडबड करितीं जरि तीव्र, न पावतील परि भूतें ॥
परिभूतें होतीलचि मन्मंत्रबळें पळांत अरिभूतें ॥ २२ ॥
जें शुभ अशुभ ध्यातों सिद्धिप्रति पावतेंचि ताता तें ॥
मेघातें दहनातें वर्तवितों मी तसेंचि वातातें ॥ २३ ॥
स्नेह तुह्मांसि भिववितो आच्छादुनि निरुपमाहि मन्महिम्या ॥
उद्धरिजेल वराहें जसि तसि लीलेंकरूनि मन्महि म्या॥२४॥
स्वल्पें काळें पुत्रें पाण्डव मथिले असेंचि परिसाल ॥
काठिन दगडाचीही मी कोणाहि न निघेल परि साल २५
स्वश्लाघा न बरी परि तुमच्या आश्वासनार्थ, हे राहो॥
इतरां पुसोंनका हें प्रज्ञानेत्रें तुह्मीच हेरा हो" ॥ २६ ॥
कर्ण ह्मणे "त्यजिजेतो जो दुर्लभवस्तुकाम तो भानें ॥
गुरुपासीं ब्राह्मण मी ऐसें वदलों महास्त्रलोभानें ॥ २७ ॥
कळतांचि कपट, वदला कीं अस्त्रस्मृति नसेल तुज अंतीं,॥
भस्मचि करिता, परि बहु कारुण्यामृत, न कोपविष संतीं॥२८
आयुष्य असे तोंवरि अस्त्रस्मृति मन्मनांत राहेल ॥
गुरुशापार्थ असा मग कोण मजकडे रणांत पाहेल ॥२९॥
गुरुचा प्रसाद नसता मज्जीवित निमिषमात्र न रहातें॥
उरलों अद्यापि ह्मणुनि निश्चित माझ्या मरेल नरें हातें३०
न स्वभ्यस्तास्त्राची स्मृति मजला यावदायुं सोडील ॥

---

१ विचित्र. २ भूमीला. ३ अर्जुन. ४ मरेपर्यंत.

जोडील कीर्ति द्याया मज माझें मन कधीं न मोडील ३१ ॥
द्रोणहि भीष्महि राहो राजेहि तुह्मांसमीप राहोत ॥
पार्थासि मीच वधितों मद्विक्रम लोकपाळ पाहोत" ॥३२॥
भीष्म ह्मणे "रे कर्णा कां स्वाश्रित धार्तराष्ट्र बुडवाया ॥
इच्छिसि दुष्टा दाढुनि दृष्टिदहनं[1] दंदशूकं[2] तुडवाया ॥ ३३ ॥
कृष्णाच्या दृष्टिपुढें जातांचि तुझा पडेल आंव[3] रिता ॥
आह्मां सावरसी जरि असता आयुष्य-शेष आवरिता ॥३४॥
जरि खांडव-दाह श्रुत तरि तुज कां चित्त नावरे घे तें ॥
विजयाचें सद्गुणनीं[4] जें ये पहिल्याचि नाव रेघेतें ॥ ३५ ॥
या हरिच्या शक्तिपुढें त्या हरिची[5] काय पामरा शक्ती ॥
तेज अजित[6]-भक्ति-पुढें मिरवील क्षुद्र-देवता-भक्ती ॥ ३६ ॥
जिंकील देव-सेना निज-तेजें सिंहवाह साऽसूतें ॥
शक्तिधरावरि जासी घेउनि तूं इष्टसाहसा सूतें ॥ ३७ ॥
तुजसह होइल भस्म व्यालमुख शरहि धनंजय-शरांनीं ॥
न तुह्मीं पुरीं मिळविलें जें तेणें मिळविलें सुयश रानीं ॥३८॥
मारिन ज्यासि ह्मणसि तो शर्वप्रतिमल्ल[7]: काय नर काचा ॥
तद्रक्षक तो, केला ज्या प्रभुनें भस्म काय नरकाचा[8] ३९ ॥
तुजहुनि कोटिगुणाधिक वीरवधीं जे समर्थ, ते ज्यातें ॥
प्रभु-भुज[9] रक्षिति, त्याच्या केंवि सहासी समर्थ तेजातें ४०
कर्ण ह्मणे" मज आहे विदित बहुसमर्थ यदुप हा साचा ॥

---

१ दृष्टीनें जाळणारा. २ सर्प. ३ डोल. ४ सज्जनाचे गण-नेंत. ५ इंद्राची. ६ विष्णु. ७ महादेवासारखा मल्ल. ८ नरकासुराचा. ९ श्रीकृष्णाचे भुज.

महिमा वर्ण्य, परि बहु प्रेमा भीष्मासि मदुपहासाचा ४१॥
उपहासाचें फळ मी दाखवितों रोकडेंचि अन्यास ॥
वृद्ध अलंघ्य असे हा तों म्यां केलाचि शस्त्र-संन्यास ४२
त्यजिली सभाहि आजिंहि जेव्हां होसील कायशांत नवा ॥
समर-चमत्कार जनां दाविन मी वीरराय शांतनवा''४३ ॥
ऐसें वदोनि मानी तेजस्वी कर्ण जाय गेहाला ॥
बुध ह्मणति मनीं 'कुमते अधिका तुजहूनि काय गे हाला' ॥
स्मित करुनि सभेंत नदी- तनय ह्मणे '' रे सुयोधना सत्य
रिपु-गर्द-नाशार्थ बरे मेळविले हे सुयोध नासत्य ॥ ४५ ॥
हा सूतात्मज आधीं वदला कीं 'मी करीन अर्यंत' ॥
आतां ह्मणतो संगर न करीन मदंत-काळपर्यंत, ॥ ४६ ॥
सत्यप्रतिज्ञ लोकीं हाचि, नसे यासमान राजन्य ॥
सांगा घडेल कैसें यासीं नारायणा नरा जन्य? ॥ ४७ ॥
मज्जीवन-क्षयावधि जे स्पष्ट उपेक्षिणार तव नाशा ॥
ते मित्र काय? त्यांच्या वचनें धरितोसि काय अवनाशा ४८
करुनि श्रीगुरु-वंचन सर्व बुडविलें स्वपुण्य-तप यानें ॥
ऐसें नसतें तरि कां याला घडतीं रणांत अपयानें'' ॥ ४९ ॥
गांधार ह्मणे '' तज्जय कां त्या आहेत काय बा सिंगें ॥
कीर्ति-वर ह्मणुनि विधिनें बांधियलीं त्यांसि काय बासिंगें५०

---

१ माझ्या निंदेचा. २ त्याग. ३ युद्ध. ४ मरशील. ५ शत्रु-रूप रोगांच्या नाशार्थ. ६ शत्रुनाश. ७ युद्ध. ८ संरक्षणाची आशा. ९ पलायनें.

न तुझा, न द्रोणाचा, न कृपनृपाचाहि, भरवंसा धरिला ॥
दुःशासन-कर्ण-बळें स्वबळें म्यां युद्ध-यज्ञ आदरिला॥५१॥
मारूनि पांडवांतें यज्ञ करीन द्विजांसि तर्पीन ॥
मणि कांचन हय रथ गज गृह गो ग्राम प्रकाम अर्पीन''५२
विदुर ह्मणे''दम तारक सुज्ञांसि गमे, खलांसि न दम हित ॥
दर्भसम अमृताचाही होईल न सज्जनांसि नद महित ॥५३॥
जो सोडिला दमें तो पावेल ध्रुवपदा न वेदान्तें ॥
विजयसुखोत्कर्ष बरे अनुभविले बहु सदा नवे दान्तें ॥५४॥
पाश पसरिता झाला गहनांत धरावयासि खग नीच ॥
दोघे पत्री पाशीं गुंतुनि भरले उडोनि गगनींच ॥ ५५ ॥
मग गगनगं खग देखत धांवे जो व्याध त्यास पाहोनीं ॥
कोणी तापस पावुनि आश्चर्य पुसे समीप बाहोनी ॥ ५६ ॥
व्याध ह्मणे " मानावा मद्यत्न व्यर्थसा न हा तातें ॥
कलहें गळतिल गगनग मग खग येतील कां न हातातें५७
सांपडले व्याधाला घेउनि पाशासि जे बहु पळाले ॥
ते कलह करुनि गुंतुनि खग गगनींहूनि भूवरि गळाले ५८
व्याधा खगसे,काळा सांपडति करुनि कलि-प्रति ज्ञाती ॥
भूमि न द्याया, केली जी काय, नव्हे भली प्रतिज्ञा,ती ५९
मेले किरात पाहुनि मधुतेंचि, न पाहुनि प्रपातातें ॥
हे तेच घातली त्वां स्पष्ट कुसंततिविषप्रपा तातें ॥ ६० ॥

---

१ पूज्य. २ इंद्रियदमन करणारानें. ३ वनांत. ४ पक्षी. ५ आकाशांत गेलेले. ६ भिल्ल. ७ कडचाला. ८ कुसंततिरूप विषाची पाणपोइ.

अंकीं धर्मचि घ्यावा, न शिरीं त्वां दोष हा कुलीना गा ॥
अल्पाहि सच्चमू बहु न खळां हरिमूर्ति धाकुली नागां[१]६१''
वृद्ध ह्मणे ''वत्सा त्वां गणिला अति हित अति स्वनाश पथ
हा यासि वारिता मी निष्फल जेंवि प्रतिस्वनां[२] शपथ॥६२॥
संजय, काय धनंजय वदला? वद लागला मला आधी॥
होये मूर्च्छित माझी या सन्तापें करूनियां आ धी'' ६३॥
अर्जुन कृष्णमुखातें पाहत वदला अशाचि वचना कीं ॥
''मन्दा त्ति सांग, रडसिल आठवुनि अनादृतार्यवच[३] नाकीं६४
अन्यायें मेळविलें देतें न करूनि वाणि हानि धन ॥
धर्मविभाग न देतां करिलचि गांडीव-पाणि हा निधन[४]६५॥
प्राणत्र परार्थाची चित्तांत धरूनि काय हो माया ॥
घ्याना तरि तुमचे शर- दहनीं आलोंचि काय हे माया' ६६॥
न वदे किमपि सुयोधन बैसुनियां बहुतकाळ मग राजे ॥
गेले उठोनि तेथुनि ते सांपडणार काळमगरा जे ॥ ६७ ॥
एकांतीं अन्ध ह्मणे ''इकडे तिकडे असे किती बल? हें ॥
वद संजया, तयां हे, किंवा ते जिंकितील या, कलहें''६८॥
संजय ह्मणे''नृपाळा प्रायःप्रभु ते समर्थकरिशीलें[५] ॥
नसतां विदुर पितामह परिसोनि मदुक्त कोप करिशिल६९॥
केवळ दशमुख-मतिसचि न कपिवच रुचे न सर्व लंकेला ॥
गांधारीहि असावी मग बोलेन त्यजूनि शंकेला ॥ ७० ॥

---

१ हत्तीला-कालियसर्पाला. २ प्रतिध्वनीस. ३ श्रेष्ठांच्या वचनाचा अनादर. ४ नाश. ५ हत्तीप्रमाणें शील ज्यांचें.

आणवितां एकांतीं गांधारी विदुर आणि शान्तनव ॥
व्यास प्रकटे, जैसा राकेंचा[1] भव्य काय कान्त नव ॥७१॥
व्यास "ह्मणे रे संजय, सांग सुतें जें विचारिलें कांहीं ॥
बुडविति बळें भुलविले हे काळ जेंवि चारिलें कांहीं"॥७२॥
संजय ह्मणे " नृपा मज तिकडिल इकडिल किती कसें बल हें
पुससी पुनःपुन्हा यां- करवीं त्यां मारवावया कलहें॥७३॥
तरि परिस, पुन्हा कथितों वीरांनीं अर्जुनाच्युत नमावे ॥
त्यांचें ब्रह्माण्डांतहि तेज ब्रह्मेश्वरस्तुत न मावे ॥७४॥
वधिले इहीं प्रतियुगीं प्रकटुनि दुर्जन सदानव सदवनीं[2] ॥
यांसि पहाया वाहति सुर करुनि शिवा सदा नवस दवनां[3] ॥
जिंकिल चक्रधराला कवण? तयाचा अगाध महिमा गा॥
कोण स्वालंघ्यत्वें लाजविल दुजा अगार्धम[4] हिमागा[5]? ॥७६॥
प्राणापरीस परम- प्रिय पाण्डव पुण्डरीकनयना त्या ॥
बहु जपतो तो आश्रित- कल्पद्रुम विश्वगीतनय नात्या ७७॥
कथितों तुला समासें तिकडिल बहुफार काय बोलून ॥
विश्वाधिक कृष्ण प्रभु कथिलें वेदें मनेंच्छि तोलून ॥७८॥
ह्रीः[6] सत्य धर्म आर्जव जिकडे तिकडेचि कृष्ण जाणावा ॥
जिकडे प्रभु, तिकडे जय जाय,न लागे स्तवूनि आणावा ७९
मिष करुनि पाण्डवांचें भस्मचि करणार या तव सुतातें ॥
द्यावें शीलचि, द्यावें केवळ व्हाया न घात वसु तातें ॥८०॥

---

१ पूर्णिमेचा. २ साधूंच्या रक्षणार्थ. ३ दवणा (सुगंधिक वनस्पति.) ४ नीच पर्वत. ५ हिमालयास. ६ मर्यादा.

परमाधर्मनिरत[1] तव   सुत केवळ हा न मान्य वालिशतां[2] ॥
दशमुखशताहि, याला   याचीच करील भस्म बालिशतां[3] ॥८१
सद्रक्षण खळमर्दन   नारायणसा न तो नर विसरला ॥
सर्वस्व तेज लोकां-   माजि विखरितां सदा न रवि सरला''॥८२
भूप ह्मणे "मी नेणें,   तुज ईश्वर कृष्ण हें कसें कळलें"॥
संजय ह्मणे " मदीय   ज्ञान अविद्यामळें[4] नसे मळलें"॥ ८३ ॥
राजा ह्मणे " अविद्या,   ज्ञानहि कैसें? यथार्थ बोलावें॥
त्वद्भाषणें सुरांच्या   गुरुनें, असुरांचियाहि, डोलावें"॥८४॥
संजय ह्मणे "अविद्या   'मी' 'माझें', ह्मणसि हेचि गा राया॥
'विद्या' असें न ह्मणणें   जें, हेंचि समर्थ होय ताराया॥८५॥
ज्यांचें मन सच्छ्रुतिमत[5]-   पथ सोडुनि दुष्पथीं कदा न रते॥
पावति भगवन्ताच्या   जाणुनि सद्भक्तिनें पदा नर ते ॥८६॥
माझी विद्या वाढे,   त्वद्विद्या निन्द्य, गारसी विघरे ॥
दीपालयसम दुर्जन-   संगांतुनि झडझडोनि बा निघ रे''८७॥
अन्ध ह्मणे "रे पुत्रा,   त्यजुनि दुराग्रह यदूद्वहा[6] नम रे ॥
अमरेश[7] मरे, ईशा   न विनत जो, विनत मर्त्यही न मरे८८ ॥
जा शरण ईश्वरा श्री-   कृष्णा, बा लोभ हठ पुरे, शम[8] रे ॥
करुनि असाचि दुराग्रह   अमरमहित कनकमयपुरेश[9] मरे८९॥

---

१ अत्यंत अधर्मामध्यें निमग्न. २ वालिवानराचे शेंकड्याला. ३ मूर्खता. ४ अज्ञानरूप मळानें. ५ सज्जन व श्रुति यांचा मार्ग. ६ यदुनायक कृष्णाला. ७ देवांचा राजा इंद्र. ८ शांत हो. ९ रावण.

जें त्या श्रीकृष्णाचें चरित, मनीं आपल्या पहा रे तें ॥
अशुचिस्पृष्टा[1] सच्छ्री ह्मणवि भली तापल्या पहारेतें"॥९०॥
भूप ह्मणे "त्या कृष्णा शरण मरणभय धरोन जाईन ॥
सुयशें तरोनि जाइन कीं स्वर्गाप्रति मरोन जाईन ॥ ९१ ॥
त्या ईश्वरासि जावें शरण अनेकत्र सदय हित सम जो ॥
कृष्ण महेश परि न बा हें सत्य तुह्मां पित्यासहित समजो ९२
ईश्वर, तरि कां तिसऱ्या त्या पांडुसुतासि मात्र कांखेला ॥
वाहे, पाहे हेमा- सह तोलाया बळेंचि लाखेला" ॥ ९३ ॥
अन्ध ह्मणे "गान्धारि त्वत्सुत जातो बळेंचि नरकास ॥
नरकासह्यबळ[2] यदुप घाली हा तज्जयार्थ नर कास"॥९४॥
अन्ध मनिं ह्मणे "अन्धा मुखलीला दाविल्या पहा रे तें ॥
न कुसन्ततितें द्यावें आलिंगन ताविल्या पहारेतें" ॥९५॥
देवी ह्मणे "मजकडे कारुण्य करूनि गाढ बा हेर॥
शोकान्ध[3]-कूप-पतितां आह्मां अन्धांसि काढ बाहेर ॥ ९६ ॥
जा शरण ईश्वराला, दे ज्याचें त्यासि राज्य, जोड कर ॥
जोड कर सुकीर्तीची, तूंचि कसा कुरुकुळांत खोडकर९७॥
तूं काय? भीम मोडिल अमरवराचीहि तट्टकर मान ॥
या अनया भरणार स्वासुधनें काळभट्टकर[4] मान[5] ॥ ९८ ॥
प्रभु-नमनें मुख शोभा होतां अंगाष्टकांत आठ वण ॥
भीम वधिल तैं करिसिल मद्वचनाची मनांत आठवण"९९॥

---

१ अपवित्र जनानें स्पर्शिलेली. २ नरकासुराला असह्य, बळ ज्याचें तो. ३ शोकरूप अंधकाराच्या कूपांत पडलेल्यांस. ४ काळरूप भटजीचा हात. ५ समज.

व्यास ह्मणे "धृतराष्ट्रा, ज्ञानें या संसृतीसि[1] तरशील ॥
वर शील साधुसंगें जोडावें, त्यजुनियां इतर शील १००॥
संजय हित कथिल तुला बहुमत याहुनि न अर्थ दुसरा या॥
सुसरां[2] याद[3], तसा तूं पाव ब्रह्मा, उपाय पुस राया"१०१॥
भूप ह्मणे "संजय, वद हित मज हें दुःख बा पहावेना ॥
पुत्र नव्हे दुर्योधन रिपु जोडा होय पाप हा वेना[4] ॥१०२॥
जाणोनि हृषीकेशा जेणें पावेन मुक्तिसि कवीनां[5]॥
तें सांग,कोण सज्जन पुसतां हित-हेतु-युक्ति सिकवीना" १०३
संजय ह्मणे "न जाणे अजितेंद्रिय सर्वथा हृषीकेशा ॥
केविं पिकेल! ढकां[6] जी लेशहि लागों न दे कृषी केशा१०४
भेदें न हो कुरुक्षय ह्मणुनि सदय देवदेव येणार ॥
घेणार जो खलाचें सर्वस्व प्रभु भल्यास देणार" ॥ १०५॥
अंध "ह्मणे कृष्ण प्रभु आपण येणार काय गा इकडे ॥
योग्यचि त्या हो वत्स- प्रेमें लंघिति न काय गाइ कडे ॥
ते धन्य भाग्यवंत प्रभुला अवलोकितात डोळस जे ॥
मी तेविं उशीरासह[7] ध्याया बहुमान जेविं मोळ सजे १०७॥
जरि मी केवळ अंध, न गंध नयाचा असे मदाचरणीं ॥
करिल भवबीजरंधन[8] बंधन-हरगुण वसे सदा चरणीं॥१०८॥

---

१ संसाराला. २ उत्तम सरोवराला. ३ मत्स्य. ४ (सूर्यवंशांतील पृथु राजाचा बाप.)एक दुष्ट राजा. ५ कविश्रेष्ठा. ६ धक्का, इजा. ७ वाळ्यासह. ८संसाराच्या बीजाचें शिजविणें.

प्रभु लोकसंग्रहार्थ द्रोणा भीष्मा मलाहि वंदील ॥
वंदी लक्ष निगम ज्या यत्पदरज शंभुचेंहि मंदील ॥१०९॥
निर्वाविल सत्य-प्रिय-हित वचनें स्पर्शे मला ससभ्यास ॥
त्या विश्वपालका बहु आहे सद्रीतिचाचि अभ्यास ॥११०॥
मी त्या जगद्गुरुप्रति गेलों शरण स्मरोनि महिमा गा ॥
ह्मणतों राज्येच्छा तरि सुत हो त्याचि प्रभूसि महि मागा ॥

## अध्याय ६ वा.

### सारांश.

धर्म—श्रीकृष्णा, कुरुकुलांचा नाश न व्हावा, याकरितां कांहीं उपाय सांग. श्रीकृष्ण—मी कौरवांकडे साम करण्यास जातों. व अनेक प्रकारच्या युक्ति योजून पाहतों. कौरव वळले तर बरेंच. नाहींतर युद्धावांचून दुसरा उपाय नाहीं. भीम—मृदुभाषणें करून दुर्योधनाला वश करावें. श्रीकृष्ण—भीमा तुझाच आह्मांला मोठा भरंवसा. असें असतां, तूंच ह्याप्रसंगीं अगदीं निर्वीर्य कसा झालास ? भीम—मी युद्धाला भ्यालों नाहीं. धृतराष्ट्राला पुत्रशोक होईल, ह्मणून भ्यालों. माझा पराक्रम काय तो युद्धांत पहा. अर्जुन व नकुल—कीर्तिदायक असेल तें खुशाल कर. सहदेव—क्षत्रियांचा

१ लोकांची प्रवृत्ति होण्याकरितां.

युद्ध करणें हाच धर्म होय. द्रौ०—(दुःशासनानें ओढिलेले आपले केश दाखवून ) प्रसंगीं तुला माझें स्मरण असावें. सर्वांचे निरोप घेऊन श्रीकृष्ण कौरवांकडे जाण्यास निघाला असतां त्यास धर्म—श्रीकृष्णा, मातेला नमस्कारपूर्वक सहदेव खुशाल आहे ह्मणून सांग. सर्वांस कुशल पुशिलें असें सांग. पांडवांस मागें परतवून श्रीकृष्ण पुढें निघाला. त्याबरोबर बहुत राजर्षि, ब्रह्मर्षिही जावयास निघाले. श्रीकृष्ण सामार्थ येतो. असें ऐकून त्यास संतोष होण्याकरितां, धृतराष्ट्रानें मार्गांत ठिकठिकाणीं तंबू देऊन त्यांत सर्व साहित्याची तयारी करून ठेविली. पण श्रीकृष्णानें तें कृत्रिम जाणून त्याचा स्वीकार केला नाहीं.

धर्म ह्मणे " श्रीकृष्णा, बुडतों मी सत्य जाण, तार मला॥
भव बुडवी ह्मणुनिच तव भजनीं सनकादि जाणता रमला
बुडतें कुरुकुळ भीमाऽर्जुन-कोपें, त्यांचि वांचवावें हो ॥
गांवें पांच बहु, नको स्थळ पांचां काय पांच वांवें हो॥ २॥
भुलला पुत्र-प्रेमें, एथें नाहींच संशय, शमाया ॥
कथिता बा दाखविता, बुडवाया सर्ववंश यश, माया॥ ३॥
जेणें न बुडे कुरुकुळ धर्म यश न्याय त्याचि सदुपाया॥
सांग सख्या भ्रमला हा जन, केवळ तूंचि आप्त यदुपा या" ।
श्रीकृष्ण ह्मणे " देवा जातों मी त्याकडे हित वदाया ॥
काय सुयोधन? नशके पचवाया वृत्र-हाहि तव दाया"॥ ५।
धर्म ह्मणे "हितहि तया अहित, अहि तसाचि तो परम खळ ग।

१ धृतराष्ट्र. २ इन्द्र देखील.

व्यसनीं भल्यासि पाडी, दुष्टगजा जेविं पिहित[1]-मुख खळगा
शौरि ह्मणे " राजेंद्रा, यद्यपि बलवान् तथापि शनकानें[2]॥
हरिचें काय करावें, परिसो तो हित-कथा पिशुन[3] कानें॥७॥
या त्वद्दूतीं अरि जरि भलतेंचि करावयासि पाहेल॥
दाहेल पळ न तो, हा खळ-कृत निज-लंघना न साहेल॥८
जिंकिल काय हरा तो? जिंकी कुतुकेंचि मन्मथ नरा ज्या॥
करिल हरि-मथन[4] शश तरि करिल सुयोधनहि मन्मथन राजा
योजीन युक्ति सामीं सांदीपनिच्या[5], तुझ्या, बहु नव्याहीं॥
प्राणांपरीस बहु मज जेविं तुह्मी, तेंवि तो बहु न व्याहीं॥
माय करी बाळाचें नित्य श्रमवूनि कार्य[6] जेंवि हित॥
तेंवि करितसे मन्मति होय निजदयेसि काय जें विहित॥११॥
देइल अंश सुयोधन तरि आह्मां पावला सदाशिव हो॥
ह्मणतोसि तूंहि मीही कीं प्रज्ञाचक्षुचें[7] सदा शिव[8] हो ॥१२॥
हो सिद्ध अंश द्याया द्याया स्वप्राण सिद्ध अथवा हो ॥
कथवा हो त्याकरवीं[9] यश नाकीं, वीर-लोक-पथ वाहो॥ १३
अंश न देइल जरि अरि तरिहि महादेव पावला नवसा ॥
न वसावासि पराक्रम नकरुनि, केवळ अशक्त मानवसा॥१४

१ तृणादिकांनीं ज्याचें मुख आच्छादिलें तो. २ कुत्र्यानें ३ नीच. ४ सिंहाचें मर्दन. ५ माझा गुरु सान्दीपनि, ह्याच्या. ६ देह. ७ धृतराष्ट्राचें. ८ कल्याण. ९ दुर्योधनाकरवीं.

श्रीराम जसा प्रेषी शिकवुनि सामोक्ति अंगदा साच्या ॥
धर्म तसा प्रभुला, जो कार्यां देणार अंग दासाच्या'' १५॥
भीम ह्मणे " केशवजी, मृदु बोला उग्र तो सुयोधन हो ॥
बा त्यासीं सख्यचि हो युद्धीं हत एकही सु-योध न हो॥१६॥
इतर असो, लाजेलचि त्या निस मदांध सुरगज, गदीशा[1]॥
दुर्योधना गुरु असें ह्मणतिल गरळांधें[2] उरगें[3] जगदीशा'' १७
श्रीकृष्ण ह्मणे " हा रे, भीमा! जरि तूं महाभुज गदीनें[4]॥
भ्यालासि, होय जैसा चिंतुनि गरुडा महाभुजग दीन॥१८॥
आह्मां तुझा भरंवसा बहु,कीं खळ मर्दिसील तूं अगदीं ॥
निर्वीर्यत्व चिकित्सा[5]- समयीं आलें चिरा[6]ऽर्जितीं अगदीं[7]॥१९॥
देवी[8] गदा द्रुपदजा अवलंबुनियां[9] भुजाप्रति ज्ञात्यां ॥
लज्जेंत बुडाल्या,कीं झाल्या वंध्या तुझ्या प्रतिज्ञा त्या''॥२०
भीम ह्मणे " हा द्याया[10] सुत-शोक पित्यासि यादवां[11] लाजे
भस्मचि होतील सकळ ते, सांपडतील या[12] दवालीं जे॥२१॥
देवा तुझ्या प्रसादें विजयश्रीकंठरत्नहार[13] गडी[14] ॥

---

१ गदाधरांमध्यें श्रेष्ठ अशा दुर्योधनाला. २ विषेंकरून अन्ध झालेले. ३ सर्प. ४ गदाधरांमध्यें श्रेष्ठ. ५ रोगप्रतीकार करण्याच्या वेळीं. ६ पुष्कळ दिवसांपूर्वी मिळवून ठेविलेल्या. ७ औषधामध्यें. ८ हा शब्द, गदा किंवा द्रुपदजा, ह्यांकडे पूज्यत्वार्थी लावावा. ९ आश्रय करून. १० हे भीमा. ११ हे श्रीकृष्ण. १२ याभीमरूप वणव्याला. १३ विजयलक्ष्मीच्या कंठांतील रत्नांचा हार असा हा भीम. १४ मित्र.

हा काळाचा, हरसख कटकें नकरूनि यत्न हा रगडी॥२२॥
माझ्या या बाहूंचें स्मरण करुनि तूं मनीं पहा शील ॥
अथवा रथ-वाजि-द्विप- भट-कोटि-प्रशमनीं पहाशील ॥२३॥
वर्णूं काय स्वमुखें स्वपराक्रम? वर्णितील सुर साधू ॥
ह्मणतिल सकळ बळिमदा भगवज्जन भीम-कीर्ति-सु-रसा धू"
यदुनाथ ह्मणे " भीमा, खळ-काळाच्या महाभुजा भावा ॥
तुज निंदिलें न, तैसें वदलों जाणावया तुज्या भावा"॥२५
अर्जुन ह्मणे " सख्या जें कीर्तिकर असेल तेंचि कर जा गा
सांगावें काय? तुझा प्रणतत्राणीं असेचि कर जागा"॥ २६
नकुल ह्मणे " जगदीशा रक्षाया हा स्वधर्म जें विहित ॥
तेंचि करितां,करितसे न विनवितां वृद्ध माय जेंवि हित"२७
सहदेव ह्मणे " देवा, दे वात्सल्येंकरूनि युद्ध-वर ॥
उत्सव रण-सम कैंचा क्षत्राला? हाचि धर्म शुद्ध वर"२८॥
कृष्णाहि ह्मणे " कृष्णा, ह्मणसि जिला प्रियसखी पहा हे ती
विसरो तुझी न समयीं ईस श्रितभव्यदा महाहेती ॥ २९ ॥
बहु गहिंवरोनि, दावुनि दुःशासन-पाणि-कृष्ट-केश, वदे ॥
दत्तु, दीर्घ उष्ण सोडुनि सुसकारा, तीस अभय केशव दे ३०

१ शंकराचा मित्र. २ हत्ती. ३ बलिष्ठांच्या गर्वाला. ४ हे भीमकीर्तिरूप उत्तम उदका. ५ खळनाशकाच्या. याचा 'भावा (बंधो), याकडे अन्वय. ६ अभिप्रायाला. ७ ज्या द्रौपदीला. ८ आश्रितांस कल्याणदायक. ९ मोठा खड्ग. १० दुःशासनाच्या हातानें ओढिलेले केश.

श्रीमद्युधिष्ठिराच्या दूतत्वा परमलाभ मानुनि घे॥
दुर्योधन-प्रमुखखल- खद्योत-तदन्य-पद्म-भानु निघे ॥ ३१ ॥
प्रभुला पूजिति निघतां वाल्मीकिवसिष्ठवामदेवादि ॥
नारदहि, जया, निज-यश माथां घेऊनि वामं दे वांदि॥३२
जो जाय दूर पावित सानुज नृप धर्म त्या अ-पापं-रता ॥
प्रभुवर ह्मणे "रहा या कार्याच्या सिद्धिला जपा, परता"
धर्म ह्मणे "शीघ्र सुखें ये जोडुनि सिद्ध कीर्तिसह देवा ॥
मातेसि नमुनि वद, कीं आहे आरोग्य साधु सहदेवा॥३४॥
तूं जेविं देवकीला भेटसि, तैसाचि भेट आतेला ॥
आह्मांहुनि तूंचि अधिक घृत सोडुनि कोण करिल आ तेला
स्व-पद-भ्रष्ट-सुतांचा भाजितसे तीस नित्य नव्याधी ॥
व्याकुळ करी जसा हा तैसा शूलज्वरादि न व्याधी ॥ ३६॥
कृष्णा, कळेल तैसें वद, कुंतीला न दुःख बाधावें ॥
पंकीं धेनु श्रमती पुण्यश्लोका मुरारि बा धावें ॥ ३७ ॥
धृतराष्ट्र भीष्म बाह्लिक विदुर कृप द्रोण सर्व शुचि तज्ज्ञ॥
जे, त्यांसि भेट, वद हित, सांगों तुज काय? तूंचि उचितज्ञ
म्यां पुसिलें कुशल, असें कर्णासि सुयोधनासि सांगावें ॥

---

१ दुर्योधनादि कौरवरूप काजवे, यांहून अन्य पाण्डवादि भक्त, हींच कमळें, त्यांचा सूर्य श्रीकृष्ण. २ मधुर, सुंदर. हें निजयशाचें विशेषण. ३ पंडित. ४ पुण्यकर्मांत निमग्न अशा श्रीकृष्णाला. ५ उत्तम. ६ नव्य ( नूतन )आधि (चिंता.)

येतां पंचम[1] दाटुनि कर्ण-कटु पिकें शिकोनि कां गावें"॥३९
ऐसें अजाततरिपु नृप सूचित सुचवूनि शौरिला परते ॥
मग विजय[2] ह्मणे "देवा, येऊं द्यावें न मजपुढें पर[3] ते॥४०॥
कर जोडिले सुज, पहा साम घडो, राहवीन कोदंड ॥
आर्या, भीमापासुनि अंधसुता आहवी[4] नको दंड ॥ ४१ ॥
खल-बल-मथनोत्साहें भीमें गर्जोनि लोक कांपविला ॥
खचले रवें नग मग, न ह्मणतिल तद्वाहु तोक कां पविला"४२
प्रभु पांडवांसि फिरवुनि जातां पाहे पथांत नाकर्षी[6] ॥
राजर्षि[7] ब्रह्मर्षि[8] स्वयशें[9] जयांच्या मनासि आकर्षी ॥ ४३ ॥
उतरोनि रथाखालीं साधूंचे वंदिले अनेक थवे ॥
प्रभुनें दिलें तया सुख मुखं-लक्षेंकरुनिही न तें कथवे॥४४॥
इच्छा पुसतां वदले "बा तुजसम अन्य बोलका नहीं ॥
प्राशूं धृतराष्ट्र-सभे- माजि तुझे धन्यबोल कानाहीं ॥४५॥
दे या अयास याया आज्ञा सदयां[11] महोदया परिसा" ॥
यापरि साधुमनोरथ जाणोनि ह्मणे मुकुन्द 'या परिसा, ४६
'सामार्थ प्रभु येतो' ऐसें धृतराष्ट्र आयके कानीं ॥

---

१ सप्तस्वरां पैकीं पांचवा स्वर-हा फार मधुर असतो. २ अर्जुन. ३ शत्रु. ४ युद्धसंबंधी. ५ मूल. ६ देवर्षि. ७ ब्रह्मनिष्ठराजे. ८ ब्रह्मनिष्ठऋषि. ९ श्रीकृष्णयश. १० लक्ष-मुखांनीं. ११ सदया, महोदया (भक्तांचा अभ्युदय करणाऱ्या), परिसा (परिसरूपा) श्रीकृष्णा, या अयास (हे आह्मी लोखंड, यांस) य:या, (येण्यास) आज्ञा दे.

अभिषेक स्वीकारुनि   जेव्हां गांगेय होय सेनानी ॥
तेव्हां वंदुनि केले   बहु जयजयकार सर्वसेनानीं ॥ ९९ ॥
झाले भूकंपोल्का-   पातांद्[1]युत्पात तेधवां बहुत ॥
कीं होणार तदस्त्रे[2]-   ज्वलनीं बहु शस्त्रभृत्[3]कदंब हुतें[4] ॥१००॥
जो द्रोणाचार्यांचा   द्रुपदें यत्नें विनिर्मिला काळ ॥
तो धृष्टद्युम्न करुनि   निजसप्ताऽक्षौहिणी-चमूपाळ ॥१०१ ॥
धर्मे सेनापति[5]र्पति[6]   केला सुमहायशा[7] धवल[8]वाजी ॥
वदले ज्यासि सुर "वधुनि अस्मद्रिपु, जग यशें धवलवा[9] जी'
जाय कुरुक्षेत्राला   आधीं धृतराष्ट्रसुत, अनंतर तो[10] ॥
जो साधु ह्मणे " मन हरि- चरणीं, व्हायासि सुख अनंत, रतो
तेथें भेटुनि केला   हर्षित शंकित बळें[11] अजातारी ॥
तोहि[12],जयाचा द्व्यक्षर[13]- उपदेश महाभ्रमीं अजों[14] तारी॥१०४
बळ धर्मासि ह्मणे " बहु   वदलों,कीं योग्य केशवा,समता॥
परि अर्जुनप्रियास्तव   झाली न मदुक्ति केशवास मंता[15] १०५
"कृष्णावांचुनि कांहीं   संसारीं प्रिय मला नसे लवही ॥
हे मूर्ति मज जसी,तसि   धनिकाला बहुमता नसेल वही १०६
भुलला हा तुज जैसा   भागवताच्या सुभागवत नाचों[16] ॥

---

१ भूकम्प—उल्कापात—आदि—उत्पात. २ त्या भीष्माचीं अस्त्रें हाच ज्वलन (अग्नि),त्यांत. ३ शस्त्रधरांचा समूह. ४ होमद्रव्य. ५ सेनापति. ६ सेनापतींचा पति. ७ फार मोठें यश ज्याचें, तो. ८ अर्जुन. ९ धवलवर्ण करा. १० धर्म. ११ बलरामानें. १२ श्रीकृष्णही. १३ 'तप' 'तप' असा. १४ ब्रह्मदेवाला. १५मान्य. १६ नाचण्याला.

बहुतृषित अन्ध-चातक मेघागम जेंवि काय केकानीं ॥४७॥
मार्गीं सभादि सर्वहि बहु साहित्य प्रतिस्थळीं करवी ॥
कीं आपणावरि दया- ० दृष्टि करावी यदूत्तमें बरवी ॥४८॥
देव न पाहे तिकडे कीं तें करणें नव्हेचि निष्कपट ॥
मैंदाचें स्वीकारिल कवण विचक्षण अमूल्य निष्क पट॥४९
तें सर्व डावलूनि[1] प्रभु गेला गजपुरासि परभारा ॥
ह्यांधि भल्याचा आप्त स्वशिरीं घेईल कोण परभारा[2] ॥५०॥

# अध्याय ७ वा.

## साराश.

धृतराष्ट्र- विदुरा, उद्यां श्रीकृष्ण आह्मांस भेटावयास येईल, तेव्हां अनेक प्रकारचीं रत्नें, यानें, दास, दासी इ० उपचार देऊन त्याचा चांगला सत्कार करावा. विदुर ह्मणाला, मनांत कपट, आणि वर प्रेम असें करून श्रीकृष्ण वळणार नाहीं. तो खऱ्या प्रेमानेंच वळेल. या करितां, त्याच्या वचनास अनुकूळ व्हावें हेंच चांगलें. दुर्योधन- श्रीकृष्णास पाण्डवप्रेम सुटणार नाहीं. मग त्यास रत्नादि देऊन काय उपयोग? आतिथ्यानें वैरशमन होणार नाहीं. भीष्म भावांमध्यें कलह नसावा हेंच श्रीकृष्णास प्रिय आहे,

१ टाकून. २ दुसऱ्याच्या भाराला.

या करितां तेंच तुह्मीं करावें. दुर्योधन–ज्याच्या बळावर पाण्डव उड्या मारितात, त्या कृष्णासच उद्यां चतुर्भुज करून ठेवावें ह्मणजे झालें. धृतराष्ट्र–साम करण्यास जो आला त्यास बंधन करणें अनुचित होय. भीष्म–ज्याच्या नामस्मरणानें संसारबंधनांतन प्राणी सुटतात, त्यास बंधन करण्याचा यत्न करून तुह्मीं आपलें वाटोळें करून घ्याल. मग श्रीकृष्णानें नगरांत प्रवेश केल्यावर भीष्मादि त्यास सामोरे गेले. श्रीकृष्ण, धृतराष्ट्रास भेटून मग विदुरास भेटला. विदुर–दुष्टास उपदेश करून व्यर्थ. तथापि हित सांगून पहा. मग श्रीकृष्ण कुंतीस भेटला. कुंती–माझे पुत्र जे तुझे दास, ते खुशाल आहेतना? द्रौपदी खुशाल आहेना? श्रीकृष्णानें कुशल सांगून तिचें समाधान केलें. मग श्रीकृष्ण दुर्योधनास भेटला. पण त्याच्या आदराचा स्वीकार केला नाहीं. तो तसाच विदुराकडे गेला. विदुराच्या भक्तीस्तव मोठ्या प्रेमानें भिटक्या देऊन श्रीकृष्ण यथेष्ट जेवला. रात्रीं निजला असतां, दुर्योधनाचीं दुष्कृत्यें सर्व विदुरानें श्रीकृष्णास कळविलीं. दुसरे दिवशीं श्रीकृष्ण कुरुसभेंत गेला. भीष्मादिकांनीं सत्कार करून त्यास सिंहासनावर बसविलें. श्रीकृष्णानें विदुराला आपल्या जवळ बसविलें. सर्व राजें श्रीकृष्णाचें भाषण ऐकण्याकरितां त्याच्या मुखाकडे टकमक पहात होते.

धृतराष्ट्र "ह्मणे विदुरा जो साधुमनें स्वसद्गुणें हरितो ॥
येइल वृकस्थळाहुनि[1] आह्मां भेटावया उद्यां हरि तो ॥ १ ॥

---

१ इंद्रप्रस्थाहून.

येतो साम कराया, होय यशोर्थींच, तो यशा लाहो ॥
देणार तुह्मी हय गज रथ दासी दास हे कशाला हो" ११॥
समजाल तरि करिल हरि हर्षें पावोनियां विडा लास्यें ॥
नाहीं तरि खेदद त्या सर्व, जसें प्रस्थिता विडालास्य १२ ॥
प्राणहि सोडिल, परि हरि पांडवसख्य न पळार्ध सोडील॥
कृष्ण-प्रीति न मोडिल, पटु कोण्ही ब्रह्मलिपिहि खोडील" १३
तेव्हां सुयोधन ह्मणे "सत्य न सोडील सख्य हरि त्याचें॥
न पुरेल कृष्ण-मानसं हरणीं बळ मेरुच्याहि हरित्याचें १४
कृष्णासि वस्तु संप्रति किमपि न द्यावें तुम्हीं अहो तात॥
भ्याले म्हणेल, मान्य न अवमानाला कुलीन होतात॥१५॥
त्रिभुवन-पूज्यतमप्रभु सत्यचि, हें किंच तो असे व्याही ॥
परि संप्रति सेव्य नव्हे सेवूं कृष्णेतरा असेव्याही ॥ १६ ॥
जें वैर वाढलें तें आतिथ्येंकरुनि काय हो शमतें ॥
अवमान नव्हे जेणें तें क्षत्रोचित असें मला गमतें" ॥१७॥
भीष्म म्हणे "रे पुत्रा धृतराष्ट्रा, ईश्वरप्रभावज्ञा ॥
जीवें-पतंगा योग्या न प्रभुदीपाहणा-प्रभावज्ञा ॥ १८ ॥
मधुर वदा, प्रियचि करा प्रभु-पूजा परमशुद्धभावानें॥
तत्प्रिय हें कीं, भावां- सह न करावेंचि युद्ध भावानें" ॥ १९

१ यश इच्छिणारा. २ नृत्य. ३ घरांतून बाहेर जाण्यास निघालेल्या मनुष्यास. ४ मांजराचें मुख. ५ कृष्णाचें मन हरण करण्यास. ६ तीन लोकांमध्यें अत्यंत पूज्य. ७ आणखी. ८ कृष्णाहून इतराला. ९ सेवनाला अयोग्य, अशाला. १० क्षत्रियाला योग्य. ११ ईश्वराचें सामर्थ्य जाणणाऱ्या. १२ जीवरूपी पतंगाला.

दासी शत दासहि शत आठ महानाग रुक्मरथ सोळा ॥
देईन तोहि सन्मणि शुचि-तेजाचाचि जो गमे गोळा ॥२ ॥
जें मनुयोजनगामी[1] स्वस्वानें[2] व्रीडदानें[3] दे वाद्या ॥
माझ्या आज्ञेनें तें अश्वतरीयुक्त[4] यान देवा द्या ॥ ३ ॥
सद्भूषणें सुवस्त्रें पुष्कळ येतांचि हरिस अर्पावीं ॥
सैन्यें सदन्नपानें बहु बहुमानेंकरूनि तर्पावीं ॥ ४ ॥
दुःशासन-मंदिर द्या उतराया माधवासि पौरव हो॥
स्वाप्तासि प्राप्त तुह्मां- पासुनि बहु-परम-पूर्ण गौरव हो" ५॥
विदुर ह्मणे " कपट मनीं, प्रेम वरि, असें करूं नको पावें॥
तुजवरि न ईश्वरानें करुणा परता करून कोपावें ॥ ६ ॥
सर्वस्व प्रभुचरणीं अर्पिति बुध होउनी शुचि तराया ॥
देणार हें किति? क्षिति दे, या पूजेसि तो उचित राया॥७॥
पांचां पुत्रां द्यावीं पांच, न होउनि खळासि वश, गांवें ॥
तें तूं नकरिसि, जेणें प्रभुनें स्वमुखें करूनि यश गावें॥ ८ ॥
गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनासि बाळक वळावा ॥
सत्य प्रेमचि दावुनि सुज्ञें तो विश्वपाळ कवळावा ॥ ९ ॥
कपटादरें वळो पर, पर परमेश्वर कसा वळेल हरी॥
कृष्ण-कृपाऽमृत-निधिची[5] अकपट–विनताकडे[6] वळे लहरी ॥

१ चवदा योजनें जाणारें. २ आपल्या शब्दानें. ३ लज्जादान ४ खेचरांच्या माद्या ज्यास जोडिल्या, तें. ५ श्रीकृष्णाच्या कृपारूप अमृत समुद्राची. ६ निष्कपट शरण आलेल्या जनाकडे.

तों दुर्योधन बोले "ताता मज हेंचि युक्त भासतसे ॥
अन्नाच्छादन देवुनि पाळावे पांडुपुत्र दासतसे ॥२०॥
उडतात शत्रु ज्याच्या सामर्थ्यें त्यासि आकळायाचा ॥
योग उद्यांचि असे, हा मंत्र नव्हे केशवा कळायाचा ॥ २१ ॥
बलिं-विवर-वसति जसि तसि चिर अनुभवु कृष्ण एकला खोली
वाहो शिवा शिव्यांची स्तुतिची मज नित्य एक लाखोली" २२
धृतराष्ट्र म्हणे "पुत्रा, न वद असें, कृष्ण सोयरा, ज्याला॥
पूजावें, त्या बंधन, हें कर्म अयोग्य होय राजाला ॥ २३ ॥
बंधार्ह नव्हे, आला सामार्थे वरूनि दूतपण साचें॥
बाहेरि गमे नीरस परि अंतर मधुर पूत पणसाचें"॥ २४ ॥
भीष्म म्हणे "दुर्मंत्रित परिसावें काय यापरी तातें॥
भजसी भस्म कराया शोकीं कुळ काय या परीतातें॥ २५ ॥
प्रभुचा किजेल येणें भंग विपातिर्चा न कां नवा टोळें ॥
हा हा! हा ऐसा खळ सुयशाचें करिल कां न वाटोळें ॥ २६ ॥
हरसा हरि प्रतापी हा होय स्पष्ट दुष्ट अंधकसा ॥
कुसुतहि अमृतरसानि तरि सेवुनि तूं अंतरींहि अंध कसा२७
तुटतो यन्नामें भव- बंध तया हा करील बंध कसा ॥

---

१ बांधावयाचा. २ बलिविवर-पाताळ त्यांतील वसति. अर्थात् अत्यंतअंधकारप्रचुरें. ३ बंधनास योग्य. ४ पवित्र. ५ फणसाचें. ६ दुष्ट मसलत. ७ मृतातें. ८ गरुडाचा. ९ अंधकासुरासारखा. १० ज्याच्या नावानें. ११ संसाराचें बंधन.

विदुर ह्मणे अमृतकरा निववूं आलासि या चकोराला ॥
मुक्तार्पितमालाश्री देतें त्वद्धास्य याचकोराला ॥ ३६ ॥
त्वद्दर्शनें सुख विभो झालें जें काय मी कथूं तुज तें ॥
बा यावरींच टकळी घालूनि ज्ञानिचित्तही सुजतें ॥ ३७ ॥
सुरभीच्या कासेसि न सुज्ञें होऊनि वत्स लागावें ॥
तुझियाचि दास होउनि लागावें, तुजचि वत्सला गावें॥३८॥
आहेत सुखी पांडव? देवा आलासि काय सामास? ॥
खळ न वळेल,झिजविला जरि करितां बोध काय सामास३९
सर्वज्ञा जगदीशा देवा आलासि काय सामास ॥
सामास हंस मौक्तिक वर्णू, प्रिय फार वायसा मास ॥ ४० ॥
तव अवमान करावा ऐसें याच्यां असे मनीं कांहीं ॥
परि होसि प्रेमांनीं बद्ध, न दुष्टाचिया अंनींकांहीं ॥ ४१ ॥
भीष्म-द्रोण-व्यास- प्रभृति सकळ भागले महाभाग ॥
विश्वगुरो करुणाब्धे तूंहि खळा कथुनि हित पहा भाग४२
विदुरासि भेटल्यावरि भेटे सर्वाप्तराज कुंतीतें॥

१ हे चंद्रा. २ मुक्ता (मोत्यें) अर्पिल्या (ओंविलीं) जींत, त्यामाळेची शोभा. ३ याचकाच्या हृदयाला. ४ हे सर्वव्यापका. ५ त्वद्दर्शनावरच. ६ प्रियवस्तूचा वेध. ७ कामधेनूच्या. ८ हे दयालो. ९ देह. १०सहा महिने. ११ दुर्योधनाच्या. १२ सैन्यांनीं १३ प्रमुख. १४ महाज्ञानी. १५ श्रम कर. १६सर्व आप्तांत श्रेष्ठ.

जीस असुख[1] सह्य[2] गमे दे जें भेदूनि हृदय कुंती[3] तें ॥ ४३ ॥
वैकुंठाच्या[4] कंठीं घालूनि मिठी रडे पृथा आर्या ॥
ब्रह्मासहि[5] गहिवरवी महिवर-वीरेंद्रपांडुची[6] भार्या ॥ ४४ ॥
प्रभुला ह्मणे "मुकुंदा बा तूं करिसी सुखी सखेदास[7] ॥
संप्रति आहेत कसे मद्बाळक जे तुझे सखे दास ॥ ४५ ॥
ह्मणती नृपर्षि पुण्य- श्लोक कवि शरण्य वासरा[8] ज्याला ॥
आहे कैसा झाला ज्या प्राप्त अरण्यवास राजाला ॥ ४६ ॥
खळ-मळ-जल-बळ[9]विश्रुत[10]- वीर्य वृकोदर[11] कसा असे आजी[12] ॥
आ जीवनां[13] पसरित्ये विकळ[14] अभिमन्युची जया आजी[15] ॥ ४७
ज्याचा प्रताप[16]-पावक खळ-दिति-दनु-तनुज बळ[17] यवस खातो
आहे कसा कसा[18] जो पुररिपुच्या[19] उतरला तव सखा तो ४८
जे ह्मणती स्वर्गाला गेली कुंतीच, माय हे[20] माद्री ॥
आहेत कीं सुखी ते[21] वत्स गुणामरनिकाय[22] हेमाद्री[23] ॥ ४९ ॥

---

१ दुःख. २ सोसण्याजोगें. ३ भालेकरी. ४ श्रीकृष्णाच्या. ५ ब्रह्मस्वरूपी श्रीकृष्णास. ६ राजांत श्रेष्ठ व वीरांत श्रेष्ठ अशा पांडुराजाची. ७ खेदयुक्ताला. ८ वत्साला. ९ दुर्जनरूप मळाला जलरूप बळ ज्याचें, तो. १० विख्यात पराक्रम ज्याचा, तो. ११ भीम. १२ आज. १३ भीमरूप उदकाला. १४ व्याकुल. १५ कुंती. १६ पराक्रमरूप अग्नि. १७ दुष्ट जे दैत्य व दानव यांचें बळ, हेंच तृण. १८ कसोटीला. १९ शंकराच्या. २० कुंती. २१ नकुल सहदेव. २२ गुणरूप देवांचें स्थान. २३ मेरु.

प्रियसुतविरह सुदुःसह, देह-विरह बहु बरा, सुसह देवा ॥
पावेन मी कधीं बा ह्मणतें स्वबहिश्चरासु सहदेवा ॥ ५० ॥
वत्सा सहदेवा, मी मेल्या त्वां 'हाय' नच वदावें हो ॥
तेरा पळेंहि नसती माता, हें हायनें चवदावें हो ॥ ५१ ॥
श्रीकृष्णा, श्रीकृष्णा कैसी आहे असें मज न पुसवे ॥
कीं तीच्या कुसंव्यानें लाजविले स्पष्ट आमुचे कुसवे ५२ ॥
ते काय रक्षिती त्या व्यसनीं पांचहि न एकलीला जे ॥
बहु लाजल्या सुतवती तीस, न हे मात्र एकली लाजे॥५३ ॥
तूं नाथ रमानाथ प्रद्युम्नहि नाथ सत्य हें नातें ॥
असतां पृथा रडावी व्हावें धड एक सत्य हें ना तें ॥ ५४ ॥
बहु येतें तेज ह्मणुनि तुझिया रमतात विप्र भजनातें ॥
खलहृतसर्वस्व तुझे सेवक गमतात विप्रभ जनातें ॥ ५५ ॥
मृत्युंजयाश्रितांच्या प्राणांहीं वा कसा रमे यम रे ॥
दैवें तुजपुढें प्रभु हें; चित्रें हरिपुढें न सारमेयें मरे''॥५६ ॥
प्रभु अश्रु पुसोनि ह्मणे "जें संकल्पित घडेल सत्वर तें ॥
आत्यालाई कवणें ऐसे श्रम भोगिले न स्वैरतें ॥ ५७ ॥

१ हे श्रीकृष्णा. २ आपला बाहेर फिरणारा प्राण. ३ वर्षे. ४ द्रौपदी ५ कुशीनें. ६ वस्त्रहरणसमयीं. ७ पुत्रवती ८ दुष्टांनीं सर्वस्व हरण केलें ज्यांचें, ते. ९ तेजोहीन. १० शंकराच्या आश्रितांच्या. ११ हें आमुचें दुर्दैव. १२ आश्चर्य. १३ कुत्रा. १४ इष्ट. १५ सत्वगुण( संकटकाळीं धैर्यगांभीर्य इ० त्यांत रमलेल्यानें.

मच्चित्त कौरवांचे चिंतूनि असाधुवाद[1] तळमळतें ॥
असतों मी तैं[2], तरि न व्यसनमळें[3] धर्मपादतळ[4] मळतें ॥५८॥
आहेत त्वत्पुत्रा पुण्यश्लोका[5] बुधा सुर सहाय ॥
होइल कीर्ति, ह्मणेल त्रिदशानादृतसुधासुरस[6] हाय ॥ ५९ ॥
"आहेत सदार सुखी देवि नमस्कार हे तुला साजे" ॥
ऐसें सांगुनि वंदी तें त्या श्रितशर्महेतुला[7] साजे ॥ ६० ॥
समजावुनि कुंतीतें भेटे दुर्योधना असेव्याही[8] ॥
कीं तो स्वसुतां[9] स्वसुतां[10] देउनियां जाहला असे व्याही ॥६१॥
लघु ह्मणति जे सुयोधन दुःशासन शकुनि कर्ण वेनातें[11] ॥
परिरंभपात्रें[12] केले प्रभुचें सौजन्य वर्णवेना तें ॥ ६२ ॥
पूजुनि घे प्रभु, होइल जलनिधिला तृप्तिदायक विहीर ॥
थोरपण अनंताचें अनंत, वर्णील काय कविहीर[13] ॥ ६३ ॥
'भोजन करा,' ह्मणे शठ देव ह्मणे "मज कशास हाकारितां[14]॥
जेवा तुह्मीच, दावुनि आदर आग्रह कशास हो कारितां॥६४
असतों जरि अन्नार्थी प्रथमचि ह्मणतों अवश्य मी तुजला ॥
प्रेमार्थी पांडवसख हा अन्नाकारणें नसे मुजला" ॥ ६५ ॥

---

१ दुर्वचनें. २ कपटद्यूतसमयीं. ३ संकटरूप मळानें. ४ धर्माच्या पायांचा तळ. ५ पुण्यकारक कीर्ति ज्याची, त्यास. ६ देवांनीं अनादरिलेला अमृतरस. ७ आश्रितांच्या सुखाला कारण, अशा श्रीकृष्णाला. ८ सेवनास अयोग्य, अशाला. ९ आपला पुत्र सांब यास. १० आपली कन्या लक्ष्मणा. ११ वेनराजाला. १२ आलिंगनास योग्य. १३ कविश्रेष्ठ. १४ बोलावितां.

प्रभुला ह्मणे सुयोधन "तिकडे इकडेहि सम असे नातें ॥
ज्या कारणें करावा अस्मदनादर तुवां असेना तें" ॥६६॥
देव ह्मणे "केवळ ते न सोयरे मदसु सर्व वसु देव ॥
मान्य जसे अक्रूरो- द्धव बळभद्रोग्रसेन वसुदेव ॥ ६७ ॥
जे तत्सख तद्रिपु, ते मत्सख मद्रिपु खरे अगा राया ॥
द्रिपदन्न न सेवावें म्यां येऊंही नये अगारा या ॥ ६८ ॥
हें काय बरें? खल हो साधु तुह्मीं सर्वकाळ जाचावे ॥
सद्रिरि असह्य मज, असा आहिहि न, जो सर्व काळजा चावे" ६९
खोटा सुयोधन ह्मणुनि विदुरगृहा जाय देव नच खोटा॥
गोपोच्छिष्टां वळला, वळता कां वासुदेव न चखोटा ॥ ७०॥
तैसीही तरली जी स्तन्यमिषें दे बकी सुतापंचि ती॥
ठात्री कथा परि घडे न खळाला देवकीसुतापचिती ॥ ७१ ॥
द्रोण कृप भीष्म बाह्लिक सर्वस्व निवेदिती, परि न परते॥
खळसंसर्गे प्रभुच्या अंतरले पूजना, जरि न परे ते ॥ ७२॥
प्रभु त्यांसि म्हणे "केली मदपचिति तुम्हीं, गृहासि जाच कसे
चित्त प्रसन्न नसतां उपचाराग्रह नव्हेत जाचकसे ॥ ७३ ॥

१ माझे प्राण. २ सर्व द्रव्य. ३ शत्रूचें अन्न. ४ सज्जनशत्रु. ५ कुटिल. ६ गोपांच्या उष्टयाला. ७ स्तनपानाच्या निमित्तानें. ८ पूतना. ९ अतिदुःख. १० श्रीकृष्णपूजा. ११ भीष्माचा चुलता. १२ शत्रु. १३ माझी पूजा. १४ बाह्यात्कारीं वरें वाटण्या करितां आग्रह. १५ जाचणारेसे.

दुःसंग-नक्र-दत्त- क्लेश निवारूनि सर्व विदुर-गजा ॥
मुक्त करी हरि, लाजे गातां गुणकीर्ति सर्वविदुरगं ज्या ७५॥
विदुर प्रेमें, जेविं ब्रह्मादि कवि प्रसन्न यज्ञानें ॥
प्रभुला तेविं न करिती व्यासादिक विप्र सन्नयँ-ज्ञानें ॥७५॥
शत-संख्य वाजवी ज्या जेववितां माय-देवकी चिटक्या ॥
तो नित्यतृप्त भगवान् विदुर-गृहीं भोजनांत दे मिटक्या ७६
आले ढेंकर, दिधल्या मिटक्या, बहुसाल मारिले भुरके॥
उरके सर्वांमागुनि अशन, परि न ताट चाटणें उरके ॥७७॥
ज्याच्या चरणें सुरजां- करविं प्रणतांसि मोक्ष देवविला ॥
देव विलासि-मनुज-तनु विदुरप्रेमें यथेष्ट जेवविला ॥ ७८ ॥
मग रात्रौ एकांतीं सर्वज्ञालाहि साधुराय कवी ॥
पाय रगडितां दुर्जन- दुर्योधन-दुर्मतास आयकवी ॥ ७९ ॥
खळ-मंडल-प्रवेश प्रभुचाहि मला प्रशस्त भासेना ॥
बहुत मिळाल्या असती शत्रूंच्या दुःसहप्रभा सेना ॥ ८० ॥
भासति पांडव जैसे तैसा मज तूंहि वत्ससा स्नेहें॥
अनुकारितसे सतत स कंपत्वें त्हदय वत्ससास्ने हें॥ ८१ ॥

---

१ दुर्जनसंगति हीच नक्र (सुसर) ह्यानें दिलेले क्लेश. २ विदुररूप गजाला. ३ सर्ववित्- उरग ह्म० सर्वज्ञ शेष. ४ उत्तम नीति व ज्ञान, यानें. ५ उत्तम रजःकणांकडून. ६ लीलेनें मनुष्य-रूप धरिलें ज्यानें, तो. ७ असह्य तेज ज्यांचें त्या. ८ अनुकरण करीत आहे. ९ वासराच्या सास्नेला-गळ्याखालच्या लोंवण्याच्या (कांबळीला.)

देव ह्मणे "वांछिसि हित वांछावें जेंवि मायबापानीं ॥
जें शिव सदुक्तिपानीं[1] तें अमृताच्याहि काय बा पानीं॥८२॥
सुख यश नसे विरोधीं सुमति रमति सुखयशोजनके-सामीं[2] ॥
आलों करावया उप- देश, उपेक्षूं सुहृज्जन कसा मीं८३ ॥
वळतील, अपयशें तरि यां सर्वांचीं मुखें न मळतील ॥
चळतील नीतिमार्गीं, धर्मक्रोधानळांत[3] जळतील ॥ ८४ ॥
ह्मणतां सुहृदुत्तम[4] मज मग म्यां समयीं कसें न राखावें ॥
विदुरा, वाइट वाटे कुलजाहि असद्भर्सें[5] नरा खावें ॥ ८५॥
बहुकामकोपलोभां उग्रां असुरां समस्त सुर भीती ॥
हे व्याघ्रचि वा विदुरा, जी कीर्ति स्पष्ट होय सुरभी ती॥ ८६
पंगुहि मेरुवरूनिहि न माथां धरितां यदंघ्रिरज[6] निसरे॥
त्या दीनबंधुची ती चिंता नसरे, परंतु रजनि सरे ॥ ८७॥
प्रातःकाळीं सशकुनि दुर्योधन ये स्वयें बहायाला ॥
प्रातर्विधि करुनि प्रभु जाय प्रज्ञांबकां[7] पहायाला ॥ ८८ ॥
स्वस्वीकृति[8] करितां शुचि- यश फोडिल कां न हाक विदुरोपें[9]
कीं त्यासि घे रथीं तो, यच्चरण-रजें[10] महाज्ञविदुरापें[11] ॥ ८९॥

---

१ सद्भाषणश्रवणानें. २ सुख व यश उत्पन्न करणाऱ्या सामांत. ३ धर्माच्या क्रोधरूप अग्नींत. ४ सुहृदांत उत्तम. ५ असत्याच्या भीतीनें. ६ ज्याचे चरणरज. ७ प्रज्ञा—अंबक ह्म० बुद्धि हेच नेत्र ज्याचे, तो धृतराष्ट्र. ८ आपला स्वीकार. ९ विदुरापाशीं. १० ज्याचे चरणरज. ११ महाज्ञात्यांस दुर्लभ.

जनदृष्टि चातकी जी, तूर्य-रवें[1]करुनि देत ओ तीतें ॥
प्रभुमेघ[2] दर्शनामृत[3] दुर्लभ जें तन्मुखांत ओती तें ॥ ९० ॥
ज्याच्या दयातरीनें[4] सर्व-मनोरथ-सागरांत[5] सुरभि[6] तरे ॥
केले धीट जयाच्या स्मृतिकवचें[7] वासवादि[8] सुर भितरे ९१ ॥
जो परमहित[9] परम हित परमहि तरिकर्णधार[10] यदुपकृती[11] ॥
बहुजीवांवरि, पावे तो त्या कौरवसभेसि यदुप कृती[12] ॥ ९२ ॥
जातांचि सभेंत नभीं देवर्षि-प्रमुख देखिले विप्र ॥
प्रभुनें सत्कारविले भीष्माकरवीं महामुनि क्षिप्र ॥ ९३ ॥
भीष्में धांवोनि पुढें जाउनि अत्यादरें पदीं नमुनी ॥
पूजुनि वरासनीं[13] बहु तोषविले ते दया[14]-नदीन मुनी ॥ ९४ ॥
मग जी जलदश्यामा[15] करुणा[16] बसली नवासनावरि[17] ती ॥
जीच्या उपासकजना- प्रति विषयाच्या न वासना वरिती ॥
केवळ जवळ बसविला विदुर प्रेमें करुनि मापतिनें[18] ॥
तद्यश न मोजवेल ब्रह्मांडा येवढ्याहि मापानें ॥ ९६ ॥

---

१ वाद्यांच्या शब्दानें. २ श्रीकृष्ण हाच मेघ. ३ दर्शनरूप उदक. ४ कृपारूप नौकेनें. ५ आपल्या अनेक वासनांच्या समुद्रांत. ६ कामधेनु. ७स्मरणरूप कवचानें. ८इन्द्र इत्यादि. ९ अत्यंत पूज्य. १० नौकेचा सुकाण्या. ११ ज्याचे उपकार१२ कुशल. १३ श्रेष्ठस्थानीं. १४ कृपासमुद्र. १५ मेघाप्रमाणें श्यामवर्ण. १६ करुणामूर्ति. १७ नवीन आसनावर. १८ लक्ष्मीपतीनें.

झाले प्राप्त कुरुसभे- मध्यें त्या दुर्लभा अवसरा जे ॥
आले शत-जन्म करित ते श्री¹गौरीश्वरा नवस राजे ॥ १७॥
टकमक पाहत होते प्रभु-मुख-चंद्राकडेचि चातकसे ॥
नसतील जोडिले श्रव- णां²हि बसाया मनाक्षि हात कसे१८॥
सभ्य श्रुतिवदनांतें प्रसरिति सेवावया भगवदुक्ती ॥
प्राशावयासि जेंवि स्वच्छस्वाती³यंबुला जलधि⁴शुक्ती ॥१९ ॥

# अध्याय ८ वा.

## सारांश.

श्रीकृष्ण—धृतराष्ट्रा, कुरुकुलांतील राजांनीं जें यश मिळविलें त्यास तूं डाग लावूं नको. कुलधर्म सोडूं नको. पाण्डवांचा नाश करण्याविषयीं यत्न करणाऱ्या आपल्या पुत्रांचें तूं निवारण कर. मी पाण्डवांचें निवारण करीन. जे राजे तुला धन्य ह्मणत होते ते आतां तुला दोष देतील. या करितां तूं पाण्डवांशीं साम कर.

परशुराम—दंभोद्भवनामक राजा होता. त्यांस आपल्या बळाचा मोठा गर्व होता. तो नित्य ऋषींना पुसत असे कीं, माझ्याशीं युद्ध करील असा कोणी वीर आहे काय ? पुनः पुह्ना विचारिल्या मुळें कंटाळून ऋषि ह्मणाले, गंधमादनपर्वतीं नरनारायण ऋषि

१ शंकराला. २ कर्णविवराला. ३ निर्मल अशा स्वातीच्या उदकाला. ४ समुद्रांतील शिंपला.

आहेत. ते तुझी इच्छा पुरवितील. तें ऐकून तो त्या पर्वतावर गेला. नरनारायणांनीं येण्याचें कारण राजास सत्कारपूर्वक विचारिलें. राजा—मी आपणांशीं युद्धाच्या इच्छेनें आलों आहें. ऋषींनीं तें मान्य केलें. युद्ध सुरु झाल्यावर ऋषींनीं त्यावर इषीकास्त्र सोडिलें. तेणें करून तो हतवीर्य होऊन ऋषींस शरण गेला. ऋषि-राजा, गर्वानें मनुष्याचा नाश होतो. यास्तव गर्व सोड, आणि स्वस्थपणें स्वस्थानीं जाऊन रहा. ऋषींच्या उपदेशाची त्यास गोडी लागली. त्या उपदेशाप्रमाणें वागून राजा सुखी झाला. दुर्योधना, तसा तूंही गर्व सोडून सुखी हो.

० कण्व—इन्द्राचा सारथि मातलि, ह्याची गुणकेशीनावाची कन्या होती. तिला योग्य वर पाहण्या करितां, मातलि व नारद फिरत होते. पाताळांत आर्यक सर्पाचा नातु सुमुख हा पसंत ठरला. आर्यकाला, त्यांनीं आपला मनोरथ कळविला. आर्यक—सुमुखाचा पिता चिकुर ह्यास गरुडानें भक्षिलें. व सुमुखासही भक्षीन असें गरुडानें सांगितलें आहे. त्याला काय करावें ? नारद व मातलि आर्यकाला अभय देऊन सुमुखाला घेऊन स्वर्गी आले. त्यांनीं सर्व वृत्त इन्द्राला कळविलें. तेथें विष्णुही होता. तो ह्मणाला, सुमुखाला अमृत पाजा. त्या प्रमाणें त्याला अमृत पाजून अमर केलें. हें वर्तमान गरुडाला समजतांच त्यास राग आला. तो मोठ्या वेगानें स्वर्गावर चालून आला. विष्णूला गरुड ह्मणाला—मी तुला आपल्या पाठीवर वाहिल्यावांचून तूं कांहीं

यश मिळविलें असल्यास सांग. विष्णु—मी स्वतांच आपल्याला वाहतों. मला वाहण्याची तुला शक्ति कोठें आहे ? असल्यास हा माझा बाहु सहन कर. असें ह्मणून विष्णूनें उजवा बाहु गरुडावर ठेविला. त्याच्या भारानें गरुड कासावीस होऊन शरण आला. विष्णूनें त्यास आश्वासन दिलें दुर्योधना, तसा तूंही गर्व सोड. व पाण्डवांशीं साम कर. ह्मणजे सुख पावशील.

नारद—दुर्योधना, अत्याग्रहानें कोणाचें बरें होणार नाहीं. पूर्वीं साक्षात् यमधर्म वसिष्ठऋषीचें रूप घेऊन विश्वामित्राचें सत्व पाहण्या करितां, त्याच्या आश्रमांत आला. ऋषि क्षुधित आहे, असें जाणून विश्वामित्रानें स्वतां पाक केला. पण ऋषीनें त्याची वाट पाहिली नाहीं. तो दुसरीकडे जाऊन जेवला. विश्वामित्र तें सिद्धान्नपात्र डोक्यावर घेऊन ऋषीकडे गेला., त्यास ऋषि ह्मणाला, माझें भोजन झालें. मी पुनः येऊन हें अन्न भक्षीन. तों पर्यंत तूं असाच येथें उभा रहा. विश्वामित्र तें पात्र घेऊन तसाच एक वर्ष ऋषीची वाट पहात उभा राहिला. वर्षांतीं ऋषि आला. पात्रांतील ताजें व उष्ण असें अन्न सेवन करून ऋषि संतुष्ट हो-ऊन त्यास ब्रह्मर्षित्वाचा वर देऊन स्वस्थानीं गेला. विश्वामित्र अन्नपात्र घेऊन उभा असतां, त्याचा शिष्य गालव ह्यानें त्याची उत्तम सेवा केली. तेणें करून विश्वामित्र संतोष पावला. त्यानें गालवास सर्वविद्या देऊन घरीं जाण्यास आज्ञा दिली. पण गाल-वानें गुरुदक्षिणा मागावी ह्मणून गुरूला अत्याग्रह केला. तेव्हां

क्रोध येऊन विश्वामित्रानें, चंद्राप्रमाणें शुभ्र असे आठशें श्यामकर्ण गुरुदक्षिणार्थ मागितले. तेव्हां गालव संकटांत पडला. तो आपला मित्र गरुड ह्याचे पाठीवर बसून सर्वत्र फिरला. तो ययातीकडे गेला. ययातीकडे श्यामकर्ण नव्हते. ह्मणून त्यानें आपली माधवी कन्या त्याच्या स्वाधीन केली. आणि ह्मणाला. श्यामकर्ण घेऊन कोणत्या तरी राजाला ही कन्या दे. तें कबूल करून ती कन्या घेऊन गालव प्रथम हर्यश्वाकडे गेला. त्याच्या संग्रहास दोनशें श्यामकर्ण होते. ते घेऊन गालवानें ती कन्या त्याकडे एक वर्ष ठेविली. त्यास वसुमनानामक पुत्र झाला. प्रसूतीनंतर ती कन्या ब्रह्मवादिऋषिवरानें पुनः कन्या होत असे. ती कन्या पुढें तो दिवोदास व उशीनर ह्यांकडे घेऊन गेला. प्रत्येकापासून दोन दोनशें श्यामकर्ण घेऊन एकैक वर्ष ती कन्या त्यांकडे ठेविली. दिवोदासाला प्रतर्दन पुत्र झाला. व उशीनराला शिबि हा पुत्र झाला. मग ती कन्या व सहाशें श्यामकर्ण घेऊन तो विश्वामित्राकडे गेला. तो विश्वामित्राला ह्मणाला, सहाशें श्यामकर्ण आणिले आहेत, व दोनशें श्यामकर्णांबद्दल ही कन्या घ्यावी. तें ऐकून विश्वामित्र ह्मणाला,. पहिल्यानेंच ही कन्या तूं मला दिली असती तर केव्हांच ऋणमुक्त झाला असतास. असो. विश्वामित्राला त्या कन्येपासून अष्टकनामा पुत्र झाला. त्याला आपलें ऐश्वर्य देऊन व ती कन्या गालवाच्या स्वाधीन करून विश्वामित्र वनास निघून गेला. गालवही ती कन्या ययातीच्या स्वाधीन करून वनास गेला. माधवीच्या चार पुत्रांनीं

यश मिळविलें असल्यास सांग. विष्णु—मी स्वतांच आपल्याला वाहतों. मला वाहण्याची तुला शक्ति कोठें आहे ? असल्यास हा माझा बाहु सहन कर. असें ह्मणून विष्णूनें उजवा बाहु गरुडावर ठेविला. त्याच्या भारानें गरुड कासावीस होऊन शरण आला. विष्णूनें त्यास आश्वासन दिलें दुर्योधना, तसा तूंही गर्व सोड. व पाण्डवांशीं साम कर. ह्मणजे सुख पावशील.

नारद—दुर्योधना, अत्याग्रहानें कोणाचें बरें होणार नाहीं. पूर्वी साक्षात् यमधर्म वसिष्ठऋषीचें रूप घेऊन विश्वामित्राचें सत्व पाहण्या करितां, त्याच्या आश्रमांत आला. ऋषि क्षुधित आहे, असें जाणून विश्वामित्रानें स्वतां पाक केला. पण ऋषीनें त्याची वाट पाहिली नाहीं. तो दुसरीकडे जाऊन जेवला. विश्वामित्र तें सिद्धान्नपात्र डोक्यावर घेऊन ऋषीकडे गेला. त्यास ऋषि ह्मणाला, माझें भोजन झालें. मी पुनः येऊन हें अन्न भक्षीन. तों पर्यंत तूं असाच येथें उभा रहा. विश्वामित्र तें पात्र घेऊन तसाच एक वर्ष ऋषीची वाट पहात उभा राहिला. वर्षांतीं ऋषि आला. पात्रांतील ताजें व उष्ण असें अन्न सेवन करून ऋषि संतुष्ट होऊन त्यास ब्रह्मर्षित्वाचा वर देऊन स्वस्थानीं गेला. विश्वामित्र अन्नपात्र घेऊन उभा असतां, त्याचा शिष्य गालव ह्यानें त्याची उत्तम सेवा केली. तेणें करून विश्वामित्र संतोष पावला. त्यानें गालवास सर्वविद्या देऊन घरीं जाण्यास आज्ञा दिली. पण गालवानें गुरुदक्षिणा मागावी ह्मणून गुरूला अत्याग्रह केला. तेव्हां

क्रोध येऊन विश्वामित्रानें, चंद्राप्रमाणें शुभ्र असे आठशें श्यामकर्ण गुरुदक्षिणार्थ मागितले. तेव्हां गालव संकटांत पडला. तो आपला मित्र गरुड ह्याचे पाठीवर बसून सर्वत्र फिरला. तो ययातीकडे गेला. ययातीकडे श्यामकर्ण नव्हते. ह्मणून त्यानें आपली माधवी कन्या त्याच्या स्वाधीन केली. आणि ह्मणाला. श्यामकर्ण घेऊन कोणत्या तरी राजाला ही कन्या दे. तें कबूल करून ती कन्या घेऊन गालव प्रथम हर्यश्वाकडे गेला. त्याच्या संग्रहास दोनशें श्यामकर्ण होते. ते घेऊन गालवानें ती कन्या त्याकडे एक वर्ष ठेविली. त्यास वसुमनानामक पुत्र झाला. प्रसूतीनंतर ती कन्या ब्रह्मवादिऋषिवरानें पुनः कन्या होत असे. ती कन्या पुढें तो दिवोदास व उशीनर ह्यांकडे घेऊन गेला. प्रत्येकापासून दोन दोनशें श्यामकर्ण घेऊन एकैक वर्ष ती कन्या त्यांकडे ठेविली. दिवोदासाला प्रतर्दन पुत्र झाला. व उशीनराला शिबि हा पुत्र झाला. मग ती कन्या व सहाशें श्यामकर्ण घेऊन तो विश्वामित्राकडे गेला. तो विश्वामित्राला ह्मणाला, सहाशें श्यामकर्ण आणिले आहेत, व दोनशें श्यामकर्णांबद्दल ही कन्या घ्यावी. तें ऐकून विश्वामित्र ह्मणाला, पहिल्यानेंच ही कन्या तूं मला दिली असती तर केव्हांच ऋणमुक्त झाला असतास. असो. विश्वामित्राला त्या कन्येपासून अष्टकनामा पुत्र झाला. त्याला आपलें ऐश्वर्य देऊन व ती कन्या गालवाच्या स्वाधीन करून विश्वामित्र वनास निघून गेला. गालवही ती कन्या ययातीच्या स्वाधीन करून वनास गेला. माधवीच्या चार पुत्रांनीं

पुढें ययातीचा उद्धार केला. असो. सारांश, अत्याग्रहानें गालव पश्चात्ताप पावला. दुर्योधना, तसा तूंही पश्चात्ताप पावशील. यास्त- व आग्रह सोडून पांडवांशीं साम कर. व सुखी हो.

देव ह्मणे " धृतराष्ट्रा   राया मोठी जगीं तुझी पदवी ॥
पद विद्यांचें तूं, परि   परिस, मज बळेंचि, आप्तता वदवी॥१
श्रुत[1]-वृत्तादि-सुगुण-गण-   मंडितकुळसन्नृपांत हे महित॥
जे झाले, त्यांत तयां   गमलें बहु यशचि हित, न हेम हित २
जें मेळविलें, चंदन-   सम झिजवुनि, परसुखार्थ, आंगातें ॥
केवळ कृपाळु-पूर्वज-   सद्यश मळविसि बळेंचि कां गा तें ३॥
आह्लाद तुह्मां होतो   वडिलां, परदुःखदर्शनें त्रास ॥
तूं दाविसि अनुकंपा   न, शशिकळा जेंवि दर्श[2] नेत्रास ॥४ ॥
कौरव[3] करीत आले   बहु यत्न परासुखप्रहाणातें[4] ॥
ऐसें कारुण्य कुल-   व्रत सोडिल कोण गा शहाणा तें ॥५
दुःख परासि न द्यावें   सत्य वदावें क्षमा न सोडावी॥
जोडावी कीर्ति, असी   कुलरीति तुह्मीं कधीं न मोडावी॥६॥
केले गुप्त प्रकट   व्यवहार अनर्थहेतु[5] तनयानें ॥
ते कां न वारिले त्वां   कैसें होईल कुशल अनयानें ॥ ७ ॥

१ शास्त्रज्ञान, सदाचार इ० सद्गुणांनीं शोभमान जें कुळ, त्यांतील उत्तम राजांत. २ अमावास्या. ३ कुरुकुलांतील राजे. ४ दुसऱ्याच्या दुःखाच्या नाशाला. ५ अनर्थास कारण.

जी वेश्या बुध वरिल  त्यजुनि अमर्यादरा जनीं तीतें ॥
भजतो अनीतितें हा  त्यजुनि अमर्याद राज-नीतीतें ॥ ८ ॥
मुख्य स्वबंधु पांडव  तन्नाशातेंचि हें अकांवे टपती ॥
विश्वस्तां मीनांतें  परदारांतें जसे बक विट-पती ॥ ९ ॥
त्वन्नंदन दुर्मति हे  क्षिति बुडवायासि तापदा आली ॥
काळाच्या क्रीडेची  तुझिया सदनांत आपदा आली ॥ १० ॥
या व्यसनातें चिंतुनि  मन कुदशेला भिऊनि हळहळतें ॥
शमवावें त्वां प्रभुनें  जेंवि शमविलें पिऊनि हळहळ तें ॥ ११ ॥
स्वसुतासि शमीव नृपा  स्वसख्यासह शमविजेल भीमहि म्या
पुत्रा अजातरिपुच्या  तूं साक्षाद्गुरुहि तरिहि भी महिम्या ॥
पाण्डव करूत तुजला  त्याही सिंहांसि हे ससे नमनें ॥
देतील मत्करीं स्व-  प्राणांसह जरिहि ते ससेन मनें ॥ १३ ॥
तूं प्रभु, सुयोधनादिक  हे पुत्र तुझ्या करीं असावेच ॥
अन्यरणीं प्राणांचा  योग्य पारि न योग्य, हा असा वेच १४ ॥
वाढिव धर्म प्रेमें  वाढावे मज जेंवि नंद नवनीतें ॥
सत्पुत्रांनीं भवनीं,  सुरतरुनीं न सुख नंदनवनीं तें ॥ १५ ॥
त्यजिले इष्टद पांडव  कां उन्मूलन करूनि सुरतरुसे ॥

१ अमरी-आदर ह्म० देवांनीं जिचा आदर केला, ती. २ मूर्ख. ३ विश्वास पावलेल्या. ४ जारश्रेष्ठ. ५ तुझ्या पुत्रांची दुर्बुद्धि. ६ त्वां-शंकरानें. ७ अर्जुनासह. ८ दुर्योधनादि. ९ सैन्यासहित.

बा उर्वशीच, एकीं पार्थी, न पवोनि एक सुरत रुसे॥१६ ॥
पाण्डव सहाय असतां तुज होतिल सर्व लोक वश्य पहा॥
त्वद्भाग्योत्कर्षातें श्रवण करुनियां ह्मणेल कश्यप हा १७॥
ह्मणतो युधिष्ठिर नको पायें लोटूं मला अवनतातें ॥
वचनकरापत्यांचें न करावें काय हो अवन तातें ॥ १८ ॥
क्रमिले तसेचि, कथिले होते त्वां त्यांसि अब्द तेरा जे ॥
धन्य ह्मणत होते जे लावितिल तुलाचि शब्द ते राजे १९
सुख संतति सुकृतर्धि प्रीति श्री पुण्य कीर्ति यालाभें ॥
साम करीं साधूंसीं नाहीं तरि पावलेंचि यालाभें"॥
बहु-सत्य बहु-प्रिय बहु- हित बहु-मत बहु-दुराप बहु रुचिरं
शुचि रम्य क्षीराब्धिजा- ननचंद्र-चकोर बोलिला सुचिर २१
त्या बोधामृतपानें निवुनि ह्मणति सभ्य वर्ण हे व्यास ॥
सुर-गुरुहि ह्मणे "रसने या सद्रिपुच्याहि वर्ण हे व्यास २२
मग भृगुराम ह्मणे "हे दुर्योधन भूमिपाळ, सत्य जुनी॥
कथितों समयोचित हित- हेतु कथा परिस आळस त्यजुनी ॥
होता अत्युद्दाम क्षितिपति दंभोद्भवाख्य पर्वतसा॥
त्याच्या हृदयांत जसा नव्हता कोणाचियाहि गर्व तसा
नित्य मुनींस पुसे कीं "मजशीं संगर करी असा मान्य॥

१ कश्यपाचे पुत्र देव, पराक्रमी व वैभवशाली आहेत. पण तुझे पुत्र व वैभव पाहून त्यासही वाईट वाटेल, हा भाव. २ शरणांगताला. ३ आज्ञाधारक मुलाचें. ४ वर्षें. ५ पुण्यवृद्धि. ६ सुखादिकाला. ७ लक्ष्मीच्या मुखचंद्राचा चकोर. ८ वर्णन कर. ९ युद्ध.

कृष्णेसि सांग कृष्णा तिळभरिहि तुजें उणें नसो शील ॥
त्वां साहिलें, असें पळ- मात्रहि सर्वसहा[1] न सोशील ॥५७॥
सति तव सभाप्रवेशीं रामेंहि विलोकिलें परश्वश्रू[2] ॥
निर्लज्जा कठिना मी, मरतीच तदा भली परि श्वश्रू[3] ॥ ५८ ॥
त्वां रक्षिलें, न झाले क्षम रक्षायासि मत्तनय नातें ॥
असते क्षम चरण-नखा स्पर्शोंदेते न मत्तनयनातें[4] ॥ ५९ ॥
जरि बुडविलीस माझ्या पुत्रांहीं व्यसनं-गर्त-लीनाहीं[5] ॥
तन्हि न त्रिटलीस, यापरि सत्वें[6] कोणीहि वर्तली नाहीं ६०॥
किंबहुना सांग तयां समयीं जें काय चांगलें कांहीं ॥
कृष्णा, मन्मत हें, कीं यश रक्षावें, न आंग, लेंकांहीं॥६१॥
बा गा ह्मण बाहूंतें पुरवाया स्वजनकाम हा भागा ॥
मागायाचें तुज हें नाहीं ह्मणसील का महाभागा ॥ ६२ ॥
पाहों नको मजकडे बा निज-बिरुदावलीकडेचि पहा ॥
काय स्तनार्थि-शिशुच्या शब्द उचित सांत्वनीं पहे 'चिप'हा"
नमुनि निघे, किमपि प्रभु न वदे, त्यावरुनियां असें वाटे॥
कीं 'कृत्वा दर्शयते प्राज्ञ, असा भाव, कीं गळा दाटे ६४॥
वृद्धांसि पुसे, स्वरथीं कर्णाला सबहुमान बाहुनि घे॥

१ सर्व सहन करणारी पृथ्वी. २ परशु-अश्रु ह्म० परशूला आलेलें अश्रु (रोदन.) ३ सासू. ४ उन्मत्तांच्या नेत्रांला. ५ व्यसनरूप खळग्यांत पडलेल्या. ६ धैर्यगांभीर्यादि गुणांनीं. ७ सुज्ञ जन बोलत नाहीं. करून दाखवितो.

कोण्ही असेल जरि, तरि सांगा लोकांत जो असामान्य[1]''
ते कंटाळुनि ह्मणती "काय उणें, बहु समर्थ आहेत॥
ह्मा गंधमादनीं नर- नारायण पुरवितील हा हेत'' ॥ २६॥
सेना घेउनि गेला दंभोद्भव गंधमादनाऽगातें ॥
सिद्धाश्रमासि पावे विश्व जया सिद्धिसदना[2] गातें ॥२७॥
जातांचि भेटले त्या प्रभु, बहुदुर्लभ तपोनिधि धीरा[3] जे॥
ज्यांला चिंतुनि तरले बहु भरतादिक-तपोनिधी राजे॥२८
पाहुनि भृश[4] कृश तो नृप हांसे हृदयांत फार अवमानी॥
परमार्थ[5] न कळतां कां हांसावें न परमांसि अवमानीं[6]॥२९॥
पूजुनि नरनारायण ह्मणति "मनें इच्छिलें कळिव राजा ॥
द्यावें सर्व सुर-नगें समभिलषित काय जें अलिवरा[7] ज्या''३०
"ऐकुनि यश समरार्थी मी आलोंहें'' असें ह्मणे मलधी ॥
खळ धीटपण प्रकटी तें पाहुनि हांसले दया-जलधी ॥ ३१॥
स्मित करुनि प्रभु वदले "पशुहि न या आश्रमांत उद्धत रे
येथें असंग-शस्त्रें[8] कवि षडरींतेंचि[9] करुनि युद्ध तरे''॥३२ ॥
हांसति मुनि, त्या मंदें समराचि वारितां पुन्हा तपोराशी॥
ह्मणति मनांत" न खेळों- द्यावें या या उन्हांत पोराशी''
मूढात्यग्रह[10] पाहनि जो नर-मुनि साध्वसाधुभावज्ञ[11] ॥

---

१ विशेष. २ सिद्धीच्या गृहाला. ३ हे दुर्योधना. ४ अत्यन्त. ५ खरें तत्व. ६ अधमांनीं. ७ भुंग्याला. ८ विरक्तिरूप शस्त्रानें ९ कामक्रोधादि सहा शत्रूंना. १० मूर्खाचा फार हेका. ११ चांगला वाईट हेतु जाणणारा.

धरि मुष्टि भरि इषींका सकरुण सस्मित सलील सावज्ञें ३४
दंभोद्भवाप्रति ह्मणे नारायणसख "बुधा न वरं[3] समर ॥
दाटुनि मरसि जरि 'गरळ-रस गिळुनि,वमुनि सुधानवरस मर
हूं ऊठ, तुझी युद्ध- श्रद्धा हरितों बहा सहायांतें[4] ॥
शस्त्र कशास? तुज बहुत मुष्टि-इषीका पहा, सहा यांतें" ३६
भूप ह्मणे "उठलों परि उचित इषीकास्त्र मज नव्हे राया"
धर्मज्ञा, तूंहि नससि योग्य अशाला मला अव्हेराया॥३७॥
शस्त्रास्त्रांचें दावी तो नृप बहुधा तयास कटकबळ ॥
कांडाचाहि[6] न ज्याच्या तेजा बहु धातया-सकट कवळ ३८
नरमुनिवर सोडियला भूपें शस्त्रौघ जो निशात[7] रणीं ॥
त्यासि इषीकांनींच च्छेदी रिपुवाहिनी-निशातरणी[8] ॥३९॥
करितां पुराण-मुनिनें ऐषीकास्त्र-प्रयोग, नाकांत[9]॥
सुख, आणि इषीकाशत कोंदे अरिच्या सर्वेंचि नाकांत४०॥
एकाहि सैनिकाला पात्यांनीं लोचना न झांकों दे ॥
तें ऐषीक न केवळ खळ-बळ-नयनीं नभांतही कोंदे ॥४१॥
नेत्रांत घ्राणांत श्रवणांत मुखांत सर्व-कटकाच्या ॥
बहु शिरकल्या इषीका जेंवि जगीं शक्ति विश्व-घटकाच्या
ऐसा मुनिवर्यासीं करुनि हठें विजय-काम-नाश रण ॥

---

१ गवत; ज्यास कसाई ह्मणतात, तें. २ धिक्कारपूर्वक. ३ स्वीकारूं नको. ४ सहाय करणाऱ्यांस. ५ याचा "राया" याकडे अन्वय.. ६ क–अंड ह्म० ब्रह्मांडांचा. ७ तीव्र. ८ शत्रुसेना हीच रात्र, तिच्या नाशाविषयीं सूर्य. ९ स्वर्गांत.

गुणकेशीची व्हावी हृष्टा अवलोकितांचि ज्या माता ॥५१॥
आर्यक ह्मणे " सुरर्षे, कवणा न रुचेल हें असें नातें ॥
परि ज्या बळें करावें " संतोषें मान्य म्यां असेना तें॥ ५२॥
भक्षुनि माझ्या पुत्रा चिकुरातें सर्पकाळ पक्षीनें ॥
वदला या मत्पौत्रा सुमुखातें, कीं 'तुलाहि भक्षीन, ॥ ५३॥
वदला तैसेंचि करिल, दुःसाध्या काय या प्रतिज्ञा त्या ॥
ऐसें असतां देशी गुणकेशी काय याप्रति ज्ञात्या" ॥५४॥
मातलि "ह्मणे दिलीच स्वसुता म्यां, वचन काय फिरवावें
जिरवावें दुःख तुह्मीं या मुनिला पौत्ररत्न निरवावें ॥५५॥
आह्मी दोघे निववूं सुरपतिला, तो समर्थ रक्षील॥
पक्षी लक्ष्मीशप्रिय परि अरि-भावें न यासि लक्षील" ॥ ५६
नाग ह्मणे "न्या न पडों- द्यावें शोकांत आर्यका मातें॥
न तसे स्वपितरहि, जसे येती लोकांत आर्य कामातें ५७ ॥
ज्याची महापुराणीं व्यास भगवदुक्तिसीच मातें लिही॥
तो अभय आर्यकाला दे, सुरपतिसूतसचिव मातलिही ५८॥
नारद मातलि घेउनि आले सुमुखाहिला सुरसभेला ॥
सुरदृष्टिमक्षिकांचा मोहक तो इक्षुचा सुरस भेला ॥ ५९ ॥
प्रसवोनि परम धन्या झाली लोकत्रयांत ज्या माता ॥

१ तें बळ. २ सर्पांचा काळ. ३ गरुड. ४ त्या गरुडाला. ५ इंद्राला. ६ विष्णुप्रिय. ७ शत्रुत्वानें. ८ ज्या नारदाची. ९ईश्वर वचनासारखी. १० भाषण. ११ इन्द्राचा सारथि व प्रधान. १२ सुमुखनामक सर्पाला. १३ देवसभेला. १४ देवांच्या दृष्टि ह्याच माशा. १४ गुळाचा रवा.

तोही जेव्हां होता क्षीराधिचा सुरसभेंत जामाता ॥ ६० ॥
यद्यश बुजगवणें दे भक्तासि शिवों न काळकागातें ॥
सदय शरण्यवरं असें श्रुतिशत ज्या विश्वपाळका गातें ६१
पुरुषार्थासि न गावुनि सत्सद ज्याचे सुवृत्त भुज गातें ॥
त्या प्रभुच्या पायांवरि घाली मुनि कथुनि वृत्त भुजगातें ॥
देव ह्मणे "हो दादा, द्या अमृत,न द्यावया पळ उशिर हो
न स्व शरणागताचें काळ बळें आपुलें पळउ शिर हो"॥६३॥
शक्र ह्मणे " चक्रधरा तन्नखरें न साहवे नव क्रकचं ॥
होइल त्या खगपतिचा मद्वज्रें एकही न वक्र कंच"॥ ६४ ॥
जिष्णुसि विष्णु सिकवि कीं "आधीं तों अमृत आणवा,हूं द्या
त्याजवळि मज न मत्कृत, सत्कृत हें,असिच आण वाहूंद्या ॥
पात्रेमुखीं न पडे जरि, तरि अमृत वृथा, कशास सांचविलें
तें सत्य वांचणें, जें शरणागत सर्व सत्वें वांचविलें ॥६६ ॥
साधुस्वीकृत ह्मणुनि प्रभुनें अहिलाहि अमृत पाजविलें ॥
साजविलें कारुण्य ब्रह्माण्ड भरूनि सुयश गाजविलें ॥६७॥
स्वर्गावरि, गाजवुनि द्वेषिकरींचे महात पाख, वळे॥

१ श्रीविष्णु. २ ज्या विष्णूचें यश. ३ काळरूप कावळ्याला. ४ शरण जाण्यास योग्य अशा जनांत श्रेष्ठ. ५ पुरुषानें साधावयाच्या गोष्टीला. ६ सज्जन सभा. ७ उत्तम वर्तुळाकार अथवा सदाचार संपन्न. ८ हे विष्णो. ९ त्या गरुडाचीं नखें. १० करवत. ११ केश. १२ योग्य जनाच्या मुखांत. १३ प्राणी. १४ साधु नारद, यानें अंगीकारिलेला. १५ शत्रुरूप गजाचे.

येउनि सभेंत इंद्रो- पेंद्रांवरिं[1] बहु महातपा[2] खवळे ॥ ६८ ॥
"वद विष्णो मजवांचुनि जरि मेळविलें असेल यश कांहीं
मद्धळ देवांनीं जरि हरिजेल, व्यजन कां न मशकांहीं"६९॥
देव ह्मणे "कवि ह्मणती मीपण अयशा,न बाहुला वाहें ॥
मज मीच वाहतों, तूं काय? बरें एक बाहुला वाहें"॥ ७०॥
ऐसें वदोनि दे तो स्कंधीं बहु भव्यभुजभर[3], भरे हो ॥
प्रभुचा प्रताप तो तनू- मदकक्षीं[4] हव्यभुज[5] भरभरे[6] हो॥ ७१॥
हरि गरुडाचें मीपण हरिबाहुभरप्रताप[7] सारेंच ॥
त्याचा गळतां मळसा मद, उतरे सर्व तापसा रेंच[8] ॥ ७२ ॥
भुज मोही त्यासि जसा रर्व शिशुदर्वीकरा[9] शिखंडीचा[10] ॥
तो भर दुःसह रचिला वत्सावरि जेंवि राशि खंडींचा॥७३॥
गरुडाचा गुरुतर[11] मद उतरुनि निजभुजहि उतरिला अजितें[12] ॥
अजि तें सदयत्व अतुल विधिहस्तें बिघडल्यासही सजितें॥
सावध होउनि गरुड प्रभुसि ह्मणे वंदुनि 'क्षमस्व' असें ॥
घे दास्य तसेंचि पुढें जरिहि असा मंद अक्षम स्व असें७५॥
जो काय सुरसदूषक[13]- अघपरिहरिता तसा चिकुरवाळी[14] ॥

---

१ इन्द्र व विष्णु यांवर. २ मोठें तप ज्याचें, तो गरुड. ३ आपल्या विशाळ बाहूचा भार. ४ त्याच्या गर्वरूप गवतांत. ५ अग्नि ६ पेटे. ७ विष्णूच्या बाहूच्या भाराचा प्रताप. ८ शब्द. ९ बाल सर्पाला. १० मोराचा. ११ फार मोठा. १२ ईश्वरानें. १३ यमुनेचें मधुर उदक दूषित करणारा कालिय व अघासुर यांचा नाश करणारा. १४ चिकुर सर्पाचा (त्याच्या पुत्राचा) वाली ह्म० तारक.

निर्गर्व करुनि चुकला बहु,परि हारि तातसाचि कुरवाळी ॥
तैसा तूंहि करिसि बहु गर्व, परि सुयोधना, न हें हित रे ॥
कर साम पांडवांसीं सत्सख्यें संकटीं कुजनहि तरे ॥ ७७॥
हा नारायण, पांडव धर्मादि सुरांश, सबळ हे राया ॥
वचके काळहि ज्यां, त्यां शक्त तुह्मी काळकवळ[1] हेरायां"॥
त्यातें सुयोधन ह्मणे " तुमच्या होणार काय.हाकांनीं ॥
ईश्वरसंकल्प बळी परिसोंचि नये मला[2] हा कानीं"॥७९॥
नारद ह्मणे "गुरुवचन न गणुनि घेतोसि करुनि किति ह्रास[3]
दुर्योधना, न आग्रह हित, या विषयींच परिस इतिहास८०
पूर्वी साक्षात् धर्म क्षुत्क्षाम[5] वसिष्ठरूप घेवून ॥
सत्वपरीक्षार्थ शिरे विश्वामित्राश्रमांत येवून॥ ८१ ॥
गाधिज सादर सत्वर आंगें बहु पाक कष्ट साहोनी ॥
धांवुनि जाय तदर्थ स्वशिरीं सिद्धान्नपात्र वाहोनी ॥ ८२ ॥
धर्म म्हणे " राहेल क्षुधित द्विजमंडळीं कसा चिर[6] हा ॥
सेवीन हेंहि पुनरपि येउनि, तोंवरि उभा असाचि रहा"८३
ऐसें वदोनि जातां गाधिज राहे उभाचि वर्षभर ॥
पात्र[7]-भर न बहु, गालव[8]- परिचरणें बहुत होय हर्षभर॥८४
भेटे वसिष्ठ-वेषें वर्षांतीं गाधिजास येऊन ॥
सेवून नवोष्णान्न प्रेमें उद्गार[9] फार देऊन ॥ ८५ ॥

---

१ काळाचे ग्रास. २ पाहुण्यास. ३ बडबड. ४ हसें. ५ क्षुधेनें पीडित. ६ फार वेळ क्षुधित कसा राहील ? अर्थात् जेवला, हें तात्पर्य. ७ पात्राचें ओझें. ८ गालवाच्या सेवेनें. ९ ढेंकर.

तो 'साधु ब्रह्मर्षे साधु' असें वरद धर्म बोलोनी ॥
तोलोनि वसिष्ठासीं जाय भले डोलवूनि डोलोनी ॥ ॥८६॥
गाधिज शिष्यांसि ह्मणे " वत्सा, झालासि धन्य, जा गेहा॥
जैसा दासहितार्थ, स्वहितार्थ तसा सदा न जागे हा" ॥८७॥
रक्षी गुरुसेवा हे सच्छिष्यशिशूसिं गालवा जिवंती ॥
प्रिय ईश्वरासि ते बहु, वंदुनि जे काय गाल वाजिवती॥८८
गालव ह्मणे " वहावी पायांवरि काय दक्षिणा सांगा" ॥
गाधिज ह्मणे "दिली बहु वत्सा, वदलासि तूं असें कां गा"
'कांहीं भागाचि' असें असकृत् फुगवुनि उगेच गाल वदे ॥
अत्याग्रहें करूनि श्रीगुरु-हृदयासि ताप गालव दे॥ ९० ॥
गाधिज ह्मणे " विधु-धवलें अष्टशत श्यामकर्ण दे वाजी"
शिष्य 'अवश्य' ह्मणे वरि परि निजचित्तांत हाय 'देवाजी'
झाला त्या चिंतेनें केवल कृश हरिणं-काय गालव तो ॥
राजा, आधि-हरिविणें भलत्या कवि-हरिणं काय गा लवतो॥
जेव्हां ह्मणे बहु मनो- रुगजंगरग्रस्तकाय गालव 'हा' ॥
गरुड ह्मणे "उडविन नगं मग, मित्रा आधि काय गा लव हा'
चाहे पृष्ठीं, पाहे बहु यत्न करूनि तदाधि वाराया ॥
परि गालवासि न पुरे धीर, परमविकळ होय गा राया ॥

१ सज्जन. २ गालवास. ३ उत्तम शिष्यरूपी मुलास. ३ मुलाच्या गळ्यांतील एक दागिना. ४वारंवार.५ चंद्राप्रमाणें शुभ्रवर्ण. ६फिकट शरीराचा. ७ चिंतारूप सिंहावांचून. ८कवि हाच हरिण. ९मनोरुग्-अजगर इ० ह्म० चिंतारूप अजगरानें ग्रासिलें शरीर ज्याचें, तो. १० पर्वत. ११ कण. १२ त्याची चिंता.

गरुड नव्हे मूर्तिमती ब्रह्मण्यां विष्णुची दया, तीतें॥
तें बहु कारुण्य असो, भेटवि वित्तार्थ मग ययातीतें॥ ९५॥
तेणें, नाहीं तादृक्[2]- धन-संग्रह ह्मणुनि, माधवी दुहिता॥
दिधली कीर्त्युपदेशें[3] भावि नृपांच्या करावया सुहिता॥९६॥
विकिली हर्यश्वदिवो- दासोशीनर[4]नृपांसि ती कन्या ॥
तद्दत्तषट्-शतहयां- सह मग गुरुलाहि[6] अर्पिली धन्या॥९७ ॥
पुत्र प्रथम वसुमना- नामा संप्राप्त होय हर्यश्वा ॥
गमला ज्या नरसिंहा- पुढें रणीं शत्रु-भूपवर्य[7] श्वा ॥ ९८ ॥
मानी प्रतर्दनाख्यें पुत्रें, बहु आत्मतप, दिवोदास ॥
ज्य: उपजतांचि धांवुनि गुण देती जेविं सपदि वो दास९९
शिबिनामक-पुत्रातें पावे हो वरुनियां उशीनर ती॥
यद्गुणजित निज[10]पतिची पाहे स्थिर कोरडी उशी न रती[11]॥
विश्वामित्रा चढवी सुयशाच्या पुत्र अष्टक विमानीं ॥
साक्षात् गरुडचि त्यातें सर्वाधिव्याळ[12]दष्ट कवि मानी १०१

१ ब्राह्मणांविषयीं दयाळु. २ गालवानें मागितला तसला धनाचा संग्रह. ३ कीर्ति व उपदेश येणें करून. ४ हर्यश्व-दिवोदास-उशीनर या राजांना. ५ त्या तीन राजांनीं दिलेल्या सहाशें घोड्यांसह. ६ विश्वामित्राला. ७ शत्रूंतील श्रेष्ठ राजा. ८ कुत्रा. ९ ज्या शिबीच्या गुणांनीं जिंकिलेला. १० आपला पति मदन, याची. ११ रतीनें आपल्या पतीची उशी कोरडी पाहिली नाहीं ह्म० ती नेत्राश्रूंनीं भिजलेली असे, हें तात्पर्य. १२ सर्व चिंतारूप सर्पांनीं चाविलेला.

गाधिज ह्मणे " अहा रे गालव, बा,लेवहि तूज न विचार॥
देतासि माधवी मज होते ऐसेचि पुत्र कवि चार ॥१०२ ॥
ऐसा हरिभक्तहि मुनि गुर्वर्थेहि करुनि आग्रह श्रमला ॥
गमला तत्सख गरुडहि दुर्बळ, कीं तोहि त्यासह भ्रमला॥
यास्तव दुराग्रह नव्हे हितें,सदुदित वाक्य कर उगा राया॥
सन्मतँ-धर्म-परावरि काळहि न शकेल कर उगाराया'"॥१०४
मानें तोहि ययाति स्वर्गापासूनि पावला पतन ॥
दौहित्रें साधु साधुनि देती त्याचें तयासि तें वतन ॥१०५॥

# अध्याय ९ वा.

## सारांश.

धृत०—कृष्णा, दुर्योधन माझें वचन ऐकत नाहीं. यास तूं उपदेश करून ताळ्यावर आण. कृष्ण—दुर्योधना, सज्जन पाण्डव यांशीं सख्य करून देवांप्रमाणें ऐश्वर्याचा उपभोग घे. भीष्म व द्रोण—श्रीकृष्णाच्या उपदेशास मान दे. सदुपदेशामृत प्राशन करणारास कधीं कोणाचें भय नाहीं. विदुर—पुत्रशोकानें

१ तिळभरही. २ गुरूकरितां देखील. ३ सज्जनांनीं सांगितलेलें. ४ साधूंना मान्य अशा धर्माच्या ठिकाणीं तत्पर असणाऱ्यावर. ५ मुलीचे पुत्र वसुमनाइ०

पितरांस दुःख होईल असें करूं नको. धृत०—धर्म ह्या लोकीं इंद्र व तूं उपेंद्र, असें लोकांनीं तुझांला ह्मणावें. दुर्योधन—तुह्मी सर्व मला दोष देतां, तर माझा अपराध कोणता? पाण्डवांनीं आपण होऊन आपला नाश करून घेतला. त्यांस सुईच्या अग्रा एवढाही भूभाग मिळणार नाहीं. कृष्ण–कपटद्यूतांत पाण्डवांचें सर्वस्व हरिलें. सभेंत द्रौपदीची विडम्बना केली. भीमाला विषान्न चारिलें. लाक्षागृहांत पाण्डवांस जाळण्याचा यत्न केला. असे असंख्य अपराध तुझे झाले. ते सर्व आह्मीं सहन केले. आह्मी साम करण्यास तुला उपदेश करीत असून तूं ऐकत नाहींस, तर तूं नाश पावशील. दुःशासन—संकटांत धर्माचा आश्रय करून आपला प्राण वांचीव. तें ऐकून दुर्योधन सभेंतून उठून गेला. श्रीकृष्ण (भीष्मादि सभासदांस)–या दुर्योधनास कुरुकुलाच्या हिताकरितां त्याच्या मित्रमण्डलासह बांधून ठेवा. गान्धारी—पुत्रा, हा दुराग्रह बरा नाहीं. येणेंकरून कुबेरही धुळीस मिळेल. मग तुझी कथा काय? दुर्योधनानें त्याही वचनाचा अनादर केला. तो कर्णादिकांस ह्मणाला. आह्मांला बांधण्याच्या पूर्वींच आह्मी कृष्णाला बद्ध करूं ह्मणजे शत्रु आपोआप मरतील. दुर्योधनाची ही मसलत सात्यकीला समजतांच ती त्यानें सभेंत बोलून दाखविली. विदुर—धृतराष्ट्रा, तूं आझून तरी आपल्या पुत्रांचा बंदोबस्त कर. श्रीकृष्ण–दुर्योधनाला योग्य वाटेल तें त्यास करूं दे. त्याची प्रतिक्रिया जी न्याय्य, तीच आह्मी करूं.

धृतराष्ट्र ह्मणे " कृष्णा　मज हा दुर्वृत्त आकळेना गा ॥
होतो मदांध जो, त्या　स्वहित अहित काय गा कळे नागा॥
तूं प्रभु परमाप्त ह्मणुनि　करुनि कृपा या सुयोधना वळिव ॥
बळि वळविला तुवां,हा किति? याला स्वहित बा पुन्हा कळिव"
ज्याच्या[१] वचनीं ब्रह्म-　प्रमुख कवींचा उदंड विश्वास ॥
निश्वास[२] वेद ज्याचे,　पाळी जो परम आप्त विश्वास[३]॥ ३ ॥
तो प्रभु करी परोपरि,　परिहाराया अनर्थ, उपदेश ॥
जेणें केला केवळ　बाळ ध्रुव साधु-मान्य सुपदेश[४] ॥ ४ ॥
परि तो न घेचि लेशहि　आंत,जसा कलश पालथा, नीच॥
अहितकरत्व स्वमतें　कल्पी अल्पायु बाल थानींच ॥ ५ ॥
जैसा निर्भाग्यांनीं　सर्वार्थद[५] दत्त[६] अतिथि वारावा ॥
खळकर्ण[७] अनादरिती　त्यापरि त्या दुर्लभाहि आरावा[८]॥ ६ ॥
"दुर्योधना शिरावें　न व्यसनशतावहीं[९] दुरभिमानीं ॥
भीष्म-द्रोण-विदुर-कृप-　धृतराष्ट्र-गुरूक्तिला सुरभि मानीं ॥७॥
भ्रमवी श्रमवी मळवी　पळवी सत्कीर्तिला दुराग्रह रे ॥
सेव्य सदुपदेश सुधा-[१०]　ग्रह, असदुपदेश हा सुराग्रह रे ॥८॥
पांथांचा ताप नृपा　तिळ तरि पावोनि सर[११] अपय[१२] शमला ॥
शम[१३], लाभ यांत आहे,　आइक, देऊंनको अपयश मला॥९॥

---

१ ज्या कृष्णाच्या. २ श्वास. ३ जगास. ४ सु-पद-ईश. ५ चारी पुरुषार्थ देणारा. ६ भगवान दत्तात्रेय. ७ दुर्जनाचे कान. ८ शब्दाला. ९ शतशः व्यसनें (संकटें) बाळगणाऱ्या दुरभिमानांत. १० अमृताचा स्वीकार. ११ सरोवर. १२ उदकरहित. १३ शांत हो.

सेवूत सुरर्षि-मुखें स्वर्गीं सादर यशःकथा पितर ॥
मद्रचितसामपोतें दुस्तरविपदब्धि जरि तथापि तर ॥ १० ॥
काय तुह्मी, भंगील स्वगदाघातेंकरूनि भीम नगां ॥
त्रिपुरारिसख्याचेंही पाहुनि निर्ज-यक्ष-कदन भी मन गा ॥
सुत बंधु जनक जननी गुरु मित्र कलत्र यांसि पात्र कसा॥
तुझिया बळासि केवळ दुःसह अर्जुन, तृणासि पावकसा"१२॥
वदला ईश्वर "पार्वति, अर्जुन मजसीं भला झगडला-गे"
किति त्यापुढें बळ तुझें खचवीसा मेरुला दगड लागे?॥१३॥
दिनमणिपुढें पळांत प्राप्ता गति होय अंधकारा, ती ॥
तुज त्या राजर्षिपुढें, कीं तो प्रभु जेविं अंधकारातीं॥१४॥
सेना व्यसनीं तुजला तारिल? कोपेल जरि अजातारी॥
हरि खवळतां भयांत स्वपति प्रति काय गा अजा तारी१५
त्याचा प्रसाद हो बहु कुरुदारांच्या न कोप तिलकीं हो ॥
नकुळ सहदेव केवळ अनलानिलसेच कोपतिल कीं हो१६॥
ते पांच, त्यांत सावा हा, यावा कोप या न साव्याही ॥

---

१ मी रचिलेल्या सामरूप नौकेनें. २ तरण्यास कठिन असा दुःखसमुद्र. ३ पर्वताला. ४ शंकराचा मित्र कुबेर, याचें. ५ आपल्या यक्षांचा नाश. ६ शंकर. ७ सूर्यापुढें. ८ अन्धक राक्षसाचा शत्रु शंकर. ९ शेळी. १० मस्तकावरील कुंकुमतिलकावर. ११ अग्नि व वायु ह्यां सारिखे. १२ हा श्रीकृष्ण.

अभिमत तसे न माझ्या जामात्यांसकट मानसा व्याही १७॥
सत्यचि दुःसह आह्मी कृष्ण त्रिदशेश्वरासही राजा ॥
त्या काय टंक भंगिल, घनही भंगूशके न हीरा ज्या॥१८॥
हो सावध सत्सख्यें सुरसत्तमसा सुखें कर विलास ॥
तूं लोभें भ्रांत, शकुनि- दुःशासन-वृष-मुखें,करविलास''१९
भीष्महि ह्मणे "कुरुवरा, दे यश यदुनायकासि बा शम' रे
कोण्हीहि सदुपदेशा ऽ मृतलवहि माशितां कधीं नमरे''२०॥
द्रोण ह्मणे " कृष्णाचें भीष्माचें वचन आयकावेंच ॥
सद्राकूचिंतारत्नें विखरिसि कां भरतनायका वेंच''॥ २१ ॥
विदुर ह्मणे " शम पावें प्रेमें, शोकेंकरूनियां न रडें ॥ "
पितरांचें न पिळावें सुतशोकवृकें धरूनियां नरडें'' ॥२२ ॥
धृतराष्ट्र ह्मणे " पुत्रा निर्भय अंतःपुरीं सुखें रम रे ॥
शम रे, गमो युधिष्ठिर इंद्र, जगीं तूं उपेंद्रसा गम रे॥२३॥
व्हावा वळला अहितहि; मग देव ह्मणेल कां नका व्याही ॥
रक्षील तेज, यापरि नीति न गुरुला कळे,न काव्यांही''२४
भीष्म द्रोण विदुर हे कथिति पुन्हाही असें खळास हित ॥
"न शिरें हठें वृकोदर- काळ-मुखीं बंधु-नृपबळासहित॥२५॥
कृष्णकरें भेट नृपा स्वांकीं श्रीधर्मराज तुज वाहो ॥

१ पाण्डवांसारखे. २ कृष्णार्जुन. ३ इन्द्रालाही. ४ हिऱ्याला. ५ देवश्रेष्ठ इन्द्र, या सारखा. ६ गोळा कर. ७ पुत्रशोकरूप लांडग्यानें. ८ पाहिजे. ९ बृहस्पतीला. १० शुक्राला. ११ आपल्या समीप.

त्याचा तूं राज्यभर- प्रोद्वहनसमर्थ बाहु उजवा हो"॥ २६॥
तो दुष्ट ह्मणे "कृष्णा, सर्व तुह्मी दूषितां मज चखोटा॥
पांडुसुतांला ह्मणतां फार भले, सानुजा मजच खोटा॥२७॥
ठावा नसे मज, तुह्मी सांगा अपराध कोण तो याचा॥
बहु जनै-वाद अनावरँ- वेग निरोधील कोण तोयाचा॥२८॥
केलें स्वयें सुखार्थ द्यूत निपुणता नसोनि धर्मानें॥
हारविलें धन कांहीं पडला व्यसनांत तो स्वकर्मानें॥२९॥
तेथें दोष शकुनिला लावितसां कां मलाहि अनघाला॥
जाणोनि पक्षपातीं कां घालितसां? नयांत मन घाला॥३०॥
तेंहि धन फिरोन दिलें तरि लावितसां बळेंचि अघं, लावा॥
साधुँ-समाधिस्थ-गळां जेविं खळ-व्याळँ आळ न घलावा॥
घडला वनवास बरें केला होता तिहीं तसाच पण॥
अज्ञातवाससमयीं परि त्यांहीं रक्षिलें न साचपण॥ ३२॥
अपराध काय? ह्मणतां कां सर्व युधिष्ठिरा करीं नमनें॥
मी क्षत्रियमानातें सोडुनि हें मान्य कां करीन मनें॥३३॥
सांगा करीन शतदा या सर्वद्विजजनांसि मी नमन॥
न विटे ब्राह्मण-नमना क्षत्र-मन, जसें वनांसि मीन-मन॥३४॥
पांडव काय, पविधरहि येइल कापावयासि जरि मान॥

१ राज्यभार वाहण्यास समर्थ. २ चांगल्याला. ३ लोकापवाद. ४ आवरतां येत नाहीं गति ज्याची, तो. ५ दोषरहिताला. ६ दोष. ७ उत्तम रीतीनें ज्याची समाधि लागली, त्याचे गळ्यांत. ८ दुष्ट सर्प. ९ घालावा. १० उदकाला. ११ इन्द्र देखील.

तरि मानवेंद्र मी न न-　मीन,उपेक्षुनि निमेषभरि मान॥३५॥
न मज समजलें तेव्हां　जेव्हां दिधला विभाग मत्तातें ॥
जो धन धूर्त हरितसे　काय कळे तत्प्रयोग मत्तातें ॥ ३६ ॥
जितुकें काय सुतीक्ष्णें　सूच्यग्रें भेद भूमितळ पावे ॥
तितुकेंहि अदेय तयां,　कीं मज खायासि गृध्र तळपावे॥३७॥
आह्मीं त्यांहींहि महा-　देवापरि या धराधवा गावें ॥
मागावें दास्य सदा　वचनीं विमदापराध वागावें ॥ ३८ ॥
कुरुगुरु भीष्म द्रोण　द्वेषि-तमोराशिचे रवि धुरीण ॥
कैसें न फेडितील　प्रभु हे श्रित-चित्त-कुमुद-विधु रीण॥३९॥
मरण-भयें अरिसि कसा　मानाधिक गणुनि काय हा लवतो
अचळ अशनिनें होइल　चूर्णशिखर, ह्मणुनि काय हालवतो
मजपासुनि पावेल न　शक्रहि, मग कोण बळिनर विभागा॥
भा गातां ज्याची,तो　विधु, कवि हो,होय मलिन;रविभा गा
केशव कोपोनि ह्मणे "　काय वदसि कविसभेंत अन्याया॥
दुर्योधना, बहुमता　तुजलाचि तुझ्या,न उक्ति अन्या या ४२
अपराध नसे केला?　स्मरण नसे काय? मन न आठव दे?॥
तरि परिस, मीच वदतों, समयीं कोण न असोनि पाठ वदे?॥

१ द्यूतकार. २ सुईच्या अग्रानें. ३ श्रीकृष्णाला. ४ गर्व व अपराध सोडून. ५ शत्रुरूप अन्धकाराच्या राशीचे. ६ अग्रगण्य. ७ समर्थ. ८ आश्रितांचें चित्त हेंच कमल, त्याचे चन्द्र. ९ पर्वत. १० चूर्ण झालें शिखर ज्याचें, तो. ११ तेज. १२ सूर्यकांति.

अपराध तुझे विश्व- श्रुत, त्यांचा लोपला नसे लवही ॥
कुशलाहि चित्रगुप्ता लिहितां गुरुहि पुरली नसेल वही ४४
घूकांसि जसा दिनकर तुज सुजनोत्कर्ष पळ पहावेना ॥
तन्नाम तुला, अंहिला गरुडाचें नामसें, सहावेना ॥ ४५ ॥
किंतवा-करवीं कपट- द्यूतीं त्वां पांडुपुत्र नागविले ॥
वागंविले जे भीष्में स्वकरतळस्फोटसे, न भागविले ॥४६ ॥
ज्या साध्वीनें केली न सतींच्या तिलहि हानि रीतीची ॥
सोडित होता स्वकरें दुःशासन दुष्ट हा निरी तीची ॥४७॥
माराया भीम, तुझा धरि संकोचासि न भुज,गरदानीं ॥
या त्वद्गुणांपुढें बहु मिरवावें तेज न भुजगं-रदानीं ॥ ४८ ॥
त्वां वारणावतीं जतु- सदनीं कोंडूनि जाळिले होते ॥
परि वांचले तशाहि व्यसनीं, दैवेंचि पाळिले हो ते ॥४९॥
ऐसे अपराध तुझे मेरुसम, न यां-समान वेनाचे ॥
बहुमत्त आपणाला, न गणुनि धिक्कार, मानवे नाचे ॥५०॥
या साधूंचा बहुमत बोध सदा सुरसभा-जना, आमां ॥
बाळाचा, हा धरवे न तुज, जसा सुरस भाजना आमां ५१॥
देतोसि, पाजितां हित- बोधामृत, जरि बळेंचि ओकारे॥
ओ कारेसि यमाच्या देसिल,शोकाग्नि याहि ओकां रे" ५२॥

---

१ घुबडाला. २ कितव द्यूत खेळणारा शकुनि. ३ सर्पाच्या दांतांनीं. ४ लाक्षागृहांत. ५ वेनराजाचे. ६ देवसभेंतील लोकांना. ७ स्तन. ८ उत्तम रस. ९ कच्च्या (भाजना.) १० बंदिशाळेला. ११ गृहाला.

तों दुःशासन बोले "राया व्यसनांत वांच धर्म करीं ॥
साम न करितां कौरव तुज बांधुनि ओपितील धर्मकरीं ॥
भीष्म द्रोण विदुर हे तुज मज कर्णासि बद्ध करितात ॥
हरितात प्राणांतें, झाला परं, परमहितहि जरि तात"॥५४
ऐसें म्हणतांचि उठे क्षिप्र निघे दुष्ट मंडळीसहित ॥
सत्सत्पतिपासुनिहि प्राप्त नव्हे दुष्टमंडळीस हित ॥ ५५ ॥
चित्तीं भीष्म म्हणे " रे गंतासि हरिं विलंघ्य करिप क्व"
देवासि म्हणे "प्रभुजी, न वळति ते,ज्यांसि काळ करि पक्व"
भीष्म-द्रोण-प्रमुखां वृद्धांसि प्रभु म्हणे "अहो परिसा ॥
चुकतां न्यायासि कसे? बांधावा दुष्ट हा तुम्हीं अरिसा॥५७॥
म्यां दुष्ट कंस वधिला वधितांहि नसेचि पाप मत्तातें ॥
अनुभविला सर्वेंही वंशें, केवळ न ताप मत्तातें ॥ ५८ ॥
देवासुरांत पूर्वीं ऐसाचि विरोध होय बहुधा त्या ॥
लोकलया चुकवाया लागे हृदयांत आधि बहु धात्यां॥५९॥
मग धर्माला सांगुनि बांधुनि दैतेय निरविले वरुणा ॥
ऐसी केली विधिनें लोकांवरि त्याखळांवरिहि करुणा ६०
दुर्योधन दुःशासन कर्ण शकुनि खळ तसेचि करकरुनी ॥
बांधुनि धर्म-करीं द्या लोक बुडवितील हे निकर करुनी ॥

१ परका. २ सज्जनांचा उत्तम नायक, त्या पासून. ३ रे करिप, हरिं विलंघ्य क्व गंतासि? गजश्रेष्ठा, सिंहाला उल्लंघून कोठें जाशील. ४ माझा पिता वसुदेव, यानें. ५ लोकनाशाला. ६ चिंता. ७ ब्रह्मदेवाला. ८ यमधर्माला. ९ दैत्य.

पुरुष कुळार्थ, ग्रामा- करितां कुळ, तोहिं जनपदाकरितां ॥
आत्मार्थ भू त्यजावी असि नीति, कळोनिं कां असें करितां
अजि धृतराष्ट्र, अजि महा-राज, न हा साधु, बांधवा यास॥
न करावा व्यर्थ तुम्हीं हित-सूचक, साधु-बांधवायास'' ६३॥
धृतराष्ट्र ह्मणे “ विदुरा, जा बाहुनि आण एथ गांधारी॥
सोडी कर कांतारीं, करुण कवि नव्हे, निजोनुगांधारी ६४॥
'जीजी' ह्मणोनि जावुनि घेउनि आला सभेंत भावजये ॥
पतिजवळि कळत्र नये कां हो? सिद्धाश्रमांत सावज्ञ ये ६५॥
स्त्रीस ह्मणे तो नृप “सति, तूं तरि दुर्योधनासि बोध करीं
देणार अंतकाच्या स्वासुंसह सकळ सहाय योध करीं'' ६६
देवी ह्मणे “ शिकवितां देवर्षि महायशाहि उपरमला ॥
उपरमला भीष्म विदुर कृष्णाहि, कथितां अशाहि उपर मला
ऐकेल काय गुरु-वच सुत आपण ऐकिलें कितिकसें जी ॥
पावेल सुयश सुसुख प्रसवुनि सुतशतहि हे दिति कसें जी
सांगेन यथामति, परि कोठें तो'' नृप ह्मणे 'वहा भ्रात्या'॥
आणी सभेंत वळवुनि विदुर पुन्हा वातसा महाभ्रा त्या ॥
गांधारी त्यासि म्हणे “वत्सा, बहु कष्टतो दुरभिमानी॥
कां त्यजिसि गुरूक्ति इला आत्माधिक बहुगुणें सुरभि मानी॥

---

१ ग्राम देखील. २ देशाकरितां. ३ हित सूचविणारा. ४ साधु व बान्धव यांचा आयास. ५ निज-अनुग-अन्ध-अरी ह्म० आपल्या आश्रयानें येणाऱ्या अन्धाचा शत्रु. ६ आपल्या प्राणांसकट. ७ थकला.

अन्यायकृष्णवर्त्मा न स्पर्शो कीर्तिकापुरा तनया ॥
ज्या लोभा भजसी तूं भजले नाहींत बा पुरातन या ॥७१॥
कामें कोपें लोभें नागविले अमित,यांस जे भुलले ॥
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरही उलले ॥ ७२ ॥
न उगाचि मूकसा तूं चित्तांत धरूनि दंभ दर्प रहा ॥
बा दुरभिमान न बरा देइल धनपतिकरींहि खर्पर हा ॥७३॥
अहित कथील तरि कसा गुरु? बाप कसा?तसीच आइ कसी
नाइकसी गुरु-वचन; क्षुद्र-वचन बहु जपोन आइकसी॥७४॥
सत्यप्रेमें स्वामी न ह्मणविती हे दयाभ्र मार्भाजी ॥
मी राजा ऐसें जें काय ह्मणसि खेद या ब्रमामाजी ॥ ७५ ॥
राज्यार्ध पांडवां दे, तूं घे राज्यार्ध, बहु तुला बा हें ॥
साम करीं, यश रुसलें मुरडुनि तुज पाहतें मुला बाहें७६॥
निष्कंटक राज्य करिसि हा महिमा सत्य पांडवांचा रे ॥
सत्सख्य करूनि यशें धवल करा सत्यपांड वांचा रे ॥७७॥
भीष्मद्रोणाद्यार्य प्राणातें सोडितील, न तयांतें ॥
सामर्थ्य असोनि अधिक बहु ते आहेत साधु नत यांतें॥७८॥
क्षुद्रशकुनि-दुःशासन- कर्ण, यश क्षुद्र-संग-रहितास॥
कोणा होइल केला भूत-बळें रुद्रसंगरें हितास ॥ ७९ ॥

१ अन्याय हाच अग्नि. २ पूर्वज. ३ कुबेराच्या हातांतही. ४ खापर. ५ दयेचे मेघ. ६ भीष्म. ७ ब्रह्माण्ड. ८ पाण्डवांना. ९ शंकराशीं युद्ध.

सर्व-सुहृत्तम कृष्ण प्रभु, याची कास धरुनि सर्व तरे ॥
तूं किति? तरले याच्या नामें बहु सागरांत पर्वत रे ॥८०॥
तुज पाण्डवजय दुर्घट, नारळ हरिजेल काय खर्वतरें ॥
कृष्णोक्तें सख्य करीं याचि उपायें अनिष्ट सर्व तरें"॥८१॥
ऐसें मातृवचनही लंघुनि गेला उठोनि पुनरपि तो ॥
जो भव्य पावणारा सद्गुरु-सद्वाक्-सुधेसि सुनर पितो॥८२॥
जाउनि सुयोधन ह्मणे "दुःशासन कर्ण शकुनि यांपाशीं॥
आह्मीं हितशत्रूंच्या कळत पडावें न ठकुनियां पाशीं ॥८३॥
जोंवरि आहों आह्मी स्वाधीन, न बद्ध जाहलों चवघे॥
कृष्णासचि बद्ध करूं, ह्मणजे मेलेचि शत्रु ते अवघे"॥८४॥
कर्णादि म्हणति, "बांधूं यदुपा, सदुपाय हा बरा सुचला ॥
शीघ्र उठा, लीलेनें पाण्डुसुतांतें करूं परासु चला"॥८५॥
तें इंगितज्ञ सात्यकि कृतवर्म्याला हळूच जाणवुनी ॥
प्रथम कुरुसभाद्वारीं सिद्ध करवुनि स्वसैन्य आणवुनी८६॥
जावुनि सभेंत आधीं श्रीकृष्णाला कुमन्त्र आयकवी ॥
राजसभेसि म्हणे मग भग- वदनुमतें सर्वसाधुराद्य कवी ॥
"अजि धृतराष्ट्र प्रभुजी, मी सात्यकि किमपि विनवितों परिसा
तुमच्या सुतें करावा बद्ध श्रीवासुदेव हा अरिसा? ॥ ८८ ॥
हा सांपडतो एका प्रेमा सुखं-कीर्तिच्या-घटक-बन्धा ॥

---

१ अति ठेंगण्या मनुष्यानें. २ सुख. ३ गतप्राण. ४ श्रीकृष्णाच्या अनुमतानें. ५ सुख व कीर्ति देणाऱ्या, अशा बन्धनाला (प्रेमाला.)

प्रेमरहिता सुदुर्जय भगवन्त, जसा महाभट कबन्धा ॥८९॥
हें काय हो विदुरजी, परमप्रेमास्पदांगजातातें ॥
द्यावें अनुमोदन निज- पर-गृह-दाहास जाणत्या तातें"॥९०
विदुर म्हणे "अद्यापि स्वस्थचि तूं, काय हें, अहा तात?॥
राया या यदुसिंहा त्वत्पुत्र धरावया पहातात ॥ ९१ ॥
हा यादवसिंह प्रभु धरितिल तव मत्तसुत मतंगज या ॥
वा दावपावकासीं समर करुनि पावतिल पतंग जया"९२॥
देव ह्मणे "देवा द्या आज्ञेसि,धरूत वीर हे मातें ॥
कीं मी धरीन यांतें, शोधिति दहनांत धीर हेमातें ॥ ९३ ॥
आतांचि धरुनि बांधुनि पाण्डवहस्तांत यासि ओपीन ॥
जरि धर्मकृत्य न घडे, भुज केले व्यर्थ काय हो पीनें ॥९४॥
हें साधुधर्मकृत्यहि राहो न तुम्हांपुढें, उचित मातें ॥
जें प्रागल्भ्य-प्रकटन वृद्धांत, नव्हे भलें शुचितमां तें ॥९५॥
निन्दित कर्म कसें हो करिन,कुलजवत्स मी,परी ज्या जी
उचित प्रतिक्रिया, मग दावीन, भवत्समीप राजाजी ॥९६॥
अन्याय मी करिना, कर्तव्य करो सुखें सुयोधन हो॥
व्यसु हो, परन्तु खोटा, सभ्यजनाच्या मुखें, सुयोध,न हो"९

१ महावीर. २ मस्तक रहिताला. ३ परम प्रेमाचें स्थान जो अंगजात, (पुत्र)त्याला. ४ हस्ती. ५ अरण्याग्नीशीं. ६ हे राजा. ७ अग्नींत. ८ स्वर्णाला. ९ पुष्ट. १० निर्दोष पुरुषांला. ११ शत्रूला. १२ निवारणोपाय. १३ आपल्याजवळ. १४ गतप्राण.

धृतराष्ट्र ह्मणे "विदुरा, मजपाशीं आण जाच पुनरपि त्या ॥
काय करूं? शूलाधिक दु:सहतर दु:खहेतु कुनर पित्या९८॥
ज्यासि न साधु सहावे जेंवि पहावे तुरंग न हल्याला[१] ॥
त्यासि कवि पुन्हां आणी जो आग्रह मित्रबन्धु-सह ल्याला

## अध्याय १० वा.

### सारांश.

धृत०—दुष्टा दुर्योधना, जो प्रभु प्रेमानें बद्ध होणार, त्याला तूं रज्जूंनीं बांधणार काय? तुला धिक्कार असो. विदुर—ज्या प्रभुला असंख्य दैत्यदानव धरूं नशकले,त्यास तूं धरशील काय! बेडकानें सर्प कधीं बद्ध केला आहे काय! श्रीकृष्ण—मूर्खा, दुर्योधना, तूं मला एकटा असें समजतोस काय? माझें शरीर तूं लक्ष्यपूर्वक पहा. असें ह्मणून श्रीकृष्णानें विश्वस्वरूप प्रकट केलें. त्या रूपांत ब्रह्मादिदेव, यादव,पाण्डव हे अंगुष्ठमात्र दिसले. तें रूप पाहून साधूंना सन्तोष, व दुष्टांना मोठा ताप, झाला. देवांनीं स्वर्गामध्यें वाद्यें वाजविलीं व श्रीकृष्णावर पुष्पवृष्टि केली. धृत०—प्रभो, मी जन्मान्ध आहें. क्षणभर मला दृष्टि दे. ह्मणजे तेणेंकरून तुझें रूप पाहून मी कृतार्थ होईन. श्रीकृष्णानें धृतराष्ट्रास दिव्यचक्षु देऊन त्यास आ-

---

१ रेड्याला.

पलें रूप दाखविलें. मग तें रूप आटपून त्यानें पूर्वरूप धरिलें. श्रीकृष्णाचें हें अद्भुत सामर्थ्य पाहूनही दुर्योधन वळला नाहीं. मग सर्वांस विचारून श्रीकृष्ण जावयास निघाला. तो कुन्तीला भेटला. कुन्तीनें धर्माला निरोप सांगीतला कीं, धर्मा, देवांनीं गाइलेलें तुझें यश पूर्वजांनीं स्वर्गांत ऐकावें. विदुलेचा पुत्र संजय ह्याचा सिंधुराजानें पराभव केला असतां; तो युद्धांतून पळून आपल्या आईकडे आला. त्याला ती ह्मणाली अरे, तूं क्षत्रिय असून युद्धांतून पळालास, त्यापेक्षां मेला असतास तर बरें झालें असतें. किंवा गर्भांतून गळतास तरी चांगलें झालें असतें.अरे दगडा,तूं जन्मास येऊन माझ्या यौवनाचा नाश केला. व आपलें संजय हें नांव बुडविलें. याप्रमाणें मातेनें निर्भर्त्सना केली असतां, संजयास आवेश येऊन तो मोठ्या वेगानें सिंधुराजावर चालून गेला. व त्यानें सिंधुराजाचा पराभव केला. धर्मा,ही गोष्ट तूं चांगली लक्षांत ठेव. भीमादिकांस ही याप्रमाणेंच क्षत्रियांस उचितकर्म करण्याविषयीं सांगितलें. श्रीकृष्ण मग कुन्तीस वंदन करून निघाला. निघतांना कर्णाला त्याचा पूर्व वृत्तान्त कळवून त्याला पाण्डवांकडे वळविण्याचा यत्न केला. कर्ण ह्मणाला, दुर्योधनाचा विश्वासघात मी करणार नाहीं. व आजपर्यंत केलेल्या प्रतिज्ञा मोडणार नाहीं. मला युद्धांत मरणच श्रेयस्कर आहे.आतां परलोकीं तुझी भेट व्हावी, एवढेंच मागणें आहे. असें ह्मणून कर्ण श्रीकृष्णास कडकडून भेटला. मग दोघेही स्वस्थानीं गेले.

धृतराष्ट्र सुतासि ह्मणे " रे कुरुकुळकीर्तिनाशका कुष्ठा[1] ॥
इच्छिसि कृष्णप्रभुला बद्ध करायासि काय रे दुष्टा ॥ १ ॥
प्रेमाचि एक यातें बांधुनि बहु कीर्ति दे यशोदेतें ॥
अभिमत साधुनि देतें सुकृत, कुकृत कीं अरे पशो देतें ॥ २ ॥
केवळ बाळचि इच्छी विधुसि धरायासि, कां बरा इच्छी? ॥
ह्मणते सभा तुज जसी पिक-रिपु[2] काकासि आंबराई छी ३ ॥
वाहसि शिरीं तयातें देतो जो गर्वभार ताप सदा ॥
सुखकर गुरुवरकर[3] भर दुर्धर तुज सर्वभारतापसदा[4]" ॥ ४ ॥
विदुर ह्मणे "द्विविद कपिहि नरकहि ज्यासि न धरावया शकला
त्यासि कसा धरिसिल? जें सकला जड तें घडे कसें शकला[5]
या धरिति न षष्टिमितें निर्मोचनवासि[6] दानवेयशतें[7] ॥
मी काय एकमुख? दश- शतवदनासहि[8] न वानवे यश तें[9] ॥
पाठविले यन्नामें अरिहि करुनि मुक्त पूत नाकाला[10] ॥
बद्ध कसें करिसिल या खलकेश्यघकंसपूतनाकाला[11] ॥ ७ ॥
बांधावया पहासी जरि या मधुकैटभांऽतकालाही[12] ॥
तरि बांधावा भेकें चक्षुर्हर्ण[13] जागरूक[14] काळाही[15] ॥ ८ ॥

---

१ कुष्ठरोग. २ कोकिळाचा शत्रु. ३ गुरूचावर हात कर (हस्त.) ४ भरतकुलांतील पुरुषांमध्यें नीचा. ५ तुकड्याला. ६ निर्मोचननामक क्षेत्रांत राहणारीं. ७ दैत्यशतें. ८ शेषालाही. ९ पापरहित. १० स्वर्गाला. ११ दुष्ट जे केशी अघ इ० दैत्य, त्यांचा काल जो श्रीकृष्ण, त्याला. १२ मधु व कैटभ यांचा अन्तक, श्रीकृष्ण; त्याला. १३ दृष्टीनेंच मारणारा. १४ जागा. १५ कालसर्प.

देव ह्मणे “ रे मंदा, एकाकी वासुदेव हा काय ॥
इच्छिसि बद्ध कराया तरि आधीं नीट तूं पहा काय[1]”९ ॥
ऐसें वदोनि उघडुनि दावी, निजविश्वरूपता पावे ॥
कीं पाहोनि निवावे साधु सकळ, दुष्ट भूप तापावे ॥ १० ॥
तेजोमय प्रकटले प्रभुच्या ब्रह्माण्डकोटिगेहांत[2] ॥
ब्रह्मादि देव यादव पाण्डव अंगुष्ठमात्र[3] देहांत ॥ ११ ॥
दे हर्ष विश्वरूप-प्रभुभास्कर[4] सुजननयननलिनांतें[5] ॥
बहु ताप दे स्वतेजें खळघूकांतें[6] स्वभावमलिनांतें[7] ॥ १२ ॥
भीष्म द्रोण विदुर कवि संजय निर्मल तपःपर महर्षी ॥
हे दिव्य दृष्टि देवुनि केले करुणाकरें परम हर्षी ॥ १३ ॥
देवांनीं वाजविलीं वाद्यें तेव्हां सुखें अवधिरहितें[8] ॥
होय मुहूर्त भरि भुवन बधिरचि सत्कविमुखें[9] अबधिरेंहि[10] तें
बहु पुष्पवृष्टि होय ब्रह्मांडींही न माय परिमळ तो ॥
या प्रभुयशें तुरावा तिळहि खळांचा, उरेचि परि मळ[11] तो॥
धृतराष्ट्र ह्मणे “प्रभुजी, संसारीं हीं कृतार्थ हो, पाहो ॥
या जन्मंधासि तुह्मी डोळसपण पळभरीच ओपा हो” १६
त्या वृद्धा[12] जात्यंधा राजाला विश्वरूप दावाया ॥

१ देह. २ अनंत कोटि ब्रह्मांडाचें गृह, त्यांत (देहांत.) ३ आंगठ्या एवढे. ४ विश्वरूपी ईश्वर हाच सूर्य. ५ सज्जनांचे नेत्र हींच कमळें त्यांस. ६ दुर्जनरूप घुबडांना. ७ स्वाभाविक पातक्यांना. ८ असंख्य. ९ सत्कवींच्या मुखानें. १० बधिर नसणारेंही. ११ पापवासना. १२ धृतराष्ट्र.

अद्भुत चातुर्याच्या निधिला विधिलाहि लाज लावाया १७॥
यत्प्राप्त्यर्थ श्रीमत्- दस्रशिरहि गुरुपदां सदा लवतें॥
रविचेंहि दृगघभंजन अंजन कंजनयनें दिलें लवं तें ॥ १८॥
अंधत्व अंधकूपचि; त्यांतुनि होवूनि दिव्यचक्षु निघे॥
प्रज्ञाचक्षु क्षणभरि बहु सुख तें विश्वरूप लक्षुनि घे,॥१९ ॥
"वृद्धा, अगस्त्य हो, हा मन्महिमामृतसमुद्र आटो, पी" ॥
ऐसें मनीं ह्मणोनि प्रभुवर तें विश्वरूप आटोपी ॥ २० ॥
न वळे गतायुजन तें उत्तमचि जसें सुवैद्य मानुनि घे ॥
सात्यकि कर धरुनि तसें तेथुनि यदुवंशपद्मभानु निघे २१
ज्ञानेंचि जना हो, न प्राप्त वयें केवळ स्थविरता, हो ॥
जरि बुद्धिवृद्ध असता, जैसा भेंडा जवस्थ, विरता हो॥२२
जाऊनि सभाद्वारा पावेतों प्रभुवरासि पावाया ॥
अंध म्हणे "प्रभुजी, हां स्पष्ट अनीश्वर, ह्मणोनि पावा या ॥
दुर्मति दुराग्रही सुत आटोपायासि अंध अक्षम हा ॥
जो जो यत्न करावा तो केला म्यां तुम्हांसमक्ष महा"२४
प्रभु मुरडोनि ह्मणे "हो, जन हो,जो परम अहितकर अरिसा

१ अश्विनीकुमारांचें मस्तक. २ दृग्-अघ-इं० ह्म० दृष्टिदोष-नाशक. (अंजन). ३ कमलनेत्र श्रीकृष्णानें. ४ लेशमात्र. ५ हे धृतराष्ट्रा. ६ माझा महिमा हाच अमृतसमुद्र. ७ संपलें आयुष्य ज्याचें, असा जन. ८मानुनि घे ह्म० मानितो. ९यदुकुल हेंच कमल, त्याचा सूर्य श्रीकृष्ण. १० वृद्धत्व. ११ ज्ञानवृद्ध. १२ धृतराष्ट्र. १३ असमर्थ,

त्या सुतशिक्षेविषयीं ह्मणती, आपण अनीश, हें परिसा२५
अजि बांह्लिक,अजि भीष्म, द्रोणविदुर,हें तुह्मांसि कळलें कीं
हे धृतराष्ट्र अनीश्वर, यांचें चाले न लेश बळ लेंकीं॥२६॥
आलां बहुदूर, रहा, येतों, धृतराष्ट्रजी, पुरें, परता ॥
कथितों धर्मासि असें कीं, यश दिधलें तुम्हीं भलें भरता"
बोलेल कृपणवचन स्वमुखें कां काय देव कीनाश ॥
कीं भक्तकीर्तिनाश न साहे, साहेल देवकीनाश ॥ २८ ॥
स्वरथीं चढोनि भगवान् मग जाय पुसावयासि आतेला ॥
तेंचि वदूं, कोण रसिक गोघृत सोडुनि करील आ तेला?२९
सांगे सुयोधनाचें मत संक्षेपें यदूद्वह सतीतें ॥
धर्मासि निरोप पुसे सुतमार्दव आठवूनि हसतीतें ॥ ३० ॥
कुंती ह्मणे "वद असें सा मत्तनयासि कमळनयना, कीं ॥
परिसोत पूर्वज तुझा प्रेमें सुरगीत अमळ नय नाकीं॥३१॥
वाटे सुभटें पुत्रें मेळविला विप्रसेवनीं नव टें ॥
वर्षोष्णसहजटिल नर, तरि काय बहुत तसे वनीं न वट॥
वर्णिति रिपूंत समरीं दाखवितां बाहुबळ जना भाटें ॥

१ भीष्माचा चुलता. २ दुर्बळा सारखें वचन. ३ यम. ४माता देवकी, इचा नाश. ५ यदुनायक. ६ धर्माचा मृदुपणा. ७ माझ्या पुत्राला. ८ हे श्रीकृष्णा. ९ नवीन. १०सुभट याचा सुभट्ट बनला असा भाव. सुभट—उत्तमवीर; सुभट्ट—उत्तम भटजीबुवा. ११ पर्जन्य व उष्ण सहन करणारे, व जटाधर.

ब्रह्मो नामीं दुसरा योग्य, क्षत्रा न, जलजनाभा रा॥ ३३ ॥
जें सिंधुराजविजित- स्वसुतातें बोलिली सती विदुला ॥
तें परिस "सांगत्यें तुज यदुकुळकमळाकराचिया विधुला ३४
विदुला ह्मणे "अहा रे क्लीवा मंदा कसा पळालास ॥
कां वांचलासि, अयश-स्कर ऐसा तूं न कां गळालास॥ ३५ ॥
अरि हरिल राज्य, मग तूं वरिशिल वृत्त्यर्थ काय माधुकरी
सुखकर सुकर्म टाकुनि असुखकर कुकर्म कोण साधु करी ॥
मद्यौवनें, संजय हें निजनामहि, बुडविलें तुवां दगडें॥
झगडें यशोर्थ, अरि-रथ- चक्रांहीं स्पष्ट लोष्टसा रगडें॥ ३७
जेणें लज्जित व्हावें स्वर्गीं सहपर्वजें तुजा तातें ॥
परमाऽनुचित पलायन कैसें केलें तुवां कुजातीं तें ॥ ३८ ॥
मरण विहित, न पलायन, भीती धर्मज्ञराजकन्या या ॥
अन्यां याहुनि अधिका घडल्याही न गणतीच अन्याया ३९
साधूंसि बाहुजांचीं मत विजय जसा, तसाचि वध मत, रे ॥

१ ब्राह्मणाला. २ जलज ( कमल ) नाभीच्या ठायीं ज्याच्या, अशा श्रीकृष्णा. ३ सिंधुराजानें जिंकिलेल्या आपल्या पुत्रास. ४ विदुलानामक स्त्री. ५ यदुकुलरूप कमलवनाच्या. ६ चंद्राला. ७ उपजीविके करितां. ८ सिद्धान्नभिक्षा. ९ माझें तारुण्य. १० उत्तम जय मिळविणारा. ११ ढेकळासारखा. १२ कु (कुत्सित) जात ( जन्म ) ज्याचें तो. १३ क्षत्रियधर्म जाणणाऱ्या राजकन्या. १४ धर्मज्ञ राजकन्यांहून इतर कन्या. १५ अधिका अन्याया. १६ क्षत्रियांचा.

निजधर्माश्रित न बुडे, निजधर्मच्युत कधीं न अधम तरे४०
अधमा तुवां मरावें क्षणहि न बुडवूनि मान वांचावें ॥
काळीं, यासम अन्यहि जे असतिल,त्यांहि मानवां चावें"४१
तो संजय तीस ह्मणे " पुत्राच्या इच्छितीस का मरणा ॥
वांछिति शमा अकाम- माझ, इतर इच्छिती सकाम रणा४२॥
रडसील सस्नुषां कीं मज जरि देइल परासुता समर ॥
न ह्मणेल स्वप्नींही शतपुत्रांही परा सुतास मर" ॥ ४३ ॥
"नी व्यर्थ उभयलोकां- ऽनुपयुक्त अपत्य वाढवी, ती तें॥
स्पष्ट करी वात्सल्यें, ज्ञाते जन ह्मणति 'गाढवी' तीतें॥४४
निजलासि काय? उठ रे, जय पावतसे सदा समरशील ॥
उत्साह टाकितां तूं दैन्यें सांऽगर्न सदास मरशील"॥४५॥
संजय ह्मणे "नमस्ते जननि, जन निशाकरें जसा निवतो॥
बोधें तसा निवालों न हितकर गुरूपदेशसा 'शिव तो'"४६
विदुलोक्त करी संजय जिंकुनि समरांत सिंधुराजाला ॥
सिंहीला तोचि उचित सुत, जो मारूनि सिंधुरा जाला४७॥
सांग स्वसख्यासि असें झाली त्वत्सूतिकीं गगनवाणी ॥
कीं "कुंति,हा अरि वधुनि पद साधिल,तुज सुखा मग न वाणी

---

१ स्वधर्मभ्रष्ट. २ हे मृत्यो. ३ स्नुषांसह. ४ मृत्यु. ५ जिला शतपुत्र आहेत, ती देखील. ६ इहपरलोकीं उपयोगीं न पडणारें. ७ दया. ८ स्त्रीसह. ९ तुला नमस्कार असो. १० चंद्रानें. ११ शंकर. १२ गजाला. १३ झाला. १४ तुझा सखा अर्जुन यास. १५ तुझ्या जन्मकाळीं. १६ अर्जुन १७ न्यूनता.

होतिल सकळ-खळ-वधीं हरिहर[1]मुख या बुधा[2] सुर सहाय ॥
चित्तीं ह्मणेल" याच्या कीर्तिरसें जितसुधा-सुरस हाय"४९॥
तें सत्य असो, तेंही जें युद्ध पुरांऽतकां[3]-महेशासीं,॥
मद्वीरसूत्वाहि, श्री- स्त्री-कीर्त्य[4]ऽपहारकाम हे शासीं[5]"॥ ५० ॥
भीमासि ह्मण "द्यूतीं नेलें जिंकूनि वित्त भीमा जें ॥
तें न स्मरे; न तुमच्या वनवासालाहि चित्त भी माजें ॥५१॥
सलतें मनांत दुष्टें वोढुन नेली सभेंत कृष्णा तें ॥
स्मरली, त्वांहि उपेक्षा करितां, हरितां निरीस,कृष्णातें५२॥
त्या स्मरणें मन पडलें तापीं बहु, जेंवि तळमळत डागें ॥
हृद्यें मोह उघडिला जैसा ग्रीष्मांत तळमळ[6] तडागें" ५३॥
दावावें यश जोडुनि कुळजानें सुप्रसन्न-वदन कुळा ॥
प्रथम पुसोनि कुशल मग जगदीशा तूं असेंचि वद नकुळा
अयशस्कर तोकें[7] पळहि मळवाया धाम वा[8] न रांगावें ॥
जरि न गमेचि, तरि सुखें चित्र-रचित-राम[9]-वानरां गात्रें५५
हें[10] क्षत्रियासि समुचित, ऐसाचि निरोप सांग सहदेवा ॥
जो पांचांत यशस्कर, तो माजा पुत्र मूर्त[11]मह देवा॥ ५६ ॥

---

१ विष्णुशंकरप्रमुख. २ ज्ञात्या अर्जुनाला. ३ त्रिपुरनाशक शंकराशीं. ४ राज्यलक्ष्मी, स्त्री. ( द्रौपदी ) आणि कीर्ति याचा अपहार करण्यास इच्छिणारे कौरव. ५ शासन कर. ६ तळचा मळ ( चिखल. ) ७ अपत्य. ८ ' बा ' या अर्थी ' वा ' समजावा. ९ चित्रांत काढिलेल्या अर्थात् पराक्रमव्यापारशून्य अशा रामाच्या वानरांला. १० पराक्रम दाखविणें. ११ मूर्तिमान उत्सव.

कृष्णेसि सांग कृष्णा तिळभरिहि तुजें उणें नसो शील ॥
त्वां साहिलें, असें पळ- मात्रहि सर्वंसहा[1] न सोशील ॥५७॥
सति तव सभाप्रवेशीं रामेंहि विलोकिलें परश्वश्रू[2] ॥
निर्लज्जा कठिना मी, मरतीच तदा भली परि श्वश्रू[3]॥ ५८ ॥
त्वां रक्षिलें, न झाले क्षम रक्षायासि मत्तनय नातें ॥
असते क्षम चरण-नखा स्पर्शों देते न मत्तनयनातें[4] ॥ ५९ ॥
जरि बुडविलीस माझ्या पुत्रांहीं व्यसन-गर्त-लीनाहीं[5] ॥
तन्हि न विटलीस, यापरि सत्त्वें[6] कोणीहि वर्तली नाहीं ६०॥
किंबहुना सांग तयां समयीं जें काय चांगलें कांहीं ॥
कृष्णा, मन्मत हें, कीं यश रक्षावें, न आंग, लेंकांहीं॥६१॥
बा गा ह्मण बाहूतें पुरवाया स्वजनकाम हा भागा ॥
मागायाचें तुज हें नाहीं ह्मणसील का महाभागा ॥ ६२ ॥
पाहों नको मजकडे वा निज-बिरुदावलीकडेचि पहा ॥
काय स्तनार्थि-शिशुच्या शब्द उचित सांत्वनीं पढे 'चिप'हा ॥
नमुनि निघे, किमपि प्रभु न वदे, त्यावरुनियां असें वाटे॥
कीं 'कृत्वा दर्शयते प्राज्ञ[7], असा भाव, कीं गळा दाटे ६४॥
वृद्धांसि पुसे, स्वरथीं कर्णाला सबहुमान वाहुनि घे॥

---

१ सर्व सहन करणारी पृथ्वी. २ परश्रु-अश्रु ह्म० परशूला आलेलें अश्रु (रोदन.) ३ सासू. ४ उन्मत्तांच्या नेत्रांला. ५ व्यसनरूप खळग्यांत पडलेल्या. ६ धैर्यगांभीर्यादि गुणांनीं. ७ सुज्ञ जन बोलत नाहीं. करून दाखवितो.

शक्र-प्रमुख-महाभुजं- भुजगाधिप-पूज्यमान-बाहु निघे ६५ ॥
प्रभुवर तेथुनि जातां, धरुनि मनीं फार कोप, देशाला ॥
भीष्म द्रोण पुन्हाही करिति खळा तारकोपदेशाला ॥६६ ॥
दुर्योधनासि न रुचे सांगति जें सदुपदेशपटु ते तें ॥
मधुररसीं उपदेशीं ज्वर खळ आणिति बळेंचि कटुतेतें ६७ ॥
घाली, होवुनि तिर्यक्- दृक् नत-मुख भोंवयांसि तो गांठी ॥
केवळ हितोक्ति कृत्या भासे त्या;काळदृष्टि ज्या गांठी॥६८॥
भीष्म ह्मणे "जो बहुमत ईश्वरसा सत्यलोकपाळाला ॥
त्या वत्सासीं विग्रह, हा! आलें काय हो कपाळाला" ॥ ६९॥
द्रोण ह्मणे "पुत्राऽधिक कीं पोषी नित्य शिष्टता पार्थ ॥
त्या वत्सासीं विग्रह? हा झालों काय शिष्ट तापार्थ"॥७० ॥
जो वळला पळ लाजुनि न श्रीदेवर्षिलीं न पितरांला ॥
वळला न ईश्वरांसहि तो दुष्ट वळेल काय इतरांला ॥ ७१ ॥
मंत्र करुनि कर्णातें देवूनि निरोप जाय अरिपाणी ॥
ज्यांचे पीतीं घट घट घटे घट घडि घडि घरींहि अरि पाणी

१ इंद्रप्रमुख महाबाहु व शेष यांनीं पूजिले जाणारे बाहु ज्याचे, तो. श्रीकृष्ण लोकत्रयांत पूज्य, असा भावार्थ. २ तारक उपदेशाला. ३ सदुपदेश करण्यांत कुशल. ४ कडूपणाला. ५ वक्र दृष्टि ज्याची, तो. ६ खालीं तोंड केलें ज्यानें तो. ७ राक्षसी क्रूर देवता. ८ ब्रह्मदेवाला. ९ धर्माशीं. १० युद्ध. ११ नारदाला. १२ चक्रपाणि श्रीकृष्ण. १३ ज्या श्रीकृष्णाचे वरीं. १४ घागर घागर.

तत्का॰ ॥मद होउनि जाय धरुनि कुशळकामना शरण॥
देउनि ॥य ह्मणति नर- नारायण"होतसे मद नरा ज्या॥
तो सर्व डे व्यसनीं होय मलिन या मळें वदन राजा ॥४४
जा स्व ॥ं स्वस्थ रहा सुदृढ धरुनि कास साधु-पदवीची॥
वद वींची प्राशावी द्युनदींची, कीं नृपा कुनद-वींची"४५॥
रुचि लागली तशासहि फार सदुपदिष्ट-साधु-रीतीची ॥
दुर्योधना, त्यजुनि अभि- मान पहा तूंहि माधुरी तीची४६
यापरि नर प्रतापी नारायण अधिक बहु नराहून ॥
तेचि धनंजय माधव नकळति साधूंत बहु न राहून"॥ ४७
कण्वहि ह्मणे "कुरुवरा, परिस तुला हींहि सांगतो कांहीं॥
कीं क्षाळावें भरिलें जें पंकें करुनि आंग तोकांहीं ॥ ४८ ॥
प्रख्यात शक्रसारथि- वर-मातलि-देह-संभवा,नावें ॥
गुणकेशी, रूप जिचें अमृत, न पररूप अंभ वानावें॥ ४९॥
तीस वर देव-मानुष- लोकांत न आढळे म्हणुनि सांधी ॥
मातलि नारद-यत्नें पाताळीं जेंवि निधि खणुनि साधी५०॥
आला मनास आर्यक- नागाचा पौत्र सुमुख जामाता ॥

---

१ लहरी. २ गंगेची. ३ सज्जनांनीं उपदेशिलेल्या चांगल्या रीतीची. ४ साधूंमध्यें बहुकाल राहिल्यावांचून. ५ कण्वही. ६ धुवावें. ७ चिखलानें. ८ मुलांनीं. ९ इंद्राच्या सारथ्यांमध्यें श्रेष्ठ जो मातलि, त्याच्या शरीरापासून जन्म जिचा, ती. १० इतर स्त्रियांचें रूप. ११ उदक. १२ पति. १३ संचित.

निजधर्माश्रित न बुडे, निजधर्मच्युत[1] कधीं न अधम तरे४०
अधमा तुवां मरावें क्षणहि न बुडवूनि मान वांचावें ॥
काळीं, यासम अन्यहि जे असतिल, त्यांहि मानवां चावें"४१
तो संजय तीस ह्मणे " पुत्राच्या इच्छितीस का मरणा[2]॥
वांछिति शमा अकाम- मान्न, इतर इच्छिती सकाम रणा४२॥
रडसील सस्नुषा[3] कीं मज जरि देइल परासुता[4] समर ॥
न ह्मणेल स्वप्नींही शतपुत्राही[5] परा सुतास मर" ॥ ४३ ॥
"जी व्यर्थ उभयलोंका- ऽनुपयुक्त[6] अपत्य वाढवी, ती तें॥
स्पष्ट करी वात्सल्यें, ज्ञाते जन ह्मणति 'गाढवी' तीतें॥४४
निजलासि काय? उठ रे, जय पावतसे सदा समरशील ॥
उत्साह टाकितां तूं दैन्यें सांऽगर्न सदास मरशील"॥४५ ॥
संजय ह्मणे "नमस्ते[9] जननि, जन निशाकरें[10] जसा निवतो ॥
बोधें तसा निवालों न हितकर गुरूपदेशसा शिव[11] तो"४६
विदुलोक्त करी संजय जिंकुनि समरांत सिंधुराजाला ॥
सिंहीला तोचि उचित सुत, जो मारूनि सिंधुरा[12] जाला[13]४७॥
सांग स्वसख्यासि[14] असें झाली त्वत्सूतिकीं[15] गगनवाणी ॥
कीं "कुंति, हा[16] अरि वधुनि पद साधिल, तुज सुखा मग न वाणी[17]

१ स्वधर्मभ्रष्ट. २ हे मृत्यो. ३ स्नुषांसह. ४ मृत्यु. ५ जिला शतपुत्र आहेत, ती देखील. ६ इहपरलोकीं उपयोगीं न पडणारें. ७ दया. ८ स्त्रीसह. ९ तुला नमस्कार असो. १० चंद्रानें. ११ शंकर. १२ गजाला. १३ झाला. १४ तुझा सखा अर्जुन यास. १५ तुझ्या जन्मकाळीं. १६ अर्जुन १७ न्यूनता.

होतिल सकळ-खळ-वधीं हरिहरमुख[1] या बुधा[2] सुर सहाय ॥
चित्तीं ह्मणेल " याच्या कीर्तिरसें जितसुधा-सुरस हाय "४९॥
तें, सत्य असो, तेंही जें युद्ध पुरांऽतकां[3]-महेशासीं,॥
मद्वीरसूत्वहि, श्री- स्त्री-कीर्त्यऽपहारकाम[4] हे शासीं[5]"॥ ५० ॥
भीमासि ह्मण "द्यूतीं नेलें जिंकूनि वित्त भीमा जें ॥
तें न स्मरे; न तुमच्या वनवासालाहि चित्त भी माजें ॥५१॥
सलतें मनांत दुष्टें वोढुन नेली सभेंत कृष्णा तें ॥
स्मरली, त्वांहि उपेक्षा करितां, हरितां निरीस, कृष्णातें ५२ ॥
त्या स्मरणें मन पडलें तापीं बहु, जेंवि तळमळत डागें ॥
हृदयें मोह उघडिला जैसा ग्रीष्मांत तळमळ[6] तडागें " ५३॥
दावावें यश जोडुनि कुळजानें सुप्रसन्न-वदन कुळा ॥
प्रथम पुसोनि कुशल मग जगदीशा तूं असेंचि वद नकुळा
अयशस्कर तोकें[7] पळहि मळवाया धाम वा[8] न रांगावें ॥
जरि न गमेचि, तरि सुखें चित्र-रचित-रामं[9]-वानरां गावें ५५
हें[10] क्षत्रियासि समुचित, ऐसाचि निरोप सांग सहदेवा ॥
जो पांचांत यशस्कर, तो माजा पुत्र मूर्तमह[11] देवा ॥ ५६ ॥

---

१ विष्णुशंकरप्रमुख. २ ज्ञात्या अर्जुनाला. ३ त्रिपुरनाशक शंकराशीं. ४ राज्यलक्ष्मी, स्त्री. ( द्रौपदी ) आणि कीर्ति याचा अपहार करण्यास इच्छिणारे कौरव. ५ शासन कर. ६ तळचा मळ ( चिखल. ) ७ अपत्य. ८ ' वा ' या अर्थी ' वा ' समजावा. ९ चित्रांत काढिलेल्या अर्थात् पराक्रमव्यापारशून्य अशा रामाच्या वानरांला. १० पराक्रम दाखविणें. ११ मूर्तिमान उत्सव.

शक्र-प्रमुख-महाभुजं[1]- भुजगाधिप-पूज्यमान-बाहु निघे ६५ ॥
प्रभुवर तेथुनि जातां, धरुनि मनीं फार कोप, देशाला ॥
भीष्म द्रोण पुन्हाही करिति खळा तत्करकोपदेशाला[2] ॥ ६६ ॥
दुर्योधनासि न रुचे सांगति जें सदुपदेशपटु[3] ते तें ॥
मधुररसीं उपदेशीं ज्वर खळ आणिति बळेंचि कटु[4]तेतें ६७ ॥
घाली, होवुनि तिर्यक्[5]- दृक् नत[6]-मुख भोंवयांसि तो गांठी ॥
केवळ हितोक्ति कृत्या[7] भासे त्या; काळदृष्टि ज्या गांठी ॥ ६८ ॥
भीष्म ह्मणे "जो बहुमत ईश्वरसा सत्यलोकपाळाला ॥
त्या वत्सासीं विग्रहं[10], हा! आलें काय हो कपाळाला" ॥ ६९ ॥
द्रोण ह्मणे "पुत्राऽधिक कीं पोषी नित्य शिष्टता पार्थ ॥
त्या वत्सासीं विग्रह? हा झालों काय शिष्ट तापार्थ" ॥ ७० ॥
जो वळला पळ लाजुनि न श्रीदेवर्षिलाँ[11] न पितरांला ॥
वळला न ईश्वरांसहि तो दुष्ट वळेल काय इतरांला ॥ ७१ ॥
मंत्र करुनि कर्णातें देवूनि निरोप जाय अरिपाणी[12] ॥
ज्यांचे[13] पीती घट घट घटं[14] घट घडि घडि घरींहि अरि पाणी

---

१ इंद्रप्रमुख महाबाहु व शेष यांनीं पूजिले जाणारे बाहु ज्याचे, तो. श्रीकृष्ण लोकत्रयांत पूज्य, असा भावार्थ. २ तारक उपदेशाला. ३ सदुपदेश करण्यांत कुशल. ४ कडूपणाला. ५ वक्र दृष्टि ज्याची, तो. ६ खालीं तोंड केलें ज्यानें तो. ७ राक्षसी क्रूर देवता. ८ ब्रह्मदेवाला. ९ धर्माशीं. १० युद्ध. ११ नारदाला. १२ चक्रपाणि श्रीकृष्ण. १३ ज्या श्रीकृष्णाचे वरीं. १४ घागर घागर.

अंध म्हणे "रे संजय जो या दुर्बुद्धिवायसां गमला ॥
प्रभुहंस अहित, तेणें केला तो मंत्र काय सांग मला॥७३॥
श्रीकृष्ण ह्मणे "कर्णा, तूं कुंतीचा कुमार कानीन ॥
त्वद्वदनोत्थ न पडला अर्थिजनाच्या कधींहि कानीं ना॥७४॥
ऐसा वदान्य विद्वान् विश्रुत तूं शुद्ध-विप्र-जन-दास ॥
चाल, भजोत भ्राते तुज, चातक भजति जेंवि वनदास७५ ॥
देईल अजातारी मद्वचनें आजि राज्य अभ्रांत्या ॥
भ्रात्या न वळेल कसा वळवीलचि धर्म-वायु अभ्रा त्या ७६
सानुज-सुत धर्म तुला नमिल, सयादव करीन मी नमन॥
सच्चित्त गुर्वनादर तोयानादर करी न मीनमन ॥ ७७ ॥
राज्याभिषेक करितिल तुज मजसह विप्र, भूमिप दरानें॥
किंबहुना घेइल तव तांबूल क्षिप्र भूमि पदरानें ॥ ७८ ॥
चाल कसा, हो राजा मातेच्या मानसासि दे सुख गा॥
यांचा तुज काकांचा सहवास,जसा सितच्छदा सुखगीं"७९

---

१ दुष्ट बुद्धीचे जे दुर्योधनादि, ( कावळे ) यांस. २ श्रीकृष्ण हाच हंस. ३ शत्रु. ४ कन्यकाजात ( कुमारीदशेंत झालेला ) ५ तुझ्या मुखांतून निघालेला. ६ दाता-उदार. ७ प्रख्यात, ८ मेघाला. ९ धर्मराज. १० भ्राता नव्हे अशाला देखील. ११ स्वधर्म-रूप वायु. १२ भ्राते व पुत्र यांसह. १३ यादवसहित. १४ सज्जनाचें चित्त. १५ श्रेष्ठ जनाचा अपमान. १६ माशाचें मन. १७ राजे. १८ भयानें. १९ शुभ्रवर्ण पंख ज्याचे त्या. २० हंस पक्ष्याला.

कर्ण ह्मणे "वा देवा, वदसि स्नेहेंचि बा दयाळो हें ॥
भट-कर-गें जोडावी स्पर्शमणीची कसी दया लोहें ॥ ८० ॥
मातृत्यक्ता मजला राधाहस्तीं दिलें अधिरथानें ॥
मज पाजाया प्रेमें पय, पळ धरिती तिचीं न धिर थानें ८१
निष्फळ कसें करूं गा बा परिहृत-सर्व-नत-नराधे तें ॥
मेल्यावांचुन द्यावें जोडुनि सुतशोकवतन राधेतें॥ ८२ ॥
दुर्योधन नांवाचा, राजा मी, सर्वराज्यभोग मला ॥
मूर्त नरक, नरकविच्या हृदयाला, जो कृतघ्न, तो गमला ८३
संस्कार विवाहाऽवधि केले माझे यथोक्त सूतानें ॥
निर्मळपणें निघावें रक्तपटांतूनि केविं सूतानें ॥ ८४ ॥
समरमखचि होवूंद्या क्षत्रिय सेवूत तल्पं न गदांनीं ॥
पुण्यरणमरणदानीं वीरां जें, तें न कल्पनगदानीं॥८५ ॥
पतितासि सांवरी मृदु शुचि हा उपदेश केशवा? तूळ ॥

१ वीरहस्तांतील लोहें ( शस्त्रानें. ) २ परिसाची. ३ मातेनें त्यजिलेल्या. ४ निवारिली, सर्व नम्रजनांची चिंता ज्यानें, अशा श्रीकृष्णा. ५ पुत्रशोकाची वतनदारी. ६ मनुष्यश्रेष्ठाच्या. ७ विवाहापर्यंत. ८ शुभ्रपणानें. ९ तांबड्या वस्त्रांतून. १० रणयज्ञ. ११ शय्या. १२ रोगांनीं. १३ शुद्ध रणांत जें मरणदान, त्यांत. १४ कल्पवृक्षाच्या दानांत. १५ अन्वय–केशवा, तुझा मृदु शुचि उपदेश पतितासि सांवरी? जैसा अंबार्पित वातूळ पदार्थलेश अति रुग्णासि, तैसा हा पतितासि होय. तूळ ( तुलना कर. )

जैसा अंबाऽर्पित अति- रुग्णासि पदार्थ-लेश वातूळ॥८६॥
श्रीकृष्णजी, करावा कैसा विश्वासघात अवसानीं॥
युद्ध कसें न करावें, आह्मां हा युद्धलाभ नवसानीं॥८७॥
तरि मग उरलें काय? प्रभुजी, त्यजिल्या जरि प्रतिज्ञा त्या।
नच सोडवेल देवुनि धीर भरंवसा अरिप्रतिं ज्ञात्या॥८८॥
राज्य न करील, देइल धर्म मला, उमजतांचि हें नातें॥
देइन सुयोधना मी, तेव्हां होइल तुम्हांसि हें ना तें॥८९॥
आटोपिला न पहिला तो आटोपेल काय गा ऊत॥
जोडा यश, कवि होउनि रोमांचव्याप्तकाय गाऊत॥९०॥
धारातीर्थींच मिळे सद्गति सत्कीर्ति शुद्धि अधमातें॥
राज्यपदभोग नलगे द्यावा देवा रणांत वध मातें॥ ९१॥
आज समजलें प्रभो हें त्वद्दृष्टिपुढें उरेल न क्षत्र॥
रवि काळरुद्रदृष्टिसि न पुरे, तेथें पुरेल नक्षत्र?॥ ९२॥
तूं स्वाश्रितप्रतिज्ञा करिसिल, न धरूनि शस्त्र, सत्या गा
उरतिल कैसे कारिते झाले जे हरुनि वस्त्र सत्यागा"॥ ९३॥
देव म्हणे "राज्य नको, उपदेश अयोग्य काय हे महिम्या

१ शेवटीं. २ वचन देऊन शत्रूलाही सोडितां येणार नाहीं. मग मित्राला कसें सोडितां येईल.? ३ दुर्योधनाविषयीं प्रेमाचा ओव. ४ रोमांचांनीं व्याप्त झालें शरीर ज्यांचें, ते. ५ शस्त्रधारा हेंच तीर्थ. ६ क्षत्रियसमूह. ७ कालरूपी [ प्रलयकर्ता ] जो शंकर, त्याच्या दृष्टीला. ८ सती ( द्रौपदी ) हिचा आग[ अपराध. ] ९ हे ( मी केलेले ) उपदेश तुमच्या महिम्या ( तुमची कीर्ति होण्यास ) अयोग्य काय?

क्लीबाला कन्यासी तुज कां द्यावी बळेंचि, हे महि, म्या९४
जेथें भीम धनंजय, बहु-दुःसह वासवा रणाजिरं तें॥
हरिलंघनें, असतांही बळि-गजसहवास, वारणा जिरतें?९५
धनदानें अनघाच्या तुमचा तैसाचि काम रणदानें ॥
म्यां पुरविजेल, द्यावीं स्वरगें इतरें, न का मरणदानें॥९६॥
जा,, सर्व सिद्ध व्हा, जरि आहे उद्युक्त मानस मराया ॥
सम रायास तुह्मांसहि भीमाऽर्जुन वरद, शीघ्र समरा या९७
देईल कुरुक्षेत्रीं धर्म प्रभुवर तुह्मां निधनें-दानें ॥
धनदानें जसिं येणें न दिलीं उदकें तथाविध नदानें''॥९८॥
कर्ण ह्मणे "बा बचना मान्य न झालों ह्मणों नको,पावें॥
वध्यें वधाचि ह्मणतां प्रभुनें आग्रह ह्मणोन कोपावें?॥ ९९ ॥
सत्य उपदेश आह्मीं वरिचेवरि भव्यहेतु झेलावे ॥
जाणोनि सर्व देवा, लाविसि कां बोल? हे तुझे लावे १००
स्वप्नांत पाहिले नृप शांतनव द्रोण हाहि दाता हे॥
धेऊनि उष्ट्र-यानीं बैसुनि दक्षिणदिशेसि जाताहे ॥ १०१ ॥
रक्तोष्णीषधरें सकल सुश्वेतोष्णीषधर तिघे मात्र ॥
कृप कृतवर्मा अश्व-त्थामा मलय-ज-रजो-धवलगात्र ॥१०२॥

---

१ रणांगण. २ सिंहाची अमर्यादा. ३ पुण्यवानाचा. ४ कल्प-वृक्षानें. स्वरगें, इतरें ( दानें ) द्यावीं. मरणदानें कां न द्यावीं. ? ५ मृत्यु. ६ तशीं. ७ वधास योग्य मनुष्यानें. ८ कल्याणहेतु. ९ खेळ. १० उंटावर. ११ तांबडीं पागोटीं धरणारे. १२ चंदनरजानें शुभ्र शरीर ज्यांचें, ते.

शुभ्र-सहस्र[1]-स्तंभ- प्रासादीं धरुनि शुभ्र माल्याला[2]॥
चढला धर्म श्वेतो- ष्णीषा दत्तोडुपभ्रमा[3] त्याला ॥१०३॥
सहदेव नकुळ सात्यकि भीमाऽर्जुन धर्म तूंहि बापा हे ॥
सप्त तुह्मी श्वेत-गजीं; ऐसें स्वप्नांत कर्ण हा पाहे"॥१०४
"श्रीकृष्ण ह्मणे" बहुधा मरणारचि हे समस्त सुपदेश[4] ॥
कीं तव हृदयें याझा हितहि स्वीकारिला न उपदेश"१०५॥
कर्ण ह्मणे "भेटि असो परलोकीं मात्र वा दयाळो, कीं ॥
कलहीं[5] स्नेह,न राहे हे दुर्लभ ह्मणुनि पाद या लोकीं"॥१०६
ऐसें ह्मणोनि कर्ण प्रभुला कडकडुनि भेटला सुचिर ॥
मुग्धासहि[6] जडित कनक[7]- मरकत नग[8] न गमला तसा रुचिर[9]
झाला मंत्र[10] असा; मग आला नगरांत कर्ण परतोन॥
पर तो न प्रभु कोपे; वरि पुरता, पूर्ण आंत, पर तो न॥१०८

---

१ शुभ्रवर्ण, सहस्र स्तंभ ज्याला, तो. २ माळेला. ३ दिला चंद्रभ्रम ज्यानें, त्या. ४ सु-पद-ईश ह्म० राजे. ५कौरवपाण्डवां-च्या तंट्यामुळें स्नेह नाहींसा झाला ह्मणून हे तुझे पाद या लोकीं दुर्लभ झाले. ६ मूढालाही. ७ सुवर्ण व पाच यांचा. ८ अलंकार. ९ सुन्दर. १० गुप्तविचार.

# अध्याय ११ वा.

## सारांश.

(१—१२३) विदुर—हे कुन्ती, सर्व अनर्थांस कारण, परम दुष्ट, काय ते दोन असामी. एक धृतराष्ट्र व दुसरा कर्ण. कुन्ती—कर्ण हा माझाच पुत्र. तो माझ्याच चुकीनें राधेच्या पदरीं पडला. त्यास हें नातें कळवून मी आपणाकडे वळवीन विदुराच्या अनुमतानें कुन्ती कर्णाकडे गेली. तिनें त्यास पूर्ववृत्तान्त कळविला. व ह्मणाली; कर्णा, तूं सूत व दुर्योधन यांचा पक्ष सोड. आणि पाण्डवांकडे येऊन राजपद भोग. आपल्या बन्धूंचें रक्षण कर. तेव्हां सूर्यापासून वाणी निघाली कीं, कर्णा, कुन्तीचें वचन खरें आहे. तूं याचा स्वीकार कर. कर्ण—हे कुन्ती, तूं माझी माता असून तुला माझा घात पुरवला. धर्मादिकांचा घात पुरवला नाहीं. बरें असो. मी ज्या प्रतिज्ञा केल्या, त्या आतां मला मोडितां येत नाहींत. मी अर्जुनास मात्र युद्धांत मारीन, बाकीच्यांस मारणार नाहीं. तूं कांहीं चिंता करूं नको. तुझे सार्जुन किंवा सकर्ण पांच पुत्र उरतील. तें ऐकून त्यास आशीर्वाद देऊन कुन्ती निघून गेली.

शिष्टाई करून आल्यावर श्रीकृष्ण धर्माकडे आला. तो

ह्मणतो—मी, कण्व, नारद, भीष्म, द्रोण, विदुर, धृतराष्ट्र, या सर्वांनीं दुर्योधनास पुष्कळ समजावून सांगितलें. पण तें सर्व व्यर्थ झालें. कर्णासही वळविण्याचा यत्न केला. तोही फुकट गेला. दुर्योधन सेना घेऊन युद्धार्थ कुरुक्षेत्रीं गेला. तें ऐकून धर्मानें धृष्टद्युम्न इ०, सात अक्षौहिणी सैन्याचे सात सेनापति केले. दुर्योधनानेंही द्रोणादि अकरा सेनापति केले. दुर्योधन—भीष्मा, तुह्मी सर्व सैन्याचे सेनानायक व्हा. तुमच्या सामर्थ्यानें मी शत्रूंना जिंकीन. भीष्म—दुर्योधना, पाण्डवांचा नाश माझ्या हातून होणार नाहीं. तुझ्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं मी दररोज दशसहस्त्र महावीर मारीन. इकडे धर्मानेंही अर्जुनास सर्व सेनेचें आधिपत्य दिलें. रुक्मिणीचा बन्धु रुक्मि, एक अक्षौहिणी सैन्य घेऊन पाण्डवांकडे साह्यास आला. तो श्रीकृष्णासमक्ष अर्जुनास मोठ्या गर्वानें ह्मणाला, तुह्मी असे भ्यालां कां? मी एका क्षणांत कौरवांचा निःपात करितों. तुह्मी कांहीं चिंता करूं नका. अर्जुन—आजपर्यंत जे मी पराक्रम केले, त्यांत मला कोणीं सहाय केलें? हरिहरगुरुकृपेनें मला कोणाच्या साह्याची गरज नाहीं. तूं निघून स्वनगरास जा. किंवा वाटेल तिकडे जा. तें ऐकून रुक्मि दुर्योधनाकडे गेला.

विदुर ह्मणे बाइ पृथे यासम विभ्रांत हे महाखळ गे ॥
गुरु अंध अंधरूपचि याचे दुर्योधनादि सुत खळ गे ॥१॥

वरकड उगेचि, सर्वा ऽनर्थांचा एक अंध हा निकर॥
कीं राधासुत, दोघे हे कुरुकुळकुशळकीर्तिहानिकर" ॥ २ ॥
कुंती त्यासि ह्मणे "हो भावोजी शिशुपणीं असें घडलें ॥
मत्पुत्ररत्न पदरीं राधेच्या मद्दुरीहितें पडलें ॥ ३॥
जावूं दिलें परकरीं निजशस्त्र तसें अपत्य हा हा! तें॥
बा निजघात अधैर्यें म्यां केला आपुल्याचि हा हातें ॥ ४ ॥
येइल मनासि तुमच्या तरि हें नातें तयासि कळवीन ॥
पळवीन भ्रम, चित्त स्नेहगुणें आकळूनि वळवीन ॥ ५ ॥
विदुरानुमतें कुंती गंगातीरीं सुताकडे गेली ॥
नकळत तदुत्तरीय- च्छायेंत उगीच ती सती ठेली ॥ ६ ॥
कर्णाचा नियम असा ब्रह्मजप करीत निश्चळ रहावें ॥
तापेल पृष्ठ तोंवरि रविचें मंडळ निरंतर पहावें ॥ ७ ॥
नियमांऽतीं कुंतीतें पाहूनि ह्मणे धरूनि राग मनीं ॥
राधेय आधिरथि मी तुज नमितों काय कार्य आगमनीं" ८।
कुंती कर्णासि ह्मणे "वत्सा, कौंतेय तूं; न राधेय॥
'राधे' यथेष्ट ह्मण, परि कर्णा, कर्णासि फार बाधे य ॥ ९।
हे मात्र न ऐकवती; सुखद मला मनुदुमिलितें राधेय॥

---

१ समूह. २ मद्-दुर-ईहित ह्म० माझ्या दुष्ट कर्मानें. ३ कर्णाच्या अंगावरील वस्त्राच्या छायेंत. ४ वेदमन्त्राचा. ५ अधिरथाचा पुत्र. ६ म-नु-दु— ह्या अक्षरांनीं युक्त, अनुक्रमें रा—धे—य— ही अक्षरें ह्म० राम-धेनु-यदु.

कानीन पुत्र माझा, कर्णा, कौंतेय तूं, न राधेय ॥ १० ॥
रविचा औरस, पाण्डु- क्षेत्रज तूं, पाळिलें अधिरथानें ॥
स्रवती पय न, न परिसति, जाणों तीं जाहलीं बधिर थानें
मुग्धत्वें त्यजुनि तुला चुकल्यें, आतां स्वबंधु रक्षावे ॥
साधो, धर्मज्ञें त्वां अनुज स्वतनुजसमान लक्षावे ॥ १२ ॥
ज्येष्ठ श्रेष्ठ प्रेष्ठ प्रभु तूं, देतिल तुला पद भ्राते ॥
'जी जी' ह्मणतिल "चरणीं वाहतिल धना यशा अदभ्रां ते
स्सावें शैळीचें कीं रसिकें धेनुचें रसवरांज्य ॥
त्वां सर्व अनुभवावें भ्रात्यांसह हें यशःप्रसव राज्य ॥ १४ ॥
सोडुनि सूतसुयोधन- पक्षांतें झडझडोनि बा निघ रे ॥
विघरो दायादांचें वळ मन, ढेंकुळ जसें जळीं विघरे ॥ १५ ॥
रे आत्मासा, पंच- प्राण तसे बंधु, सत्य बापा हें ॥
ांदा एकत्र, नको द्वेष, करूं मजकडेचि बा पाहें ॥ १६ ॥
ा कर्णा, तूं, अर्जुन; राम-जनार्दनसमान साजाल ॥
ंस तसे साधूंच्या सोडूनि तुह्मी न मानसा जाल ॥ १७ ॥

---

१ कुमारी असतांना झालेला. २ स्वस्त्रीचे ठायीं गोत्रजापासून किंवा अन्यापासून पत्याज्ञेनें झालेला पुत्र. ३ पुत्राला पाहून किंवा त्याचे शब्द ऐकून स्नेहानें मातेच्या स्तनांतून दुग्धधारा वाहाव्या; त्या वाहत नसल्यामुळें कुन्तीनें आपल्या स्तनांवर 'स्तन बधिर झाले, ऐकत नाहींत' अशी उत्प्रेक्षा केली आहे. ४ आपल्या ुत्रांसारखे. ५ अत्यन्त प्रिय. ६ बहुत. ७ सर्व रसांत श्रेष्ठ असें प. ८ यशाचा प्रसव ज्यापासून तें. ९ मानस सरोवराला, पक्षीं, ाला.

॥ श्री ॥

श्रीमयूरकविकृत

भारतांतर्गत

# उद्योगपर्व.

बाबाजी अनंत तेंडुलकर,
यांनीं आपल्या
श्रीहरिवरदा छापखान्यांत छापिलें.

मुंबई.

१८९१.

जेंवि महाऽध्वरवेदी- माजि ससुरे सत्यनायक विराजे ॥
तेंवि विराजें स्वपदीं भ्रात्यांसह, वर्णितील कवि राजे"॥१८
कुंतीवचोवसानीं सूर्यापासुनि असी दिवे वाणी ॥
सत्य पृथोक्ति; गुरुवचन- निरता सुखकीर्तिची नसे वाणी"
कर्ण ह्मणे "सन्माता तोकीं सुख व्हावया असु खरचिती!॥
किंवा नेत्रें झांकुनि, व्हाया सुख आपणा,असुख रचिती?२०
माझा घात पुरवला तुज,त्यांचा मात्र घात पुरवेना ॥
काय असें अघ? विटलें कां त्वन्मन मज? जसें स्वपुर वेना?
न ह्मणेल काय माता व्हावा लोकांत आत्मज न नीच ॥
रक्षील, धर्म रक्षुनि, जी ती भर्लतीहि आत्मजननीच ॥ २२
अरिहि न करिल,असें त्वां केलें;कां नख न लाविलें जननी?
जन नीच मज न ह्मणते, परि काय करील नियंविला जन्मीं?
कृष्णें जसी यशोदा त्यजिली, तसि न त्यजीन राधा मी॥
ती यातना न नरकीं होय, कृतघ्नास जी नरा धामीं॥२४॥
वसु जेंवि वासवाच्या, माझ्या साऽनुज सुयोधन, मनातें।
रंजवितो; मज करिती सवें तदाश्रित-सुयोध नमनातें ॥२५।
अर्जुनवधप्रतिज्ञा केली, ती कसि दहांत सोडावी?॥

---

१ महाध्वर—महायज्ञ;वेदि—यज्ञाकरितां डमरूच्या आकाराची जी भूमि तयार करितात ती. २ देवांसह. ३ ब्रह्मदेव. ४ शोभमान हो. ५ कुन्तीवचनाच्या शेवटीं. ६ गुरूचें वचन पाळणाऱ्याला. ७ वेन राजाला. ८ दुसरी एखादी. ९ जन्मकाळीं. १० दैवाला. ११ अष्ट वसु. १२ दुर्योधनाचे आश्रित सर्व महावीर.

तोडावी कुरुपतिची मीति कंसी म्यां? अकीर्ति जोडावी?२६
ह्मणतील प्रकट सकल लोक मज त्वन्मतांऽनुगा[1]'भ्याला'॥
यावें कर्पूराच्या काय मषीगर्भसाम्य[2] गाभ्याला ॥ २७ ॥
मारीन अर्जुनासचि समरीं, धर्मादिकां न चवघां मी ॥
करिच्या मर्दीं अलिस जी बहु, तीहि मिळेल काय चव घामीं?
ह्मणतों मीच, नतजनन[3]- मरण हरी, परम सुख करी, नवध[4]
यद्भक्ति[5], तत्सख्याच्या प्रभु कवण ह्मणेल मी करीन वधा?
जा, भागलीस, कल्प- द्रुमसंश्रितकाम[6] कां न पुरतील? ॥
स्वस्थ रहा, पांच तुझे सुत, साऽर्जुन कीं सकर्ण उरतील"
कुंती ह्मणे "अभयवर आत्मा, आह्मी जडें असों देहें।
बहु तुजपुढें न वदवे, यश जोडीं, स्मरण बा असोंदे हें" ३१॥
आलिंगुनि कर्णातें भिजवुनियां अश्रुनीं पृथा परते ॥
चित्तीं ह्मणे "सखे जे, होती फिरतांचि विधि[7] वृथा पर[8] ते
सुज्ञ ह्मणति कोपावा विधि, परि ज्यांचे[9] न पाय कोपावे ॥
धर्माप्रति वात्सल्य[10]- स्वीकृतदूतत्व देव तो पावे ॥ ३३ ॥
भेटुनि अजातरिपुला, संक्षेपें वृत्त कथुनि आधीं, तें ॥
रात्रौ सविस्तर कथी त्याच्या नाशावयासि आधींतें ॥ ३४ ॥

---

१ तुझ्या मताला अनुसरलेल्या (मज.) २ शाईच्या उदराचें सादृश्य. ३ शरणागताचें जन्ममरण. ४ नऊ प्रकारची. ५ ज्या श्रीकृष्णाची भक्ति. ६ कल्पद्रुम (श्रीकृष्ण), त्याच्या आश्रिताचे मनोरथ. ७ दैव. ८ शत्रु. ९ ज्या देवाचे (श्रीकृष्णाचे.) १० स्नेहें करून स्वीकारिलें दूतत्व ज्यानें, तो.

कृष्ण ह्मणे "खळ न वळे कथिला धर्मार्थलाभ सुगमहि म्या
श्रमले नारद कण्वहि बोधुनि त्या मूर्तपापयुगमहिम्या ३५
भीष्में स्वकथा कथिली सत्यवतीप्राप्तकाम जाणूनी ॥
होऊनि ऊर्ध्वरेता शीघ्र दिली ती पित्यासि आणूनी॥३६॥
दिधलें विचित्रवीर्या सत्यवतीच्या सुता पद भ्रात्या ॥
त्याचे विवाह तन्मृति ऐशा कथिल्या कथा अदभ्रा त्या ॥
प्राणांसहि त्यजिति, परि न त्यजिति क्षणहि जीप्रति ज्ञाते
कथिली, मातेच्याही वचनें त्यजिली न जी प्रतिज्ञा, ते ३८॥
जन्म व्यासापासुनि कथिलें धृतराष्ट्र-पाण्डु-विदुरांचें ॥
सर्वाऽसुखदाऽराजक- पीडित-लोकाधिशैलभिदुरांचें ॥३९॥
क्षितिनें अंध त्यजिला, वरिला जो पाण्डु उचित राज्याला
चाखील तैल रसना काय, त्यागूनि शुचितराज्याला॥४०॥
विश्व ज्येष्ठ श्रेष्ठ प्रेष्ठ असें ज्या स्वपितृनिभा गातें ॥
तो पाण्डव धर्म कसा सांग नव्हे योग्य या विभागातें?४१॥
गाती अजातरिपुच्या हे सर्व परा सुयोधना महिम्या ॥

१ धर्म व अर्थ ह्या पुरुषार्थांचा लाभ. २ मूर्तिमान जें पापयुग (कलियुग) त्याचा महिमा दुर्योधन; यास ३ सत्यवतीविषयीं प्राप्त झाली इच्छा ज्याला; तो पिता शान्तनु. ४ अस्खलित ब्रह्मचर्य ज्याचें तो. ५ सर्वांस दुःख देणारी जी राजरहितता; तिनें पीडिलेल्या लोकांचे आधिरूप पर्वतांचीं वज्रेंच, अशांचे. ६ शुचितर—अति पवित्र, अशा घृताला. ७ आपल्या पित्यासारख्या. ८ उत्कृष्ट अशा.

द्यावी त्यासचि वसुधा[1] निरवूनि परासु-योध-नामहि[2] म्या ॥
तातचि योग्य नव्हे, मग राज्याला योग्य तूं कसा? वद रे॥
पद रेखिलें कपाळीं विधिनें त्याच्या[3], तुज्या अयश सदरे''॥
ऐसें बहु भीष्म वदे गुरुहि ह्मणे "मिळुनियां स्व भावांसीं॥
भोगीं राज्यसुख; वृथा कां करिसी भेद सुस्वभावांसीं?॥४४॥
हा ब्राह्मण भीष्माश्रित साक्षात् त्वद्दत्तवृत्ति[5] कारा[6] या ॥
सदहितजनसंपर्कें[7] सुकृताची होय मृत्तिका राया ॥ ४५ ॥
मी गुरु यांचा तुमचा त्यांचें तुमचेंहि सत्य जें विहित ॥
तेंचि कथावें म्यां या अश्वत्थाम्या सुतासि जेंवि हित ४६॥
धर्माला भीष्मप्रभु- वचनें राज्याऽर्धभाग दे; वांचें ॥
न भलें आगं[8] भल्याचें क्षणतरिहि पचेल आग देवांचें४७॥
जिकडे नदीज तिकडे मी; मन्मन अक्षकाळकेतुकडे[9] ॥
सोडुनि सदन्न सेविल कोण सुधी अशुचि वाळके तुकडे'' ४८
विदुरहि सभेंत वदला तातांतें[10], तेंहि आयका सारें॥
कविनेंचि तृप्ति कर्णा द्यावी; तृषितासि काय कासारें?॥४९

---

१ पृथ्वी. २ परलोकवासी पूर्वज योधांचें नाम (कीर्ति) देखील. पृथ्वी व पूर्वजांची कीर्ति ह्या दोहोंचेंही धर्मानें रक्षण करावें. असा भाव. ३ धर्माच्या. ४ हे सज्जनाच्या शत्रो. ५ तूं दिलेली वृत्ति (उपजीविकासाधन). ६ बंदिशाला. ७ साधूच्या शत्रूच्या संसर्गानें. ८ अपराध. ९ अक्ष ( रावणपुत्र; त्याचा काळ मारुति. तो केतूवर ( ध्वजावर ) ज्याच्या, तो अर्जुन; त्याकडे. १० भीष्माला.

लीलेनें उद्धरिला स्पष्ट बुडविलाचि वंश[2] परं[1] मागें ॥
कां आजि बुडों देतां या पामरपापपौत्र[3]परमागें ॥ ५० ॥
बुडविल कुळ हा लोभी हा क्रोधी हा असाधु हा कामी ॥
कां न तुह्मीही परिसां मारित आलों अशाचि हाका मी ५१॥
बापाजी आह्मी हीं चित्रें, तुमचा अनुग्रह चितारी ॥
निर्मुनि शोभवुनि पदीं स्थापुनि पूजुनि अनुग्रहाचि तारी ॥
गेली वृद्धपणीं मति जोडा सुतपो[4]वनांत सुतपातें ॥
धृतिला पळवुनि मूर्छा[5] न शिरो तुमच्या मनांत सुत-पातें[6] ॥
ध्या धृतराष्ट्रासि, चला ही जसि तसि वृत्ति ती न सापायां[7]
कीं सदनांतुनि काढा न करूनि उपाय तीर्न सापा[8] या ५४
राज्य कराल तरि, जना तारुनि, आपण तराल राघवसे ॥
त्या काय राज्य? जेथें कामक्रोधादि दुस्तराघ[9] वसे ॥५५॥
स्वपरविनाशोपेक्षा[10] कां करितां? व्हा प्रसन्न, यश रक्षा॥
भोगार्थ काय रामें होऊं न दिलें कलत्र[11] वश रक्षों[12] ॥ ५६ ॥
चिताग्नीनें अंतः- संतप्त सर्वकाळ, जी चुल, ती ॥
बहु तदली, वाहतसे बहु तुमची सर्व काळजी चुलती[13]॥५७॥

---

१ परंतु. २ पांडूच्या पूर्वी बुडालेला वंश भीष्मानें उद्धरिला. ३ नीच व पापी अशा नातवाच्या महापराधानें. ४ उत्तम तपाला. ५ मोह. ६ पुत्राच्या पतनानें. ७ अपायसहित. ८ कर्ण, शकुनि, दुर्योधन या तीन सापांना. ९ दुस्तर अघ. १० आपल्या व दुसऱ्याच्या नाशाची उपेक्षा. ११ स्त्री-जानकी. १२ रावणाला. १३ कुंती.

सभ्यें सोडावाचि स्व[1]-पर-विकृति-कर कुसंग गंधकसा ॥२८॥
न भलें भगवदवज्ञा- फळ ऐसें कळकळोनि आयकवी ॥
परि नवळे,ह्मणुनि निघे तेथूनि,खळासि करिल काय कवी २९
वृष्णिप[2] वृकस्थलाहुनि येतां भीष्मादि सुज्ञ ते सर्व ॥
जन सामोरे गेले अंदुक[3] झाला सुयोधना गर्व ॥ ३० ॥
धरिलें असतें जरि तें कृष्णांऽबरकर्षणादि[4] आगं[5] मनीं ॥
आगम-निगम[6]-नुत प्रभु आदर करिता कशास आगमनीं॥३१
दिन धन्य धन्य ऐसें प्रभुला पाहोनि सर्व पौर वदे ॥
सर्वांसि योगि-दुर्लभ-दर्शन तारावयासि पौरव[7] दे ॥ ३२ ॥
धृतराष्ट्र-गृहा नेती राजपथीं हळुहळूच हरि हरितें[8] ॥
त्यां पशु ह्मणेल तो पशु,त्यांचें सकृपत्व अतुल हरि!हरि!तें ३३
भेटे धृतराष्ट्राला तत्कृतपूजेसि बहुत भावुनि[9] घे ॥
मग जगदीश्वर तेथुनि त्याचा[10] निववावयासि भावुं निघे ३४
'हरि' न ह्मणतां स्वधीतें[11]- ही होती वाणि देवि[12] दुरधीतें[13] ॥
ऐसें ह्मणंतीतें[14] सुख भेटुनि अरिपाणि[15] दे विदुर[16]-धीतें ॥ ३५ ॥

१ आपल्याला व दुसऱ्याला विकार करणारा. २ यदुपति कृष्ण. ३ बंधनशृंखला. ४ द्रौपदीचें वस्त्र ओढणें इ०. ५ अपराध. ६ शास्त्रें व वेद यांनीं स्तविलेला. ७ कृष्ण. ८ घोडे. ९ मानून. १० विदुर. ११ उत्तम पठन केलेलीं शास्त्रें इ०. १२ हे देवि सरस्वति. १३ वाईट रीतीनें पढलेलीं. १४ ह्मणणारीला. हें, विदुरधीतें, याचें वि० १५ चक्रपाणि. १६ विदुराच्या बुद्धीला.

दुर्योधना तुझे हे जन्मप्रद होहि विदुर भावोजी ॥
यांसह ह्मणत्ये होउनि बद्धांजलि ज्यासि कुरुसभा वोजी॥
देवव्रत[1] मामाजी प्रभु, यांचें राज्य भारताऽपसदा ॥
गुरुचा प्रसाद नसतां हरिसहि[3] दे राज्य भार ताप सदा ५९
भज यांला, हे कामद ईश्वर, हितबोध परिस, हे व्यास ॥
धर्मासीं सख्य करीं स्वप्नींहि करूं नकोचि हेव्यास ॥ ६० ॥
देही[5] पांडुहि विदुरहि या यांच्या भोगमूर्ति[6] हे शिव[7] रे ॥
पाण्यापरीस पातळ करिते[8] तुज;परि नव्हेत हे शिवरे[9]॥६१॥
धर्म न्याय पहातां धर्मासचि सर्व राज्य ओपावें ॥
मामाजींनीं तुजवरि त्या द्यूतोपक्रमींच[10] कोपावें ॥६२ ॥
द्यावें सर्व, जिहीं जें, अर्ध 'करुनि साम' देववावें तें ॥
'हूं ह्मण' भेटों आला तुज पसरुनि वामदेव[11] वावें तें ॥ ६३ ॥
शक्रासहि न मिळालें, मूर्खा, मिळतें कसें तुला यश तें ॥
महिषघ्नीभंग[12] रणीं करिजेल प्राकृतें ळुलायशतें[13]'' ॥ ६४ ॥
धृतराष्ट्र ह्मणे "पुत्रा सोमापासुनि ययाति जो सावा ॥
ज्याच्या भुजें प्रजाभर, भूभर[14] शेषें तसाचि सोसावा॥ ६५॥

१ ज्या भीष्माला. २ भीष्म. ३ इंद्रालाही. ४ मत्सराला. ५ धृतराष्ट्रही. ६ भोग- राज्यभोग अनुभविणाऱ्या मूर्ति—अवतार. ७ भीष्म हेच शिव—शंकर. ८ करणारे. ९ शिव्याशाप देणारे. १० द्यूताच्या आरंभींच. ११ शंकर. १२ महिषासुरमथिनीचा पराभव. १३ रेड्याच्या शतकानें. १४ भूमीचा भार.

तत्पुत्र पांच, त्यांत ज्येष्ठ यदु समर्थ शक्रकन्याभू[1] ॥
त्या अवशा[2] तद्रुची शापोक्ति प्राप्त होय अन्या भू[3] ॥ ६६॥
न करी गुरुवच म्हणुनि ज्येष्ठा यदुवरिहि होय भू रुसती ॥
अनुसरलीच कनिष्ठा असुरसुतेच्या[4] सुतासि पूरुस ती ॥६७
यत्कीर्ति[5]-परिस अधिक न तृप्ति सुधेची सुरांसि दे वापी ॥
प्रपितामह[6]-प्रतीपें[7] प्रभु, त्याचा ज्येष्ठ पुत्र देवापी ॥ ६८ ॥
वदल्या[8] प्रजा असें कीं "आह्मां भर्ता नकोचि हा कुष्ठी ॥
काय करावी श्वानें केली चाखोनि जी सुधा उष्टी" ॥ ६९ ॥
रडत प्रतीप वदला "याहि भवविषोदधीस[9] देवा पी" ॥
जेव्हां तपोवनाला गेला सदन त्यजूनि देवापी ॥ ७० ॥
होता पितृमृतिसमयीं दूर महाराज-बाह्लिक[10] भरतसा[11] ॥
शंतनुला दे क्षिति, कीं याच्या राज्यांत मात्र, न भर[12] तसा
तैसाचि अंध ह्मणवुनि मी अनुचित जाहलों अवन्यवना[13] ॥
अनुभविल कसा मादृश[14] गहना राज्या जसा अवन्य[15] वना ॥
पाण्डु कनिष्ठहि राजा, कीं विश्वहि तृप्त यत्सुगुणपानें[16] ॥
कार्य कृशेंहि सजीवें, तें होइल काय दुष्टकुणपानें[17] ॥७३॥

---

१ देवयानीपासून जन्म ज्याचें, तो. २ प्रतिकूळाला. ३ पृथ्वी. ४ शर्मिष्ठेच्या. ५ ज्या पूरूच्या कीर्तीपेक्षां. ६ पणजा (धृतराष्ट्राचा. ७ शान्तनूचा पिता. ८ देवापि वनास गेला असतां वदला. ९ संसाररूप विषाच्या सागराला १० प्रतीपाचा दुसरा पुत्र. ११ रामभ्राता तसा. १२ उत्कर्ष. १३ पृथ्वीपालनाला. १४ माझ्यासारखा. १५ वनांत न राहणारा १६ ज्याच्या सद्गुणाच्या प्राशनानें. १७ प्रेतानें.

राज्यानर्ह पिता मी कैसा राज्यार्ह तूंचि, वद नातें ॥
परधन हरुनि न लाजसि, दाखवितां या दहांत वदनातें ॥
धर्माचें राज्य दिलें सदनुमतें तत्पित्यासि मत्तातें ॥
मत्ता, तें तुज नुमजे, कोण करिल सावधान मत्तातें" ॥ ७५
वदला यापरि बा परि खापरिला परिस, तेंवि सा बोध ॥
तो धन्य आग्रही, बा तैसा न मिळेल केलिया शोध ॥ ७६ ॥
बहु मीहि भागलों बा, बोधुनि दगडासि कां न भागावें ॥
खळहृदय- शून्य केवळ शून्य असें व्यर्थ कां नभीं गावें ७७॥
भेदित होतों, देउनि राज्य सकळ, करुनियां सुवर्णनें, गा
परि न ढळे कर्ण, तशा यत्नलवें ढाळितों सुवर्णनगीं॥७८॥
देतो प्राण, न हृतधन, दृढ निजकर्माभिमान चोरा ज्या ॥
युद्धार्थ कुरुक्षेत्रा गेला घेवूनि सैन्य तो राजा ॥ ७९ ॥
जो मी हितार्थ गेलों; कीं, दुःखीं मग्न ससुत अंध नहो ॥
त्या मज करीत होता दुर्योधन नृप धरूनि बंधन हो॥८०॥
वदले न युक्त कुरुगुरु, सम्यक् कवि विदुरमात्र वदला हो
एकें काय करावें पारि ह्मणतो धर्म राज्य-पद लाहो ॥८१ ॥
धृष्टद्युम्न शिखंडी द्रुपदनृप विराट चेकितान तथा ॥

१ राज्याला अनधिकारी. २ मी पिता ( धृतराष्ट्र. )३ सज्जनांच्या अनुमतानें. ४ धर्माचा पिता पाण्डु यास. ५ भीष्मानें. ६ आकाशाला. ७ कौरवांपासून वेगळा करीत होतों. ८ उत्तम स्तुति. ९ हालविला असता. १० मेरुपर्वताला.

युयुधान भीमकर्मा भीमहि ज्याची परां[1] असह्य कथा ॥८२॥
ऐसे धर्मे केले साता अक्षौहिणींत सात पती ॥
जे तपनें[2] ताप द्याया रात्रिंहि अरिघूकमानसा[3] तपती ॥८३॥
द्रोण कृप शल्य सैंधव[4] गुरुनंदन शकुनि कर्ण कृतवर्मा ॥
भूरिश्रवा सुदक्षिण बाह्लिक विख्यात जो सुकृतवर्मा[5]॥८४॥
अक्षौहिणीहि अकरा कल्पुनि त्यांचे पती असे अकरा ॥
भ्रात्यांसि ह्मणे "यांच्या सत्कारीं आळस क्षणाहि न करा॥
मग भीष्मासि सुयोधन नमुनि म्हणे "व्हा तुमीच सेनानी[6]" ॥
सुज्ञसमर्थपतिविना जय कैसा पाविजेल सेनानीं ॥ ८६ ॥
ख्यात यशस्वी इच्छा[7]- मृत्यु तुह्मी कुरुकुळांत वासवसे ॥
स्थिर तुमच्या धन्वीं[8] यश कीं सुरतरुच्या फुलांत वास वसे
सेनापति मुख्य तुह्मी व्हाल, तरि विभो करूनि शुद्ध रण॥
लीलालेशें[9] मद्रिपु-[10] विषवृक्षांचें कराल उद्धरण ॥ ८८ ॥
अरिवळ तसें तुह्मां, तम दावीना जेविं वदन दीपातें॥
तुमचा प्रताप रिपुतें नुरवि जसा घटज[11] नदनदीपातें[12] ॥८९॥
चालों, पुढें तुह्मांला करुनि, जसे करिति लोक रात्रि दिवा
केला त्या गांगेयें विस्मय जो काय तो करा त्रिदिवा[13]"॥९०

---

१ शत्रूला. २ सूर्य. ३ शत्रुरूप घुवडाच्या मनाला. ४ जयद्रथ. ५ अतिकाठिन वर्म (कवच) ज्याचें, तो. ६ सेनानायक. ७ इच्छामरणी. ८ धनुष्याचे ठायीं. ९ थोड्याशा लीलेनें. १० माझे शत्रु हेच विषवृक्ष, त्यांचें. ११ अगस्ति ऋषि. १२ समुद्राला. १३ स्वर्गाला.

भीष्म ह्मणे " काय करूं समयीं शरणागता न सांडावें ॥
आलें असे कपाळा कीं स्वभुजांशीं स्वयेंचि भांडावें॥९१॥
स्वहित पुसतील पांडव तरि सांगुनि संकटांत तारीन ॥
प्रकट प्रहार पहिला केल्यावांचुनि परा न मारीन ॥९२॥
ज्याशीं युद्ध करावें म्यां, क्षितिवरि कोण गा असा मान्य॥
कीं मजवरि प्रसाद श्रीमद्गुरुंचा[1] जगीं असामान्य[2] ॥ ९३ ॥
मत्सम एक धनंजय योद्धा गुरुसंकटींहि[3] अभ्रांत[4] ॥
प्रकट न भिडेल मजशीं इच्छील मयूर काय अभ्रांते[5] ॥९४॥
सद्गुरुलब्धास्त्रबळें[6] क्षणमात्रें करिन निर्मनुष्य जगा ॥
सुर असुरहि न मजपुढें टिकतिल, उरतिल कसे मनुष्यज[7] गा
न घडेल पांडवक्षय, दहनांतहि शुचि[8] सुयोधना वांचे ॥
परि अनृण[9] व्हावया मी मारीन अयुत[10] सुयोध नावांचे॥९६॥
स्पर्धा करितो मजसीं सूतात्मज[11] हा करो प्रथम रण हो ॥
कीं मजचि पांडुपुत्रां- पासूनि प्राप्त सुप्रथ[12] मरण हो"९७॥
कर्ण ह्मणे " कुरुराया जैं समरीं पावतील हे मरण ॥
तैंच करिन विजयाशीं[13] रक्षाया हें स्वमित्रहेम[14] रण ॥९८॥

---

१ श्रीपरशुरामाचा. २ लोकोत्तर. ३ महत्संकटीं. ४ निःसंशय. ५ अभ्र—अन्त. ६ सद्गुरूपासून मिळालेल्या अस्त्रांच्या सामर्थ्यानें. ७ मनुष्यापासून जन्मलेले. ८ निष्पाप पुरुष. ९ ऋणमुक्त. १० दशसहस्र. ११ कर्ण. १२ सुप्रसिद्ध. १३ अर्जुनाशीं. १४ आपला मित्र हेंच सुवर्ण.

न असा प्राकृतहि झटे साधाया निज सुभाग वर्तनाचा १०७
अभिमान यास तुमचा जैसा, ऐसा न आमचा कांहीं ॥
त्वत्कार्य या भुजांहीं शकटाचें जेविं काम चाकांहीं॥१०८॥
हा जिकडे तिकडे जय येतो; संबंधिवध[१] पहावेना ॥
भेटाल पुन्हा मजला तीर्थस्नानोद्यतां[२] रहावेना ॥ १०९ ॥
जातां मागुनि भगवान् बलभद्र बळें निजानुजा फिरवी ॥
मिरवी,प्रभु प्रभूत प्रेम प्रेमाश्रु लोचनीं जिरवी ॥ ११० ॥
रुक्मी सहाय व्हाया आला अक्षौहिणी-बलासहित ॥
कीं वाटलें करावें धर्माचें त्या तशा खलास हित ॥१११॥
तो प्रभुसमक्ष[३] गर्वें- करुनि ह्मणे अर्जुनासि "साधि न हो॥
भ्यालां कां? लीलेनें तुमचें मी सर्व कार्य साधिन हो११२॥
भीष्मकसुत[५] मी,परि भुज- वीर्यें केवळ नव्हेंचि भीष्मकंसा[६]॥
वांचेल मजपुढें तो द्रोण कसा?तोहि वृद्ध भीष्म कसा११३
द्या भाग कर्ण, कीं कृप, कीं भीष्म द्रोण सर्व अथवा द्या॥
धर्मस्थापन-मद्यश- गावू वाजवुनि चित्ररथ[७] वाद्या ॥ ११४॥
जेविं अमृतप्रदार्ला[८] कांजिक दावूनि "सुरस हा, यातें ॥
घ्या,, पामरें ह्मणावें तोहि ह्मणे तेविं सुरसहायांतें[९] ॥११५॥

---

१ आप्तांचा नाश. २ तीर्थस्थानांविषयीं उद्युक्त झालेल्या मला. ३ श्रीकृष्णासमक्ष. ४ सचिन्त. ५ भीमकराजाचा पुत्र. ६ ढेंकणासारखा. ७ चित्ररथ गन्धर्व. ८ अमृत देणाराला. ९ देव ज्याचे साह्यकारी आहेत,त्या अर्जुनाला.

सस्मितमुख[1] नर नारा- यण-मुख पाहुनि ह्मणे "सहाय मला॥
श्रीगुरुपदप्रसादचि[2] बहु, तदितर[3] तुच्छ सर्वथा गमला११६॥
भ्यालों कसें ह्मणेन? क्षत्रिय मी द्रोणशिष्य हरदास[4] ॥
उखळीन ईश्वरीच्या[5] हरिच्याहि महाभयावह[6] रदास[7] ॥११७॥
करितां कृपा सुरासुर, मोडुनि जाळूनि खांडवास[8] मयीं[9] ॥
सांग सहाय तशा त्या होता जन कोण पांडवा समयीं? ११८
खळ, काळकेय दुर्मद गंधर्व निवातकवच यां, गमला ॥
हाहीं; तेव्हां होता समरांत सहाय कोण सांग मला॥११९॥
हा कौरवांस हरिहर- दास, जसा, नकुळ[10] घोणसां[11], गमला॥
काळचि विराटनगरीं, होता सुसहाय कोण सांग मला॥१२०॥
आराधुनि हरिहरगुरु येतांही तत्प्रसाद हातातें ॥
भ्यालों ह्मणेल,त्याच्या कां न ह्मणावें दहांत'हा'तातें॥१२१
नाहीं भ्यालों, नाहीं किमपि सहायप्रयोजनहि, राया ॥
जा कीं अन्यत्र रहा धर्मबळ असे द्विषद्यश[12] हिराया॥१२२॥
दुर्योधनाकडे मग जाता झाला; असेचि गर्व तसा ॥
कोणाला बुडवीना अयशीं, उदकीं शिरस्थ पर्वतसा॥२३॥

---

१ हास्ययुक्त मुख ज्याचें, तो. २ गुरूच्या पायांची कृपा. ३ गुरुकृपेहून इतर. ४ शंकराचा दास. ५ दुर्गेच्या. ६ महाभयदायक. ७ दांताला. ८ खाण्डववनाला. ९ मयासुराचे ठायीं. १० मुंगुस. ११ हा एक प्रकारचा सर्प आहे. १२ शत्रुयश.

# अध्याय १२ वा.

## सारांश.

( १—१०७ ) दुर्योधनानें, कुरुक्षेत्रांतून शकुनीचा पुत्र उलूक यास दूत करून धर्माकडे पाठविलें. तो धर्मास ह्मणाला. आजपर्यंत तुझें धार्मिकपण आह्मांस खरें वाटलें. पण अलीकडे तुला लोभ उत्पन्न झाल्यामुळें तें खोटें अशी आमची खातरी झाली. कृष्णा, तुझ्या सारखें इन्द्रजाल आह्मीही दाखवूं. पण अशानें धीरजनास लिमपि भय वाटणार नाहीं. तूं, कौरवांस मारून धर्माला राज्य देईन असें बोलला होतास, तें आपलें वचन आतां खरें कर. भीमा, तुला खादाडाला युद्धाच्या वार्ता काय करावयाच्या आहेत? नकुळा, तूं युद्धांत नमरतां जीवंत राहून पितरांस जलांजलि दे. सहदेवा, तुझी स्त्री सभेंत ओढून नेली असतां, तिचें तुझ्यानें रक्षण झालें नाहीं. तूं जीवंत कशाला राहिलास? आतां तुझ्या हातून काय पराक्रम होणार आहे? अर्जुना, तुह्मी दोघे कृष्णार्जुन तर काय? पण असे शेकडों आले तरी ही त्यांस जिकणारे वीर आह्मांकडे आहेत. तुह्मी कूपमण्डूकाप्रमाणें उगीच टुरटुर किती करितां? आतां स्वस्थ रहा.

याप्रमाणें उलूकाचें भाषण ऐकून विराट, द्रुपद यांस मोठा राग आला. भीमाच्या मनांत कौरवांविषयीं मूळचाच क्रोध होता. श्रीकृ-

ष्ण—दुर्योधनाला सांग कीं, दुष्टा, निजलेल्या सर्पाच्या शेंपटावर पाय देऊन त्यास जागृत केलें. भीम—दुष्टा, आधीं तुझे सर्व बन्धु वधून शेवटीं तुझा वध करीन. व तुझा मस्तक डाव्यापायानें तुडवीन. अर्जुन—भीष्मद्रोणतर काय? पण सर्व देव, इन्द्र शंकरही जरी तुझ्या मदतीस आले तरी त्यांचाही मी पराभव करीन. धर्म—गर्वामुळें नहुषाला जी गति झाली, तीच गति तुला होईल.

उलूकानें पाण्डवांचा निरोप दुर्योधनाला कळविला.तो ऐकिल्यावर दुर्योधन भीष्माला ह्मणाला. उभयपक्षांत रथ, अतिरथ कोण आहेत, तें सांगा. भीष्म—तुह्मी सर्व बन्धु रथ आहां. माझा पराक्रम तुला माहीतच आहे. कृप, कृतवर्मा, बाह्लिक, शल्य हे अतिरथ होत. जयद्रथ द्विगुणरथ. शकुनि रथ होय. अश्वत्थामा हा प्रतिद्रोणच आहे. पण हा आपल्या जिवाला जपणारा आहे. द्रोण अनेक सेनानायकांचाही नायक होय. हा युद्धांत फार अद्भुत कर्म करील. पण अर्जुनावर याचा हात वाहणार नाहीं. कर्ण महाप्रतापी. पण गुरुब्राह्मणशापदग्ध झालेला. हा अर्धरथ होय. कर्ण—दुर्योधना, हा भीष्म वृद्ध. वृद्धाला पुनः बाल्यदशा येते. तीच स्थिति ह्याची. ह्याचे वचनावर तूं भरंवसा ठेवूं नको. हा आधीं मेल्यावर मागून मी पाण्डवांस मारीन. भीष्म—कर्णा, कमलाप्रमाणें सहज तुझें शिर उडविलें असतें. पण तूं दुर्योधनाचा मित्र, ह्मणून तुला क्षमा करितों. दुर्योधन—हे भीष्मा, हे कर्णा, स्वजनाहितास्तव तुह्मीं आपला क्रोध आवरावा. भीष्म—दुर्योधना सर्व रथांत धर्म श्रेष्ठ होय. सर्व रथांच्या आठपट भीम. माद्रीपुत्र रथ होत. अर्जुनासारखा वीर पूर्वीं झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. सा-

क्षात् श्रीकृष्ण त्याचें रक्षण करितो. त्याच्याशीं युद्ध करणें फार कठिन. तथापि मी त्याच्याशीं लढेन. द्रौपदीचे पांच पुत्र महारथ होत. अभिमन्यु रथांचा व महारथांचा नायक होय. सात्यकिही अभिमन्यूसारखाच प्रतापी आहे. द्रुपद, विराट हे महारथ होत. द्रुपदपुत्र शिखण्डी हा सर्व रथांत श्रेष्ठ होय. धृष्टद्युम्न अतिरथ होय.

या प्रमाणें सांगून भीष्म ह्मणाला, दुर्योधना, मी सर्वांशीं युद्ध करीन. पण शिखण्डीशीं युद्ध करणार नाहीं. कारण सांगतों; ऐक. माझा बन्धु विचित्रवीर्य ह्या करितां काशीराजाच्या तीन कन्या, त्यांच्या स्वयंवरीं सर्व राजे जिंकून मी आणिल्या. पैकीं अंबा ह्मणाली, मी शाल्वाला वरिलें आहे. मी दुसऱ्याला वरणार नाहीं. तें ऐकून मी तिला शाल्वाकडे पाठविलें. बाकी अंबिका व अम्बालिका ह्या विचित्रवीर्याला दिल्या. अंबेचा शाल्वानें स्वीकार न केला. दोहोंकडे आश्रय नाहींसा झाल्यामुळें रडत ती तपोवनाला गेली. व तिनें दुर्धर तप केलें.

अंध कुरुक्षेत्रकथा पुसतां संजय ह्मणे कृतात्यनयें ॥
धर्माकडे उलूका- भिध-दूत प्रेषिला तुझ्या तनयें ॥ १ ॥
धर्मासि ह्मणे धरिता- झाला व्रत मूषकार्थ ओतू तें ॥
स्वीकारिलें ह्मणुनियां आलें तत्साम्य देत ओ तूतें ॥ २ ॥

१ कृत—अति—अनय ह्म० ज्यानें अति अन्याय केला, त्यानें २ उलूक नांवाचा. ३ उंदरांकरितां. ४ बोका. ५ त्या बोक्याचें सादृश्य.

आजिवरि तुझें धार्मिक- पण आह्मां सत्य भासलें होतें ॥
ह्मणति कवि स्तविलें परि लोभें साधुत्व नासलें हो तें ॥३॥
समर स्वधर्म सुगतिद यांत तरि सुरुचि असो नहो कुरुची
कुरुचीका माशीशी न शिवे क्लीबासि कीर्ति हो कुरुची''४
कृष्णासि ह्मणे ''दावूं ऐशा आह्मींहि इन्द्रजालांतें ॥
हें किति? वीरांसि न दे भय, पूजी नित्य इन्द्र जालां तें५ ॥
स्मरें वचन, वधुनि कौरव दे हें धर्मासि राज्य साधूनी ॥
कीं अर्क देखिजेतो देखोनि असत्यसन्ध साधूनीं ॥ ६ ॥
आहेत भृत्य बहु, मी स्पर्श करिन न तुज कंसभृत्यानें ॥
जो अयशोवायसभृत् स्पर्शेना कीर्तिहंसभृत् त्यातें ॥ ७॥
भीमासि ह्मणे ''रण तुज काय? तुवां विविध अन्न रांधावें॥
सुजला असासिल आधीं मागाया अन्नमन्नरां धावें॥ ८ ॥
तूं बरवा न रणीं, तूं स्पष्ट पुरस्कार्य पुष्कळीं अशनीं॥
तूं किति बाळा! अक्षम दुःशासनरक्त प्यावया अशनी''९॥
माद्रीपुत्रासि ह्मणे ''ह्मणसि करुनि युद्ध कां मरेन? कुळा॥
रक्ष, रहा सानुज, दे जळ, हाही शुद्धकाम रे नकुळा''॥१०

---

१ कु-रुचिक ह्म० वाईट असा रुईचा चीक, त्याला. २ कुरु-वंशाची. ३ गारुडाला. ४ ज्या वज्राला. ५ असत्य-संधा ह्म० असत्य प्रतिज्ञा ज्याची, तो. त्याचें मुख पाहिलें असतां तद्दोषप-रिहारार्थ सज्जन सूर्यावलोकन करितात. ६ अकीर्तिरूप काकप-क्षी धरणारा. ७ अन्न ज्याच्याजवळ आहे त्यांकडे. ८ पुढें कर प्यानोगा.

सहदेवासि ह्मणे "त्वां कां रे जीव न दिला परवशं[1] स्त्री॥
कसि देखिली सहातां दासीचाहि न विलापरव[2] शस्त्री[3]"॥११
विजयासि ह्मणे "आह्मां आहे दिव्यप्रभाव[4] धनु ठावें॥
त्वां खद्योतें इच्छुनि कुरुगुरुभानुप्रभावध[6] नुठावें॥ १२॥
कंसारि सहाय तुझा ठावा न असेल कां मला खोटा॥
वारि बरवा, अंत न जो, तो काय करील काम लाखोटा.१३
कर्ण नदीसुत[7] कुरुगुरु कोण रणीं वळविना शतमखातें[8]॥
यां जिंकितासि तरि जरि, रविसि करुनि बळविनाश तम खातें
किति दोघे कृष्ण तुम्ही असतां शत जिंकिते तथापि कवी
हें तो असो, तयांची समरक्षेत्रांत जयकथा पिकवी॥ १५॥
रे कूपदर्दुरा[9] किति टरटुर करिसी? वृथा न भाग रहा॥
कोठें तुझें भाग्य, अरे मंदा त्वां पाहिला न सागर हा"॥१६
यापरि उलूकवदनें ऐकविल्या विपकटूग्रसंदेशें[10]॥
केले वृद्ध विराट द्रुपदहि बहु तप्त त्या सुमंदेशें[11]॥ १७॥
खळवाक्कोप[12] पराच्या उठवी, होताचि भीमयोधमनीं॥
काय म्हणे? कल्पांतीं रुद्रालिकनयनदहन[13] 'यो[14]' धमनी[15]१८

१ पराधीन. २ आक्रोशाचा शब्द. ३ शस्त्रधर. ४ प्रखर पराक्रम ज्याचा, तें. ५ काजव्यानें. ६ द्रोणरूप सूर्याच्या तेजाची हानि. ७ भीष्म. ८ इंद्राला. ९ विहिरींतील बेडका. १० विषाप्रमाणें कडू व उग्र अशा. ११ अत्यंत मूर्खशिरोमणीनें. १२ दुर्जनाचें भाषण. १३ शंकराच्या मस्तकावरील नेत्रांतील अग्नि. १४ येवो. १५ फुंकणी.

आला कोप जन्हि तन्हि न सोडिति सहज क्षमेसि सुरसिक्ते ते
येते तरि यांपाशीं यांच्या सुगुणांसि कां न सुर सिकते १९
तेंव्हां भीम हरिकडे पाहे नेत्रें करूनि शोणाभें ॥
बहुधा देवहि भ्याला त्याचें वाटेल मग न कोणा भें ॥२०॥
देव म्हणे "शकुनिसुता जा म्हण त्यालाहि ऐक फटकाळा॥
जाखविला पुच्छीं त्वां देउनि पद वहु सपूर्वफट काळा२१ ॥
वांचाया ब्रम्हाण्डा- बाहिर जावूनि जरि रहासील ॥
मत्मापित अर्जुनरथ निजकर्मविपाकसा पहासील"॥ २२ ॥
मारुति म्हणे "उलूका हें कुरुकुळ बुडविलें तुजा तातें ॥
यास्तवचि बुध न घेती संबंधीं सर्वथा कुजातातें ॥ २३ ॥
म्हण त्यासि मत्प्रताप- ज्वलनासि बळेंचि लाव कचें पेट ॥
साहेल काय हरिची गज, गरुडाचीहि लावक, चपेट ॥२४॥
आतांचि, पडोनि गळां रड, मग समरक्रतूत्तमीं न रडें ॥
दुःशासनरुरुचें क्षतज प्राशिन पिळुनि सिंह मी नरडें २५
आधीं वधीन अधमा अनुज तुझे मग तुला गदाघातें ॥

---

१ सद्गुणरसज्ञ असे पांडव. २ शोण—आभा ज्यांची अशा० रक्तवर्ण असे. ३ दुष्टा. ४ 'स' हें अक्षर पूर्वी ज्याच्या असा फट सफट अश० फणासहित. ५ मी पोंचविलेला. ६ तुझ्या कर्मांचा परिणाम असा. ७ भीम. ८ नीचकुलोत्पन्नाला. ९ माझ्या प्रतापाग्नीला. १० केश. ११ लावापक्षी. १२ चपराक. १३ युद्धरूप उत्तम यज्ञामध्यें. १४ दुःशासनरूप काळविटाचें १५ रक्त.

होइल मद्यश लोकीं तुझिया कुरुकुळमहागदा[1] घातें ॥ २६॥
धर्मासमक्ष ठेविन तुज पाडुनि तव-शिरीं स्वपद[2] डावें ॥
न चुकेल हें परि तुवां मात्र रणमख त्यजूनि न दडावें"२७॥
जिष्णु ह्मणे "आर्या हर[2] ह्मणतिल साक्षात् तुजप्रति ज्ञातीं॥
जी दुष्करा महेंद्रा केवळ सुकरा तुज प्रतिज्ञा ती ॥ २८ ॥
शकुनिसुता सांगाया त्याला माझ्याहि या निरोपा पी ॥
उदकें भेंडा[3] तैसा यांच्या श्रवणेंचि तो विरो पापी ॥ २९ ॥
केवळ मूर्ख अधम तूं ऐसें कळलें तुझ्याचि संदेशें ॥
कीं योजिला परबळें[4] अस्मत्परिभव तुवां सुमंदेशें ॥ ३० ॥
यावरुनि गमे अशनेंहि[6] निज-जठर भरावयासि संदेशें ॥
त्वां करिजेल परमुखें; कीं करिजेताति जेविं धंदे शें॥३१॥
कैवार तुझा घेउनि आह्मांवरि शस्त्र धरुनि यो जीनें ॥
सोडानि घृणा तृणावरि दवसे शर नमन करुनि योजीन ३२
भीष्मासूतें ह्मणतिल मच्छर दुष्टाकडे नका राहूं ॥
गुरुसहि सुखें ह्मणावें, करितां विहितीं हितीं नकारा, हूं॥३३॥
होउत सहाय तुज जे रामा[12] शक्रा सहाय कपि नाकी ॥
कुरुगुरु भीष्म द्रोणहि, किंबहुना लोकनायक पिनाकी[13]॥३४॥

---

१ कुरुकुलाच्या महारोगा, दुर्योधना. २ शंकर. ३ मातीचा गोळा. ४ दुसऱ्याच्या बळानें. ५ मूर्खशिरोमणीनें. ६ भोजन. ७ वृद्ध(भीष्म). ८दया. ९वणव्यासारखे. १० भीष्माच्या प्राणांना. ११ माझे बाण. १२रामा कपि व शक्रा नाकी जे सहाय, ते तुज सहाय होवोत. १३ शंकर.

होतिल भग्न मजपुढें जेविं रविपुढें बलीहि मंदेह ॥
धर्माश्रित जय पावे, न अधर्माश्रित, न यांत संदेह॥३५ ॥
जो दुखविला जिहीं त्या विंकरांघ्रिहि साप मानवां चावे ॥
मग कैसे भीमाचे रिपु कृतहासापमान वांचावे ॥ ३६ ॥
पापडशा भीमगदा घातें चुरतील तव-चमूढाला ॥
रक्षिल पळहि न तुज जरि धरिलें पविचेंहि कवच मूढाला" ३७
धर्म ह्मणे "शकुनिसुता माझाहि निरोप सांग त्यातें गा॥
शुचिकवितें निंदिसि तरि कळत अमेध्यांत रांगत्यातें गा ३८
मज सर्व सुज्ञ ह्मणती जरिहि तुझें शील साधु वत्सा हें ॥
दंडीं खळांसि न च्छळ दत्तात्रेयादिसाधुवत् साहें॥ ३९ ॥
मज सांगुनि धाडावी ऐसी हे ओतुची कथा नीचा ॥
हें वाटलें रुईचा वदनीं बहु ओतु चीक थानीच्या ॥ ४० ॥
सोडूनि हरिजनाची स्तुति, निंदा करिसि कां मरायास ॥
आयु हरी सन्निंदा हा योग्य नव्हेचि काम रायास ॥ ४१ ॥
लंघिसि मज सिंहाला मरणार्थ अरे सुयोधना कीशा ॥
जिंकूं जातां उरतिल पुरतिल मानव सुयोध नाकीशा॥४२॥
चुकलास रे सुयोधन- राजा भिववुनि हरीस चुकलास ॥
भुकलास कसा मंदा श्वा कीं तूं जीवनास मुकलास ॥४३ ॥
येणें हातीं धरिलें प्रणता कोणा न दे वरा यवसं ॥

---

१ दैत्यविशेष. २ करपदरहित. ३ केला उपहास व अपमान ज्यांनीं, ते. ४ अमंगल पदार्थांत. ५ बोक्याची. ६ बालकाच्या. ७ मर्कटा. ८ देवेंद्राला. ९ भोंकलास. १० येणें ( कृष्णानें ) हातीं धरिलें तृण हीं, कोणा प्रणता वर न दे.

स्तोत्यां कोणा न ह्मणे स्वर्गी होऊनि देवराय वस॥ ४४ ॥
जी नहुषगति तुझीही गति तीच, धरूं नकोचि संदेहा ॥
धिक् धिक् कुसंगतें त्वां केला श्रितसर्वघात मंदेहां"॥४५॥
नकुळ-सहदेव-सात्यकि- पांचाळविराट-राजसंदेश ॥
नेउनि उलूक सांगे ऐके सावज्ञ तोहि मंदेश ॥ ४६ ॥
इकडे तिकडे किति रथ, अतिरथ सांगा असा धुनीजाल॥
प्रश्न करी तो राजा कुमति सिकविली असाधुनीं ज्याला४७
भीष्म ह्मणे "कुरुराजा सानुजहि रथांत तूं उदार सदा॥
वांछितसां युद्धाला तृषित जसे इच्छिती उदां रसदा ॥४८॥
ठावें असेचि तुजला माझें मज न स्वरूप कथवे गा ॥
गरुड स्ववेग न कथिल कथिल समस्तान्यपत्ररथ-वेगा॥४९ ॥
अतिरथ कृप कृतवर्मा बाल्हिक मद्रेश शल्य जाणावे ॥
द्विगुणरथ जयद्रथ,रथ शकुनि,तुझ्या हें मनांत बाणावें५०॥
द्रौणि द्रोणचि; देवहि ह्मणतिल, याचें करूनि अप्रिय, हा॥
परि न महारथ न रथहि कीं आयुष्काम जीवितप्रिय हा॥५१॥
रथयूथपयूथांचा यूथपति द्रोण हा महातेजा ॥
करिल असें कर्म रणीं भ्रमतिल लोकेशही पहाते ज्या॥५२॥

---

१ स्तवन करण्यास. २ दुष्टसंगतीनें. ३ आश्रितांचा० सर्वही नाश. ४ मूर्खपणाचा व्यापार ज्याचा, त्यानें. ५ अवज्ञापूर्वक. ६ भीष्माला. ७ रथी योद्ध्यामध्यें. ८ उदकाला. ९ सर्व दुसऱ्या पक्ष्यांच्या वेगाला. १०दहा सहस्र धनुर्धरांबरोबर एकटा युद्ध करणारा. ११ रथसमूहाचे नायकांचा समुदाय, त्याचा.

मारिल सुरासुरासहि न धरीलचि हा समर्थ विम्र भया ॥
होतील द्वादशही आदित्य प्रेक्षितांचि विप्रभ या ॥ ५३ ॥
समरीं ऐरावतही शोणितपूरीं नहात वाहेल ॥
परि परमप्रिय अर्जुन, त्यावरि याचा न हात वाहेल ॥ ५४ ॥
भिडले भगदत्तविजय[1] शस्त्रक्षत[2]शुद्धकाय हे मागें ॥
गमलें तैं करिजेतें विंध्यासीं युद्ध काय हेमागें[3] ॥ ५५ ॥
शक्रें या स्वसख्याला[4] पूर्वी प्रार्थूनि पार्थ भेटविला ॥
याचा प्रताप जैसा लयवातानें[5] लयाग्नि पेटविला ॥ ५६ ॥
ज्याच्या[6] बळें तुवां त्या सत्पुरुषाशीं विरोध हा केला ॥
न दळसि बरें नव्हे हें या ऐशा आमुच्याहि हाकेला ॥ ५७ ॥
सहज-कवचकुंडल बल- हीन गुरुब्रह्मशाप[7]पविदग्ध ॥
अतिरथ नव्हे रथ नव्हे हा केवळ अर्धरथचि अविदग्ध[8] ५८ ॥
वधिल विजयशर अमरा वज्रमय प्रोच्चगगनयानींच्या[9] ॥
रक्षूं शकेल येवुनि आड कनकमयहि नग न या नीच्या ५९
स्मित करुनि 'एवमेतत्'[10] द्रोण ह्मणे त्या दहांत, कुरुगुरुनीं ॥
अपमान असा करितां पाहे तो वीरसिंह[11] गुरुगुरुनी ॥ ६० ॥
कर्ण ह्मणे भीष्माला "रक्षूं द्यावी निजप्रभा वढिला ॥

---

१ भौमासुराचा पुत्र भगदत्त व अर्जुन. २ शस्त्रप्रहारांनीं. क्षतयुक्त झाले, शुद्ध देह ज्यांचे, ते. ३ मेरूनें. ४ भगदत्ताला ५ प्रलयकालचे वायूनें. ६ ज्या कर्णाच्या. ७ गुरु. ( परशुराम ) व ब्राह्मण यांचे शाप हींच वज्रें, यांहींकरून दग्ध झालेला. ८ महामूर्ख. ९ अतिउंच आकाशांत चाळण्याऱ्या विमानांतील. १० असेंच. ११ कर्ण.

होतो ईर्ष्याऽसूया- हंकृतिनीं प्रबळहि प्रभाव दिला ॥ ६१ ॥
कां या कुगुणें वुडविसि जें ह्मणति तुला भले कुरूपमें तें ॥
काय उपाय सुरूप न ऱ्हावाचि जगत्त्रयीं कुरूपमतें ॥६२॥
जेव्हां तेव्हां करिसी मत्तेजोवध दहांत शांतनवा ॥
शब्देंचि कळे सुज्ञा स्वाभाविक कीं उगाचि शांत नवा ६३॥
शब्दशरीं विंधुनि त्वां केलें काळिज पितामहा धिरडें ॥
शिकविसिल तूं, शिकेलचि या कुरुपतिचा पिता महाधि रडें ६४
मी साहतों तुझ्या या मित्रसुयोधननृपार्थ अपराधा ॥
वृद्धाचें सोशीसा हो सुत ह्मणउनि करी सुतप राधा॥६५॥
राया अर्धरथ असें मज ह्मणतो हा दहांत आजोबा ॥
साजो बाहुबळें यश जोडुनि याचेंचि नांव गाजो बा॥ ६६ ॥
भूषार्थ वृद्धतरुवाक्- कुसुमांतें मर्त्यनायकां वेंच ॥
अतिवृद्ध पुनर्बालचि निःसार तदुक्त नायकावेंच ॥ ६७ ॥
मारीन पांडवां मी आप्तां-आंतुनि अनाप्त हा निवडा ॥
मत्तगजकुठारधरा- पासूनि प्राप्त होय हानि वडा ॥ ६८ ॥
हा सेनापति घेइल जें जें अर्जुनवधादिमद्यश तें ॥
कैंचा विचार, भुलतें थोरपणें मन, तसें न मद्यशतें॥ ६९ ॥
आधीं मरेल हा, मग मारीन धनंजयास मी परहां ॥

१ ईर्ष्या ( अक्षमा ). असूया ( गुणाच्या ठायीं दोषारोप. २ कुरूसारखा. ३ कुरूप पुरुषाच्या मतानें. ४ अतिचिंताग्रस्त. ५ शोभेकरितां. ६ वृद्ध हाच तरु, त्यांचे शब्द हींच पुष्पें, त्यांस. ७ हे राजा, दुर्योधना. ८ शत्रुहंता.

वृद्ध व्याकुळ होतां मांडी द्यायासि यासमीप रहा"॥ ७०॥
भीष्म ह्मणे "रे नीचा भेदभयांतें मनीं जरि न धरितों ॥
अतांचि वारिजापरि लीलेनें त्वच्छिरासि मी हरितों ॥७१॥
दुर्योधनप्रिय ह्मणुनि वांचसि तूं नीचकुलभवा नीचा ॥
वांचे गजमुखमूषक लंघुनि पंचानना भवानीच्या ॥ ७२ ॥
गुरुसिंहि नाहीं भ्यालों बहुदिन करितां तशाहि समरा मी ॥
सामर्थ्य जरि पहावें तरि साक्षात् कार्मकाळसम रामीं॥७३॥
केला अपूर्णकाम प्रभु मन्निधनैककाम रामहि म्यां ॥
हरिल्या काशिपतिसुता सांगों तुज काय पामरा महिम्या७४
लाजविली जिंकुनि महि- पति षंढस्त्री जसी तसी महि म्यां
राहो, तें वाखाणिल सद्रसना आपुल्या कसी महिम्या"॥७५
भूप ह्मणे "भेद नसो म्यां हा केला तुह्मांसि अंजलि हो॥
तुमच्या प्रसादविधिचें मद्भाळीं विजय पाणिकंज लिहो७६ ॥
प्राप्त महत्कर्म तुह्मी दोघेहि मदाप्ततम कराल पणें ॥
भासाल शत्रुसेना-नयनाला रुद्रसम करालपणें ॥ ७७ ॥
प्यां स्वजनार्थ क्रोधा जेविं विषा विश्वनायक पियाला ॥

१ फुटाफुट होण्याचे भयाला. २ कमलाप्रमाणें. ३ गणपती-चा उंदीर. ४ परशुरामाला. ५ शंकरासारखें. ६ भग्नमनोरथ. ७ माझ्या मृत्यूची इच्छा ज्याला, तो. ८ साधूची जिह्वा. ९ कृपारूपी ब्रह्मदेवाचें. १० करकमल. ११ माझे अत्यंत आप्त. १२ भयंकरपणानें. १३ श्रीशंकर.

नरचि विवेकें कोपा वारी, वारील काय कपि याला॥ ७८॥
इकडिल जसी तसी मज तिकडिलहि रथातिरथकथा सांगा ॥
न भल्या दुरुक्ति देती यापरि हृदयांत न व्यथा सांगा"॥७९॥
भीष्म "ह्मणे सकलरथां- माजि महोदार धर्म सुतपा हो॥
तज्ज्ञामरबळहि ह्मणे इकडे क्रोधें न धर्मसुत पाहो ॥ ८० ॥
सर्वां रथांहुनि अधिक बाहुबळेंकरुनि भीम आठपटें॥
तत्तनुंसि त्वद्भट जरि गगनाची झांकितील पाठ पटें॥८१ ॥
माद्रेय रथी परि त्या तृणसम रथ पत्ति नाग राऊत ॥
येईल तत्प्रताप- ज्वलदग्न्यतितप्तसांगरा ऊत ॥ ८२ ॥
अर्जुनसम वीर नसे मार्गे,आतां पुढें न व्हायाचा ॥
हा वीररसौघ, नगहि न उरेल,उरेल जो लव्हायाचा॥८३॥
होवूनि वज्रपंजर रक्षितसे वासुदेव कीरा या ॥
तत्संगतिहुनि त्याला बहु न यशोदा न देवकी राया ॥८४
दिव्यरथ दिव्यशस्त्रें दिव्यकवच दिव्यसूत कंसारी ॥
ज्याचें साहित्य असें त्यावरि जाईल कोण संसारी ॥८५ ॥
जाइन मी, कीं जाइल गुरु,जाइल कोण जिष्णुवरि तिसरा॥

---

१ साङ्ग या नांवाचीं शस्त्रें. २ धर्मराजाच्या तेजाला जाणणारें देवसैन्यही. ३ यमाचा पुत्र धर्मराज. ४ आठपटीनें. ५ त्याच्या शरिराला. ६ वस्त्रानें. ७ माद्रीपुत्र. ८ पायदळ. ९ हत्ती १० घोडेस्वार. ११ त्याचा प्रताप हाच प्रज्वलित अग्नि, तेणेंकरून अतितप्त अशा समुद्राला. १२ लवणारा. १३ वज्रमय पिंजरा. १४ पोपटाला. १५ द्रोण.

प्रतिभटहृदयां[1] तच्छर तेंवि सुतृषिताहि न पांथ वरिति सरां[2] ८६
पारि आह्मी ह्मातारे राया तो श्वेतवाह[3] तरणा रे ॥
काय इतर तरतिल जल- निधिसि कसे जे नदासि तरणारे ८७
दाविल किति स्थविर[4] गुण पिकती तरु तरुण, कीं जरठ पिकतो
पटु त्यापुढें वदेसा कवण? रण[5] वसंत आम्र हरि पिक तो ८८
सर्वमहारथ पंच भ्राते जे द्रौपदेय ते ज्यांतें ॥
आदर्श[6] ह्मणाति पांडव दाखवित्यां स्वगुणरूप[7]तेजांतें ॥ ८९ ॥
रथयूथपयूथप अभि- मन्यु सुरासुरशतांहि[8] असुगम[9] तो ॥
जो समगुण, पितृमातुळ[10]- हृदयासि बहिश्चर स्वअसु गमतो ९०
सात्यकिही रथयूथप- यूथप, वृष्णींत तो असामान्य ॥
आप्तांत अर्जुनास श्रीकृष्णासाहि नसे असा मान्य ॥ ९१ ॥
द्रुपद विराट महारथ आणूनि मनांत धर्म नय नातें ॥
वृद्धाहि करुनि पराक्रम निववितिल रणांत धर्मनयनातें ९२॥
द्रुपदसुतशिखंडी तो रथसत्तम होय पुत्र दुसरा जा ॥
धृष्टद्युम्न ह्मणाति तो अतिरथ, हें सत्य गुरुसि पुस राजा" ९३
कथुनि रथातिरथ ह्मणे "सर्वांसीं मी करीन युद्धातें ॥
परि न शिखंडीसीं, कीं बा योग्य नव्हे मला विशुद्धातें" ॥९४
कुरुपति ह्मणे "निराळा कां एकचि वीर हा निवडिला हो ॥

१ प्रतिस्पर्धी वीराच्या हृदयाला. २ सरोवराला. ३ अर्जुन. ४ वृद्ध. ५ रण हाच वसंतऋतु. तेथें आम्रवृक्ष श्रीकृष्ण. त्या वृक्षावरील कोकिल अर्जुन. ६ आरसे. ७ आपलें ( पांडवांचें ) रूप, गुण व तेज यांस. ८ देवदानवांचे शतांशा देखील. ९ कठिण. १० पिता- अर्जुन, मातुळ-श्रीकृष्ण, यांच्या हृदयाला.

हरिला हरिणापासुनि तसि त्यापासुनि न हानि वदिला हो''९
भीष्म ह्मणे "म्यां कन्या हरिल्या भ्रात्रर्थ काशिराजाच्या ॥
मुनिजनहि ज्यांसि भुलला वरि दिसती सकळिका शिरा ज्याच्या[1]
बहुसंख्य आडवे मज झाले दुर्योधना नरक्रा जे ॥
क्षमले[2] सहावया या चापगुणाचाहि ते न रव राजे ॥९७॥
बहुसंख्य भूप जिंकुनि म्यां स्वपुरा आणिल्या तिघी कन्या॥
ज्येष्ठा अंबा वदली वरिला शाल्व;न वरीन मी अन्या॥९८ ॥
शाल्वाकडेचि तीं म्यां पाठविली अंबिका स्वभावातें ॥
अंबालिकाहि दिधली विचित्रवीर्या शुचिस्वभावातें ॥ ९९ ॥
अंबेला शाल्व ह्मणे "जा गंगासूनुचीच[3] नवरी हो" ॥
परविजिता[4] परपूर्वा[5] ऐसा ठेवूनि दोष न वरी हो ॥ १०० ॥
"भीष्म-परिग्रह[6] कीं तूं करितीस स्वपरघात कां पावें ॥
मी काय!तुजकडे मन जातां जगदंतकेंहि[7] कांपावें"॥ १०१ ॥
ऐसें शाल्व वदे, ही बहुत विनवितांहि तो न मूढ वळे ॥
आठवुनि जिंकित्या मज ती कोपें जेविं रिपुचमू ढवळे१०२॥
वरिलाचि मनें, व्हावा; परि त्या ती बायको नको पतिला ॥
आला तद्वदनें बहु, याहि,असें आयकोन कोप तिला॥१०३॥
रडतचि तपोवनाला गेली पावोनि उग्र ताप सती ॥
मजवरि दोष स्थापुनि वृत्त कथुनि करि सखेद तापस[8] ती१०४

१ ज्याच्या शरीरावरील सर्व शिरा स्पष्ट दिसूं लागल्या. जो अतिवृद्ध तो. २ समर्थ झाले. ३ भीष्माची. ४ दुसऱ्यानें जिंकिलेली. ५ पूर्वीं दुसऱ्याची झालेली. ६ भीष्माचा भाग. ७ जगाचा नाश करणाऱ्यानें. ८ तपस्वी करणारे.

त्यांसि ह्मणे "पावेना दीन भल्याच्या पदासमीप दरां ॥
माहेर हेंच, द्या वर हाच, पसरित्यें पदास मी पदरा ॥१०५
सांगा तो धर्म मला ज्या धर्में वर्ततात संन्यासी ॥
अन्यासि प्रेक्षींना वर्तेन सुखें वनांत वन्यासीं ॥ १०६ ॥
ज्या आश्रमांत जातां अतिबप्ताचाहि सर्व ताप सरे ॥
त्या आश्रमांत झाले तत्तापें तप्त सर्व तापस रे ॥ १०७ ॥

# अध्याय १३ वा.

## सारांश.

परशुरामाचा परम मित्र होत्रवाहन राजा हा अम्बेचा आजा. तो त्या वनांत आला. तो अंबेला ह्मणाला, वत्से परशुरामाचा आश्रय कर. इतक्यांत परशुरामाचा दूत अकृतव्रण आला. त्यानें सांगितलें कीं उद्यां ह्या वनांत परशुराम येईल. दुसरे दिवशीं परशुराम तेथें आला. होत्रवाहनानें त्यास सर्व वृत्तान्त सांगीतला. परशुराम—वत्से, तुझी काय इच्छा आहे? अंबा—भीष्माला मारावें. तें मान्य करून परशुराम कुरुक्षेत्रीं आला. त्यानें मला निरोप पाठविला. मी तत्काल गुरूला सामोरा गेलों. पूजासत्कार झाल्यावर गुरु मला ह्मणाला, भीष्मा तूं अम्बेला हरण करून आणून आतां तिचा स्वीकार कां करीत

१ भयाला. २ वनवासी अशी.

नाहींस?मी ह्मणालों,परस्त्रीचा स्वीकार करणें योग्य नव्हे.त्यानंतर रामानें मला उपदेशपूर्वक आग्रह केला व भय ही घातलें.पण मी भ्यालों नाहीं व आपली प्रतिज्ञा सोडिली नाहीं.मग परशुराम रागानें ह्मणाला. युद्धास सिद्ध हो.गुरूची आज्ञा वंदून मी नगरास आलों.सत्यवतीला तें वृत्त कळविलें.तिला वंदन करून तिचा आशीर्वाद घेऊन युद्धाची तयारी करून गुरूकडे गेलों. परशुरामाला वंदन करून त्याला ही युद्धाचें साहित्य दिलें.मग आह्मां दोघांचें युद्ध सुरू झालें.आमचें युद्ध पाहण्यास सुरर्षि राजर्षि ब्रह्मर्षिं ही आले.माझी माता गंगा,हिनें ही मला पुष्कळ निषेध केला. पण माझा कृतनिश्चय ढळला नाहीं. युद्धारम्भीं मीं रथावरून उतरून गुरूला नमन केलें. व हे गुरो, माझ्या जयाची इच्छा कर, अशी मीं गुरूची प्रार्थना केली. तेणेंकरून सन्तुष्ट होऊन परशुरामानें मला युद्धाची आज्ञा दिली.प्रथम रामानें मजवर बाण सोडिले. नन्तर मी त्यावर बाण सोडिले. दोघांचें मोठें तुमुल युद्ध झालें. तें चोवीस दिवस सारखें चाललें. शेवटीं स्वर्गस्थ पितर ऋषि देव ह्यांच्या आग्रहावरून रामानें आपलें धनुष्य खालीं ठेविलें. मग मींही धनुष्य खालीं ठेविलें व धांवत जाऊन रामाला नमन केलें. राम सन्तुष्ट होऊन ह्मणाला, पुत्रशिष्यांपासून पराभवाची इच्छा करितात, ती माझी इच्छा अनायासानें पूर्ण झाली. जा. तुझा सर्वत्र जय असो. असा माझ्यावर प्रसाद करून अंबेला ह्मणाला, वत्से, हा भीष्म मला अजिंक्य आहे. याशिवाय दुसरी तुझी इच्छा असल्यास सांग. अथवा भीष्माला शरण जा. ती क्रोधानें ह्मणाली.आतां मी वनाला शरण जातें.मग ती वनाला गेली. रामही माझ्या शरीरावरून हात फिरवून माझें समाधान करून

महेन्द्र पर्वतावर गेला. अंबेनें उग्र तपस्या केल्यावर शंकर प्रसन्न झाला. भीष्मपराभव व्हावा असा तिनें वर मागीतला. शंकर ह्मणाला—तूं प्रथम द्रुपदाची कन्या होऊन, पुढें पुरुष होशील; व भीष्माचा पराभव करशील. वरप्राप्तीनंतर अंबा यमुनातीरीं चिता तयार करून मद्वधाचा संकल्प करून परलोकास गेली. शंकराच्या वरानें द्रुपदास कन्या झाली. द्रुपदानें तिला मुलग्याचा वेष देऊन पुत्र झाला असें प्रसिद्ध केलें. सर्व पुत्रसंस्कार केले. व त्याचें नांव शिखण्डी ठेविलें. दशार्णदेशांचा राजा हिरण्यबाहु यानें आपली कन्या त्यास दिली. शयनगृहांत गेल्यावर तिला तो पुरुष नव्हे असें समजलें. तिनें तें वृत्त पित्यास कळविलें. हिरण्यबाहु युद्धास आला. शिखण्डीस तें समजतांच तो वनांत गेला. तेथें त्यास स्थूणाकर्णनामक यक्ष भेटला. त्यापासून शिखण्डीनें पुरुषत्व उसनें घेतलें व स्वनगरास येऊन आपला पुरुषभाव अनुभवास आणून दिला. यक्षास, त्याचा स्वामी कुबेर यानें शाप दिला कीं, तूं स्त्रीच होशील. यक्षप्रार्थनेवरून कुबेरानें उच्छाप दिला कीं, शिखण्डी मेल्यावर तुझें पुरुषत्व तुला मिळेल. असो शिखण्डीचा पूर्ववृतान्त असा आहे. स्त्रीनामा, पूर्वस्त्री व स्त्रीस्वरूप हें तिचे स्त्रीतुल्यच समजावे. याकरितां मी शिखण्डीशीं युद्ध करणार नाहीं.

**राजर्षि होत्रवाहन भृगुरामाचा सखा तिचा आजा ॥**
**तो पातला अकस्मात् तीर्थतपःपद[1] जसा भरत राजा ॥१॥**

१ तीर्थें व तपस्या करण्यांत परायण.

ब्राह्मण-कार्या-वांचुनि सोडावी कासि निजप्रतिज्ञा ते'॥ १२॥
अंबा वदे "प्रतिज्ञा शरणागतरक्षणार्थ सोडावी ॥
तुज ईश्वरासि दुष्कर काय? प्रभुजी सुकीर्ति जोडावी"॥ १३
राम ह्मणे "वत्से, तुज भीष्म नमिल, बहुमता मदाज्ञा त्या
लंघ्या नव्हे प्रतिज्ञा प्रतिपाल्या होय हे सदा ज्ञाया"॥ १४ ॥
काश्या[१] ह्मणे "वधा, कीं भीष्म ह्मणो निर्जितोऽस्मि[२] आजोबा॥
माजो[३] बाहुबळें न च्छात्र[४], बहु गुरुप्रताप साजो बा" ॥१५॥
अकृतव्रणाहि ह्मणे, "जी वर्णुत भृगुकुळगुरुप्रति ज्ञाती ॥
स्मरली मज, स्मरावी स्वामींनींही गुरु प्रतिज्ञा ती[५]॥ १६ ॥
वदलां त्यां शरणागत दंडुनि विप्रादि सर्व तारावा ॥
जो सर्व क्षत्र रणीं जिंकील प्रबळ तोहि मारावा" ॥ १७
भार्गव ह्मणे "विसरलों होतों कीं मीहि या प्रतिज्ञातां[६]॥
वत्सा, तुज धन्य ह्मणो आधीं, मग सर्व या[७]प्रति ज्ञाता॥ १८
सामेंचि कार्य होइल जरि, तरि युद्धासि काय कारण हो॥
न करील वचन जरि, तरि माराया भरतनायका[८] रण हो"॥ १९
ऐसें योजुनि घेउनि त्या मुनिमित्रांसमेत मुलगीतें ॥
प्रस्थान शीघ्र केलें त्या राजामरमहर्षिकुलगीतें[९] ॥ २०
येऊनि कुरुक्षेत्रीं राहे, सांगोनि पाठवी राजा[१०] ॥

---

१ काशीराजपुत्री. २ मी जिंकिला गेलों. ३ उन्मत्त होवो. ४ शिष्य. ५ प्रतिज्ञात विषयाला. ६ रामाला. ७ भीष्माला. ८ राजे देव व देवर्षि यांच्या समूहानें स्तविलेला. ९ हे दुर्योधना.

तो तें परिसोन तिला अंकीं घेऊनियां मुनिजनातें ॥
सांगे दौहित्री हे ऐसें, होवूनि साश्रु, निज-नातें ॥ २ ॥
अंबेसि ह्मणे "वत्से राम अधिष्ठुनि असे महेंद्रागा ॥
जा सांग नाम माझें, त्या प्रभुसचि गा, न तूं महेंद्रा गा॥ ३॥
तोंचि अकस्मात् तेथें अकृतव्रण पातला रहायास ॥
तो सांगे राम-सखा येणार उद्यां तुला पहायास ॥ ४ ॥
अकृतव्रणासि अंबा वंदुनि निज दुःख सर्वही कळवी ॥
तैसीच लोभ दावुनि सुकृताचा तद्दया तया वळवी ॥ ५ ॥
रामहि दुसरे दिवशीं भेटे निववूनि घे स्वकाय कवी ॥
नायक वीरांचा जो त्या तो राजर्षि सर्व आयकवी ॥ ६ ॥
येती शरण तुला जे ते जन सर्वत्र सत्पदा वरिती ॥
ऐसें प्रार्थुनि जोडी अंजलि घालूनि तत्पदावरि ती ॥ ७ ॥
राम ह्मणे "वत्से तूं आजवळा पावलीस, न वनातें॥
जें राजर्षिकडे या ब्रह्मर्षिकडेहि तेंचि तव नातें ॥ ८ ॥
अश्रु पुसोंदे, वांछित सांग मज, अनाथसी नकोचि रहूं ॥
आह्मांसि आपणासह या दुःखमहाभरें नको चिरडूं" ॥ ९ ॥
अंबा ह्मणे "असें हें झालें किति कथिल दुःख हे तूतें ॥
मारावें भीष्मातें या माझ्या परमदुःखहेतूतें ॥ १० ॥
भीष्मापुढें करावें बळ शाल्वें काय? काय मत्तातें? ॥
आजोबा साजो बा यश, मारीं त्या अतिप्रमत्तातें ॥ ११ ॥
राम ह्मणे "धरिन धनू जरि न विनवितिल मजप्रति ज्ञाते

१ नात. २ महेंद्रपर्वताला. ३ हा परशुरामाचा प्रिय सेवक. ४ उत्तम पदाला. ५ फार दुःखाला कारणभूत अशा (भीष्मातें.) ६ मदोन्मत्ताला.

धांवोनि भेटलों मी वेद धनुर्वेद पाठ वीरा जां ॥ २१ ॥
मत्कृतपूजन घेउनि राम ह्मणे "रे सुरापगांगभवा[1]॥
भक्त्यर्पित बहु[3] नाहीं- तरि काय असे दुराप गांग भवा २२॥
गरुडें सुधा, तसी त्वां हे अंबा,रण करूनि जरि हरिली॥२
तरि हरिलीनमतिजनें[4] संसृतिरुचि[5] तेंवि केंवि परिहरिली[6]" २
वदलों 'सत्य; भ्रात्या- करितां हरिली बळें; परं[7] स्वामी॥
वरिला शाल्व ह्मणे हे घेऊं जाणुनि कसें परस्वा[8] मी"॥२४
राम ह्मणे "शाल्व न घे, मानी हरि,गज परें दिला न वरी
त्वां जिंकिली यदर्थ त्वद्भ्राता तो करू इला नवरी"॥ २५
मी वदलों, "जें दुष्कर सुयशस्कर सांग काज रामा तें ॥
होइल अकीर्ति, देतां कां हा उपदेश काजरा मातें"॥२६ ॥
राम ह्मणे "त्वद्गुरु मी माझें सुखपुण्यकीर्तिजनक वच ॥
गुरुवचनासचि ह्मणती सर्व भले पुण्यकीर्ति जन कवच"२७
मी बोलिलों "असें तों न घडेल कधीं; दयानदा पावें॥
गुरुनें, ज्यासि अधर्मा-चरण न माने, तया न दापावें"॥२८
राम ह्मणे "होय सुखी निजगुरुचें वचन शिष्यजन करिता

१ ज्या रामाला. २ सुर—आपगा—अंग—भव ह्म० देवांची नदी गंगा, हिच्या शरीरापासून जन्म ज्याचा, त्या भीष्माला. ३ भक्तीनें अर्पिलेलें उदक शिवाला बहु प्रिय होतें, नाहींतर त्यापाशीं गंगा नाहीं काय? तुझी पूजा भक्तीवांचून व्यर्थ होईल, हा रामाच्या मनांतील भाव. ४ हरीच्या ठायीं लीन झाली मति ज्याची, त्या जनानें. ५ संसाराची आवड. ६ टाकिली. ७ परन्तु. ८ दुसऱ्याच्या वस्तूला.

नातरि गुरुकुंभभव-क्षोभें छात्रामृतांशुजनक रिता ॥ २९ ॥
हे सर्वमता साक्षात् दुर्गासी सर्व कामदा ज्ञात्या ॥
लंघील खळमहिपसा जो, नकरिल भस्म कां मदाज्ञा त्या ३०
झाले पशुचि; न वाहुनि शृंगा पुच्छा वळी मुठा, राजे ॥
तैसे ते न क्षितिवरि आढळले, न वळले कुठारा जे ॥ ३१ ॥
अज्ञ गुरुपुढें "असें तों न घडेल कधीं" असें कसें वदसी ॥
असतां समर्थ अघटित- घटना-पटु मत्कुठार हा सदसी ३२॥
खचसील कौरवा तूं कीं बहु चढला तुझा मद सिगेला ॥
लंघावया पहासी? गांवाला काय रे मदसि गेला ॥ ३३ ॥
वधिले क्षितितळवर्ती क्षत्रिय म्यां एकवीसदा सारे ॥
माझा प्रताप गातां रुद्रभ्रमें दे कवीस दासा रे" ॥ ३४ ॥
ऐसें भलतेंचि वदे वर्णावा मुख्य जो गुरु गुरूनीं ॥
पाहे राम मजकडे जेंवि हरिकडे हरी गुरुगुरूनी ॥ ३५ ॥
वदलों धर्म-न्यायें "हा देह तपोवनांत राबावा ॥
त्यजुनि दुराभिमान, धरुनि शांतिसि, तारुनि जनांतरा, बावा ॥

१ गुरु हाच कुम्भभव (अगस्ति) त्याचें क्रोधानें. २ छात्र (शिष्य) हाच अमृतांशु (चन्द्र) त्याचा जनक समुद्र. ३ बैल इत्यादिकांचे पाठीला खोगीर इ० न लागावें ह्मणून उशीसारखे दोन अवयव एकत्र शिवून जी तयार करितात, ती ४ ओझें घालण्यापूर्वी बैलाचे पाठीवर गादीसारखा एक पदार्थ ठेवितात, तो. ५ न घडणारी गोष्ट घडविण्यास समर्थ. ६ उत्तम खड्ग. ७ मद्—असि. ८ पृथ्वीच्या पृष्ठावरील. ९ हा राम नव्हे, शंकर आहे असा भ्रम. १० राहावा.

ठाव्या आहेत मला सांगा गोष्टी यथेष्ट अन्या या ॥
तरि भय भलत्यापासुनि होइल, जरि मी करीन अन्याया ३७
वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव समज ॥
देवांसि मागते तें झाले मरणीं करूनि नवस मज ॥ ३८ ॥
गेलें गुरुत्व तुमचें कांहो ह्मणतां वधीन अनवार्ते ॥
येइल पदरांत कसें यश धर्म-न्याय-निष्ठ-जन-घातें ॥ ३९ ॥
सच्छिष्याला विद्या गुरु झांकायासि काय हो शिकवी?॥ "
पांडित्य पहा माझें पाहानि मला ह्मणाल होशि कवी" ॥४०
हांसुनि राम ह्मणे "रे हितकर गुरुवचन कां न आइकसी॥
साहेल तुझी तुझिया दुःसहशोकानलासि आइ कसी ॥ ४१ ॥
भीष्मा, मज सिंह गणीं वेड्या तूं आपणासि कलभ गणीं ॥
न रविपुढें मिरवेसें चंद्रींहि; कसें असेल बल भगणीं ॥४२॥
देसिल सत्यवतीतें शोक, बहुत रडविशील गंगेतें ॥
समज वरं मददूषित जें जें तेज क्षणांत भंगे तें ॥ ४३ ॥
हो सिद्ध, ये, हरीनें व्यसु आला तो करेणु केला हो" ॥
हो गंगेला शोकद तोखर्द हें तोकं रेणुंकेला हो ॥ ४४ ॥
सिंधूंत नगं जसा कपि तैसा पाहोनि गर्वनग रामीं ॥
वंदानि, येतों एसें बोलुनि आलों फिरोनि नगरा मी ॥४५॥
सत्यवतीतें सांगुनि नमुनि तदाशीःप्रसाद घेऊन ॥
हा गुरुचें दर्शन घे हेमंतीं जेविं अधन घे ऊन ॥ ४६ ॥

---

१ देवाजवळ. २ माझे पूर्वज तुह्मांपासून वध पावते समयीं तुमचा गर्वपरिहार करणाऱ्या अशा मला, देवाला नवस करून मागते झाले. ३ निरपराधी जनाला. ४ बालगज. ५ नक्षत्र मण्डलांत ६ गतप्राण. ७ गज. ८सन्तोषप्रद. ९ अपत्य. १० राममातेला. ११ मैनाक.

आह्मां गुरुशिष्यांचा अत्यंताद्भुत पहावया समर ॥
आले बहु सुरराज- ब्रह्मर्षिसमेत सर्वही अमर ॥ ४७ ॥
पुत्रस्नेहें मातें ये वाराया भिऊनि देवधुनी[1] ॥
हनु धरुनि ह्मणे "बा हां काळकरीं बहु भटांसि दे वधुनी४८
अनुभावें[3] न, जितावे भावें, गुरु देव सर्वथा पटुनी ॥
उठविति अनर्थ खिजतां; रिझतां पुरुषार्थ सर्व थापटुनी" ।
सांगोनि कलहकारण वदलों "गंगे, वृथा न क्लेपावें ॥
रामापरि[4] मज तूंही निजधर्मच्युत करूंनको; पावें"॥ ५० ॥
सुतजीवदान मागे पसरुनि रामा नदी नता पदर ॥
नमुनि ह्मणे "शरण तुला येतां पावे न दीन ताप दर॥५१
आग्रह कां करितां हो प्रभुजी द्या अभय बाळका [illegible]वा॥
न गिळी कटुक-रस ह्मणुनि कोप करुनि काय बाळ कापावा"
राम ह्मणे "गंगे, जें विद्यादिगुणेंकरूनि माते तें ॥
दावी वंध्येहुनि बहु कदपत्यें[5] उणें करूनि मातेतें ॥ ५३॥
या ऐशाही गुरुचें जो वेदवचनसखें[6] वच न मानी ॥
तो हा मानील कसें तुज गुरु मानुनि तुझें वचन, मानी ॥५४
करितां आज्ञा त्याच्या स्पर्शेन शिरा सुरापगे[7] हातें ॥
त्यजिल मदाशी-साध्वी नाहीं तरि त्या सुरापं[8]-गेहातें॥५५ ॥
रक्षावाचि सुत असें त्वच्चित्तीं जरि असे महाभागे ॥

---

१ देवांची धुनी (नदी) गंगा. २ राम. ३ पराक्रमानें. ४ रामाप्रमाणें. ५ वाईट अपत्य. ६ वेदवचनाचें मित्र ह्म० वेदवचनासारखें. ७ गंगे. ८ मद्यपी.

गंगे जा वाटेवरि आण, अभय द्यावया न हा भागे" ॥ ५६॥
पुनरपि माय मज ह्मणे "न विलंघावें धरूनि हठ नातें ॥
गुरु हरि हर बहु रतले गुरुचरिताच्या करूनि पठनातें"५७
शतदा उपदेशौषध हा संरक्षावया स्वसुत पाजी ॥
ती कां विटेल? वेंची नित्य पतितशताहिता स्वसुतपा जी॥५८॥
अत्याज्य सुप्रतिज्ञा- ग्रह निजकुलधर्म सन्नय नरा हे ॥
तैसें कसें करावें, 'जेणें एकहि न सन्नयन राहे" ॥ ५९ ॥
सिंधु ह्मणे "कोण असी माता जोडील हात पोराशी ॥
शिष्य असा, मग आग्रह कैसा सोडील हा तपोराशी"६०॥
जों माय ह्मणे "देइल, हा हरि तुज मुग्धसिंधुरा मरणा ॥
मजवरि येता झाला, तोंचि यशोदुग्धसिंधु राम रणा॥६१॥
बैसा रथीं कवच घ्या, ऐसें ह्मणतां ह्मणे "उणें काय ॥
पूर्ण असे हा माझा चिंतामणिकोटिगुरु गुणें कार्य ॥ ६२ ॥
रथ भूमि, वेद वाजी, गायत्री कवच, सारथी वात॥
या साहित्यें आह्मां काळाऽधिक कोण जोडिना हात"॥ ६३॥
ऐसें वदतांचि दिसे, दिव्यरथीं दिव्यकवच तो हरसा॥
मोहे देवांचीही मति केवळ पावली न मोह रसा ॥ ६४ ॥
ठेवूनि चाप करींचें उतरूनि रथावरूनि पद नमुनी ॥

---

१ शेंकडो पातकी जनांच्या हिताकरितां. २ आपल्या उत्तम तपाला. ३ टाकण्यास अयोग्य. ४ दृढ प्रतिज्ञेचा आग्रह. ५ नदी(गंगा) ६ मूर्ख हत्तीला. ७ कोटिशः चिन्तामणींचा गुरु. ८ देह.

मम जयमाशास्व[1] असें प्रार्थियला कीर्तिकेलिसदन[2] मुनी ॥
मज राम ह्मणे "नमन न करितां, करिताचि हानि शापानें
वंदावा गुरु हर्षद अमळद्विजराज[3] हा निशापानें[4] ॥ ६६ ॥
भीष्मा मजला ह्मणसी जरि जयमाशास्व मे विभो राम[5] ॥
तरि संप्रति जैसा तूं जयकाम तसाचि हाहि जयकाम ॥ ६७ ॥
झालों प्रसन्न मी या त्वच्चरितें तूंचि शुद्ध समयज्ञ[6] ॥
हूं बैस रथीं घे धनु सत्फलद न अन्य युद्धसम यज्ञ[7] ॥ ६८ ॥
नमुनि रथीं बैसुनि मी वदलों 'गुरुजी, न हार नत[8] पाहो ॥
तुमच्या[9] न ब्राह्मण्या न श्रुतिवृंदा प्रहार न तपा हो ॥ ६९ ॥
स्वीकारिला तुह्मीं जो असमुचित[10] क्षत्रधर्म साधूंनीं ॥
खंडीन त्यासि, होइन सन्मत, हें साधुकर्म साधूनी, ॥ ७० ॥
करिता झाला मजसीं माझा गुरु राम संगरारंभा ॥
पाहों ये योगिचमू जसि सोडुनि कामसंगरा रंभा ॥ ७१ ॥
प्रथमचि सोडी मजवरि मद्गुरु शरवर्ष कार्यहानिकर[11] ॥
तैसेंचि हाहि शिष्य, प्रेक्षक जन ह्मणति काय हा निकर ॥ ७२ ॥

---

१ माझ्या जयाची इच्छा कर. २ कीर्तीचें विलासमन्दिर. ३ निष्कलंक ब्राह्मणश्रेष्ठ. ४ चन्द्रानें. ५ हे विभो राम, मे जयमाशास्व. हे प्रभो, रामा, माझ्या जयाची इच्छा कर. ६ स्वधर्मज्ञ, ७ स्वधर्म. ८ नत (नम्र-भीष्म) हार (पराजय) न पाहो. ९ तुमच्या शरीरांत राहणाऱ्या ब्राह्मणत्वाला, वेदांला, व तपाला मी प्रहार करीत नाहीं. १० अयोग्य. ११ शरीराचा नाश करणारा.

झांकिति समरीं शतदा आह्मां देवर्षि सत्प्रसूनगणीं ॥
निज-वीरसूत्व निरुपम सुकृतफळ; परंतु मत्प्रसू न गणी ७३ ॥
बाणांहीं मी गुरुच्या, गुरु माझ्याही, करी रथा पिहित ॥
शस्त्र-प्रहार यद्यपि अहितचि; गमले मना तथापि हित ॥ ७४ ॥
प्रथमदिनीं म्यां गुरुच्या धनुची पण करुनि तोडिली कोटी
मजवरि तीक्ष्णशरांची गुरुनें कोपोनि सोडिली कोटी ॥ ७५ ॥
पळमात्र पावली शर मर्मीं शिरतां मदीय तनु कंपा ॥
नाहीं गडबडलों कीं मजवरि गुरुचीच पूर्ण अनुकंपा ॥ ७६ ॥
मग मी झालों गुरुच्या मर्मीं शतसंख्यबाण शिरकविता ॥
संधानशक्ति माझी कांपवि तद्धृदय, जेंवि शिर कविता ७७ ॥
क्षण मूढसाचि झाला क्षतजें प्रभु न्हाणिलाचि भल्लांनीं ॥
मल्ला निष्क्रिय केलें जाणों कवळुनि अनेकमल्लांनीं ॥ ७८ ॥
हा रे भीष्मा मंदा जपला गुरुवत्सल व्रता कुरु ज्या ॥
तें बुडविलें तुवां कीं. हा! न कुसंतति भली, भली कुरुजा ७९ ॥
गुरु हरिहर कीं, धिक् त्वां करिसि न करवेल लांडग्याला जें
दे जीव, जा; भल्याला दावाया तोंड दांडग्या लाजें ॥ ८० ॥
असि आपलीच आपण केली निंदा बहु प्रथम-दिवसीं ॥

१ उत्तम पुष्पांच्या समूहानें. २ आपलें वीरमातृत्व. ३ माझी माता. ४ आच्छादित. ५ धनुष्याचें टोंक. ६ रक्तानें. ७ लोहमय बाणांनीं. ८ व्यापारशून्य. ९ गुरूविषयीं ममताळु. १० वाईट रोग. १२ तुला धिक्कार असो.

कीं विप्र पुरोडाशं, क्षत्रकुळें त्यांपुढें जसीं दिवसीं ॥ ८१ ॥
दुसरे दिवसीं मजवरि शस्त्रें अस्त्रें हितें गुजें योजी ॥
तेव्हां वदलों स्वामी हें केलें भग्न म्यां, दुजें यो जी॥८२ ॥
मज डावलूंनि मद्गुरु भेदी भल्लेंकरून हें उर तें ॥
सांगों काय तुज नृपा नसती श्रीगुरुकृपा न हें उरतें॥ ८३ ॥
मत्सूत मला मागें मूर्छा येतांचि तत्क्षणीं काढी ॥
बा दीग वेदना अनु- भविल्या, समरीं परंतु ही गाढी॥८४॥
मागें हळूच मद्रथ सारथि ने जीर हरींस न पिटाळी ॥
मेला खळ ह्मणुनि पिटिति, मुनि;रामजयीं जसेंचि कपि टाळी॥८५
अंबेचा तर्क किती? पिटिती अकृतव्रणादि कवि टाळी॥
हा हा देवहि ह्मणती, गुरुचि निजगंभीरतेसि न विटाळी॥८६
रामाश्रितसाधूंची दूर करी गर्जनाचि मन्मोहा ॥
माय ह्मणे "रडवाया न परसतीच्या कुशींत जन्मो हा॥ ८७
म्यां सावधान होउनि रथ फिरवुनि बाण सोडिले बहुत॥
रामप्रतापदहनीं झालेचि न लागतां विलंब हुत ॥८८ ॥
मग म्यां मूर्छित केला, कालोग्रशरव्रजें उरोनिहितें॥
गमलें यावरि न करिल गुरु, शिष्यांचीं जगीं उरोनि हितें ८९.

---

१ ब्राह्मण पुरोडाश ( हवनीय द्रव्याचें शेष ) होत. २ विप्रांपुढें. ३ बाजरीच्या पिठाची उकड काढून तिचे केलेले पदार्थ. ४ डावा घालून. ५ प्रबल. ६ आपल्या गांभीर्याला. ७ दुसऱ्या सतीच्या. ८ रामाचा पराक्रम हाच अग्नि, त्यांत. ९ दग्ध. १० कालाप्रमाणें उग्र अशा बाणसमूहानें. ११ हृदयांत मारिलेल्या.

मागूनि घेतलें गुरु- देवा म्यां आंग कांपत नमुनि तें ॥
बसला अशनिसम उरीं शर मग व्हावें न कां पतन मुनितें ९०
कल्पांतीं भानु तसा राम पडे भूवरी रथावरुनी॥
घालूनि उडी अकृत- व्रणसूत धरी शरीर थावरुनी ॥९१ ॥
जल वायु घालिती किति किति जपती शांतिसूक्त तापस रे॥
यत्नशतें चिरकाळें हळुहळु भृगु-राम-मोह-ताप सरे॥९२ ॥
उघडुनि दृष्टि गुरु ह्मणे "भीष्मा माझ्यासमोरचि रहा रे ॥
उग्राही भुजगासीं करितां संगर न मोर चिर हारे ॥ ९३ ॥
मत्पार्श्वीं मज हाणीं मेलासि असें ह्मणोनि रोपानें[1]॥
कोपानें क्षत्रक्षत- जांचीं[2] आला करीत जो पानें ॥ ९४ ॥
चुकलें दैवें, देह न त्या आघातीं रणीं रहावा तें ॥
झालों सकंप पळभरि होय महातरु जसा महावातें॥ ९५ ॥
कांपविले शर मभीं हाणुनि माझे भृगूद्वहें[3] घोडे ॥
मोडे धैर्य न त्याचें तेजस्वी शोधितां तसे थोडे ॥ ९६ ॥
गुरु खवळलाचि होता मीहि बहु तसा कधींच न खवळलों ॥
एकामेकांवरि मग साक्षात् कल्पांतमेघसम वळलों ॥ ९७ ॥
घातास कीं शिराया न दिली पदवी[4] रविप्रकाशाला ॥
इतरां मीच, न होइल मग तापद वीर विप्र काशाला ॥९८॥
शर कोंदले नभीं, बळ त्यांचें अन्योन्य-खंडनीं न चले ॥
नच लेश उरे, स्वोत्थ[5]- ज्वलनें होऊनि दग्ध ते खचले ॥९९॥

---

१ बाणानें. २ क्षत्रियांच्या रक्तांचीं. ३ भृगुनायकानें. ४ मार्ग.
५ स्व—उत्थ इ० ह्म० आपणापासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें.

उतरीं संध्याकाळीं नित्य स्वधनुर्गुणासि कवि राम ॥
मूर्छेविना न आह्मां- मध्यें प्रेक्षकजनींहि न विराम ॥ १०० ॥
म्यां त्या समरमखाच्या प्रारंभीं स्वगुरुचे सदा चरण ॥
अवसानींहि नमावे कीं मज हें बहु रुचे सदाचरण ॥१०१ ॥
तिसरेदिवशीं केला जो दिव्यास्त्रप्रयोग तच्छमना ॥
करितां झालों राया कीं मी गुरुदेवभक्त अच्छमना ॥१०२ ॥
गुरुनें जी पाठविली मग कृत्यासीच शक्ति बा राजा ॥
ती,त्याहि, खंडिल्या म्यां आल्या अत्युग्रशक्ति बारा जा १०३
पुनरपि सोडुनि शक्ति प्रकटी दिव्याऽस्त्र तें न कथवे गा ॥
मद्रथवेग गुरुपुढें किति? करिता रुद्ध भानु-रथ-वेगा॥१०४॥
खरतर शर प्रकटले जिकडे तिकडे अनंत राजा रे ॥
खंडाव्या किति तरि त्या शक्तिशरतती अनंतरा जा रे१०५ ॥
स-तुरग-सारथि-रथ मी झालों शुक, गुरुशरौघ पंजरसा ॥
शर शिरकले शरीरीं कंजीं अलि शिरति जेंवि कंजरसा१०६
मद्रथरत्नीं शिरले बहुत शिलीमुख जसे कुशलभे वनीं ॥
कीं सर्वस्व हराया तस्कर बहु ज्या वसे कुशल भवनीं१०७ ॥
सुरहि मुरडिती, चुकलों ह्मणउनि, मग कां न कान नर हातें
रे काय दवाग्निपुढें पसरूनि दुकान कानन रहातें ॥१०८ ॥

---

१ त्याच्या शान्तीकरितां. २ निर्मल अन्तःकरण ज्याचें, तो. ३ ज्या. ४ शक्ति व शर यांच्या पंक्ति. ५ अन्तररहित. ६ कमलांत. ७ मकरन्दाला. ८ बाण. ९ दुष्ट टोळ. १० कल्याण.

तेव्हां जें केलें तें कथितों, सादर कथेंत मन घाला ॥
विव्हल करिता झालों मी मजहुनि फार त्याहि अनघाला॥१०९
उरलों विकळहि होउनि; तिसरा तो वेंचलाचि अस्तां गा ॥
राहे रण, प्रकाशा आटोपुनि मित्र जाय अस्तांगा॥११०॥
चवथे दिवशीं संगर संगरहितबुद्धि तो करी राया ॥
मारुनि मत्सूतातें डसवी शरसर्प शत शरीरा या ॥१११॥
अतितेजस्वीषुवरें मद्धृदया होय तो विदारविता ॥
तत्काळ मला आली शशिता,त्या युद्धकोविदा रविता॥११२॥
स्वरथावरूनि बाणाऽऽघातें उसळोनि पावतां पतन ॥
वरिचेवरि भव्यपुरुष आठ करिति सांवरूनि मज जतन११३॥
ते एकदांचि वदले माभैःस्वस्त्यस्तुते असें हित रे ॥
झालों स्वस्थ सदुक्तें सर्वहि संकट असो कसेंहि तरे ॥११४॥
त्या विप्रांसि नमुनि म्यां पुशिलें कीं रण पुन्हा करूं निकरें॥
बसतों तों माय रथीं आहे मत्तुरगगुण धरूनि करें॥ ११५॥
गंगेसि नमुनि वदलों मत्सारथि तव-कृपाकटाक्ष महा ॥
याचि बळें दिग्गिभांच्या आहे भेदावया कटां क्षम हा॥११६॥

---

१ पापरहिताला. २ असतां. ३ सूर्य. ४ अस्ताचलाला. ५ कर्माच्या कर्तृत्वाचा अभिमान व कर्मफलाशा यांनीं रहित बुद्धि ज्याची तो. ६ अतितेजस्वी अशा श्रेष्ठबाणानें. ७ युद्धनिपुणाला. ८ मा—भैः—स्वस्ति—अस्तु—ते ह्म० भिऊं नको, तुझें कल्याण असो. ९ माझ्या घोड्यांच्या दोऱ्या. १० दिग्गजांच्या. ११ गण्डस्थळाला.

आशी तुजी समर्था स्वन्यूना त्वां इला न लेखावें ॥
देखावें कुतुक, परें देवीसिंहासि काय गे खावें ॥ ११७॥
देवसतींत विमानीं बैसोनि सुखें दुरूनि समर पहा ॥
गुरुघर-सारथि ज्याचा त्यासीं भांडुनि ह्मणेल अमरप हा ११८
वरितील मजचि सुयशें केलीं हरिपादनखसुते जितकीं ॥
बहु मच्छिरो-निषंगीं गुर्वाशीर्वादशर सुतेजित कीं॥ ११९ ॥
"तरसील द्विभुज कसा? यासि न समरीं सहस्त्रबाहु तरे॥
बहु झाले या मूर्त- प्रलयज्वलनीं पडोनि बाहुत रे"॥१२०॥
ऐसें वदे रडे तनु- जप्रेमांचा न आवरे उत रे ॥
मज आलिंगुनि, हुंगुनि माथां, माता रथावरुनि उतरे १२१
सारथ्य युद्ध-तांडव शस्त्रास्त्रपयोधरा गुरुसमोर॥
करिता झालों मीच, न केलें म्यां स्वर्गगां कुरुस मोर ॥ १२२॥
जोडुनि कर सोडुनि पर- सर्प-प्राणांतका शरा मोरा ॥
झालों विदारिता मी केवळ यमसन्निकाश रामोरा॥१२३॥
क्षितिसह गुरुतनु कांपे पावे उल्कासमेत पतनातें ॥
रक्षिति सर्वस्वें मुनि सर्व; जसे वृत्तिमंत वतनातें ॥ १२४ ॥

---

१ आपणाहून कमी. २ दुसऱ्या सिंहानें. ३ इन्द्र. ४ विष्णुपदनखाच्या कन्ये, गंगे. ५ माझें शिर हाच भाता, त्यांत. ६ गुरूचा आशीर्वाद हाच शर. ७ उत्तम पाजळलेला. ८ सहस्रार्जुन. ९ मूर्तिमान प्रलयकाळचा अग्नि अशा रामावर. १० पुत्रप्रेमाचा. ११ युद्धरूप नृत्य. १२ शस्त्रास्त्रांचा मेघ, अशा. १३ स्वर्गांतील. १४ शत्रुरूप सर्पाचा प्राणनाशक. १५ यमसदृश. १६ रामहृदयाला. १७ आकाशांतून जो अग्निरूप तारा पडतो तो, त्या सहित.

जलधींत बुडे, कीं त्या शकला न सख्यासि अर्क राखाया॥
मित्रत्व हेंचि घ्याया कीं लागे अन्य शर्करा खाया॥१२५॥
ऐसें तेवीस दिवस झालें युद्ध त्रिलोकमोहन हो ॥
ह्मणतांचि होतों देवा समयीं समरक्रतूंत[१] मोह न हो॥१२६॥
चिंताकुळ मी निजलों प्रार्थुनि पितृविप्रदेवता राया ॥
ते पूर्वदृष्ट आले स्वप्नीं मज विप्र देव ताराया ॥ २७ ॥
वदले भिऊं नको गा भीष्मा भ्यालासि कां महाबाहो॥
स्मरशील प्रस्वापन त्या अस्त्रें सिद्ध काम हा बा हो१२८॥
निजला तो मेलाचि प्रस्वापास्त्रें[२] गुरूसि मार कसा ॥
तारक साचा गमसिल अस्त्रें; संबोधनें[३] न मारकसा॥१२९॥
वर्णावा सदनुग्रह किति झाला फार तो विसावा हो ॥
जागा झालों, आला युद्धाचा दिवस चोविसावा हो॥१३०॥
मग तुमुल लोमहर्षण[४] अद्भुत युद्ध प्रवर्तलें बा गा ॥
झाला असेल कंप क्षितिकंपें क्षितिधरा महानागा ॥१३१॥
पूर्वदिवसप्रहार- क्रोधें तो क्षत्र-कुळ-महाशत्रु ॥
बहुशक्ति शक्ति सोडुनि फोडुनि टाकी मदीय हें जत्रु[६]॥१३२॥
विमलाऽतुळबळसागर[७] घागरभर रक्त ओकवी राजा ॥
तेव्हां मेलाचि असें मानिति जन सर्व लोक वीरा जा १३३
ज्यां रोविला ललाटीं शृंगापरि शर धरूनि आवांका ॥

---

१ युद्धरूप यज्ञांत. २ झोंप आणणारें अस्त्र. ३ जागृत करण्यानें. ४ रोमांच उठविणारें. ५ शेषाला. ६ बाहु व मस्तक यांचा संधि. ७ निर्मळ निरुपम अशा बलाचा समुद्र राम. ८ ज्याला.

कोपें मनांत वदलों गुरुजी आतां करूनि आ वांका॥१३४॥
हाणी गुरु शर कठिनहि माझें त्या [1]सुकठिनों न [2]वक्ष तरे॥
पडलों क्षितिवरि,जाणों झालें बाळासि तें नव क्षत रे१३५॥
आली संज्ञा, बसलों स्वरथीं, झाल्या विभीत शक्ति-मती ॥
मग शक्ति हाणिली म्यां श्रीराम भुजांतरांत शक्तिमती१३६
स्वरथावरूनि मूर्च्छित होउनि मुनिवीरमुकुटमणि खचला॥
उठकुनि सूत ह्मणे यश गेलें कीं,खळवधार्थ [3]अणिखं चला१३७
मोह हरुनि देउनि कर अकृतव्रण सारथी रथीं चढवी ॥
कढवी क्रोध मनीं बहु योजावें ब्राह्म अस्त्र हें पढवी॥१३८॥
ब्रह्मास्त्र योजिलें मग मज भस्म करावया [5]शुचिकथानें ॥
जन ह्मणति बळें शिशुला पाजावा काय हो [6]रुचिकं थानें१३९
अनघा बरवा न असा अत्युग्राचार, [7]अननघा बरवा॥
त्यजिलें [8]अकृपपण पुन्हां स्वीकारुनि साधुमन न घाबरवा१४०
गुरुकर्म गुरुप्रिय मी करिता झालों तसा न होत्सा हें ॥
ब्रह्मास्त्रावरि म्यांहि ब्रह्मास्त्रचि योजिलें महोत्साहें ॥ १४१॥
ब्रह्मास्त्रद्वयतेज [9]व्योमीं व्योमगजना न फटकों दे ॥
सर्वत्र तें [10]तृणीकृत- कल्पांतरुषितसहस्रफण कोंदे ॥ १४२ ॥

---

१ अत्यन्त कठिन अशा बाणाला. २ हृदय, ३ भयरहित. ४ आणखी. ५ शुद्ध आहेत कथा ज्याच्या अशा रामानें. ६ रुईचा चीक. ७ पाप्याला. ८ निर्दयपण. ९ आकाशांत संचार करणाऱ्या जनास. १० तृणतुल्य केला आहे,प्रलयकालचा सहस्रफणांचा शेष ज्यानें तें. दैनन्दिनप्रलयकाळीं शेषमुखांतून अग्निज्वाला उत्पन्न होऊन अतलादि एकादश भुवनें भस्म होतात; असें वर्णन आहे.

देवर्षि ब्रह्मर्षि क्षत्रर्षि[1] व्योमभूमिचर[2] सारे ॥
झाले सुतप्त, गमला हा गुरुहि क्रुद्ध शुद्ध हरसा रे ॥ १४३ ॥
ह्मणति नभश्वर आह्मीं सोडुनि कोणीकडे नभा जावें ॥
बापा ब्रह्मास्त्रानें आह्मां शरणागतां न भाजावें ॥ १४४ ॥
मज पतनीं रक्षाया करिती जे विप्र आठ वेगातें ॥
त्यांहीं कथिलें होतें जें प्रस्वापास्त्र, आठवे गा तें ॥ १४५ ॥
अस्त्र स्मरसील असा देती ते विप्र आठ वर हा या ॥
तो हेतु होय समयीं याच्या चित्तास आठव[3] रहाया ॥ १४६ ॥
प्रस्वापनप्रयोगी रामाचे बाण ते जन पहाते ॥
जे व्योमगत महीगत ह्मणति सकळ जाणते जनप[4] हा ते १४७
प्रस्वापनप्रयोगो- पक्रम करितांचि साधु सुर सारे॥
मज ह्मणति पारिजातें हि न लंघावी कदापि सुरसा रे१४८॥
नारद ह्मणे करावा न प्रस्वापप्रयोग शांतनवा ॥
कां क्षोभलासि बहु तूं जन्माचा शांत कीं न शांत नवा१४९॥
कैसाहि असो गुरु, बहु मान्यचि, चित्तेंहि लंघ्य न भल्याला॥
पूज्यचि दक्षमखांतक[6] ज्न्हि[5] आस्थि भुजंग भस्म नभ ल्याला[7] १५०
अवमान स्वगुरूचा त्वां न करावाचि हा असामान्य ॥
ब्रह्मण्य[8] ब्राह्मण हा लोकीं तापस नसे असा मान्य॥१५१ ॥
गुरुचरणावरुनि सदा वोवाळुनि सांडिती असु ज्ञाते ॥

---

१ राजर्षि. २ आकाशांत व भूमीवर चालणारे. ३ आठवण. ४लोकपाल. ५मुंगुसवेल. ६शंकर. ७नभ ल्याला ह्म० आकाशरूप वस्त्र पांघुरला; दिगंबर झाला. ८ब्राह्मणभक्त.

सुज्ञा हरिहरसे जे गुरुचरण, न मानती असुज्ञा ते॥ १५२ ॥
ते गगनग अष्ट पुरुष वदले देवर्षिवच न मोडावें ॥
जोडावें यश भीष्मा त्वां न प्रस्वापनास्त्र सोडावें ॥१५३ ॥
तें ऐकुनि म्यां केलें ब्रह्मास्त्राचें पुनःप्रदीपन गा ॥
रामास भासलों मी कल्पांतींचा जसा नदीप नगां ॥ १५४ ॥
राम दिसे विप्रर्भ, तें अद्भुतचि, जसा रवि प्रभा वमला ॥
निंदूनि ह्मणे कळला आतांचि असार विप्रभाव मला १५५॥
जमदग्निप्रमुख पितर रामातें ह्मणति, काय हा निकर॥
वत्सा, तुज अनुचित हा परधर्म स्व-पर-काय-हानिकर१५६
दिसतोसि शीतकरसा हा समर ग्रीष्म,भीष्म हा तप न॥
हा तपनसा तसा तूं पारि ह्मणवी सेवित्यासि हा तपन॥१५७॥
हा देव कीं सुरनदी- नंदन आठां वसूंत अन्यतम॥
तुज जिंकुनि भीष्म जसा वांचुनि झालासि तूंहि धन्यतम१५८
याचा मृत्यु विधिविहितें शक्रसुत नराऽवतारं जो भावी ॥
परशक्ति यापुढें जसि न रविपुढें दीपदीप्ति शोभावी ॥१५९॥
सिंधूसि जेंवि मानव बाहुबळें तेविं यासि न पर तरे ॥
येथुनि परत, मग करुनि हट मठ सांडुनि कदापि न परत रे
राम निवृत्त न होतां मत्पितर ह्मणाति मला अगा साधो ॥
तुज निज धर्मौदार्यें यश, हें न स्वर्गगा-अगा साधो॥१६१॥

---

१ मान्य होत नाहींत. २ समुद्र. ३ पर्वताला. ४ तेजो-हीन. ५ ब्राह्मणत्व.६ चन्द्रासारखा.७ब्रह्मदेवानें नेमलेला.८अर्जुन.

राम तुजा गुरु याचा   रक्षावा मान मानदा मानीं ॥
बांधी बाहुगुणांनीं[1]   दक्षा-वामा, न मान दामांनीं[2] ॥ १६२॥
वदलों, क्षत्रिय मी, कां   परतेन प्रथम धर्म सोडूनी॥
राम ह्मणे घ्यावी म्यां   कीं शिष्यें हार हात जोडूनी १६३
न मना ये जें असकृत्[3]   कथिति पितर इतर नारदादिहि तें ॥
क्रोधिहृदय गुर्वक्षर   मोडी कीं मूल लाडिकें लिहितें॥१६४॥
झालों रणविमुख न मीं   विनविति जऱ्हि मुनि धरूनि मद्धनुतें[4]॥
गुरुकरवों विज्यं[5] बळें   कराविति अनिवर्तिकीर्ति[6] मद्धनु तें१६५॥
ह्मणति प्रणति गुरुप्रति   कर मज ते मूर्त आठ वेदेश[7] ॥
रामें प्रथम स्वधनु   त्यजिलें तो नित्य आठवे देशीं[8] ॥१६६॥
मन्माताहि ह्मणे रे   हो न यशोहानि वासरा मन मी ॥
कितितरि समजावूं निज-   भव्याचा[9] हा निवास राम नमीं१६७
पहिल्यापासुनि गुरुवाक्-   ग्रहणीं सादर मदीय कान मन ॥
मग धर्म-यशस्कर-गुरु-   चरणासि करीन मी न कां नमन १६८
धांवूनि पाय धरितां   आशीःसूक्तें सुखें वदे हातें ॥
स्पर्शे माथा मद्गुरु   निववाया दे सुखेंवं[10] देहातें ॥ १६९ ॥
प्रेमें असें ह्मणे या   लोकीं या भार्गवीं रविप्रतिमीं ॥
त्वां तेज मिरविलें वहु   तेजस्वी न वदलों रविप्रति मी१७०॥
झाली व्हावी प्रीति   श्रीदाच्यांही[11] न जी वितरणांतें[12]॥

१ बाहुरूप रज्जूंनीं. २ दाव्यांनीं. ३ वारंवार. ४ माझ्या हनुवटीला. ५ दोरीनें रहित. ६ अचल कीर्ति ज्याची, तें. ७ वेदपुरुष (अष्टवसु). ८ स्थान. ९ आपल्या कल्याणाचा. १० द्वं आलिंगन. ११ कुबेराच्या. १२ दानांत.

करिती उदारजीवित ऐसेचि, न हीनजीवित, रणांत ॥१७१॥
मृत्युपरीस परिभवा- पासुनि बहुतचि भिती,परि भवांतें[1] ॥
प्रार्थुनि मागति पुत्र- च्छात्रांपासुनि[2] भले परिभवातें ॥१७२॥
घे माझ्या आशीच्या[3] सर्वाहितहरिणवागुरा[4], बाजा ॥
स्वर्वल्लिमंडपींच्या[6] भवसिंधूतील वा गुराबा[7] ज्या ॥ १७३ ॥
नमन पुरे, संकोचा- सह अंजलि वसर्वसाहि[5] सोडावा ॥
ऐसाचि विजय समरीं अमरांला गावयासि जोडावा॥१७४॥
ऐसा प्रसाद मजवरि करुनि ह्मणे राम काशिपतितनये ॥
हळहळुनि जसें ह्मणतो शिव कांगे देवि काशि पतित नये ॥
तैसेंचि ह्मणतहोतों शरणार्थी कां न येति चापलते ॥
तारूचि निश्चयें जे जे कळवितिल स्वशत्रु चापल ते॥१७६॥
परि परम प्रबळ प्रति- बंधक विधिसाचि आपगेय महा ॥
नयवर्तित्वें बाई दंडुनि गुरुसहि विपाप गे यम हा ॥१७७॥
मज जिंकिलें नदीजें न चले बळ यापुढें तिळहि माजें ॥
हिमजित होय रविमहहि वराचि तमापरि भयें त्रिळ हिमाजें ॥
भीष्मपराभव न घडे शाल्व तुला शरण आणुं सांग मला ॥

---

१ शंकराला. २ पुत्र व शिष्य यांपासून. ३ आशीर्वाद. ४ सर्व शत्रु हेच हरिण, त्यांचीं जाळीं. ५ खाटलीं. ६ कल्पवृक्षांच्या मण्डपांच्या. ७ मोठीं लढाऊ गलबतें. ८ भय. ९ हे अंबे. १० हे काशीक्षेत्रा. ११ चपलपणा. १२ दैवासारखा. १३ भीष्म. १४ न्याय-मार्गानें वागण्यानें. १५ पापरहित. १६ हिमानें जिंकिलेलें. १७ सूर्यतेज.

कीं काळा जिंकूं जो हरिणा हरिसाचि माणुसां गमला १७९
अन्या धन्या गति तुज नाहीं जा जान्हवीसुता शरण ॥
अक्षम करावया या, वीरासीं सूर्य वह्नि हुताश रण १८० ॥
अंबा ह्मणे शरण मी जाइन वना न या भरतपातें ॥
करिन सहाय वधाया याला घालूनियां भर तपातें॥ १८१ ॥
यापरि वदोनि गेली मन्मथनार्थ स्वयें तप कराया ॥
उपशम परम मधुर, परि लागे केवळ तिला सपर्क राया १८२
रामहि मला पुसोनि प्रेमें मजवरुनि हात फिरवूनी ॥
जाय महेंद्रगिरिप्रति विश्रांत गुरुप्रसाद मिरवूनी ॥ १८३ ॥
येतां स्वपुरा करिती बहु वंदी पौर कवि मम स्तवन ॥
गाजविति मयूर जसे गर्जुनि मेघोदयीं समस्त वन ॥१८४ ॥
क्षतशत पाहुनि पावे सत्यवतीचीहि फार तनु कंपा ॥
किंबहुना गंगेची मजवरि तितुकी नसेल अनुकंपा ॥ १८५ ॥
मद्वधकामें अंबा करिती झाली वनीं बहु-तपाला ॥
जी स्वल्प पवन सेवी सेविल ती काय हो बहुत पाला॥१८६॥
वर माग, भागलिस बहु देतों मी वर नतासि अंबे शें ॥
यापरि वदोन केली धन्या संन्यासियांत अंबेशें ॥ १८७ ॥
असती विवेकमति तरि मिळती परमा गती परि भवांतें ॥
माझ्या अंबा झाली जोडुनि कर मागती परिभवातें॥१८८॥
ईश्वर ह्मणे दिलें जा ऐक नृपा ती प्रभूसि जें वदली ॥
काय शुका मंदिराक्षी, खदिरा क्षीणत्व दे रणीं कदली१८९॥

१ भीष्माला. २ भरतनायकाला. ३ कमी रुचीचा. ४ शरणागताला. ५ शंकरानें. ६ शंकराला.

ांगा सुयोधनाला पावावे पांडुपुत्र अंशाला ॥
ीष्मा, न स्पर्शावें धृतराष्ट्राच्या अभद्र वंशाला ॥ ५ ॥
तेकडे सात असोंद्या, इकडे अक्षौहिणी जरि अकरा ॥
अक्षौहिणी-सहस्रा- सम सात्यकि भीम, साम कां न करा६॥
्यां यां तुह्मां समस्तां- हुनि अर्जुन अधिक, कृष्ण त्यापरिस
यरि सर्व सामकामुक कां मुकसि सुखा सुयोधना परिस''॥७॥
भीष्म ह्मणे "द्रुपदगुरो तूं ब्राह्मण ह्मणुनि तीक्ष्ण वदसि परी
सदसि परिस्फुट शब्दचि कार्य कराया समर्थ सदासिपरी॥८॥
राज्यार्धभाक् युधिष्ठिर, ह्मणतों, अर्जुन समर्थ शिवसा, मी
कृष्ण जगत्प्रभु,कलहीं अशिवचि सर्वत्र,विपुळ शिवँ सामीं''
सभ्यश्रुत्यमृत असें जों बोले सर्व-भारतेश तदा ॥
कर्ण ह्मणे "राहोंद्या पाल्हाळ कशास तेंच तें शतदा॥१०
अज्ञातवास पूर्ण न झालाचि द्रुपद-नृप-पुरोहित हो॥
द्वादशवर्षें पुनरपि वनवासें स्पष्ट पण पुरो हित हो ॥ ११ ।
कां मूर्खसा युधिष्ठिर अर्थकरें न्यायसमय सोडून ॥
उडतो अनर्थकर लघु पांचाळ तसेच मत्स्य जोडून ॥ १२ ।
निजबाहुबळें तरला मारुति, कीं अब्धिला अलाबु-बळें ।
होय भला इष्टार्थ- ग्रह उपनेत्रेंचि कीं भला बुबळें ॥ १३ ।

---

१ अकल्याण २ भाषणाचा प्रकार. ३ सभेंत. ४ स्पष्ट. ५ उत्तम खड्गासारखा. ६ राज्याच्या अर्धाचें सेवन करणारा. ७ कल्याण. ८ सभ्याच्या कर्णाला केवळ अमृत. ९ लाभदायक. १० क्षुद्र. ११ भोंपळ्याच्या बळानें. १२ इष्ट वस्तूचा स्वीकार.

देव ह्मणे द्रुपदसुता आधीं होसील, पुरुष मग जा गे ॥
निजविरुदरक्षणीं हा प्रभु जोंवि न तोंवि अमरं-नग जागे१९०॥
हा वरद-वरं-समर्पित मज हितकरचरमुखें कळे वर हो ॥
देव विनविला म्यां कीं पात्र अपयशा न हें कलेवरं हो॥१९१॥
होतां अंतर्हित तो वरदेश्वर सर्वभक्तहित रचिता ॥
स्वचिर्ता रची स्वयें ती उग्रमति रचील कोण इतर चिता१९२
यमुनातटीं चितेला पावक ती आपुल्याचि दे हातें ॥
मद्वधसंकल्प करुनि होमी हो मीनदृष्टि देहातें ॥ ९३ ॥
मद्वधकाम द्रुपदहि उग्रतपें ईश्वरासि आराधी ॥
त्यालाहि भक्तवत्सल भेटे नसतांहि शांतिसारा धी ॥ ९४ ॥
स्त्रीपूर्व-पुत्र दिधला ऐसें वर मागतां वदे वरद ॥
न करी विचार ध्याया विचकूं दे याचका न देव रदं ॥ ९५॥
द्रुपदपुरीं पुत्रोत्सव परिपूर्ण घरोघरीं भला माजे ॥
पुत्री ह्मणोनि नारद- मुनि कळविति, तेंचि चर मला माजे९६
ठेवी नाम शिखंडी हें वर्णू काय वा रसें गा तें॥
अद्यापि वंदि-मागध- सूतांचें वृंद बारसें गातें ॥ ९७ ॥
लेवविल्या बहु भूषा उचिता पुत्राचिया शरीरा ज्या ॥
किंबहुना द्रुपदमतें राजसुतेलाहि ती वरी राज्यां ॥ ९८ ॥

---

१ कल्पवृक्ष. २वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ जो शंकर त्यानें दिलेला. ३ दूतमुखानें. ४ शरीर. ५ गुप्त. ६ आपली चिता (सरण) ७ मत्स्याप्रमाणें चंचल दृष्टि जिची ती. ८ शंकराला. ९ शान्ति हेंच बळ जिचें, ती. १० दांत. ११ प्रीतीनें. १२ हे दुर्योधना.

वरिली या द्रोणाची चापश्रुति[1] मग दशार्णपतिकन्या[2] ॥
ती शयनीं समजे कीं प्रकृति स्वसमा[3] असे, नसे अन्या॥ १९॥
धात्रीस ती ह्मणे हित होतें, जरि तात कापिता मान ॥ ॥
मानस ह्मणतें मज कीं न अशा या घातका पिता मान२०[4]॥
कळतां हिरण्यबाहु क्षितिपाळ ह्मणे सुता असाव्या ही ॥
इच्छा अरिसहि न शिवो न मिळाला मदितरा असा व्याही१॥
द्रुपदाच्या मथनार्थ स्वचमूची शीघ्र सिद्धता करवी ॥
ती सज्ज होय, दधिचें जेंवि करायासि सिद्ध ताक रवी॥२॥
*त्याला पांचाळ ह्मणे देवा पसरिति सुरद्रु पदरा ज्या ॥
त्या तव करें करावें यापरि चिंतातुर द्रुपद-राजा ॥ ३ ॥
स्त्रीस ह्मणे वदलीस प्राप्तवराचा धरूनि विश्वास ॥
लग्न कराचि प्रभुवर यश विदित असे अतर्क्य विश्वास॥४॥
ठावें असोनि सर्वहि पतिच्या खोलींत कोंडवा सून ॥
ऐसें स्वसख्यांपाशीं कांगे वदलीस तोंड वासून ॥ ५ ॥
सद्यःस्वदुर्दशा हे, जरि नाइकतों त्वदुक्ति,कां होती ॥
यापरि विटंबिली जी न करील महत्त्वहानि कांहो ती ॥ ६ ॥
स्वस्थ रहा, मुलि, देवूं प्राण, परि न तुज दशार्ण-वसुधापा॥
तारिल दशाब्धिविषपा ईश्वर मारिल दशार्णवसुधापा॥ ७ ॥

---

१ धनुर्वेद. २ दशार्णदेशाच्या राजाची कन्या. ३ आपल्या सारखी. ४ दशार्ण देशांचा राजा. ५माझ्याशिवाय दुसऱ्याला. ६ द्रुपद. ७ कल्पवृक्ष. ८ पुत्र झाला अशी उक्ति. ९ हिरण्यबाहूची कन्या. १० हे शिखंडिनी. ११ दहा समुद्रांचें विष पिणाराला. १२दहा समुद्रांचें अमृत पिणारा. *तेव्हां असा पाठ असता तर बरा.

स्वनिमित्त प्राप्त असा होतां सर्वस्वनाश जनकास ॥
घाली शिखंडिनी तनु टाकाया दृढ करूनि मन कास ॥ ८ ॥
तरि जाउनि विजनवनीं निज नवनीतातिमृदुलवपु[१] सुकवी ॥
कीं तप संकट चुकवी ऐसें सर्वत्र सांगती सुकवी ॥ ९ ॥
पाहे स्थूणाकर्ण त्र्यक्षसखानुचरवर[२] तिला स्ववनीं ॥
आग्रह करुनि पुसे "कां दिससी विटलीससी निजास्ववनीं[३]१०
ऐकुनि दुःख ह्मणे तुज उचित नव्हे या स्वजीवितीं रुसणें ॥
स्वस्त्रीत्व हें मला दे माझें पुरुषत्व सर्व घे उसणें ॥ ११ ॥
अतिदुर्लभ जें मिळतां कांहो न करील मान्य सांगा तें ॥
आंगातें त्याच्या ये योषात्व[४] तिच्याहि पुंस्त्व सांगातें॥ १२॥
जायाचें भूषणसें घेउनियां पुरुषचिन्ह मिरवाया ॥
परतोन ये पित्याचा आधिगिरि[६] सुखार्णवांत विरवाया॥१३॥
द्रुपद-नृपति-हृदयींच्या दुःसह-चिंता-स्वरूपसांगेतें ॥
होय अयश्चुंबक[७] जें यक्षवराप्त[८] स्वपुंस्त्व सांगे तें ॥ १४ ॥
दूतमुखें द्रुपद ह्मणे बालिशहो नीट पारखा याला ॥
अंगारभुक्चकोरें[९] पण न करावाचि पारं[१०] खायाला ॥१५ ॥

---

१ लोण्याहून अति मृदु असें शरीर. २ यक्ष—शंकराचा सखा कुबेर, याचा सेवक. ३ निज-असु अवनीं. ४ स्त्रीत्व. ५ दुसऱ्याचें चार दिवस मागून आणलेलें. ६ चिन्तारूप पर्वत. ७ शस्त्रविशेषाला. ८ यक्षश्रेष्ठापासून मिळालेलें. ९ अग्निभक्षक चकोरानें. १० पारा.

कुपितें त्यां हेमभुजें पुरुषपरीक्षास्मृती न आठवल्या ॥
पोरी नव्या नव्या नर- पतिसुतवेषें सजूनि पाठविल्या॥ १६॥
पदल्या एके शिग्या- वरि बहु शिग्या करूनि हातेंणें॥
जो मंदुरेंत होतो गोंधळ, केला प्रकार ह्य तेणें ॥ १७ ॥
भेटे दशार्णभूपति परि न द्रुपदाननाकडे पाहे ॥
वाहे कन्यासी श्री बाहे क्षमिकोटिकीर्तिला वाहे ॥ १८ ॥
सासूसि सासऱ्यासहि सुतशत-सत्कार्य होय जामाता ॥
विहिणी व्याह्याकरवीं धुववीते निजपाद-तोय जा माता १९
ऐसा अवगत आहे वरदा मज ईश्वरा समाचार ॥
सर्वहि कळवित होते मज वरदा ईश्वरासमा चार ॥ २० ॥
त्या यक्षाच्या आला, प्रिय सेवक ह्मणुनि धनदसदनातें ॥
स्त्रीभावास्तव लज्जित होवुनि तो दाखवी न वदनातें ॥ २१ ॥
धनद ह्मणे हर्षमद दासाला जेंवि हा, तसा मोरा ॥
घनहि नसे, स्थूण न कां आला जोडूनि हात सामोरा॥२२॥
देउनि पुरुषत्व स्त्री झाला, दावावया मुखा लाजे ॥
ऐसें यक्ष कथिति बहु पाहुनियां पावले सुखाला जे ॥ २३ ॥
धनद ह्मणे "हा मंदा केलें भलतेंचि हें कसें स्वमतें॥
गमतें पुरुषत्वीं न स्त्रीत्वीं च स्वांत बहु तुझें रमतें ॥ २४ ॥
स्त्रीत्वचि असो, अशा या मूढाला अन्य काय शासन हो ॥
न्यूनत्व लेशमात्र द्रुपदाच्या कन्यकायशास न हो ॥ २५ ॥

१ हिरण्यबाहूनें. २ कामयुक्तता. ३ अश्वशाळेंत. ४ आपल्या पदकमलाला. ५ आले. ६ मन.

विनवुनि शापांतार्थ स्वामीचें वळविलें मन दहांनीं ॥
बहु खवळलाहि न करी सत्प्रभुचा कोप अमृतनद हानी२६॥
शिवसख ह्मणे शिखंडिस मारिल पावेल मरण जेव्हां हो ॥
गेलें स्वरूप त्याची प्राप्ति पुन्हा या कुधीस तेव्हां हो ॥ २७
होउनि कृतकार्य पुन्हा पुंस्त्व जयाचें तयासि ओपावें ॥
ह्मणउनि ती गेली कीं अभिलाषें ईश्वरें न कोपावें ॥ २८ ॥
यक्ष "ह्मणे राजसुते जा यावज्जीव तूं असीच रहा ॥
मत्स्वामीनें, अथवा त्वद्दैवानेंचि तुज दिला वर हा ॥ २९ ॥
कवडी दुर्लभ ज्या त्या मोत्यांच्या जेंवि राशि खंडीच्या ॥
पुंस्त्वप्राप्तिकथा हे कथिली तुज नरवरा शिखंडीच्या ॥३०॥
यास्तव ह्मणतों आह्मी हाणूंना बायकोस हातेरें ॥
करिती सर्वस्वाचें परि न यशाचें सुबुद्धि मातेरें ॥ ३१ ॥
स्त्रीतुल्य, स्त्रीनामा स्त्रीपूर्व स्त्रीस्वरूप हे तीन ॥
यां चौघांवरि आह्मां दृढसंधांची उठेल हेती न" ॥ ३२ ॥
ऐसे शांतनवाचे साचे परिसोनि बोल कानांहीं ॥
सभ्य ह्मणति "गंगासुत-सम गौरीसुतहि बोलका नाहीं"॥ ३३

१ कुबेर. २ मूर्खाला. ३ ज्याचें कार्य झालें तो. ४ शिखण्डिनी. ५ हत्यारानें. ६ दृढ प्रतिज्ञा ज्यांची, त्यांची. ७ शस्त्र.

# अध्याय १४ वा.

## सारांश.

१ दुर्योधनानें, कितिदिवसांत पाण्डव सैन्य माराल? असा प्रश्न केला असतां,भीष्म मी एका महिन्यांत मारीन. द्रोणानें ही दसेंच सांगितलें. कृपाचार्य—मला दोन महिने लागतील, अश्वत्थामा—मला दहा दिवस पुष्कळ होतील. कर्ण—मला पांचच दिवस बस्स होतील असें ह्मणाले. हें वृत्त दूतमुखानें धर्माला समजलें.धर्मानें तें श्री कृष्णास व अर्जुनास कळविलें. मग धर्मही अर्जुनाला ह्मणाला," कीं, तुला कौरवसैन्य मारण्यास किती दिवस लागतील? अर्जुन ह्मणाला, भयंकर प्रतिज्ञा करणारे कौरवयोद्धे आहेत. केवळ धर्मबलानेंच यशःप्राप्ति होईल. अन्यथा होणें नाहीं. असें बोलून कृष्णाकडे पाहून पुनः ह्मणाला, कीं,एका निमेषांत शत्रूचा निःपात करीन. भीम, नकुल, सहदेव,सात्यकि, धृष्टद्युम्नादि वीरांकडे, शत्रूच्यानें पाहवणार देखील नाहीं. मग दोन्ही सैन्यें कुरुक्षेत्रांत युद्धास सिद्ध झालीं

राजा "वधाल पांडव- बळ किति दिवसां"असें पुसे भीष्मा
द्रोणा कृपा गुरुसुता कर्णासहि रिपुचमूनदीग्रीष्मा ॥ १ ॥
भीष्म ह्मणे "राजा मी मारिन पांडवबळास मासानें ॥
द्रोणहि असेंचि सांगे वृद्ध ह्मणुनि निजबळा समासानें॥ २ ॥

१ शत्रुसेना हीच नदी,तिला शुष्क करणारा ग्रीष्म.२ संक्षेपानें.

आचार्य कृप ह्मणे "हो व्हावे मज दोन मास या काजा" ॥
गुरुसुत ह्मणे "दश दिवस बहुत म्हणाया परांसि नाकां जा"
कर्ण म्हणे "या कामा पांच दिवस बहु कशास दिवस दहा ॥
शिवशिष्यच्छात्रें म्यां उक्त न करितां ह्मणेल शिवसद हा॥४॥
भीष्म ह्मणे "रे उडणें विसरे हरिदृष्ट-कृष्णसार थितें॥
तोंवरि उड राधेया जोंवरि न पहासि कृष्णसारथितें"॥५॥
हें चारकथित वृत्त प्रातःकाळींच साधुराय कवी ॥
धर्मनृप अर्जुनास स्वमुखें कृष्णासमक्ष आयकवी ॥ ६ ॥
भीषणहि ह्मणे "वीरा रिपुवधकाळ-प्रमाण सांग मला ॥
कुरुबळसिंधु सुरांसहि दुस्तर केवळ न माणसां गमला" ॥ ७
अर्जुन ह्मणे "प्रभो बहु थोरचि ज्यांच्या अशा प्रतिज्ञा ते॥
परि पावति धर्मबळें न तदितरबळें यशाप्रति ज्ञाते" ॥ ८ ॥
इतुकें वदोनि पाहुनि मेघश्यामाननाकडे डोळे ॥
'पुसतां प्रमाण तरि अरि वधिन निमेषांत मी' असें बोले॥९
किति कुरुबळ? भस्म करिल जग पाशुपतज्ञ हा निमेषांत

---

१ शत्रूला. २ स्वर्गाला. ३ शंकराचा शिष्य परशुराम,त्याच्या शिष्यानें. ४ शंकराची सभा. ५ सिंहानें पाहिलेला काळवीट. ६ थोडें. ७ कृष्ण सारथि ज्याचा, त्या अर्जुनाला. ८ दूतांनीं सांगीतलेलें. ९ कृष्णमुखाकडे. १०पाशुपतास्त्र जाणणारा.

हरि कोपतां गजांतहि शिरती मग कां न हानि मेषांतं[1]॥१०॥
जें स्वप्रभुसीं[2] धरितें मजसीं हें तेंचि पाशुपत नातें ॥
पावेल ब्रम्हांडहि या मत्तेजेंचि आशु[3] पतनातें ॥ ११ ॥
जळतिल खळ देवा जरि करशील कटाक्षपातही रागें ॥
किति खळबळ, जोडावे भंगभयें यासि हात हीरागें[4]॥ १२ ॥
ह्मणतो सर्वां कार्यां- हूनि अतिअवश्य कार्य भीम रणा ॥
भीतो अयशा,न तसा हा मानि बळींद्र आर्य भी मरणा॥१३॥
तुरतिल या भवदाज्ञा- देवीसिंहापुढें[5] अरातिकरी[6] ॥
भीमाकडे नरचमू मुख जैसें रविकडे न राति करी ॥ १४ ॥
नकुळ सहदेव सात्यकि धृष्टद्युम्नादि वीर हे राया ॥
तेजस्वी रवि यांसि न, धरितिल खळ[7]-घूक धीर हेराया ॥१५॥
केला शुष्क समुद्र क्षणहि न भरतां अगस्त्यपाणितळें[8] ॥
रक्षील स्वबळानें त्यापासुनि[9] काय जी स्व पांणि[10] तळें[11]॥१६॥
या कृष्णसखोक्तीतें[12] धर्मात्मा धर्म होय मानवता ॥
कीं ते पुराणमुनितां[13] वदवी, वदवील काय मानवतां[14] ॥१७॥
सिद्ध कुरुक्षेत्रीं ते सर्वहि झाले करावया समरा॥
राजे,अन्योन्य ह्मणति सफळ रणमखा करावयास मरा॥१८॥

---

१ मेळ्यांत. २ आपला प्रभु शंकर यासीं. ३तत्काल. ४ हिऱ्याच्या पर्वतानें. ५ तुझी आज्ञा ही देवी दुर्गा, तिचा सिंह भीम, त्यापुढें. ६ शत्रु हेच हत्ती. ७ दुष्ट हेच घुबड. ८ अगस्तीच्या करतलानें. ९अगस्त्यापासून. १०उदक. ११सरोवर. १२ अर्जुनवाक्याला. १३ नरऋषित्व. १४मनुष्यत्व.

जनमेजयासि ऐसी वैशंपायन कथी कथा तीतें ॥
गाय मयूर रसिककवि- किंकर चित्तें असत्पथातीतें ॥ १९ ॥
स्ववरविरचितें गुरुवरें हें भारत लिहविलें मयूरकरें ॥
मुनिरचित मयूरेश्वर-देवकरें द्वापरांत जेंविं हरें ॥ २० ॥

१ असत् मार्ग मागें टाकिलें ज्यानें, त्या. २ स्व–गुरु, ह्याच्या वर्गानें रचिलेलें. ३ श्रीगजाननाच्या हस्तानें.

## मुम्बई येथें,

"श्रीहरिवरदा" प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिलें.

॥ श्री ॥

# श्रीमयूरकविकृत

( १ )

## उद्योगपर्व.

| पृ. | ओ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ८ | १० | वारलास | वारिलास |
| ८ | १० | पाडु | पांडु |
| १२ | १० | नमुन | नमूनि |
| २० | ३ | जरि | जरी |
| २१ | ८ | रणतां | रणांत |
| २१ | ९ | गांडाव | गांडीव |
| २९ | १८ | मोडुनि | सोडुनि |
| ३५ | २१ | शब्दचा | शब्दाचा |
| ३५ | २१ | असवा | असावा |
| ३७ | ४ | वास | वासें |
| ३८ | १५ | भीष्म | भीम |
| ३९ | १३ | क्रोधवतशां | क्रोधवशां |
| ३९ | १९ | साधिली | भासिली |
| ४१ | १९ | वज्नाच्या | वज्राच्या |
| ४२ | ८ | भाधेल | बाधेल |
| ४२ | २२ | शत्रुसारख | शत्रुसारखा |
| ४८ | १७ | मान | पान |
| ४८ | २१ | माभा | भामा |
| ५५ | ४ | काळ | काळें |
| ५८ | १६ | ध्याया | छ्याया |
| ६७ | ४ | बंधनातन | बंधनांतून |
| ८० | ९ | प्रसरिति | पसरिति |
| ११५ | २१ | धर्मज्ञराज कन्याहून इतैर कन्या | हें अन्यायाचें विशेषण |
| १३० | ६ | नवध | नवधा |
| १३५ | १ | शक्रकन्यांभू | शुक्रकन्यांभू |
| १६८ | ७ | भरणा | मरणा |

१८९१.

# भारत.

[ भीष्मपर्वांतील आर्या. ]

## अध्याय १.

हालाहलगलसा[1] प्रभु उग्रतपा[2], परि अनुग्र[3], हव्यास[4] ॥
ज्यास परहितीं बहु; तो करि धृतराष्ट्रीं अनुग्रह व्यास ॥१॥
" युद्ध पहावें ऐसें जरि तुज वाटत असेल बा पाहें ॥
घे दिव्यदृष्टि देतों मज किमपि कठिन नसेचि बापा हें "२
अंध ह्मणे " दृष्टि नको स्वज्ञाति-क्षय मला पहावेना ॥
रण-वृत्त वरें कळवा हें आयकिल्याविना रहावेना " ॥ ३ ॥
व्यास ह्मणे " संजय तुज सांगेल विचारशील[5] समरा ज्या
तुजकरितां मजसीं हो पावोनि विचारशील सम[6] राजा ॥४॥
प्रथितां[7] करीन वर्णुनि कीर्ति तुझ्या पांडुच्याहि तनयांची ॥

---

१ हालाहलनामक विष गळाचे (कंठाचे) ठायीं ज्याच्या तो शंकर, त्यासारखा. २ उग्र तप ज्याचें, तो. ३ सौम्य. ४ कार्य करण्याविषयीं अत्युत्कंठा. ५ विचारसंपन्न असें शील. ६ सारखा. ७ प्रख्यात.

अनुभाविलें क्षणभंगुर सर्वहि जें सुज्ञ-जन पहातात ॥१४॥
पितृ-शोक-वज्र पातें- हि नव्हे कां सांग गा पतन यांचें[1]॥
होय अकस्मात् तारक तात-क्षय[2]-हेतु पाप तनयाचें[3] ॥१५॥
मथिला कसा उतरिता रिपुचा काकुत्स्थ[4]वीरसा रेंच॥
कैसें उलेल? विधिनें रचिलें हें हृदय हीरे[5]-सारेंच ॥१६॥
त्वद्दोषेंचि बुडाला देवव्रत हा महातपा पोरा॥
दुर्योधना भिजवितें अश्रु, सुजवितात हात पापोरा[6] ॥ १७॥
करिता न धर्मलंघन तरि तुमचा भीष्म-सेतु उरता तें ॥
काय वदावें आतां घ्यावें बडवुनि ललाट उर तातें ॥१८॥
दुःशासना, खळा, त्वां साध्वीची सोडिली निरी हातें॥
त्या कर्माचें फळ हें झालें ऐशाहि या निरीहातें[7] ॥१९॥
प्रभुता असोनि शासन केलें न तुज प्रकाम-मत्तातें[8] ॥
होंचि पतन-कारण; अघ इतर लवहि जोडिलें न मत्तातें २०
रे सौबळ[9] दुर्योधन दुःशासन अंगदेशें[10] हा खलहो ॥
चूर्ण करील तुह्मांला धर्म बर्ता[11], भंगदेशें[12] हा खल[13] हो ॥२१॥
झाला कृत्य-कृत्य जगीं जाइल भेदूनि तात हा रविला ॥

---

१ या धृतराष्ट्राचें. २ भीष्मनाशास कारण. ३ दुर्योधनाचें. ४ ककुत्स्थकुलोत्पन्न वीर श्रीरामचंद्र. ५ हिऱ्याच्या दृढत्वानें. ६ पातक्याच्या उराला. ७ निःस्पृहाला. ८ अत्यंत उन्मत्ताला. ९ हे शकुने. १० अंग-द-ईश. अंग नामक देश देणारा( कर्णाला) तो अंगद ( दुर्योधन ), त्याचा ईश नियामक कर्ण. ११ वत्ता. १२ रणांगण. १३ औषध चूर्ण करण्याचें पात्रविशेष.

ग्भरविला धर्में कुळ- गुरु राज्यार्थ, स्वधर्म हारविला॥२२॥
हा धर्मा स्वल्पार्थें कां वधिला ओपिता महालाभा ॥
स्वप्नांत ह्मणत होती दिक्पांची[1] ओ पितामहाला भा[2]॥२३॥
रे धर्मा व्यर्थ तुझें झालें सद्धार्मिकत्व, आ ज्याला॥
कवळार्थ[3] पसरिला, त्या वधिलें कैसें धनार्थ आज्याला २४
झालें काय कराया ज्या तेजें विश्व-होम शकता तें ॥
न गणावा गरुडहि मग लेखावा काय हो मशक तातें२५॥
बा संजया, सविस्तर वद खचला कोंवि तो पिता तरणी[4]॥
आहे कीं द्रोण, यदिषु लाज रविकरांसि ओपितात रणीं२६
जो देव ह्मणत होता अनुदिन सुहृदंबुजव्रजा[5] विकसें ॥
त्या अद्भुत भीष्म-दिवा- कर-पतनीं वाटलें तुह्मांसि कसें"२७
संजय ह्मणे " नरेंद्रा, तेव्हां ऐसेंचि वाटलें कांहीं ॥
कीं भीष्में धरिली ती वरिलीच तुझ्याहि वाट लेंकांहीं॥२८॥
अनयें तुमच्याचि पिता साधु शमविला न याविना शमला॥
लोभी म्हणतो झाला न त्यजितांही नया विनाश मला २९
लोभी धर्मनयं[6]-नयन- हीन म्हणे हा तसा न अनयनें[7] हा ॥
करितां अजातरिपुचा विद्वेष कसा अधर्म अनय न हा३०॥
करितां साधूच्छेद स्वोच्छेदचि होय, हो यश न राहे ॥
खल काम कोप लोभ च्छळिति बळें करुनियां वश नरा हे
युद्ध सविस्तर कथितों ज्ञान मला जें दिलें गुरुवरानें[8] ॥

---

१ दिक्पालांची. २ तेज. ३ ग्रासाकरितां. ४ सूर्य ५ मित्ररूपी कमलसमूह. ६ धर्म व नीति हेच नेत्र त्यांनीं हीन. ७ आंधळा. ८ व्यासानें.

श्रीमुनिनें तुजकरितां तें हें काय न तुवां कुरुवरानें ॥ ३२ ॥
कुरु-गुरु भीष्म द्रोण प्रातःकाळीं उठोनि देवास ॥
प्रार्थुनि वदले 'धर्मा जय, आह्मां निज-पदींच दे वास' ३३
त्वत्तनयें भीष्म पुढें केला बलसिद्ध करुनियां कलहा ॥
धर्में धनंजयमतें भीम महा-बाहु कीं महा-खल-हा ॥ ३४ ॥
स्वल्प स्व-बल, सुयोधन- बल विपुल, ह्मणोनि धर्म जो भ्याला
त्यासि ह्मणे विजय विजय- लवलाभ नसे परस्व-लोभ्याला
बा सत्य धर्म जिकडे तिकडे श्रीकृष्णनाथ जाणावा ॥
हा तेथें जय रविसा प्रार्थुनि नलगे प्रकाश आणावा ॥३६॥
जिकडे हरि हर विधि मुनि- वर वेद दिगीश शक्र हे तिकडे
फोडील मेरुचेही एतद्दृक्प्रहित चक्रहेति कडे ॥ ३७ ॥
वर्णू कैसे कौरव- पांडव-सेना-समूह-अर्णव ते ॥
गुरुवर मला कथंचित् करिना जरि दशशतास्य वर्णवते ३८
येतां धर्मयशाच्या अकरा अक्षौहिणी चमू हरणा ॥
झाला सिद्ध युधिष्ठिर- भीम-नरा-ज्ञप्त-भट-समूह-रणा॥३९॥
तर्कित होते निज पर भट विधु कीं रवि असें पहाते ज्या ॥
त्वन्नंदन-सेनाग्रीं होता त्वत्तात तो महातेजः ॥ ४० ॥
केल्या कपिध्वजानें तुमच्या सकळाहि विप्रभा सेना ॥
तदधिक न पर, वासिष्ठा- ऽधिक कोणी जेंवि विप्र भासेनः ४१

१ दुर्योधनानें. २ दुष्टांचा नाश करणारा. ३ परद्रव्य. ४ लोकपाल. ५ कृष्णदृष्टिप्रेरित. ६ चक्ररूप शस्त्र. ७हजार तोंडाचा (शेष). ८ निस्तेज.

युद्धारंभीं यदुपति वदला विजया रथातळीं उतर ॥
दुर्गेसि हात जोडीं होइल खल-बल-समुद्र हा सुतर ॥ ४२ ॥
त्रिभुवन इच्या प्रसादें जेंवि वसंततुनें समस्त वन ॥
शोभे, ह्मणुनि करावें त्वां केवळ दुर्बळा-सम स्तवन ॥ ४३ ॥
स्वरथाखालीं उतरुनि नमुनि ह्मणे विजय विजय दे दुर्गे॥
त्वपदभजनीं दह्रु सुख ह्मणुनि ह्मणे भक्त मुक्तिला दुर्गे ४४
आह्मां दासां रक्षीं भगवति जगदंबिके अनादि सती ॥
येती शरण तुला जे केउलेवाणे न ते जना दिसती ॥ ४५ ॥
वासरमणि-कोचि-रुचे हास-रस-वशीकृत-स्मरारातें ॥
कासरनगाशने हा दास रणीं विजय-पात्र हो माते ॥ ४६ ॥
ऐसें स्तवितांचि शिवा दर्शन देउनि ह्मणे अगा साधो॥
त्वदुदारता जशी तसि न सुरांच्यां बहुमता अगा साधो ॥
द्याया मज यश, लोकां सुख, गृध्रां तो लुलाय मांस,मरे ॥
मरतिल तसेंचि तव रिपु मानुनि समरीं तुला यमासम रे ४८
विजयी महेश्वरासम तूं नारायणसखा नरा हो रे ॥
वदल्यें काळाला कीं, खल-बल निःशेष खा,न राहो रे ॥ ४९ ॥
देउनि विजय-वर असा झाली अंतर्हिता भवानी ती ॥
सदवन असदनेवन या नित्य जिच्या बहुमता भवा नीती ५०
स्वरथीं चढला पावुनि वर ईश्वर-दत्त-हस्त वासवि त्या ॥
पाहुनि ह्मणति मुनि-मनें यासि अव्हेरूनि न स्तवा सवित्या

१ अर्जुन. २ दीन. ३ कोटिशः सूर्यप्रमाणें कांति जिची. ४ हास्यानें वश केला शिव जीणें. ५ महिषासुररूप पर्वतास वज्ररूपिणी. ६ रेडा ( महिषासुर. ) ७ अदृश्य. ८ सद्रक्षण. ९ खलनाश. १० अर्जुन. ÷ सुरांच्या अगा ह्म० कल्पवृक्षाला

युद्धारंभीं भीष्म द्रोण-प्रमुखाऽखिलाप्त-वध-भीता ॥
शक्र-सुता त्रिजगद्गुरु- कृष्णें उपदेशिली स्वयें गीता ॥५२॥
गत-मोह तमोहरसा सजला हृत-गोपमुग्ध-सारथि जो ॥
तत्तेजें न गळे पर- बल तरि अनलेंहि दुग्ध-सारें थिजो ५३
बहुविध-वाद्य-रव अमर- नाथादि विमान दाटले खांतें ॥
वर्णिति नर-नारायण कोण तयांचे न भाट लेखांतें ॥५४॥
इतक्यांत धनु कवच रथ कवणासहि न पुसतांचि सोडूनी॥
धर्म निघे कुरु-सेना- ग्रग-भीष्माभिमुख हात जोडूनी ॥५५॥
त्यजुनि रथातें मारुति धांवे तैसाचि जिष्णुसह देव ॥
टाकूनि उडी धांवत गेले मागूनि नकुळ सहदेव ॥ ५६ ॥
ते धर्मातें ह्मणती 'करुनि श्रीशंकरा नवस राजा ॥
चिंतित होतों चित्तीं तेरा वर्षें सदा अवसरा ज्या ॥५७ ॥
तो हा प्राप्त बहुदिसां झाला जों तोंचि काय हें सुचलें ॥
कार्मुक टाकुनि जावें खल-कटका-प्रति असें कसें रुचलें' ५८
देव ह्मणे 'पांडव हो अद्भुत नाहींच युद्ध-सम यज्ञ ॥
ह्मणउनि बहुधा जातो हा गुरुनमनार्थ शुद्धसम्यज्ञ' ॥५९॥
भीम श्वेताश्व नकुळ सहदेव श्रीमुकुंद हे मार्गें ॥
चालति, पुढें युधिष्ठिर जोडावे ज्यासि हात हेमार्गें ॥६०॥
जें संपादी होउनि मत्त बळें नीच मूढ वाळी, तें ॥
कर्म जयाचें, त्यांची करिती झाली चमू ढवाळीतें ॥ ६१ ॥

---

१ सूर्य. २ कृष्णसारथि ३ लोणी. ४ आकाशांत. ५ देवांत. ६ भीष्मासमोर. ७ भीम. ८ युद्धप्रसंगास. ९ सुवर्णपर्वतानें. १० दुर्योधनाची.

अभयार्थ शरण येतां सोडुनि भू-लाभ-यत्न सानुज[1] या ॥
पुष्कळ वाढे ना कां विंध्य न व्हे पात्र रत्न-सानु-जया[2] ॥६२॥
अजि धर्मराज ठावें पांडित्य तुह्मासि लवहि न भटांचें[3] ॥
यांचें हृदय पहातां विपुल ह्मणाति कवि तथापि नभ टांचें[4]६३
'सार्जुन भीमहि अयशीं सेवुनियां निर्गुणासचि बुडाला ॥
न भजति सुयशस्काम क्लीबा आरोग्यकाम चिबुडाला ॥६४॥
धन्य सुयोधन लोकीं अन्य नसे या समान राजन्यें[5] ॥
वन्यगुणें काय घडे मारुतिसीं इतर वानरा जन्यें[6]' ॥६५॥
प्राकृत कौरव-सैनिक करिती उपहास बहु असा राजा[7] ॥
त्या वर्णूं काय रसिक बहु विटती सेवितां असारा जा ॥६६॥
भीष्माचे पाय धरुनि धर्म म्हणे 'हो पितामह त्वरतें[8] ॥
मन समरमखारंभा[9] हेंचि करावें हिता महत्त्वरतें ॥ ६७ ॥
द्या आज्ञा सानुज मी पौत्र तुह्मांसीं करीन शुद्ध रण ॥
गुर्वनुमतें स्वधर्मा- चरणें कवि करिति कुलं-समुद्धरण[10] ॥६८॥
आशीर्वाद मजकडे द्यां, देइल भव्यं-कोटि[11] केशवसा ॥
गुर्वाशीर्बलवर्जित[12] 'जो क्षणहि उभा न तो टिके शवसा[13]' ॥६९॥
भीष्म म्हणे 'झाल्रों मी या कर्में करुनि सुप्रसन्न-मना ॥
देतों शाप पराभव व्हाया, येतासि जरि न मन्नमना[14] ॥७०॥

---

१ बंधूंसह. २ मेरु पर्वत. ३ शूरांचें ४ लहान. ५ क्षत्रिय. ६ युद्ध. ७ हे धृतराष्ट्रा. ८ त्वरा करतें. ९ रणयज्ञारंभास. १० कुलाचा उद्धार. ११ अनंत कल्याण. १२ गुरुकृपाहीन. १३ प्रेतासारखा. १४ माझ्या नमनास.

भंगेल गुर्वपूजक साधुनि देईल गर्ग होरा ज्या ॥
या कर्मे तूं साक्षात् सकलाहितकामभंग हो राजा ॥ ७१ ॥
बा पुरुष अर्थ-दास न अर्थ पुरुष-दास जाणत्या समज ॥
कीं बद्ध कौरवांनीं केलें अर्थेंचि जाणत्यास मज ॥ ७२ ॥
युद्धेतर वर मागें द्यावें म्यां काय सज्जना तूतें ॥
जें आज्याचें द्याया योग्यचि तद्वजनसज्ज नातू तें' ॥७३॥
धर्म म्हणे ' आजोबा उत्साहें कौरवार्थ भांडावें ॥
साह्य करावें माझें हा द्या वर, मज मनें न सांडावें' ॥७४॥
शांतनव ह्मणे ' वत्सा काय करूं सांग वत्स-वरदा या ' ॥
बापा अजातशत्रो माझ्या तूं मात्र पात्र वर-दाया' ॥ ७५॥
धर्म ह्मणे ' अपराजित आपण झालांचि राम-सम रामीं,॥
करिन ह्मणतों कराया तुमचा तेजो-विराम समरा मी ७६॥
होइल कसा स्व-परिभव, सांगा साहित्य होय हें माजें ॥
उत्कर्ष-करचि शस्त्र- ज्वलन-पतन वीरदेहहेमा जें' ॥७७॥
भीष्म ह्मणे ' मज लोकीं जिंकीसा वीर आढळेना गा ॥
वृद्धहि सिंह महामद- मत्ताही काय गा ढळे नागा ॥७८॥
न टिकेल शक्रहि धरुनि चित्तीं यत्ना करांत शतकोटी॥
बुडतिल बाहु-बल-मदें भट या रत्नाकरांत शत-कोटी'॥७९
धर्म ह्मणे 'ह्मणुनचि मज जोडुनि द्यावा तुह्मी उपाय सखा

---

१ गुरूची पूजा न करणारा. २ मुहूर्त. ३ सर्व शत्रुरूपा मदनास शिव. ४ वर हेंच पितृधन. ५ वज्र.

सुबुभुक्षित ही सुपितर ह्मणति क्षुधिता मुला सुपा[1]यस खा'
भीष्म ह्मणे ' बा बहु-मत साधुचि, न तसे सदा असु, ज्ञासा
जः, ये पुन्हा, प्रतिज्ञा न जडा सुज्ञा, जडा असुज्ञा, त्या'८१
द्रोणहि असेंचि नमितां होउनि परम प्रसन्न ', पद[2] लाहो ॥
पुण्यश्लोक युधिष्ठिर, ' इत्याद्याशी सहस्र वदला हो ॥८२॥
' धर्मा भला भला गा शाप चुकविला सुधर्मसमयज्ञा ॥
करिशील खळ-क्षत्रिय पशु मारुनि परशुराम-सम यज्ञा८३॥
जो तुज रुचेल तो मज युद्धाहुनि इतर सर्व वर माग ॥
लाजोत अभीष्ट[3]-प्रद जे मंदारादि[4] पांचँ परमाग ' ॥ ८४॥ ॥
धर्म ह्मणे नमुनि ' तुह्मां पुसतों तुमचाचि मी वधोपाय ॥
द्यावा कुठार कल्प- द्रुमसा हा वर मला वधोपाय ' ॥८५ ॥
द्रोण ह्मणे ' होइल जरि साधु-मुखें सुमहदप्रिय-श्रवण ॥
योगबलें देहातें त्यजिन करुनि चित्त उपशमप्रवण[5] ॥८६॥
तेव्हां करील कोणी भलता त्वद्वीर मन्मथन राजा ॥
सुगुरु सुशिष्यसुवश कीं सुस्त्रीवश सुबहु-मन्मथ[6] नरा ज्या ८७
यापरि इतराऽसुलभ स्व-गुरु-द्रोण-प्रसाद साधुनि घे ॥
ऐसेंचि कृपाचार्या- प्रतिही वंदावयास साधु निघे ॥८८॥
नमनें प्रसन्न होउनि कृपहि ह्मणे 'या विधीस चुकतास ॥
तरि देतों शाप, तुला विजय न घडतां हितास मुकतास ८९
अर्थाचा दास पुरुष, अर्थ नव्हे पुरुषदास बापा हें ॥
सत्य, मज कौरवांनीं केलें अर्थेंचि बद्ध वापाहें ॥९० ॥

---

१ खीर. २ राज्य. ३ इच्छित देणारे. ४ मंदार, पारिजातक, संतान कल्पवृक्ष हरिचंदन हे पांच कल्पवृक्ष. ५ शांतितत्पर. ६ अतिकाम.

यास्तव मी क्लीबापरि वदतों युद्धान्य सर्व वर मागें ॥
राया त्वत्सम साधु ज्ञाता झाला न भूमिवर मागें ' ॥९१॥
'स्ववधोपाय वदा हा वर द्या' न वदों शके असें नृपती ॥
परि कामना मनींची गूढाही समजला सुधी कृप ती ॥९२॥
बोले 'जरि संकोचें न मनोरथ कळविसी परि समजला ॥
गुरुवत्सला असे तव हित-चिंता बहु तुझ्यापरिस मजला ॥
असतें मरण कपाळीं कथितों तदुपाय, फार यश होतें ॥
परि नाहीं, काय करूं त्या दों वृद्धांसि मात्र वश हो तें ९४
चिंतीन त्वद्विजय ब्राह्म-मुहूर्तीं उठोनि संतत मी ॥
जे जे गुरुभक्ति-रसिक ते न श्रमले पडोनि संत तमीं' ॥९५
एवं नृप कृप-गुरु-वर साधुनि शल्यासही करी नमन ॥
तोहि ह्मणे 'माग वर प्रिय करुनि तुझें सुखी करीन मन'९६
धर्म ह्मणे ''उद्योगीं जो दिधला तोचि मद्र-महि-वर हो ॥
सूतात्मज-तेजोवध-[3] वर बहु, तेणेंचि भद्र महिवर हो ॥९७॥
शल्य ह्मणे 'बा धर्मा, हें तों आह्मांस काम सामान्य ॥
जा हो खल-बल मर्दुनि विजयें विश्वांत रामसा मान्य' ९८
ऐसे भीष्म-द्रोण- प्रमुख-गुरु-वर-प्रसाद साधूनी ॥
परते धर्म महात्मा स्तविला बहु नारदादि साधूंनीं ॥९९॥
ब्रह्मत्याचेही करिती ज्याच्या बोधामृतासि आ कर्ण ॥
तो भगवान् कर्णातें भेटोनि ह्मणे 'मदुक्त आकर्ण ॥१००॥
धर्मा सहाय हो, ये धरिति परार्थहि असि-मति ज्ञाते ॥

---

१ भीष्मद्रोणांस. २ हे शल्या. ३ कर्णाचा धिक्कार. ४ ऐक.

पार्थी भीष्मामागें युद्ध करावें असि प्रतिज्ञा ते ॥ १०१ ॥
भीष्म पतन पावे तों आह्मांला हो सहाय चाल कसा ॥
सुभट पार्थावा पर-दमनीं गमनों तुरंग-चालकसा' ॥१०२॥
कर्ण ह्मणे 'विप्रियं तिल- मात्र घडो या सुयोधनाचें न॥
कृष्णा दारोदारीं नटसा कां मी सुयोध नाचेन ॥१०३॥
त्यजिलें सुयोधनार्थ स्त्री-प्राण-धनांसह स्व-धामाहि म्यां ॥
या कर्माच्या पात्रें न स्वाहा तसिच न स्वधा महिम्या' १०४
कर्ण न मिळतां परते ज्याच्या नामें तरे अजामिळ तो ॥
साधुमुखें साधु ह्मणुनि घेणारा तोचि या अजां मिळतो १०५
त्या दों कटकांत उभा धर्मात्मा धर्मराज राहोनी ॥
उज्वा बाहु उभारुनि उच्च वदे कौरवांसि पाहोनी ॥१०६॥
न वरा असाधु नृप, कां पडतां राहुनि तयासमीप दरीं॥
खल-संग त्यागुनि जो येइल, घेइन तयास मी पदरीं ॥
भेटे युयुत्सु धर्मा त्यजुनि ज्येष्ठा कृताऽनंया भ्रात्या ॥
जैसा साधु बिभीषण रघु-कुल-तिलका महा-दयाभ्रा त्या ॥
धर्म ह्मणे 'वा तूं तों बंधु करूं नेणसीच अन्याया ॥
परि ह्मणतों या समरीं येतां आगस्करांहि अन्या या १०९
उरसील तूंचि साधो इतर सकळ दुष्ट भस्म होतील ॥
हस्त तुझाचि तिलोदक त्या ताताच्या मुखांत ओतील' ॥
वैश्यात्मजागमन हें जेंवि अवसरासयुक्त तोकं-वच ॥
स्वीकारूनि गुणज्ञ प्रभु घे स्वरथीं चढोनि तो कवच १११

१ सारथि. २वाईट. ३श्रीकृष्णास. ४अपराधी. ५मुलाचें बोलणें.

ज्याला न्याय ह्मणे हूं कारुण्य ह्मणे धरूं नको दंड ॥
तो श्रीमदजातारि स्वरथीं बसतां धरून कोदंड ॥ ११२॥
चढले रथीं भुजांतें भ्राते भीमादि सर्व थापटुनी ॥
धरिलाचि रणोत्साह त्यजुनि मरण-भीति सर्वथा पटुनीं ॥
पाहुनि अजातरिपुची तादृक् गुरुचरण-भक्ति गहिवरले ॥
अहिवर-लेखवरांहुनि बहु कठिणहि यवन-वीर गहिंवरले ॥

# अध्याय २.

## प्रथमदिनयुद्ध.

भीष्म पुढें करुनि उठे प्रथम सुयोधन करावया कदन[३] ॥
भीम पुढें करुनि उठे धर्म[१] प्रभु जो सुकीर्तिचें सदन ॥ १ ॥
लीलेनें द्विडिभांचा[४] न मद लव स्थापिता महान रणीं ॥
न दिसों देचि जनां तव लेश अवस्था पिता महातरणी[५]॥२॥
भीमाचा सिंह-ध्वनि करिबल-धैर्या अपाय देवाजी ॥
लक्षांत एकाहि पुढें यत्न-शतेंही न पाय दे वाजी ॥ ३ ॥
भीमाच्या सिंह-रवें हगले मुतले समस्त गज वाजी ॥
ह्मणाति न असमदसूंहीं[६] याकरवीं अंतकासि यजवा[७] जी ॥४॥

---

१ धर्म. २ शेष व देव यांहून. ३ युद्ध. ४ शत्रुरूपी गजांचा. ५ सूर्य. ६ आमचे प्राण. ७ बळी द्या.

भीमाचा सिंह-ध्वनि कोणासहि आयकों न दवे १०१ ॥
सोडुनि समाधि मस्तक डोलविलें आयकोन देवाद्यें ॥
शल्य-युधिष्ठिर-भीष्मार्जुन-भीम-सुयोधनादि हे तु०२ ॥
युद्धें करिते झाले स्व-पर-विनाशीं तुझींच हेतु मुलें ॥ न॥
सहदेव दुर्मुखाशीं गुरु-पुत्रासीं करी रण शिखंडी ॥ ०३॥
राक्षस अलंबुष घटो- त्कच भिडले बहु जसे अहि शिखंडी ॥
दुःशासन नकुळासीं धृष्टद्युम्नासवें भिडे द्रोण ॥ ४
सात्यकिसीं कृतवर्मा द्वंद्वें वर्णील तीं किती कोण ॥ ८ ॥ ॥
युद्धें जिकडे तिकडे शोणित-गंधें समस्त भट भुलले ॥ ५
स्वपरक्षतजोक्षित ते जेंवि वसंतीं पलाश-तरु फुलले ॥९॥
येउनि वराप्सरा अव- लोकी राजन्य-संगरा ज्या जी ॥
ती उदितर वांछीना जेंवि सती अन्य-संग राजाजी ॥१०
वर्णित होत्या आधीं वीरांच्या शुद्ध सुर-वधू लीला ॥
निंदावें परि निंदित नव्हत्या त्या रुद्ध-सुरव-धूलीला १
बहु साधुहि साधूतें वधिते झाले जसे खळ खळांतें ॥
जें तद्रक्त वहातचि होतें वर्षांबुसें खळखळां तें ॥ १२ ॥
भांडोनि भागला बहु भगवान् भार्गवहि करुनि पण ज्यासीं
संगर करिता झाला अभिमन्यु कुमार त्या स्वपर्णज्यासीं ॥
भीष्म-शर-हत-विराट- क्षितिप-सुत श्वेत [illegible] अमर मेरो॥
वदले सुरेंप त्यातें बा चिर नाकीं महेंद्र-सम रम रे ॥१४॥

---

१ शंकरानें. २ सर्व. ३ मोर. ४ आपल्या आणि शत्रूंच्या रक्तानें ५ हे धृतराष्ट्रा. ६ रोधिला आहे शब्द जीनें. ७ पावसाळ्यांतील पाण्यासारखें. ८ भीष्माशीं. ९ स्वर्गांत.

ज्याला
तो श्रीम
चढले
धरिल
पाहुनि
अ